म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९२८८
९६५३

पंडित दामोदर कवि विरचित

# वस्त्रहरण

प्रो. दत्तात्रय सितोराम पंगु.

REFBK-0008082
REFBK-0008082

दा.स्प.
८०६२
१९५३

काव्य. १२२६

नों. नं.

१४८३९
२८।८।५३

का. काव्य
१२२६

पंडित दामोदर कवि विरचित

# वच्छहरण

[ मूळ संहिता, प्रस्तावना,-टीपा स्पष्टीकरण, शद्बकोश व भाषाशास्त्रविषयक परिशिष्टांसह ]

( सुधारून वाढविलेली द्वितीयावृत्ति )

संपादक

दत्तात्रय सीताराम पंगु

राजाराम कॉलेज, कोल्हापूर

REFBK-0008082

रामकृष्ण बुक डेपो गिरगांव, मुंबई ४

द्वितीयावृत्ति-१९५३

प्रकाशक : **वि. र. वाम,** रामकृष्ण बुक डेपो मुंबई ४.
मुद्रक : **कृ. ना. सापळे,** रामकृष्ण प्रिंटींग प्रेस दादर-मुंबई.

माझे विद्यालयीन गुरु

**प्रो. श्रीकृष्ण नीळकंठ चापेकर**

माजी मराठीचे प्राध्यापक

डेक्कन कॉलेज, पुणें,

यांच्या स्मृतीस

# प्रो. द. सी. पंगु यांचे ग्रंथ

## संशोधनात्मक

(१) सामराज (२) प्राचीन मराठी कविपंचक (३) मुक्तेश्वर-कृत **विराटपर्वा**ची अनेक प्राचीन हस्तलिखितांवर तयार केलेली पाठशुद्ध प्रत (मुक्तेश्वरावरील संशोधनात्मक प्रस्तावनेसह).

## संपादित

(४) **वस्त्रहरण** (द्वितीयावृत्ति.) (५) **सीतास्वयंवर**-नागेश. (६) **वनपर्व-मुक्तेश्वर** (द्वि. आ) (७) **लवकुशोपाख्यान**-मोरोपंत. (८) **ज्ञानेश्वरी** अ. १२ (द्वि. आ.) (९) **ज्ञानेश्वरी** अ. १६ (द्वि. आ.) (१०) **सभापर्व**-मुक्तेश्वर (११) **सीतास्वयंवर**-विठ्ठल बीडकर. (१२) **ज्ञानेश्वरी**-अ. १. (१३) **ज्ञानेश्वरी**-अ. १५.

## टीका-प्रबंध

(१४) आस्वाद, (१५) तुषार, (१६) पुष्पांजलि.

८०८२

# प्रस्तावना

बारावें शतक महाराष्ट्राच्या धार्मिक व वाङ्मयीन इतिहासाच्या दृष्टीनें अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असेंच आहे. वारकरी व नाथपंथाचा प्रसार, रामदेवराय–हेमाद्रीसारख्या कुशल राजपुरुषांची राजवट व मुकुंदराज–ज्ञानेश्वरादि साक्षात्कारी संतांची वाङ्मयद्वारा शिकवण, हे या शतकाचे कांहिं विशेष म्हणून सांगतां आले, तरी एकंदरीनें स्मृतिप्रणीत आचाराच्या व शंकरप्रणीत अद्वैत तत्त्वज्ञानाच्या अनुक्रमें संकुचितपणामुळें व अनाकलनीयतेमुळें, बहुजनसमाज त्यापासून सर्वस्वी उदासीन असल्याचेंच स्पष्ट दिसून येतें. ब्राह्मण, क्षत्रीय व वैश्य हे त्रैवर्णिक, व्रतोद्यापनांत, क्षुद्रदेवतांच्या व भुताखेतांच्या पूजेंत गर्क होऊन राहिल्यामुळें, खऱ्या वैदिक धर्मापेक्षा वरवरच्या आचारांनाच बेसुमार महत्व कसें प्राप्त झालें होतें, हें 'चतुर्वर्गचिंतामणी' सारख्या ग्रंथावरूनही समजून येण्यासारखें आहे. ब्राह्मणवर्गांत पांडित्य भरपूर असलें, तरी भावनेला पारखा होऊन बाह्य नियमांचें स्तोम त्या कालीं त्यानें कसें माजविलें होतें, याची साक्ष ज्ञानेश्वर व त्यांचीं भावंडें यांचा पैठणकर ब्रह्मवृंदाकडून झालेला धार्मिक छळ आजही स्पष्टपणें देत आहे. वेद व वैदिक तत्त्वज्ञान यांचा अधिकार फक्त त्रैवर्णिकांनाच असल्यामुळें, बहुजनसमाज म्हणून ओळखली जाणारी स्त्रीशूद्रअंत्यजादि अज्ञजनता पारमार्थिक ध्येयाच्या बाबतींत हताश व दिङ्मूढ होऊन बसली असल्यास नवल तें काय ? अशा या आचारविचाराच्या, दादागिरीच्या व भगवान् श्रीकृष्णाच्या गीताधर्माच्या अथवा मोक्षधर्माच्या ग्लानीच्या कालांत, श्रीचक्रधरस्वामींनीं आपल्या महानुभावपंथस्थापनेनें अज्ञ बहुजनसमाजाला त्याच्याच बोलभाषेंत परमेश्वर भक्तीचा अथवा मोक्षमार्गाचा जो सुलभ असा उपदेश केला, तोच या शतकाचा खरा अनन्यसाधारण विशेष होय असें मानणें प्राप्त आहे.

श्रीचक्रधरांनीं आपल्या पंथाच्या प्रचार–कार्यासाठीं महाराष्ट्राची निवड करून त्याला धर्मक्षेत्राचे दिलेलें स्वरूप, मराठी भाषेला प्राधान्य देऊन तिला देववाणीची दिलेली प्रतिष्ठा, या गोष्टीं पुढील शतकांतील वाङ्मयविकासाला एवढ्या उपकारक झाल्या कीं, मराठी भाषिकांनीं श्रीचक्रधरांचें कायमचें ऋणी रहावें !

## श्रीचक्रधर व त्यांचा महानुभावपंथ

महानुभावपंथाचे आद्य-प्रवर्तक श्रीचक्रधर हे देवगिरीच्या यादवांच्या उत्तरकालीन राजवटींत सिंघण राजाच्या कारकीर्दींत विद्यमान होते. सिंघणाची ( इ. स. १२१०-१२४७ ), कन्हरदेवाची ( १२४७-१२६० ) महादेवरायाची ( १२६०-१२७१ ) व रामदेवरायाची ( १२७१-१२७३ ) अशा कारकीर्दी त्यांनीं पाहिल्या असल्यानें, इ. स. १२७३ पर्यंत म्हणजे शेवटीं ते बदरिकाश्रमीं जाईपर्यंत, महाराष्ट्रांतच संचार करीत होते असें म्हणावें लागतें. सिंघणानें गुजराथेंत ज्या स्वाऱ्या केल्या, त्यांपैकीं एकीमध्यें भरवस ( भडोच ) प्रांताच्या राजसेनेचें आधिपत्य चक्रधराकडे होतें, अशी महानुभावपंथीची समजूत आहे. हा गुजराथच्या चढाईचा काल इ. स. १२१६-१९ असल्यामुळें, यापासून प्रयाणापर्यंतचा चक्रधरांच्या आयुष्याचा बहुतेक भाग विदर्भ, झाडीमंडळ, औरंगल, पैठण व श्रीनगर ( सिन्नर ) या प्रांतांत गेला. पूर्ववयांत आपला मूळचा 'लाट' दक्षिण-गुजराथ कायमचा सोडून देऊन व रामटेकच्या यात्रेचें निमित्त पुढें करून श्रीचक्रधर रिद्धपुरास आले, व तेथें असणाऱ्या गोविंदप्रभु नामक विदेही वृत्तीच्या विरक्त पुरुषाचें दर्शन घेऊन व प्रसादस्वीकार करून, त्यांनीं यानंतरचा १२ वर्षांचा काल रानाडोंगरांत तपाचरणांत घालविला.

अशा प्रकारें देहीविदेही स्थितींत सातपुडा झाडीमंडळांत बारा वर्षें घालविल्यावर, चक्रधरांनीं शिष्यपरिवार न जमवितां एकाकीपणानें बरींच वर्षें सर्व प्रांतभर भ्रमण केलें. आज औरंगल तर उद्या भानारा ( भंडारा ), कधीं गोंडवण झाडीमंडळ तर कधीं अचळपुर ( एलिचपुर ) अशा अनियमित संचरणांत त्यांनीं सुमारें ३०-३२ वर्षें घालविलीं. या काळांत भांडारा येथें त्यांना आपला पहिला अनुयायी 'दामोदरभट ऊर्फ दादोस हा लाभला; एलिचपुरचा रामदरणा म्हणून देवगिरीकरांचा एक मांडलिक होता, त्याचा स्नेह त्यांनीं संपादन केला; आंध्र देशांत वास्तव्य व कमलनायकाची मुलगी हंसांबा हिच्याशीं परिणय करून कांहीं काल ते गृहस्थाश्रमी बनले; पुनः वैराग्यवृत्ती बाणून झाडीमंडळांत त्यांनीं भ्रमण केलें व लोणार क्षेत्रीं महादेवरायाची भेट झाल्यानंतरच संचार करीत ते पैठण येथे येऊन व नागांबिका ऊर्फ बाईसे नांवाच्या एका पयोव्रतधारी वृद्ध स्त्रीला अनुग्रह देऊन अवतार-

कार्यार्थ प्रगट झाले. कन्हरदेवाची कारकीर्द स. १२६० मध्यें संपली असल्यानें, कन्हरदेवाशीं त्यांची भेट इ. स. १२५६ च्या मानानें झाली असावी व त्यामुळें त्यांचा पैठणास प्रगट होण्याचा काल महादेवरायाच्या ( १२६०–१२७१ ) कारकीर्दींत मानावा लागतो.

पैठणच्या दिशेनें प्रवास करीत असतांनाच ज्याच्या मार्फत चक्रधाकडे नागदेव व त्याच्या आप्तसंबंधीयांचा परिचय वाढला, त्या रामदेव ऊर्फ दादोसची भेट झाली. पुढें चक्रधर श्रीनगर येथें असतां, नागदेव हा आपली आई आबाइसे, बहीण उमाइसे, चुलत बहीण रूपाइसे ऊर्फ महदाइसे, यांना बरोबर घेऊन चक्रधरांच्या दर्शनास आला, व हा घरोबा वाढत जाऊन हें सर्वच कुटुंब सर्वस्वी चक्रधराच्या भजनीं लागलें. चक्रधरांच्या दर्शनानंतर नागदेवाच्या वृत्तींत फरक पडूं लागून, पुढें वारंवार झालेल्या भेटींपैकीं, ६ व्या भेटींत वैराग्य बोध दृढ झाल्यावर, ७ व्या भेटींत नागदेवानें त्यांचा अनुग्रह घेतला. यानंतर ४ वर्षांनीं चक्रधर शके ११९४ श्रीमुख संवत्सरीं महोमासी शु. ४ सोमवारीं बदरीकेदारीं निघून गेले.

पैठण. येथें प्रगट होऊन बदरीकेदारास जाईपर्यंत चक्रधरांचा ७–८ वर्षांचा काल नित्य पर्यटनांत जात असे. एकाच ठिकाणीं ते फार दिवस राहत नसत. त्यांच्या दर्शनास जरी कोणाची बंदी नव्हती, तरी त्यांनीं आपल्या भोंवतीं भक्तमंडळीची गर्दी कधींच जमवली नाहीं, किंवा आपलें सिद्धांत प्रतिपादन करीत व सभा जिंकींत ते कोठें हिंडलें नाहींत. जी जिज्ञासू, आर्त अगर ज्ञानी मंडळी त्यांच्या दर्शनास येई व सहजपणें ज्या चर्चा चालत, अगर एखादा विषय निघून प्रसंगप्राप्त असें जें निरूपण होई, त्याखेरीज वादविवादांचे असे आखाडे त्यांच्या बैठकींत पडत नसत. अशा वेळीं निरूपण करीत असतां, आपला आशय श्रोत्यांना सुगम व्हावा म्हणून चक्रधर अनेक दाखले, उदाहरणें व दृष्टांत यांनीं सजवून तो सहजगम्य करीत असत. महानुभावांत चक्रधराला केवळ पंथसंस्थापकच नव्हे, तर साक्षात् ईश्वरावतार मानतात. त्याचें चिंतन करणें, त्याच्या लीला आठवणें, त्याच्या शिकवणुकी· प्रमाणें आचरण ठेवणें, त्याचा संबंध असलेल्या वस्तूंना पवित्र लेखणें, व तो राहिलेल्या स्थळांची यात्रा करणें, यांतच या पंथाचें सारसर्वस्व सामावलें आहे.

'लीला चरित्रा'च्या सर्व पाठांत चक्रधर अखेरीस 'उत्तरा पंथें' गेल्याचा वृत्तांत आला आहे. मात्र कांहीं पाठांत रामदेवराव यादवानें वेलापूर (जि. अहमदनगर) येथून चक्रधरास नेऊन देवगिरींत ठार केलें, पण तो लगेच जिवंत झाला, व 'उत्तरपंथें' गेला अशी या पूर्वीची अद्भुत हकीकत आली आहे. शेवटच्या लीला ६०२ मध्यें, चक्रधर उज्जनीस असल्याची अफवा नमूद केलेली असून, ही लीला म्हणजे 'स्मृतिस्थळ' २३२ होय.

## नागदेवाचार्य

चक्रधराच्या पश्चात् नागदेवानें ऋद्धिपुरास श्रीगोविंदप्रभूची सेवा केली, व शके १२०८ मध्यें गोविंदप्रभु वारल्यावर तो निंव (जि. परभणी मोंगलाई) येथें राहूं लागला. हा पंथाचा आद्याचार्य होय. नागदेवाच्या बापाचें नांव महादेवभट व आईचें आवाइसें असून, त्याची पत्नी गंगाइसा व पुत्र महेश्वर होता. नागदेव तारुण्यांत अनेक ढांढाळांचा असून, पुढें रामदेव ऊर्फ दादोस याच्यामुळें तो निवळला व त्याच्याचमुळें त्याची श्रीनगर ऊर्फ सिन्नर येथें चक्रधराशीं प्रथम भेट होऊन त्याचा तो पट्टशिष्य बनला. चक्रधरापासून नागदेवानें संन्यासदीक्षा घेतली होती.

उर्वरित आयुष्यांत नागदेवानें चक्रधराच्या आदेशानुसार पंथप्रसार केला. तो स्वतः विद्वान् नसला, तरी म्हाइभट, गोपाळपंडित, केशोबास, दामोदर-पंडित, भास्करभट्ट असे थोरथोर विद्वान् त्यानें आकर्षित केले, यावरून त्याच्या 'वेधवंती' पदवीची यथार्थता पटते. संस्कृत भाषेचेंही त्याला कळण्यापुरतें ज्ञान असून, मराठी भाषेवर तर त्याचें उत्कट प्रेम होतें. रसिकता, विनोदबुद्धि व शिष्याबद्दलची आपुलकी हे गुण असून सुद्धां, त्यांच्यावर करडी नजर ठेवण्याइतका तो कणखर होता. त्याची लीनता अथवा विनयही उल्लेखनीय असून, शिष्यांना स्वतःच्या पायांवर मस्तक ठेवून नमस्कार करूं न देणें, आपलें पादतीर्थ घेण्यास त्यांना मनाई करणें, स्वतःस फक्त 'भटो' म्हणविणें, व मृत्युसमयीं हात जोडून सर्व शिष्यांची क्षमा मागणें, इत्यादि गोष्टीं त्याच्याबद्दल मनांत आदर उत्पन्न करतात. 'हा गाः श्रीचक्रधराचेनि प्रसादें इतुलें ही नेणें:' असें स्वतःबद्दल त्याचें नेहमीं म्हणणें, व चक्रधरांच्या वर्तनांतल्या व वागणुकींतल्या बारिकसारिक गोष्टींचेंही अनुकरण करणें, यांवरून तो श्रीचक्रधराशीं किती एकरूप झाला होता, हें दिसून येतें.

[handwritten accession number, illegible] 2.6.1957

याप्रमाणें पंथप्रसार करून नागदेवानें देह ठेवला. त्याचा काळ १२२४ शुभकृत संवत्सरीं भाद्र. व. १२ ला झाला असें, सांप्रदायिकरीत्या मानण्यांत येते. पण 'स्मृतिस्थळां'तील अंःतःप्रमाणावरून तो मान्य करतां येत नाहीं असें श्री. वा. ना. देशपांडे यांचें म्हणणें आहे. शके १२३१ त रामदेव यादवाच्या निधनप्रसंगीं ज्याअर्थीं नागदेव हयात होता, व त्याच्या तोंडीं 'ना मी वर्तें तंव मऱ्हाटें ( यादवांचें राज्य ) वर्तैल' अशी भविष्यवाणी ज्याअर्थीं घालण्यांत आली आहे, त्याअर्थीं शके १२३४ त यादवराज्य बुडण्यापूर्वीं केव्हां तरी नागदेव वारला असला पाहिजे हें निर्विवाद ठरतें. अर्थात् नक्की शक जरी सांगतां आला नाहीं, तरी शके १२३१ ते १२३४ च्यां दरम्यान केव्हां तरी नागदेव मरण पावला असला पाहिजे, असें धरून चालणें प्राप्त आहे.

## चक्रधरोक्त सूत्रपाठ

महानुभावपंथसंस्थापक श्रीचक्रधर यांचें चरित्र त्याचा शिष्य म्हाइंभट यानें 'लीळाचरित्रां'त वर्णिलें आहे. लीळाचरित्रांत चक्रधराच्या तोंडचीं म्हणून जीं जीं वचनें आलीं, तीं सर्व निवडून नागदेवशिष्य केसोबास यानें संगृहित केलीं. तोच हा सूत्रपाठ असून त्याला महानुभाववाङ्मयांत, 'श्रुति' असें म्हणतात. सूत्रपाठांचें ग्रथन चक्रधरानें 'उत्तरापंथें' प्रयाण केल्यानंतर म्हणजे सांप्रदायिक समजुतीप्रमाणें, शके ११९४ नंतर लवकरच घडून आलें आहे. या सूत्रपाठाचे ( १ ) अन्यव्यावृत्ति ( २ ) युगधर्म ( ३ ) विद्यामार्ग ( ४ ) संहार ( ५ ) संसरण ( ६ ) महावाक्य ( ७ ) निर्वचन ( ८ ) उद्धरण ( ९ ) अस्तीपरी ( १० ) आचार ( ११ ) विचार असे आकरा विभाग असून, या शिवाय खुद्द केशोबासानेंच तयार केलेल्या 'दृष्टांत' नामक बाराव्या प्रकरणांत, चक्रधरानें वरील सूत्रांवर विशदीकरणार्थ सांगितलेले दृष्टांत एकत्रित केले आहेत. 'आचार' व विचार यांचें अनुक्रमें 'आचारमालिका' व 'विचारमालिका' असे पुरवणीविभाग असून, ते भास्करभट्ट कवीश्वराचा शिष्य परशरामव्यास यानें संगृहित केलेले आहेत. याशिवाय 'सूत्रपाठांत' पूर्वी, पंचकृष्ण, व पंचनाम ही तीन प्रकरणें आरंभींच येतात. उपरिनिर्दिष्ट ११ प्रकरणापैकीं पहिल्या ९ प्रकरणांस 'लक्षणप्रकरण' अशीं संज्ञा असून, या लक्षणप्रकरण व विचार यांत चक्रधराचें तत्त्वज्ञान

व ‘आचारांत’ महानुभावांनीं आपलें आचरण कसें ठेवावें, या संबंधींच्या त्याच्या आज्ञा ग्रथित केल्या आहेत.

## अवतारकल्पना

सूत्रपाठांत परमेश्वर जीवाचे अज्ञानबंध छेदण्यासाठीं युगोयुगीं अवतार घेतो, ही कल्पना, “(परमेश्वर) अनंतीं अवतारीं अवतरले :: तरि मागां अवतरले होते : साउमे अवतरति” याप्रमाणें अनेक सूत्रांत गुंफली आहे. कृतयुगांत हंसावतार, त्रेतायुगांत दत्तावतार, द्वापरयुगांत कृष्णावतार व कलियुगांत चक्रधरावतार असें चार युगाचे चार अवतार, महानुभावांत मानले जातात. पण महानुभावांचा त्रेतायुगांतील दत्तावतार, हा ब्रह्मा-विष्णु-महेश यांची एकवटलेली त्रिमुखी षड्भुजा मूर्ति नसून, तो एकमुखी व चतुर्भुज समजला जातो. पुनः दत्तात्रयाप्रमाणें द्वापारींचा अवतार जो कृष्ण, त्याचाही पूर्ण ब्रह्मावतार या नात्यानें चक्रधरानें चार अवतारांत समावेश केला आहे. उत्तर हिंदुस्थानांतील महानुभवांत कृष्णभक्ति व दक्षिण हिंदुस्थानांतील महानुभावांत दत्तभक्ति विशेष प्रचारांत आहे, असें सर्वसाधारणपणें म्हणतां आलें, तरी हंस, दत्तात्रय व कृष्ण या अनुक्रमें कृत-त्रेता-द्वापरीच्या अवताराप्रमाणेंच चक्रधर हा कलियुगांतला परमेश्वरावतार, असा महानुभावांचा जसा समज आहे, तसा तो खुद्द चक्रधराचाहि होता.

या चार अवतारांखेरीज महानुभावांत ‘पंचकृष्णां’ना पूजार्ह मानलें गेलें असून, दत्त, कृष्ण व चक्रधर या तीन ‘कृष्णां’त, चांगदेव राऊळ व गुंडम राऊळ यांची गणना केली कीं, ‘पंचकृष्ण’ सिद्ध होतात. सूत्रपाठांत ‘पंच-कृष्ण’ म्हणून जें प्रकरण आहे, त्यांत या पांचांचा उल्लेख आला असून, प्रतिष्ठानचा चांगदेव राउळ, म्हणजे सांप्रदायिक दृष्ट्या चक्रधरच असें मानलें गेलें आहे. पूर्वी द्वारावती येथे चांगदेव राउळ नामक एक मोठा सिद्ध पुरुष होता. त्याजवर कामाख्या नांवाची हठयोगिनीं फिदा होऊन त्यांच्या अंगसंगासाठीं हट्ट धरून बसली. विरक्त चांगदेवानें तिला वैराग्याचा उपदेश करून पाहिला पण व्यर्थ! शेवटीं वैतागून जाऊन चांगदेवानें देहत्याग केला! पण याच वेळीं हरपाळदेव (चक्रधर) हा भडोचला अकालीं मृत्यु पावला होता, त्याच्या कुडींत चांगदेवाच्या आत्म्यानें योगमार्गानें

शिरून त्याला पुनः जिवंत केलें! यामुळें हरपाळदेव ( चक्रधर ) याला केव्हां केव्हां चांगदेव राऊळ या नांवानेंच संबोधण्यांत येऊं लागलें. पंचकृष्णांतील गुंडम राऊळ हे तर ऋद्धिपूरचे गोविंदप्रभु असून, यानींच हरपाळदेवाचें 'चक्रधर' असें नांव ठेवलें.

## महानुभाव तत्त्वज्ञान

तथापि महानुभाव तत्त्वज्ञानाचा विचार करतां जीव, जगत् व परमेश्वर या वेदांतांतील त्रिकुटाऐवजीं जीव, देवता, प्रपंच ( जगत् ) व परमेश्वर ही चार मूलद्रव्यें येथें गृहीत धरलीं आहेत, व त्यांचेंच विवरण सूत्रपाठांत प्रामुख्यानें केलेलें आहे. यांपैकीं देवता या नित्यबद्ध, जीव बद्धमुक्त व परमेश्वर नित्यमुक्त असें थोडक्यांत त्यांचें वर्णन करतां येईल.

देवतांना नित्यबद्ध म्हणण्याचें कारण असें कीं, चक्रधरांच्या मतें उच्च देवता जशा कधीहीं नीच होऊं शकत नाहींत, तशा नीच देवताही उलट उच्च होत नाहींत. जीव हे अनादिकाळापासून अविद्यायुक्त असल्यामुळें बद्ध आहेत, पण ज्ञानानें ते मुक्त होऊं शकत असल्यानें, त्यांना 'बद्धमुक्त असें म्हटलें आहे.

सूत्रपाठांत **जीवाचें** लक्षण, 'नित्यः केवलः अनादिः अविद्यायुक्ताः वस्तु एकु आतिः ते जीवशब्दें जाणिजे' असें दिलें आहे. येथे 'नित्य' म्हणजे तिन्ही काळीं राहणारा, व 'केवळ' म्हणजे त्रिगुणरहित असे या दोन शब्दांचे अर्थ आहेत. नित्य व केवल या गुणांनीं जीव हा परमेश्वरासारखा वाटतो खरा, पण त्या दोघांत फरक हा कीं, जीव हा प्रारंभापासून अविद्यायुक्त, तर परमेश्वर हा ज्ञानसंपन्न व मुक्त आहे. यासाठींच जीवाला, अविद्येचा नाश करण्यासाठीं परमेश्वरसेवा करावी लागते, व म्हणून जीव व परमेश्वर यांचा सेव्यसेवक संबंध जडतो असा चक्रधरांचा सिद्धांत आहे. "जीवेश्वरा स्वामीसंबंध हा अनादीचा". या सूत्राप्रमाणें, जीवाला नित्य व अनादि म्हटल्यानें तो जन्ममरणानंतरहि शिल्लक राहतो, असें ओघानेंच म्हणावें लागतें.

जीव हा मूळचा अगदीं शुद्ध आहे. पण अनादिकाळापासून तो अविद्यायुक्त असल्यामुळें, निष्क्रिय किंवा कोणतेंही कार्य करण्यास असमर्थ होतो. तो ज्ञानयुक्त व समर्थ होऊन त्यानें सृष्टिरचना करावी हें जाणून, जीवाबरोबर त्याच्याच परिमाणाएवढा मायास्वरूपाचा अंश परमेश्वरी इच्छेनें दिला गेला

आहे. या अंशाला 'संलग्न' अशी संज्ञा असून, हा जीवाबरोबर सतत असतो. शुभाशुभ कर्मे करण्याच्या स्वतःच केलेला निर्देश विसरणाऱ्या जीवाला, 'संलग्न', त्या निर्देशानुसार तें तें कर्म करण्याची प्रेरणा देतो. तथापि जीव भोगतो तींच सुखदुःखें संलग्नाला भोगावीं लागतात, आणि जीव मुक्त होताच संलग्नही मुक्त होतो. मात्र हा संलग्न जीवाला लागतांक्षणीं त्या जीवाला वस्त्राची–आच्छादनाची–वासना होते, व या वासनेमुळें त्या संलग्नाला पाहतांच, जीव मायेच्या प्रेरणेनें "चैतन्यमहं" म्हणजे 'मी माया आहे' असें म्हणतो. सूत्रपाठांत माया, चैतन्य, विदेह, परा व शक्ति, हे सर्व शब्द समानार्थी मानले आहेत. पण जीव–संलग्नांची सांगड घातली गेल्यामुळें, जीवानें मी चैतन्य किंवा माया आहे असें म्हणताच, 'संलग्नही' 'चैतन्यमहं' असें म्हणूं लागतो. याप्रमाणें जीव व त्याचा संलग्न या दोघांनांही आपण चैतन्य अथवा मायारूप आहों असे मिथ्याज्ञान होतें, व असें मिथ्याज्ञान झाल्यावर जीवाला चैतन्य मायेचा जसा 'मल' लागतो तशी संलग्नालाही याच वळीं मलाची उपाधि जडते. यानंतर जीव हा संलग्नांच्या प्रेरणेनें 'विश्वमहं' प्रकृतिरहं इ० क्रमानें म्हणतो व त्याला 'मी विश्व आहे,' 'मी प्रकृति आहे', या मिथ्याज्ञानानें 'विश्व' प्रकृति वगैरे देवतांचा मल जडतो. जीवाबरोबरच संलग्नालाही त्या त्या देवतेचा मल लागतो, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

महानुभाव तत्त्वज्ञानांत देवतास्वरूपाचें सूक्ष्म शरीर अथवा लिंगदेह या अर्थी 'मल' हा शब्द योजलेला असून, ८१०१२५०१० या मानल्या गेलेल्या देवतांच्या संख्येएवढीच जीवाला जडणाऱ्या मलांची संख्याही मानली गेली आहे. हे मल लागण्याचें कारण असें कीं, जीव हा मूळ अव्यक्त असून, त्याला परमेश्वराव्यतिरिक्त कोणीही पाहूं शकत नाहीं. खुद्द माया सुद्धां प्रत्यक्ष जीवाला पाहूं शकत नसल्यानें, भ्रमानें त्याच्या अविद्येलाच जीव म्हणते. पण जीवाला त्याच्या शुभाशुभ कर्मानुरूप फल देणें हें तर उपरिनिर्दिष्ट असंख्य देवतांचें कर्तव्य असल्यामुळें, व जीव तर अव्यक्तच असल्यानें, अशा अव्यक्ततेच्या आवरणाखालीं झांकलेल्या जीवांचें बरें वाईट कर्म देवतांना कळावें, म्हणून सृष्टिसंचलनाठीं जीवाला एरएक देवतेच्या मलाची जोड देण्यांत येऊन त्यायोगें तो देवतांना व्यक्त झाला. अशारितीनें या अनेक मलासहच जीव सृष्टींत जन्म घेतो.

जीवाला प्रथमच जो चैतन्यमायेचा मल लागतो, त्याला 'आद्यमल' असें, चक्रधरानें म्हटलें आहे. हा 'आद्यमल' म्हणजे चैतन्यमायेचें सूक्ष्मशरीर, जीव व त्याचा संलग्न यांना लागतांच, ते संकुचित होऊन चैतन्यमायेला दृग्गोचर होतात. पण चैतन्यमायेला ते दृग्गोचर झाले, तरी सर्वच देवतांना ते तसे होतात असें नाहीं. तर ज्या ज्या देवतेचा मल लागेल, ती ती विशिष्ट देवताच जीव व संलग्न यांना पाहूं शकते. याप्रमाणें चैतन्यमायेपासून प्रारंभ होऊन जीवाला उपरिनिर्दिष्ट ८१०१२५०१० या सर्व देवतांचे मल जडतात! प्रत्येक देवतेचा मल जडूं लागला, तरी जीवाची वस्त्राची वासना पूर्ववत् कायम राहते. पण या देवतांपैकीं शेवटची जी कर्मभूमीची देवता, तिचा मल लागूनही जेव्हां जीवाची वस्त्राची वासना नाहींशीं होत नाहीं, तेव्हां त्याला अखेर मनुष्यदेहाची प्राप्ति होते. म्हणजे मनुष्यदेह प्राप्त होईपर्यंत जीव प्रत्येक देवतेचा मल घेत जातो, व तो एकदा मनुष्य देह धारण करून जन्मास आला कीं, त्याला पूर्वजन्मांतील कर्माकर्माप्रमाणें पुढील जन्माची प्राप्ति होते. प्रत्येक जन्म घेतांना मात्र जीवाला पहिल्यासारखेंच देवतांचे हे मल जडवून घ्यावे लागवात.

शिवाय जीवाची अनादि काळची अविद्या ज्ञानाशिवाय नष्ट होत नाहीं, व ज्ञान तर जीवानें मनुष्यदेह घेतल्याशिवाय मिळावयाचें नाहीं, असा चक्रधरांचा सिद्धांत असल्यामुळें, जीव मनुष्यदेहधारी होतो, व परमेश्वर अवतार घेऊन त्याला ज्ञानदान देतो. जीव असो किंवा परमेश्वर असो, त्याला अव्यक्त स्वरूपांत कांहींच करतां येत नाहीं, यामुळें या दोघांनाही अव्यक्तांतून व्यक्तांत यावें लागतें. पुनः जीवाच्या अविद्येचा ब्रह्मज्ञानानें लोप होऊन, जीव मुक्त होतांच, चैतन्य-मायेच्या ज्ञानानें संलग्नही मुक्त होतो, म्हणजेच तो स्वस्वरूपीं रममाण होतो, अशी महानुभावांची जीवोद्धाराबद्दलची एकंदरीनें उपपत्ति आहे.

चक्रधरानें हिंदुधर्मापैकीं दत्त व कृष्ण या अवतारांचा महानुभावांच्या उपास्यदैवतात अंतर्भाव केला असून, बाकीच्या लक्षावधि **देवतांना** स्वतंत्र मूलद्रव्य बनवून टाकलें आहे. जीव व परमेश्वर यांच्याप्रमाणेंच देवताही नित्य आहेत. सूत्रपाठांतील अन्यव्यावृत्ति प्रकरणांत, कर्मभूमीच्या देवता, अष्टदेवयोनि देवता, अंतराळीचे गणगंधर्व, स्वर्गांचे इंद्रचंद्रादिक, कैलास-वैकुंठ-ब्रह्म लोकीचे हर, हरि, व ब्रह्मा, क्षीराब्धीच्या शेषशायी, अष्टभैरव, विश्वरूप देवता

आणि चैतन्यमाया इतक्या देवतांचा निर्देश केला आहे. या सर्व देवतांची संख्या ८१०१२५०१० इतकी आहे.

तथापि या सर्व देवता मूळ अव्यक्त असून, त्यांना परमेश्वराच्या आज्ञेनें साकार म्हणजे परिमित व्हावें लागतें. या साकार देवतांना 'ब्रह्मांडस्थ देवता' असें नांव असून, जीवाला त्याच्या कर्मानुसार त्या स्वर्गनरकादि फलें देतात. या ब्रह्मांडस्थ देवतांच्या स्वरूपापासून थोडथोडा अंश देहधारी जीवाच्या शरीरांत प्रवेश करतो, त्या अंशरूप देवतांना 'पिंडस्थ देवता' म्हणतात. ब्रह्मांडस्थ देवता संख्येनें जितक्या, तितक्याच पिंडस्थ देवताही असून, या ब्रह्मांडस्थ देवता मूर्तिधारी स्वतंत्र, तर पिंडस्थ देवता मनुष्याच्या देहांत मेदमांसरूपानें राहतात. यावरून पिंडनाश केल्यानें म्हणजे मनुष्यहत्या अगर आत्महत्या केल्यानें, ब्रह्मांडनाश केल्याचें म्हणजे ब्रह्मांडस्थ देवतांचा नाश केल्याचें पातक लागतें, असा चक्रधरानें निष्कर्ष काढला आहे. या सर्व देवतापैकीं, फक्त चैतन्यमाया ही अपरिमित असून, ती कधींही साकार किंवा परिमित होत नाहीं. अर्थात् ती ब्रह्मांडस्थ व पिंडस्थ देवतेचेंही स्वरूप धारण करीत नाहीं.

या देवतांचे उच्च देवता व नीच देवता असे दोन विभाग पडत असून, उच्च देवता नीच देवतेला पाहते, म्हणजे उच्च देवतेला नीच देवतेचें दर्शन व ज्ञान होतें, आणि दुसरीला पहिलीच्या अस्तित्वाची जाणीव असते, उच्च देवता नीच देवतेला व्यापून राहते, व देवतेची उच्चनीचता तिच्या स्वरूपाच्या परिमाणावरून ठरते, इत्यादि तपशीलावरून चैतन्यामाया ही सर्वांत श्रेष्ठ देवता असून कर्मभूमीच्या देवता या नीच देवता आहेत, असें दिसून येतें.

सूत्रपाठांत चैतन्यमाया व अष्टभैरव या देवतांचें विवेचन विशेष आलें आहे. परमेश्वराच्या खालोखाल चैतन्य मायेचेंच प्रस्थ असून, जीवाचे सर्व व्यापार चैतन्य मायेच्याच अनुरोधानें चालतात. अष्टभैरवांचें महत्त्वही कांहीं कमी नाहीं. स्वत: त्यानांहीं आपण सृष्टीची उभारणी व संहारणी करणारे आहो, असा अभिमान असतो. करालि, वीकरालि, उमापति, पशुपति, सदाशिव, ब्रह्मा, विष्णु, व महादेव असे हे अष्टभैरव प्रसिद्ध असून, नाद, बिंदु, कला,

लो, जोती, अवस्था, आनंद, व आवेश अशा त्यांच्या अष्टविद्या आहेत. तसेंच स्वच्छंद, ललीति, मंथन, भैरव, आदि व कादि हे त्यांचे आगम असून, वज्रोळि, आमरवोळि, दिव्यवोळि सिद्धवोळि या चार प्रकारच्या सिद्धी अष्टभैरवांच्या म्हणून प्रसिद्ध आहेत. देवतांचें निरूपण याहून अधिक केलें नसून, खुद्द चक्रधरानींच त्यांचें वर्णन करूं गेल्यास आपणास पृथ्वीएवढी पाटी व मेरूएवढी धूळ पुरणार नाहीं, असें म्हणून त्यांचें असंख्यत्व सूचित केलें आहे.

**प्रपंच** म्हणजे जगत् किंवा सृष्टि. पण सूत्रपाठांत प्रपंच हा 'स्वतंत्र पदार्थ' अर्थात् कारणरूपानें अनादिसिद्ध मानला आहे. सांख्यांचा परिणामवाद अथवा शंकराचार्यांचा विवर्तवाद चक्रधराला मान्य नसून, त्याच्या मतें प्रपंच हा स्वतंत्र पदार्थ आहे. याचा अर्थ कारणरूप प्रपंच अनादिसिद्ध व नित्य, तर कार्यरूप प्रपंच नाशवंत अथवा जीवकृत आहे. जीवाला 'आद्यमल' जडला तेव्हां तो सृष्टीचा विषय झाला, व नंतर त्यानें 'विश्वमहं' म्हणून विश्वरूप देवतेचा मल घेतला, तेव्हां कार्यरूप प्रपंच निर्माण झाला. हा प्रपंच अशाश्वत आहे.

कारणरूप प्रपंच अनादिसिद्ध असून अष्टभैरवस्थित आहे. प्रत्येक भैरवापासून आठ आठ भूतांचा समूह उत्पन्न होतो. 'भूत' म्हणजे ज्याला पुढें अवच्छेद जाऊं शकत नाहीं. असा प्रपंचाचा शेवटचा अंश या आठ भूतांत पंचमहाभूतें, व त्रिगुण यांचा समावेश होत असून, एक 'कारणभूत' व सात 'समलभूतें' असतात. अष्टभैरवांपासून प्रत्येकीं आठ आठ अशीं एकंदर ६४ भूतें निर्माण होतात, व या ६४ भूतांत सर्व मिळून ८ कारणभूतें व ५६ समलभूतें असतात. ही कारणभूतें आधार असून त्यांचीं समलभूतें हीं आधेय होत. प्रत्येक भैरवापासून निघणाऱ्या ८ भूतांच्या गटांत एक कारणभूत जरी नसलें, तरी त्याच्याशिवाय बाकीचीं सात समलभूतें 'निरुपयोगी' होतात, असा कारणभूत व समलभूत यांचा परस्परसंबंध आहे. वरील ६४ भूतांमधल्या ८ कारणभूतांचा मिळून विश्वरूप-देवतेचा मळ ऊर्फ सूक्ष्म शरीर बनतें, आणि त्यांतून ५६ समलभूतें जीं बाकी राहतात, तीं 'निरुपयोगी'च असतात. जीवाला ८ कारणभूतांचा झालेला

विश्वरूप देवतेचा मल जडल्यावर, कार्यरूप प्रपंच उत्पन्न करतो. भूत हें परमाणूसारखेंच नित्य आहे, व कार्यरूप प्रपंच संहारानंतर कारणरूप होऊन राहतो.

सूत्रपाठांत परमेश्वराचें स्वरूप त्रिविध वर्णिलें आहे. त्याचें एक स्वरूप 'सत्' म्हणजे मायोपाधिविरहित आहे, तें ब्रह्म होय; आणि दुसरें रूप 'आनंद' म्हणजे मायोपाधीनें युक्त आहे, तें ईश्वर होय. याखेरीज तो 'चित्' आहे म्हणजे त्याच्यांत मायेचाहि अंश वास करतो. याप्रमाणें सत्, चित् व आनंद किंवा ब्रह्म, माया व ईश्वर या तिहींचें एकवटलेलें द्रव्य म्हणजे परमेश्वर होय. म्हणुनच सूत्रपाठांत त्याला त्र्यंश म्हटलें आहे. सौंदर्य, आवदार्य लावण्य, दया, मया; सौभाग्य, कृपा, कारुण्य इत्यादि परमेश्वराचें अनंतगुण असून, नीत्यत्व, व्यापकत्व, सर्वआत्मकत्व, सर्वआतीतत्व, सर्वकर्तृत्व, सर्वसाक्षीत्व, असे त्याचे अनंत धर्म सांगितले आहेत.

निराकार व अव्यक्त **परमेश्वराला** जीवाचें कल्याण-अकल्याण, कांहींच करतां येत नसून, जीवाला ज्ञान देण्यासाठींच त्याला मनुष्यदेह धारण करावा लागतो. परमेश्वराचा मानवदेहधारी अवतार जीवाच्या म्हणजे भक्ताच्या भक्ति प्रेमाचा स्वीकार करून त्याला त्याच्या अधिकारानुरूप फल देतो. उलट निराकार व अव्यक्त परमेश्वराला तसें कांहींच करतां येत नाहीं. यामुळें प्रत्यक्ष परमेश्वराला सुद्धां जन्म-मरणाच्या फेऱ्या चुकवितां येत नाहींत परमेश्वर जो नरदेह धारण करतो, तो 'मायानिमित्त पुर मायापुर' असा मायेनें केलेला मायेचा दिव्य देह असतो. या देहांत प्रवेश करून परमेश्वर साकार होतो, व या साकार परमेश्वराच्या संनिधानानें देहधारी जीव आत्मकल्याण करून घेतात. हें 'संनिधान' दर्शन, आनुस्मरण, सेवा, व संबंध, असें चार प्रकारचें आहे. 'दर्शन' म्हणजे त्या परमेश्वराला पाहणें किंवा त्याच्या संन्निध असणें; आनुस्मरण म्हणजे तो अवतार विद्यमान असतां त्याचें स्मरण करणें; सेवा म्हणजे त्या अवताराची अगर त्याच्या संबंधित वस्तूची सेवाचाकरी करणें; आणि संबंध म्हणजे सदर अवताराचा स्पर्श झालेल्या माणसांचा व वस्तूंचा सहवास घडवून आणणें. या चार मार्गांनीं इष्ट हेतु साध्य करून घेतां येतो.

सूत्र पाठांत ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग व कर्ममार्ग हीं जीं मोक्षप्राप्तीचीं तीन साधनें, त्यांतील कर्ममार्ग अगदींच गौण मानला आहे. कर्मानें सर्व कांहीं प्राप्त झालें तरी, मोक्ष मात्र मिळणार नाहीं, असें सूत्रांत स्पष्टपणें म्हटलें आहे. क्वचित् ज्ञानाशिवाय मोक्ष मिळत नाहीं, व ज्ञानापेक्षां भक्ति श्रेष्ठ आहे, (ज्ञानापसि प्रेम (भक्ति) उत्तम) अशीं वरवर परस्पर विसंगत वाटणारीं वचनें आढळलीं, तरी, ज्ञान व भक्ति या दोन्ही साधनांनीं मोक्ष-सिद्धी होते, असें म्हणण्याकडे चक्रधराचा एकंदर रोख आहे. किंबहुना ज्ञान व भक्ति या दोन्ही मार्गांचा लागोपाठ अवलंब केला पाहिजे असें 'वेधूनि बोधीतिः कां बोधूनि वेधीति' या सूत्रानें सूचित केलें आहे. याप्रमाणें ज्ञान व भक्ति यांचा चक्रधरानें समन्वय केला असून, ज्ञानाचे शाब्द, सत्ता, सामान्य व विशेष असे चार प्रकार सांगितले आहेत. शाद्वज्ञान होऊन 'सत्ता' ज्ञान झाल्यावर जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर ही चार तत्वें प्रत्यक्ष दिसूं लागतात, 'सामान्य' ज्ञानानें पिंडस्थ देवता साधकाच्या शरीरापासून पृथक होऊं लागतात, व जीवाचे मल सुटूं लागतात. आणि 'विशेष' ज्ञानानें साधकाचें शरीर मेदमांसादि सप्तधातूपासून मुक्त होऊं लागून पुढें तर एका चैतन्य-मायेच्या आद्यमलाखेरीज जीवाचें सर्व मल नाहींसे होतात. शेवटीं अविद्यानाशानें जीवाचा उर्वरित आद्यमलहि गेल्यावर परमेश्वर जीवाच्या केवलत्वाला बाध न यावा या उद्देशानें त्याचें हें चारप्रकारचें ज्ञानहि हरण करतो व मग त्या ज्ञान्याला मोक्ष देतो, असा हा महानुभावांचा मोक्षविचार, 'कैवल्या' वरच भर देणारा आहे.

तथापि जीवाला मोक्षावस्था प्राप्त झाल्यावर जीवेश्वरद्वैत कायमच राहतें, असा चक्रधराचा ठाम सिद्धांत आहे. त्याच्या मतें भक्त किंवा ज्ञानी अविद्यानाशानें शुद्धस्वरूप झाला, तथापि तो परमेश्वर मात्र होऊं शकत नाहीं, तर तो फक्त परमेश्वरासमान शुद्ध, नित्य व केवल होतो. जीव परमेश्वरापासून वेगळा राहूनही ब्रह्मस्वरूपांत मिळून जातो, असा चक्रधराचा विश्वास असून 'भक्त आपणेयांतें देवो न म्हणवी.' (वि. १३८) या सूत्रांतही हेंच द्वैतमत त्यानें पर्यायानें मांडलें आहे.

सारांश श्रीचक्रधरानें परमेश्वराचें ज्ञान व त्याची अन्यभक्ति ही दोन मोक्षाचीं साधनें प्रतिपादन करून, स्त्रीशूद्रापासून ब्राह्मणवर्गापर्यंत सर्वांना मोक्षाचा मार्ग

मोकळा केला. तसेंच हिंदुधर्मांत असंख्य क्षुद्रदेव–देवतांचें माजलेलें बंड मोडण्याचा प्रयत्न करून, एकमेव परमेश्वराच्या कल्पनेची स्थापना केली, व आपली शिकवण सर्वांना थोडक्यांत तत्कालीन सोप्या व ओजस्वी मराठी भाषेंतून देऊन महाराष्ट्रांत आपल्या संन्यास व कर्मप्रधान महानुभावपंथाची स्थापना केली, त्यामुळें मराठी भाषेचा जसा गौरव झाला आहे, तसाच महाराष्ट्रालाही तीर्थ–क्षेत्राचा मान मिळाला आहे. महानुभावपंथ अहिंसा तत्त्वावर स्थापला गेला असून ,महानुभावीय लोक श्रीमद्भगवद्गीता व श्रीमच्चक्रधरांच्या मुखांतून निघालेले सूत्ररूप पाठ, हे आद्यधर्मग्रंथ मानतात. तसेंच श्रीदत्तात्रय व श्रीकृष्ण हे अवतार व श्रीकृष्णलीलावर्णनपर श्रीमद्भागवत दशमस्कंद हे ग्रंथ पूज्य समजत असल्यानें या पंथांत चरित्रपर, स्थळवर्णनपर, टीकारूप व तदनुषंगिक विषयावर विपुल वाङ्मय निर्माण झालें आहे. त्यांपैकीं भास्करकवीश्वराचा ( १ ) शिशुपालवध, ( २ ) एकादशस्कंद ( उद्धवगीता ) ( ३ ) दामोदर पंडिताचें वत्सहरण, ( ४ ) नरेंद्राचें रुक्मिणीस्वयंवर ( ५ ) रवळो ऊर्फ राघो व्यासाचे सह्याद्रिवर्णन, ( ६ ) पंडित विश्वनाथाचा ज्ञानप्रबोध व ( ७ ) नारायणपंडिताचें ऋद्धिपुरवर्णन हे साती ग्रंथ तर महानुभावांच्या नित्याच्या पूजेंतलेच होऊन बसले आहेत.

## केशिराज व्यास

श्रीचक्रधरांच्या प्रयाणानंतर त्यांचे सर्व शिष्य ऋद्धपूर येथे श्रीगोविंद-प्रभूजवळ एकत्र झाले व नागदेवाचार्यांच्या अनुज्ञेनें माहींभटानीं ‘ लीळा चरित्राची ’ मांडणी करून दररोज एक प्रहर याप्रमाणें सहा महिन्यांत त्यांनीं त्याचा कच्चा खर्डा तयार केला. नंतर ज्यांच्या समक्ष ज्या ज्या लीळा घडल्या, त्यांच्या जवळून अधिकोत्तर माहिती गोळा करून ती भटांच्या माहितीप्रमाणें पडताळून, भटांच्या अनुसरणापूर्वीच्या लीळांचा पूर्वार्ध व त्या नंतरचा उत्तरार्ध, असे मुख्य भाग कल्पिले. याच ‘ लीळा-चरित्रांतून ’ पुढें सांप्रदायिक पाठांच्या संहिता केशिराजांनीं नागदेवाचार्यांच्या अनुज्ञेनें तयार केल्या. नागदेवाच्या शिष्यांत जे अनेक अधिकारी पुरुष होते, त्या सर्वांत भटांनीं, भास्कर पंडित व केशिराज वास या दोघांचीच फक्त फार प्रशंसा केली आहे.

केशिराज बास हे पापदंडी रामपुरीचे विद्वान व्याख्याते होते, अशी लौकिकांत समज होती. ते ज्ञानभीक्षेसाठीं भटापाशीं येऊन राहिले, व नागदेवाची त्यांच्यावर मर्जी जडली. अल्पवयांत अंगीं बाणलेली वैराग्यवृत्ति, केशिराजांच्या आप्तसोयऱ्यांना व विशेषतः सासऱ्यास घातुक वाटली; आणि त्यांचे मन वळवून त्यांना संसाराची आस्था लागावी म्हणून अनेक युक्त्या आनेराज ( वडील भाऊ ) व सासरची मंडळी यांनीं केल्या. मोठमोठ्या वादविवाद पटु पंडितांना बोलावून केशिराजास निरुत्तर करण्याची खटपट केली; फार काय प्रत्यक्ष अर्धांगीच्या सांनिध्यांत तरी त्याची वृत्ति निवळेल या अपेक्षेनें दोघास एका खोलींत ठेऊन पाहिलें. पण जसे विद्वानांनीं केशिराजापुढें हात टेकले, त्याचप्रमाणें इकडे मुलीनेही वडिलांस कळविलें कीं, " आतां हे योगिये जाले " नागदेवास ही गोष्ट पुढें कळली तेव्हां त्यांनीं केशिराजाची फार प्रशंसा केली व हर्षभरानें 'माझा केशवू शुकयोगींद्र कीं गा' असे म्हणाले. ( स्मृतिस्थळ लीला. १३ ).

'रत्नमाळा स्तोत्र' हा केशिराजाचा पहिला ग्रंथ असावा, लीलाचरित्रांतील अनेक लीलांचा संस्कृतांत त्यानें जो पद्यात्मक अनुवाद केला आहे, तोच हा रत्नमालास्तोत्रकलाप होय. याची रचना सन. १२८४ मध्यें झाली व तो जेव्हा नागदेवास वाचून दाखविला, तेव्हां भटांनीं त्यांची फार वाहवा केली. या प्रोत्साहनानें केशिराजांना अधिक हुरूप चढून त्यांनीं नागदेवास विनंति केली कीं, 'रत्नमाले' प्रमाणेंच उद्धरणप्रकरण देखील गीर्वाण स्वरूपांत तयार करूं काय? त्यावर नागदेवानें "माझिया म्हातारिया नागवतील" असें जें उत्तर दिलें आहे, तें आतां सर्वांच्या परिचयाचें झालें आहे. चक्रधराचा ब्रह्मसिद्धांत संस्कृतांत नसावा, हें मत नागदेवांनीं अनेक वेळा प्रगट केलें असून, एकदा तर वादविवादांच्या भरांत केशिराज संस्कृत पारिभाषिक संज्ञा उच्चारून गेले, तेव्हां 'पंडित केशवदेयाः तुमचा 'अस्मात् कस्मात्' नेणोः मज चक्रधरें निरूपीली मऱ्हाटी तियाची पुसा।' असें जें झणझणीत उत्तर नागदेवानें दिलें, त्याचा परिणाम असा झाला कीं, मग केसोबास संस्कृत वंध न करीतीचि. ( स्मृतिस्थ. ली. १५. ).

केशिराज स्वरूपानें अत्यंत सुंदर व देखणे होते, व अंतःकरणानें तर खंबीर–शुकाप्रमाणें होते. स्त्रियांच्या मोहास ते बळी पडले नाहींत, याबद्दल

त्यांची अशी प्रसिद्धि होती कीं, अनिष्टकालीं त्यानीं स्वतःपेक्षां पंथाची अब्रू राखली. केशवबास, राघोभट व पंडित दामोदरबास यांना कवीश्वरबास 'एकमूर्ती त्रयो भागा' असे म्हणत असत, यावरून या तिघांच्या उत्कट मैत्रीची कल्पना येते. यांचे परस्परांत नित्य वादसंवाद चालत असत.

## पंडीत दामोदर

प्रस्तुत काव्याचा कर्ता पंडित दामोदर हा नागदेवाचार्यांचा एक शिष्य व केशिराजांचा निकटवर्ती मित्र व आप्त होता. दामोदराच्या पत्नीचें नांव हिरांबा असून हीं दोघेंही गंगाकाठीं आपल्या गांवीं राहत असतां, तेथें सहज आलेल्या नागदेवचार्यांकडून त्यांनीं शके ११९४ मध्यें उपदेश घेतला. पण नागदेवचार्यांच्या उपदेशानें नवऱ्यापेक्षां बायकोचेंच मन जास्त विरक्त झालें, व संन्यास घेऊन आचार्यांकडे जाण्याबद्दल ती नवऱ्यास विनवूं लागली. पण "माझ्या पुत्राचे विवाह व शिक्षण झाल्याशिवाय मला संन्यास घेतां येणार नाहीं." असें पंडित दामोदरानें उत्तर देऊन, तिला एकटीलाच त्यानें नागदेवाचार्यांकडे जाण्यास सांगितलें. हिरांबा म्हणाली, "मी एकटी कैसी जाऊँ सको ! तुम्हीं मज सांगातें चाला." असा बायकोचा जास्तच आग्रह आहे असें पाहून दामोदर तिला नागदेवाचार्यांकडे घेऊन गेला, व त्यानें तिच्या संन्यस्तवृत्तीची खात्री करून दिल्यावर, त्या नवराबायकोचीही निग्रहाचीं भाषणें ऐकून, नागदेवाचार्यांनीं तिला दीक्षा दिली व ज्ञानोपदेशश्रवणासाठीं तिला आपल्याजवळ ठेऊन घेतली.

इतकें झाल्यावर पंडित दामोदर आपल्या घरीं निघून गेले, व त्यांनीं पुत्राचें अध्ययन व विवाह केला. पण या कृत्यानें आपला नवरा संसारपाशांत जास्त गुरफटला आहे असें समजून त्यांस, "जिये चुलीची क्षिरू खादली तियेची चुलीची आता राखू काई खाल पां" अशा अर्थाचा तिनें निरोप पाठविला. हा निरोप ऐकून दामोदर पंडितास अनुपात होऊन ते तात्काळ नागदेवाचार्यांकडे आले, व भेटीक्षेम झाल्यावर पंडितांनीं त्याच दिवशीं तिसऱ्या प्रहरीं संन्यास घेतला. हिरांबेनें धर्मबंधुत्वाच्या नात्यानें पंडितांना नमस्कार केला व पंडितहि यापुढें कायमचे भिक्षावृत्तीनें राहूं लागले.

पंडित दामोदर हा जसा विद्वान् तसाच गायनपटुही असून, सारा वेळ तो

आपल्या प्रेमळस्वर गायनानें ईश्वरास आळवीत असे. परंतु त्यांस नागदेवाचार्यांनीं गाण्याची बंदी केल्यावरून त्यानें उघडपणें गाणें बंद केलें. तथापि नेहमीची गाण्याची संवय एकदम न सुटल्यामुळें, पंडित एके दिवशीं मधुर कंठानें ईश्वरचरित्र गांत असतां, नागदेवाचार्य तेथें आलें. आचार्य आल्याचें भान न राहून ते तसेच गात राहिले. त्यावेळीं ते "आणिका बोलना : न लगो श्रवणा : रुपु तरी नयना : आवडो तुझे : तूची परदेव इतुले मी जाणें : बहुतेचि विघ्नें झांकौळितातीं : धृ० : जीवो मी न कदा : विसंबे बा तुज : हेंचि देइ मज : गोविंदु राजा : २ : निरंतरीं करो तुझेचि स्मरणा : हेंचि एॐ मना : गोविंदु राजा : ३ : आणिके बुजवितां : डिंभू न बुझावे : मातेलागीं रोवें : ते कां अपराधि : ४ : माझी से न सांडी : आर्तांचा तू दानीं : नागदेवास्वामी : चक्रधारा : ५ :" हें पद गात होते. या प्रेमळ गाण्यानें आचार्यांची तंद्री लागून त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहूं लागले. त्यांनीं पंडितांची पाठ थोपटली व केलेली मनाई रद्द करून गाण्याची परवानगी दिली.

## वच्छहरणाचें कर्तृत्व

त्याच्या या गायनपटुत्वामुळें व विद्वत्तेमुळें केशवराजाचा व पंडितांचा विशेष स्नेह जडला. 'वच्छहरणां' त 'भणे मुनि केशवराजु' असा उल्लेख जवळ जवळ चार वेळां आला आहे, त्यावरून या ग्रंथाचा कर्ता 'केशवराज असावा असा वाचकांचा समज होतो. पण दामोदर पंडितांनीं आपल्या 'वच्छहरणांत' केशवराजाचें व केशवराजांनीं उलट आपल्या 'रत्नमाला' स्तोत्रांत दामोदर पंडिताचा नामोल्लेख करून व आपापलें ग्रंथकर्तृत्व लपवून परस्परांचा जो सन्मान केला आहे, तो त्या दोघांच्या उत्कट स्नेहाचाच निदर्शक आहे. वच्छहरणांतील 'भणे मुनि केशवराजु' ही शेवटची ओंवी ऐकल्यावर पंडितांची स्त्री हिरांबा म्हणाली, "माझी माता परी वांझिरूः निराभिवाणी अहंकारू :" हें ऐकून पंडित म्हणाले, "हो ही आमची चुकी झाली" व ते त्या ओंवीवर हरताळ फासूं लागले. यावर श्रीकविश्वराचार्य म्हणाले, "परश्रीसंतापाचा ज्वरू : न भोगी ऐसा नाहीं नरू : एक पंडित दामोदरू : वाचौनिया :" व त्यांस लिहिलेली ओंवी खोडूं दिली नाहीं. तेव्हां हल्ली काव्याच्या शेवटीं असलेली ओवी (५०३) दामोदरानें लिहिली व ग्रंथ समाप्त केला. अशा प्रकारानें दोघांचीही नांवें या काव्यांत आली आहेत.

स्मृतिस्थळाप्रमाणें दामोदरानें 'वत्सहरण' काव्य केशोवासाच्या हयातींत त्यांचें नांव घालून लिहिलें, पण तें त्यानें केशववास मरण पावल्यावर त्याच्या स्मृत्यर्थ त्याच्या नांवानें लिहिलें, असें हरिवास–सोंगोवासाच्या 'अन्वय स्थळां'त सांगितलें आहे.

पंडित दामोदरानें शके ११९४ मध्यें महानुभाव पंथ स्वीकारला व तो पुरंदर मार्गानें लाजी वैरागराकडे जाऊन तिकडेच त्याचें देहावसान शके १२२६ चें सुमारास झालें. यावरून शके ११९४–१२२६ चें दरम्यान 'वच्छहरण' हें काव्य रचलें गेलें असावें. तसेंच केशवराजसूरीनें शके १२०७ मध्यें लिहिलेल्या रत्नमालास्तोत्रांत पंडित दामोदराचा ज्या अर्थी उल्लेख केला आहे, त्या अर्थी शके ११९४ ते १२०० या मधल्या काळांत हें काव्य रचलें गेलें असावें, असें म्हणावें लागत असून, वरील शकावरून व एकंदर भाषेच्या विशेषांवरून हें काव्य ज्ञानेश्वरीपूर्वकालीन आहे हें सिद्ध होतें. याशिवाय दामोदर पंडिताच्या नांवावर चौपद्या, पदें, धांवा इत्यादि रचनाही प्रसिद्ध आहे.

## पंडित दामोदराची योजकता

पण आपण अगदीं नुकत्याच स्वीकारलेल्या महानुभाव पंथाच्या तत्त्वज्ञाचें व्यापक संस्कार निर्दिष्ट करतांना, पंडित दामोदरानें महाभागवतांतर्गत दशमस्कंदांतील 'वच्छहरण' कथेची जी निवड केली आहे, ती त्याच्या अपूर्व योजकतेचीच द्योतक समजली पाहिजे. कारण या कथेच्या रूपानें एकीकडून श्रीकृष्णचरित्राचा गौरव, तर दुसरीकडून महानुभाव तत्त्वज्ञानाच्या ठळक तत्त्वांचें प्रात्यक्षिक, असें दुहेरी धोरण त्याला सांभाळतां आलें आहे. उदाहरणार्थ महानुभाव तत्त्वज्ञानांत परमेश्वराचा श्रीकृष्णावतार हाच जीवाला मोक्षदायक असून, त्याच्या मानानें च्युतिमंत फलें देणारे ब्रह्मेशादि देव, हे खालच्या कोटीचे मानण्यांत आले आहेत. प्रस्तुत 'वच्छहरण' कथेंत देखील गोकुळांतील वत्सगोपाळांना सत्यलोकीं हरण करून ब्रह्मदेवानें श्रीकृष्णाच्या सामर्थ्याची परीक्षा पाहण्याचा अहंकारी डाव टाकला असतां, श्रीकृष्णानें आपल्या विज्ञानशक्तीनें पुष्कळशीं ब्रह्मांडें, प्रत्येक ब्रह्मांडांत गाई वासरासहित अनेक गोपाळ, प्रत्येक गोपाळाजवळ एकेक ब्रह्मदेव, एकमेकांची उपासना करणारीं अनेक शक्तिचक्रें, अष्ट दिक्पाळ, सप्तसमुद्र व अष्ट कुलाचल

इत्यादींचें मूर्तिमंत दर्शन घडवून ब्रह्मदेवाचा जो भ्रम दूर केला व आपल्या खऱ्या स्वरूपाचा व दिव्य शक्तीचा प्रभाव दाखवून त्याला जो शरण आणला, त्यांतच श्रीकृष्णावताराचें श्रेष्ठत्व व त्याच्या अपेक्षेनें ब्रह्मेशादि देवांचे परमेश्वराधीनत्व सिद्ध झालेलें दाखविलें आहे. तसेंच श्रीकृष्णानें गोकुळांतील गोपाळांना लावलेला वेध, अघासुरासारख्या शत्रूलाही त्यानें दिलेला मोक्ष, बलरामसारख्या वडील बंधूनेंही त्याची मानलेली श्रेष्ठता, ब्रह्मदेवाला त्यानेंच हरण केलेल्या गोपवासरांचें सत्यलोकांत व गोकुळांत एकसमयावच्छेदानें घडविलेलें दर्शन, व शेवटीं अनुतापानें ब्रह्मदेवानें शरण येऊन केलेली श्रीकृष्णाची स्तुति, या मूळ भागवती कथेंतील श्रीकृष्णमहिमा सांगणाऱ्या व महानुभाव तत्त्वज्ञानाशीं अगदीं चपखल बसणाऱ्या गोष्टींचा, पंडित दामोदरानें तर असा कांहीं फायदा घेतला आहे कीं, प्रस्तुत वच्छहरण कथा हें श्रीकृष्ण अवतारांतील परमेश्वराचा महिमा वर्णन करणारें अतएव महानुभाव तत्त्वज्ञानाची परिस्फुटता करणारें एक **रूपकच** आहे, अशी कोणाही वाचकाची ठाम समजूत व्हावी !

याशिवाय मध्यंतरीं वर्णनांत श्रीकृष्णाचा 'सकल वेधु दीक्षा गुरु' (१८) अथवा सांभव वेधु मूर्तीसी आला (२२८) असा केलेला उल्लेख, किंवा धेनूवर 'ईश्वराच्या अनिवारू शक्तींची' अथवा 'सांभवादिका मूर्तींची' योजलेली उत्प्रेक्षा, किंवा 'एके शक्तीचेनि गुणें ब्रह्मा अपमानिला' (३४१) असा श्रीकृष्णाच्या विज्ञानशक्तीचा निर्देश करून शरणागतांचें उद्धरण करण्याच्या त्याच्या अवतार कार्याचें सांगितलेलें उद्दिष्ट, तसेंच ब्रह्मदेवानें केलेल्या श्रीकृष्णस्तुतींत परमेश्वराच्या सौंदर्य, लावण्य, औदार्य, सौभाग्य, दया, मया, कृपा, व करुणा इत्यादि गुणांचा व नित्यत्व व्यापकत्व, सर्वात्मकत्व इत्यादि धर्मांचा महानुभाव तत्त्वज्ञानास अनुसरून केलेला अंतर्भाव, या गोष्टींनीं प्रस्तुत भागवती कथेला पंडित दामोदरानें आपल्या पंथतत्त्वाची जाणून बुजून कशी मुरड घातली आहे, हें समजून येत असून, शेवटीं तर ब्रह्मदेवकृत श्रीकृष्णस्तुतींत (४१२–४८६), कर्ममार्ग व ज्ञानमार्ग यांच्या अपेक्षेनें भक्तिमार्गाची जी श्रेष्ठता वर्णन केली आहे, तिनें महानुभाव पंथाचें ध्येयकार्यच कवीनें उघडपणें मांडून टाकलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. बाराव्या शतकांत नव्यानेंच स्थापित झालेल्या व आपणही

मोठ्या उत्कटतेनें स्वीकारलेल्या या द्वैती भक्तिसांप्रदायाच्या प्रसाराला, प्रचाराची किती आवश्यकता आहे हें ओळखून, पंडित दामोदरानें 'वच्छहरण' हे भागवती प्रकरण अशा महानुभावी तत्त्वज्ञानाच्या रंगांत रंगविलें असून, त्यांतूनच

**आतां सांडा अन्य-भजनें : कां नाइकां वेदपुराणें ॥**
**मुंजिचे ना आतां कल्लणें : एकु श्रीकृष्णसेवा ॥**

किंवा

**सांडा सांडा अहंकारा : अनुसरा श्रीचक्रधरा ॥**
**मग जाणाल परात्परा : विचारा तें ॥**

असा आपल्या पंथाचा उघडपणें पण जिव्हाळ्यानें प्रचार केला आहे. सूत्रपाठासारख्या तांत्रिक ग्रंथापेक्षां पंथप्रचाराचें कार्य अशा ललित काव्यांच्या द्वारांच अधिक प्रमाणांत व सुलभतेनें होतें, हें इंगित ओळखून, भास्कर दामोदरादि कवींनीं अशा भागवती कथांवर रचना केली असून, महानुभावांतील साती ग्रंथांना यामुळेंच विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे.

## पंडित दामोदराचें कवित्व

अशा या थोड्याफार तत्त्वज्ञानात्मक काव्यांतही पंडित दामोदराच्या प्रतिभेचें नवनवोन्मेष जागजागीं दृग्गोचर झाल्याशिवाय रहात नाहींत. कारण प्रस्तुत काव्य जरी त्यानें भागवत दशमस्कंद, अध्याय १२, १३ व १४ यांच्या आधारें रचलें असलें, तरी संधि सांपडेल तेथें ग्रंथविस्तार करून आपल्या स्वतंत्र प्रतिभेची चमक त्यानें निदर्शनास आणली आहे. तसें पहायला गेलें, तर ज्या एकाद्या उपमादृष्टांतरूपकानें कवि आपल्या वर्णनाला रमणीयता व भव्यता आणतो, त्यांतच त्याच्या उच्चतर कल्पनाशक्तीचें सामर्थ्य सांठविलेलें असतें. प्रस्तुत काव्यांत प्रथमच हरिकथेबद्दल भक्ताच्या एकांतिक रतीचें वर्णन करतांना

**जैसी कुलस्त्रिअेची गुणसंपत्ती : भोगावी एकेंचि पतीं ॥**
**तैसी हरिकथारसीं रती : भक्तां वांचौनि नाहीं ॥ २ ॥**

या ओवींतच हरिकथेला कुलस्त्रीची व भक्ताला पतीची जी सोज्ज्वळ, रम्योदात्त व उत्कटभक्तिनिदर्शक उपमा दिली आहे, तिनें वर्ण्यविषयाची

वा. नं. ...
१२२८

परिणामकारकता किती तरी पटीनें वाढलेली आढळून येते! पुनः आपल्या काव्यांतील थोडाही गुण रसिक वाचकांनीं मानून घ्यावा अशी अपेक्षा ध्वनित करतांना, आमच्या कवीनें आपल्या संतश्रोत्यांना.

**जो चंद्रु चकोरांचें जीवन : अमृतें नीववी त्रीभुवन ॥**
**तो हीं गुणें एकें नीराजन : मानी कळावंतु ॥ २३ ॥**
**तैसे सकल गुणभरितुः परमानंदैकनिरतु ॥**
**तो तोकडेआंहीं परगुणां संतु संतोखती ॥ २४ ॥**

या दोन ओव्यांत दृष्टांतरूपानें दिलेलें चंद्राचें साम्य व मनुष्यगुणांना दिलेलें निराजनाचें साम्य तर, अत्यंत हृदयंगम व कवीच्या विनयसौशिल्यादि गुणांचें निदर्शक असून, तेथें पुनः 'गुण' या शब्दावर नकळत झालेली कोटी कवीच्या चातुर्याचें उत्तम गमक आहे.

अशा प्रकारचीं उदाहरणें प्रस्तुत काव्यांतून आणखी देतां आलीं, तरी पंडित दामोदराच्या प्रतिभेचा अथवा वर्णनशैलीचा खरा बहर आपणास त्याच्या व्यक्तिवर्णनांत व निसर्गवर्णनांतच दिसण्यासारखा आहे. महानुभाव पंथाचे आदिदैवत श्रीकृष्ण असल्यानें व पंडित दामोदरांचें अंतःकरणही उत्कट कृष्णभक्तीनें ओथंबलेलें असल्यानें, आपल्या आराध्यदैवताचें वर्णन करतांना त्याची इतकी एकतानता होते कीं, या वर्णनप्रसंगीं कितीही सुश्लिष्ट व अर्थपूर्ण शब्द योजले, तरी त्याची तृप्ति म्हणून होत नाहीं. 'वच्छहरण' काव्यांत ओ. ७९–८२ व पुढें ओ. २१८–२४५ अशा दोन ठिकाणीं श्रीकृष्णरूपवर्णन आलेलें असून, दुसऱ्या स्थलीं दिलेलें श्रीकृष्णवर्णन त्यांतील अवयवांच्या व आयुधालंकारांच्या उदात्त व भव्य गुणामुळें, विशेषच चेतोहर झालें आहे. खऱ्या अभिजात कवीच्या रचनेंत काव्याच्या आशयाबरहुकूम शैलीची योजना आपाततःच होत असल्यामुळें,

**वेढिली सोने-सळा : देउ इंद्रनीळु सांवळा ॥**
**वरि उटी मिरवे पातळा : विचित्रा धातूंचीं ॥**

× × × ×

**इंद्रनीळाची दीप्ती : नीलोत्पलांची कांती ॥**
**एकवटली तैशी सांवळी श्रीमूर्ति : मिरवतुसे ॥**

अशा श्रीकृष्णाच्या अंगकांतिवर्णनाच्या कांहीं ओव्यांत मूळच्या मृदुल व मधुर वर्णनाला साजेशी अशी मृदु, सानुस्वार व मंजुल वर्णांची योजना कवीकडून सहजच होऊन गेली आहे. तसेंच पुढें श्रीकृष्णाच्या मुखकमलाचें वर्णन करतांना देखील,

**कवण श्रीमुखाचें बरवेपण : कैसें सदोदितु प्रसन्न ॥**
**तेआंतें इंदु लाहांत पाईकपण : वरि कलंकिआ न होता ॥**

असें प्रतीपालंकारानें श्रीमुखाचें रमणीत्व सिद्ध केलें असून, श्रीकृष्णाच्या गगनसदृश अंगावर पांढऱ्या वर्णाचें तकतकीत रेशमी उत्तरीय विद्युल्लतेप्रमाणें शोभत होतें असें वर्णन करतांना,

**सुनीळे गगनीं विस्फरतु : जैशी कां विद्युल्लतु ॥**
**तैसा फूटा असे मिरवतु : स्कंदावरी ॥**

या ओंवीच्या पहिल्या ओळींतील अत्यंत हृद्य उपमेनें, श्रीकृष्णाची सुनील अंगकांति व त्यांच्या उत्तरीयाचें शुभ्रत्व मोठ्या खुबीनें ध्वनित केलें आहे. श्रीकृष्णाचे अलंकार म्हणा किंवा त्याचे अवयव म्हणा कवीला इतके अप्रतिम व अनन्य साधारण वाटतात कीं, जगांतील अत्युत्तम म्हणून गणल्या गेलेल्या उपमानांचीं त्यांच्याशीं तुलना करणेदेखील त्याला अनुचित वाटतें, अशीं बहुधा त्यानें अशा प्रसंगीं योजलेल्या प्रतीपव्यतिरेकादि अलंकारावरून वाचकांची कल्पना होऊन, येथें कवि कवित्वापेक्षां श्रीकृष्णभक्तीनेंच अधिक भारला गेला आहे असें वाटूं लागतें. श्रीकृष्णाच्या भालपट्टावरील टिळा, त्याचे कृष्ण कुरल कुंतल व त्याचे आरक्त मुख, यांवर कवीनें योजलेले.

**अर्धचंद्रु टिळां भालस्थळीं: सुनीळें कुरळें तेची भ्रमरावळी ॥**
**लुब्ध जाली परिमळीं: मुखकमलाचा ॥**

या दोन पंक्तींतील रूपक, संस्कृत कवींच्या पद्धतीचें म्हणून थोडे सांकेतिक वाटलें, तरी तें सुललित व मनोहर असून, श्रीकृष्णाची कुंतलरूपी भ्रमरावलि, त्याच्या मुखकमलसुवासास लुब्ध झाली, अशा तेथेंच कल्पिलेल्या उत्प्रेक्षेनें तर, श्रीकृष्णाचें प्रदीर्घ केश त्याच्या मुखावर लोळत होते हा व्यंगार्थ, कवीनें अतीव सुश्लिष्ट पद्धतीनें व कौशल्यानें व्यक्त केला आहे.

पंडित दामोदर जात्याच एक वस्तुनिष्ठ व कल्पनाशाली कवि असल्यामुळें, एकाद्या व्यक्तिवर्णनाप्रमाणेंच, एक प्रसंग अथवा वस्तु अगर स्थल, मुळापेक्षांही खुलवून वाचकापुढें चित्रित करण्याचा त्याला विलक्षण मोह होऊन, साहजिकच मग त्याच्या प्रतिभेचा विलास एकामागून एक अशा अनेक अभिनव उत्प्रेक्षांच्या मालिकांनीं वाचकांना दृग्गोचर होतो. प्रस्तुत काव्यांतील वृंदावनवर्णन (१२४–१६६), श्रीकृष्ण व त्याच्या भोंवतीच्या गोपाळांचें वर्णन (२०५–२१०), ब्रह्मदेवानें वासरें सत्यलोकीं कां नेली यांवरील काव्यात्मक युक्तिवाद, (२६५–२६८) गौळणींच्या पान्हयाचें वर्णन व गाईंचें गोवर्धनाखालीं अवतरण, इत्यादि स्थलप्रसंगवर्णनांत आमच्या कवीनें बहारीच्या उत्प्रेक्षा योजून आपलें उच्च प्रतिभाशालित्व प्रत्ययास आणलें असून, कालिंदीच्या वर्णनांत तर त्याच्या या मौलिक दर्जाच्या कल्पकतेनें अगदीं उच्चांकच गांठला आहे. कालिंदीचें हें सुरम्य वर्णन प्रस्तुत काव्यांत ओ. १६७–१९८ या भागांत येत असून, तें वाचतांना, कालिंदीच्या नवोनव तरंगपक्तीबरोबर पंडित दामोदराच्या प्रतिभेच्याहि अभिनव तरंगमाला एकामागून एक येऊन रसिक वाचकांच्या मनःस्तटावर जोरानें आपटत आहेत, असा भास होतोः—

**कालिंदीजल निर्मलः श्रीकृष्णकांती श्यामल ॥**
**प्रतिबिंबैली भणऔनि सुनीलः होऔनि ठेलीं ॥ १६८ ॥**
**भक्तिभावें ऽ॰ ळगतांः केवि वर्णावी सायुज्यता ॥**
**जेआंचिआं संन्निधी सरूपताः जडा आलीं ॥ १६९ ॥**
**देखौनि श्रीचक्रपाणीः कैसी संभ्रमीतु जाली तरंगिणी ॥**
**कीं आनंदैली अंतःकरणींः ते रोमांचु दाटिलें ॥ १७० ॥**
**कीं आलिंगावेंआं श्रीकृष्णराजाः तिआं वहुतीं केलिआं भुजा ॥**
**तैसें तरंगु पढियासलें मजः कालिंदिअेचें ॥ १७१ ॥**
**मग आनंदसागरीं मीनलीः तैसी निश्चलु जाली ॥**
**कीं देहभा ऽ॰ विसरैलीः श्रीकृष्णवेधें ॥ १७२ ॥**
**कीं जन्मैली देवांचां चरणींः ते उतावेळु फुण असें मर्णीं ॥**
**भणऔनि भेटों आली मंदाकिणीः कालिंदी नोहे ॥ १७३ ॥**

**कीं श्रीकृष्णाचिआं संगतीं: आमुची फिटैलु अधोगती ॥**
**भणऔनिं भेटों आली भोगावती: पाताळौनि ॥ १७४ ॥**

अशा या कांहीं ओव्यांतून, नुसत्या यमुनेवर, तिच्या श्यामलकांति सलिलावर, व तिच्या तरंगावर कवीला एकामागून एक अशा सुचलेल्या संबंधोत्प्रेक्षा व अपह्नुति, याच पंडित दामोदराचें काव्यवैशिष्ट्य असून, त्यांच्या बुडाशीं असणाऱ्या उत्कट श्रीकृष्णभक्तिभावनेनेंच पंडितांच्या या कल्पकतेला प्रतिभेचा शृंगारसाज चढला आहे. प्रस्तुत काव्य रचण्यांत पंडित दामोदराचा पंथ-प्रसाराचा अथवा पंथतत्त्वज्ञानविवेचनाचा असा अन्य कोणताही हेतु असो, पण येथें मध्यंतरींच स्थलीं स्थलीं उत्प्रेक्षांच्या द्वारां उचंबळून येणाऱ्या त्याच्या कल्पनाशालित्वांतच त्याचें खरें व्यक्तित्व सांठविलें आहे, असें म्हणणें भाग पडतें.

यापुढें यमुनेच्या घाटांचें, तिच्या संपन्न वाळवंटाचें, तेथील पक्ष्यांचे, जलपानार्थ आलेल्या अनेक निर्वैर पशूंचें, व स्नानार्थ आलेल्या यतिवरांच्या ध्यानतपस्यादिकांचें विस्तृत वर्णन आलें असून.

**एकांगुष्ठतपिअे वक : नासाग्रीं दृष्टि घालितां ढोंक**
**यज्ञदीक्षित तैसें चक्रवाक : प्रियातें सांडिती ना ॥**

यांतील वक, ढोक व चक्रवाक या पक्ष्यांच्या स्वभावोक्तींच्या आधारें तत्कालीन ढोंगी कर्ममार्गी लोकांवर कवीनें जी जातां जातां उपरोधिक टीका केली आहे, तिनें पंडित दामोदरांच्या विनोदी स्वभावावर थोडाफार प्रकाश पडत असला, तरी त्यांतून त्याच्या पंथाभिनिवेशी व वोंचक वृत्तीचेंही दर्शन घडल्याशिवाय राहत नाहीं. तथापि प्रस्तुत भागवती कथेचा अनुवाद करीत असतां, उपरिनिर्दिष्ट कांहीं स्थलीं, आपल्या कवित्वाच्या आहारीं जाऊन त्यानें ग्रंथविस्तार केला असला तरी,

**असो हे शब्दरचना : वर्णो नेणिजे वृंदावना ॥**

अथवा

**असो हा वोलांचा विस्तारू : कांई करिता जाला नंदाचा कुमरू ॥**

अशा कांहीं उल्लेखावरून पंडित दामोदर हा उगाच वर्णनांत वाहवत जाणारा गृहस्थ दिसत नसून, काव्यरचनेंत जरूर त्या संयमाची व औचित्याची

त्याला चांगलीच जाणीव असल्याचें स्पष्ट दिसतें. अशा या तत्त्वज्ञानपर व वस्तुनिष्ठ काव्यांत, पंडित दामोदराचें म्हणावें तसें व्यक्तित्व स्फुट झालें नाहीं हें खरें असलें, तरी

**कामिनी प्रियाते आळंगितु : तैसिआं मंदारांवरी कल्पलतु ॥**

यासारख्या वृक्षवर्णनांत, त्याच्या हांतून साधलेल्या चैतन्यारोपानें ( Pathetic fallacy ) त्याची रसिक पण सात्विक वृत्ति कांहीं झांकली गेलेली नाहीं, हेंही लक्षांत आल्याशिवाय राहत नाहीं.

## पंडित दामोदराची विद्वत्ता व बहुश्रुतता

तथापि पंडित दामोदर ज्याप्रमाणें एक उत्तम कवि होते, त्याप्रमाणेंच ते पट्टीचे विद्वान्ही असावे, अशी त्यांच्या काव्यावरून कल्पना करण्यास पुष्कळ वाव आहे. पंथाच्या सांप्रदायाप्रमाणें त्यांचें महाभागवताचें परिशीलनही सूक्ष्म व सखोल असून, प्रस्तुत काव्य हें त्याचेंच एक परिपक्व व परिणत फल असें म्हटलें पाहिजे. याशिवाय प्रस्तुत ग्रंथांत इतस्ततः विखुरलेल्या महाभारतांगत ( १०८–१०९ ) व रामायणीय ( ३७० ) उल्लेखांवरून, त्यांचा महाभारत–रामायणादि पुराणग्रंथांचा अभ्यास दिसत असून, ‘ तियेवेळीं विश्वतोमुख हे श्रुती : देवें साचु केली ” ( २०४ ) व ‘ ते व्हेळीं अन्नब्रह्म हें वचनः देवें साचु केलें ’ अशा-सारख्या वचनांनीं व ‘ कीं महंताची मतीः दशोपनिषदांचिआं श्रुती ’ या वाक्यानें, त्यांचा श्रुतींचा व दशोपनिषदांचा परिचयही व्यक्त होतो. याशिवाय

**जैसा मणिगणींतंतुः मेघावली गगनांतु ॥**
**तैसा भूतीं विश्वनाथुः कीं भूतें तयाभाजीं ॥**

या ओंवीत तर ‘ सूत्रे मणिगणा इव ’ व “ अहं सर्वेषु भूतेषु, सर्वभूतान्यथो मयि ” या श्रीमद्भगवद्गीतांतर्गत श्लोकपादाचाच अनुवाद केलेला दिसत असून, कालींदीच्या हिरेलग वाळवंटाच्या उदात्तालंकारान्वित वर्णनावर व कालींदीचें जल पिऊन निर्वैर झालेल्या पशूंच्या वर्णनावर अनुक्रमें मेघदूत व बाणाच्या कादंबरींतील जाबालिऋषीच्या आश्रमवर्णनाची छाया पडली असावी असा तर्क करण्यास जागा आहे. पंडित दामोदराचें साहित्यशास्त्राचें परिशीलन, त्यानें योजलेल्या प्रस्तुत काव्यांतील स्वतंत्र वर्णनांतील विविध अर्थालंकारावरून व

**उपमा श्लेष वर्णुकः एहीं रंजऊ सकळैंकु लोक ॥"**

या ओंवीवरून, आजमावतां येण्यासारखें असून,

**ऐसें नवरसु नाटकुः देऊ खेळे जनमोहकु ॥**

यांत "नव नाट्ये रसाः स्मृताः" या सूत्राचा ऐकूं येणारा पडसादही भरतमुनीच्या नाट्यशास्त्राची त्याची ओळख सिद्ध करीत आहे.

दामोदराच्या बहुश्रुततेबद्दल फारसें लिहिण्याचें कारण नाहीं. त्यानें वासरांच्या विविध वर्णांचें व फलपुष्पवृक्षांच्या विविध जातींचें केलेलें वर्णन, 'चतुर्विधा दंडीच्या विद्यावंतां' चा व 'मंगल रागां' चा केलेला उल्लेख, शशि शिरणें, हमामा, व हुंबळी इत्यादि खेळांचा व हटयोगांतर्गत षट्चक्रभेदनादि प्रक्रियांचा त्यानें केलेला निर्देश, त्याची विविध शास्त्रकलांतील बहुश्रुतता दर्शवीत असून, त्याच्या गरीयसी व्युत्पत्तीबद्दलही वाचकांचा अनुकूल ग्रह होण्यास त्यामुळें बरीच मदत झाली आहे. विशिष्ट हेतूनें रचलेल्या प्रकरणवजा काव्यांत कवीच्या अंगचें बौद्धिक व भावनिक गुण स्फुट होण्यास फारसा वाव नसला, तरी अशा कांही थोड्याच गोष्टींवरून त्याच्या अभिरुचीचा व वृत्तीचा थोडा बहुत कानोसा लागतो यांत मात्र शंका नाहीं. तरी पण शैली हीच लेखकाच्या वृत्तीची निदर्शक मानल्यास, पंडित दामोदराची नादवती रचना त्याच्या गानप्रिय मृदु हृदयाचीच साक्ष देते.

## पंडित दामोदराची भाषा

'वच्छहरण' हा ग्रंथ यादवकालीन असल्यामुळें, त्याची भाषा तत्कालीन उच्चार प्रक्रियेच्या, सामाजिक चालीरितींच्या व रूढीरिवाजांच्या विविध संस्कारांनीं नटलेली असल्यास नवल नाहीं. तेथें वरिषतां (वर्षतां), विरुदावली (ब्रीदावली), ताराण, (त्राण) असा **वर्णागम**; कुमरें (कुमार), पवे (पावे), कल्पीं (कळपीं), सें (असें), असा **वर्णनाश**; दिशीं (दृष्टि), वेठी (वेष्टि), अशी **वर्णविकृति** झालेली आढळत असून, साचु (सत्य), वाणू (वर्णू), अशा शब्दांत जोडाक्षरांतील एक अक्षर गळून उपांत्य स्वर दीर्घ झालेला आहे. ओहरतें (ओझरतें), पन्हरें (पंधरे) अशा शब्दांत अनुक्रमें **झ, ध,** बद्दल **ह** घालण्याचा प्रघात असून, कीजे (कियते), दीजे (दीयते), जमुना (यमुना) अशा शब्दांत, **य** बद्दल **ज** झालेला

आहे. शिवाय रुख ( वृक्ष ), उन्मेख ( उन्मेष ), आरिख ( आर्ष ) अशा शब्दांत, **क्ष** व **ष** बद्दल **ख** झालेला दिसत असून, विणविता ( विनविता ), गोपांगणां ( गोपांगना ), दिगंगणा ( दिगंगना ) अशा शब्दांत, **न** बद्दल **ण** उच्चारण्याची प्रवृत्ति, तर, मोरविसां ( मोरपिसां ) सोवाणी ( सोपानी ) यासारख्या शब्दांत, **प** चा **व** झालेला आढळतो. तरीं पण यादवकालीन भाषेंतील ळक्षांत राहण्यासारखा विशेष म्हणजे तिच्यांतील सांघीजैल ( सांगिजैल ), फणस ( पनश ), फुण ( पुनः ) अशा शब्दांतील मूळ अक्षरांत **हकार** मिसळलेला असतो, हा होय.

**नामांचे** अनेक प्रकार 'वच्छहरणां' त पाहिले म्हणजे आपले जुने प्राकृत, संस्कृतोत्पन्न, व कानडी, गुजराथी, हिंदीसारख्या शेजारच्या भाषांतून आलेले किती तरी शब्द, आजच्या मराठी भाषेच्या प्रचारांतून नाहींसे झाले, याची कल्पना थोडीशी तरी येते. आंगवण, अंतुरी, आघाडा, उजुकार, कामारें, कीळ, खेवण जोहर, थडी, परगुणें, पह्वरें, पसाय, पांतिकर, पाहुणेर, वांदौडी, ब्रीजें, भांगार, मरगज, वडप, वेध, से, सोवाण, हातिरूं, दाखाळा, ओतवरा, तडवा, पुडुरा, रापदळिआ, मालगंठी, फूटा, परिवट्ट, फडतरी, अशा शब्दांच्या समूहांत आपणांस ज्ञानेश्वरीला सर्वसाधारण असे शब्द जसे आढळतात, तसे महानुभावी वाङ्मयांतच केवळ तोंड दाखविणारे शब्दही नव्यानेंच आपली ओळख पटवितात. तथापि चोखाळेंपण, साकारपण, अघासुरपण, समर्थपण, सदैवपण, लोभाळुपण, अशीं 'पण' लावून **भाववाचक नामें** करण्याचा प्रघातही येथे दृष्टोत्पत्तीस येत असून, फार नाहीं तरी केसनी, कवण, सरिस, अनारिसें, अशीं **सार्वनामिक विशेषणें**, आज थोडीं अपरिचितच भासतात. साध्या **विशेषणांतही** चोखाळ, मौवाळ, चांग, नागर, थोकडे, बरवीं, साचु, वहळ, वेंभळे, मीलखें, अशा, आज जुन्या वाटणाऱ्यांचाच भरणा अधिक आहे. 'चोरा शंखा' ( २५० ), भूतां ग्रामां ( ३९३ ) अशा उदाहरणांत **नामाप्रमाणेंच विशेषणाची विभक्ति** ठेवण्याची चाल, संस्कृत भाषेच्या धर्तीवर गेलेली असून, 'आथिला' म्हणजे असलेला, युंक्त, अशा अर्थीं 'अस्' या धातूचें **भूतकालवाचक विशेषण** लावून 'अंगाथिलें' ( १७८ ) असा शब्द बनवला जाई, असें दिसून येतें.

**उपमा श्लेष वर्णुकः एहीं रंजउ सकळैंकु लोक ॥ ”**

या ओंवीवरून, आजमावतां येण्यासारखें असून,

**ऐसें नवरसु नाटकुः देउ खेळे जनमोहकु ॥**

यांत “ नव नाट्ये रसाः स्मृताः ” या सूत्राचा ऐकूं येणारा पडसादही भरतमुनीच्या नाट्यशास्त्राची त्याची ओळख सिद्ध करीत आहे.

दामोदराच्या बहुश्रुततेबद्दल फारसें लिहिण्याचें कारण नाहीं. त्यानें वासरांच्या विविध वर्णांचें व फलपुष्पवृक्षांच्या विविध जातींचें केलेलें वर्णन, ‘ चतुर्विधा दंडीच्या विद्यावंतां ’ चा व ‘ मंगल रागां ’ चा केलेला उल्लेख, शशि शिरणें, हमामा, व हुंबळी इत्यादि खेळांचा व हटयोगांतर्गत षट्चक्रभेदनादि प्रक्रियांचा त्यानें केलेला निर्देश, त्याची विविध शास्त्रकलांतील बहुश्रुतता दर्शवीत असून, त्याच्या गरीयसी व्युत्पत्तीबद्दलही वाचकांचा अनुकूल ग्रह होण्यास त्यामुळें बरीच मदत झाली आहे. विशिष्ट हेतूनें रचलेल्या प्रकरणवजा काव्यांत कवीच्या अंगचें बौद्धिक व भावनिक गुण स्फुट होण्यास फारसा वाव नसला, तरी अशा कांहीं थोड्याच गोष्टींवरून त्याच्या अभिरुचीचा व वृत्तीचा थोडा बहुत कानोसा लागतो यांत मात्र शंका नाहीं. तरी पण शैली हीच लेखकाच्या वृत्तीची निदर्शक मानल्यास, पंडित दामोदराची नादवती रचना त्याच्या गानप्रिय मृदु हृदयाचीच साक्ष देते.

## पंडित दामोदराची भाषा

‘वच्छहरण’ हा ग्रंथ यादवकालीन असल्यामुळें, त्याची भाषा तत्कालीन उच्चार प्रक्रियेच्या, सामाजिक चालीरितींच्या व रूढीरिवाजांच्या विविध संस्कारांनीं नटलेली असल्यास नवल नाहीं. तेथें वरिषतां (वर्षतां ), बिरुदावली ( ब्रीदावली ), ताराण, ( त्राण ) असा **वर्णागम**; कुमरें ( कुमार ), पवे ( पावे ), कल्पीं ( कळपीं ), सें ( असें ), असा **वर्णनाश**; दिशीं ( दृष्टि ), वेठी ( वेष्टि ), अशी **वर्णविकृति** झालेली आढळत असून, साचु ( सत्य ), वाणू ( वर्णु ), अशा शब्दांत जोडाक्षरांतील एक अक्षर गळून उपांत्य स्वर दीर्घ झालेला आहे. ओहरतें ( ओझरतें ), पन्हरें ( पंधरे ) अशा शब्दांत अनुक्रमें **झ, ध,** बद्दल **ह** घालण्याचा प्रघात असून, कीजे ( कियते ), दीजे ( दीयते ), जमुना ( यमुना ) अशा शब्दांत, **य** बद्दल **ज** झालेला

आहे. शिवाय रुख ( वृक्ष ), उन्मेख ( उन्मेष ), आरिख ( आर्ष ) अशा शब्दांत, **क्ष** व **ष** बद्दल **ख** झालेला दिसत असून, विणविता ( विनविता ), गोपांगणां ( गोपांगना ), दिगंगणा ( दिगंगना ) अशा शब्दांत, **न** बद्दल **ण** उच्चारण्याची प्रवृत्ति, तर, मोरविसां ( मोरपिसां ) सोवाणी ( सोपानी ) यासारख्या शब्दांत, **प** चा **व** झालेला आढळतो. तरीं पण यादवकालीन भाषेंतील ळक्षांत राहण्यासारखा विशेष म्हणजे तिच्यांतील सांघीजैल ( सांगिजैल ), फणस ( पनश ), फुण ( पुनः ) अशा शब्दांतील मूळ अक्षरांत **हकार** मिसळलेला असतो, हा होय.

**नामांचे** अनेक प्रकार 'वच्छहरणां' त पाहिले म्हणजे आपले जुने प्राकृत, संस्कृतोत्पन्न, व कानडी, गुजराथी, हिंदीसारख्या शेजारच्या भाषांतून आलेले किती तरी शब्द, आजच्या मराठी भाषेच्या प्रचारांतून नाहींसे झाले, याची कल्पना थोडीशी तरी येते. आंगवण, अंतुरी, आघाडा, उजुकार, कामारें, कीळ, खेवण जोहर, थडी, परगुणें, पहरें, पसाय, पांतिकर, पाहुणेर, बांदौडी, बीजें, भांगार, मरगज, वडप, वेध, से, सोवाण, हातिरू, दाखाळा, ओतवरा, तडवा, पुडुरा, रापदळिआ, मालगंठी, फूटा, परिवट, फडतरी, अशा शब्दांच्या समूहांत आपणांस ज्ञानेश्वरीला सर्वसाधारण असे शब्द जसे आढळतात, तसे महानुभावी वाङ्मयांतच केवळ तोंड दाखविणारे शब्दही नव्यानेंच आपली ओळख पटवितात. तथापि चोखाळेंपण, साकारपण, अघासुरपण, समर्थपण, सदैवपण, लोभाळुपण, अशीं 'पण' लावून **भाववाचक नामें** करण्याचा प्रघातही येथे दृष्टोत्पत्तीस येत असून, फार नाहीं तरी केसनी, कवण, सरिस, अनारिसें, अशीं **सार्वनामिक विशेषणें**, आज थोडीं अपरिचितच भासतात. साध्या **विशेषणांतही** चोखाळ, मौवाळ, चांग, नागर, थोकडे, बरवीं, साचु, बहळ, वेंभळे, मीलखें, अशा, आज जुन्या वाटणाऱ्यांचाच भरणा अधिक आहे. 'चोरा शंखा' ( ३५० ), भूतां ग्रामां ( ३९३ ) अशा उदाहरणांत **नामाप्रमाणेंच विशेषणाची विभक्ति** ठेवण्याची चाल, संस्कृत भाषेच्या धर्तीवर गेलेली असून, 'आथिला' म्हणजे असलेला, युंक्त, अशा अर्थीं 'अस्' या धातूचें **भूतकालवाचक विशेषण** लावून 'अंगाथिलें' ( १७८ ) असा शब्द बनवला जाई, असें दिसून येतें.

**विभक्तिप्रत्ययांकडे** वळल्यास, श्रीचक्रधरु, देॐ, सांवळा, अशीं **प्रथमेचीं** एकवचनी; व तपिअे पापिअे, गोवळे, अशीं अनेक-वचनीं रूपें आढळतात. राआं, मुरारितें, आपणपें, अशीं **द्वितीयेचीं**, तर सांष्टांगीं, आदिनार्थे, संगती, जसोदां, कृष्णमहिमेसीं, अशीं **तृतीयेचीं** रूपें रूढ होतीं. अद्‌भुतासी, पशुसी ही **चतुर्थीचीं**, तर दैत्यदेहापासौनि बंदीशाळेहौनि, पाताळौनि, अशीं **पंचमीचीं** रूपें तत्कालीन भाषेची कल्पना करून देतात. आमुचीं, जपिआंचिआं, माझा, कैवल्याचा, अशीं आजच्या सारखींच **षष्ठींचीं** व वरसाहरणीं, एतें जातें द्वारां, अशीं **सप्तमीचीं** रूपें नित्याचींच दिसतात. या विभक्तीप्रत्ययांबरोबरच कांहीं ठराविक अव्ययांनीं विभक्तिप्रत्ययांचें काम भागविलें जाई. बंधना**लागीं**, देआवेआं**दोषें**, शक्तीचेनि**गुणें**, गोकुळा**माझारी**, दैत्यदेहा**पासौनि**, परिवटां**माजी**, हरिकथा-श्रवणें**वीण**, ब्रह्मकटाहे**वर्‍ही**, अशीं कित्येक उदाहरणें आज चमत्कारिक वाटण्यासारखीं आहेत.

**शब्दयोगी अव्ययांत**, चि, वाचौनि, यांचा व **उभयान्वयी अव्ययांत**. जे ( कारण ), भणऔनि ( म्हणून ), वरि ( शिवाय, आणखी ), की, ( जसा–तसा ), कां ( अथवा ) इत्यादींचा समावेश झाला असून, रे, ! व्हो ! हां ! अशी **केवलप्रयोगी** अव्ययेंही या यादवकालीन भाषेंत सांपडतात.

**क्रियापदाचा** पसारा सुद्धां येथें कांहीं लहान नाहीं. जाणिजे, वर्णिजे, पविजे, नीवती, शोभेति, दीसेति, भेडावणें, पढिआसणें, बंबाळणें, विभांडणें, फेडणें अशा कांहीं क्रियापदाबरोबरच, गाईजतुसे भुलौनि गेला, बांधौनि ठेले, मिरवतुसे, अशीं **धातुसाधित** व **सहाय्य क्रियापदेंही** योजलेलीं दिसतात. तसेंच नेदितांसी, नेणती, नाइकितां असे **अकरणरूपी एकशब्दात्मक धातु** मुक्तेश्वरांच्या कालापर्यंत सुद्धां चालत आलेले असून, हाकारिली, काकुलतैलें, अशा थोड्याच **नामधातूंनीं**, तर थोडक्यांत पुष्कळ अर्थ व्यक्त करण्याची पद्धति अवलंबलेली आहे. यादवकालीन भाषेंत सहाय्य क्रियापदांचा उपयोग काल, प्रयोग, रूप दर्शविण्याकडे जसा केला जाई, तसाच तो जोरदापणा व परिणामकारकता साधण्यासाठीही केलेला असल्यामुळें, वरील सहाय्यक्रिया-पदाचा या दृष्टीनें विचार करण्यासारखा आहे.

**काळ व अर्थ** यांकडे दृष्टिक्षेप केल्यास, मिरवत असे, भणतों, भानी, सतोखती, उपजे अशीं **वर्तमान-काळचीं** रूपें, **रीतिवर्तमानासारखीं** वाटतात. वार्णिजे, पविजे, जाणिजे, अशा कर्मकर्तरी रूपापुढेंच 'एल' जोडून सांधीजैल, तुटैल, अशीं **भविष्यकाळचीं** रूपें सिद्ध केलीं जात. वाणिजे, पोखिजे, भजीजे यांत **आज्ञार्थ**; तर वाणावा, भागावी, करावें, होआवें, यांत **शक्यार्थ** स्फुट होई. पीजे, कीजो, बुडलीं-जताती, आईकींजती, अशीं कर्मणिरूपें तर यादवकालीन भाषेंत पुष्कळ असून, **कृदंतांत**, मिरवत, पांतु पढतु, वातु ही **वर्तमानकालवाचकें**; राहिला, रीगालें, प्रकटिलें, उमटलें, ही **भूतकालवाचकें**; विनिला, रंगिला हीं **भूतभूतकालवाचकें** व अवगौनि, सांडौती, लंघौनी हीं **पूर्वकालवाचकें** तर पुष्कळ प्रमाणांत सांपडतात. **हेत्वर्थक** रूपांत बोलों लागैला, निर्धारों लागैला, वदों लागैला, पांतु ठेला, अशीं कित्येक सांगतां येण्यासारखीं आहेत.

पण 'वच्छहरणां'तील कांहीं सामासिक शब्द पाहिल्यास, ते सकृद्दर्शनीं तरी कानाला कसेसेच लागतात. सापरूपधरू, दूधपीरू, सापामुखां, दत्तचित्त-अवधातु, दिग्मोहितु, हे समास संस्कृत धर्तीवर गेले असले, तरी कित्येकांत एक संस्कृत व एक प्राकृत अशा दोन भिन्न भाषिक शब्दांचा संयोग झालेला आहे. **निश्चयात्मक** अव्ययांत निर्न्हां, व **क्रियाविशेषणांत** देखोवेखीं, खेळीं मेळीं, ही उल्लेखनीय आहेत.

**वाक्प्रचार व म्हणी सांप्रदाय** यांसंबंधानें एवढें खास म्हणतां येईल कीं, देशांतील चालीरीतींत, आचारविचारांत व संस्कृतींत जसजसा फरक पडत जातो, तसतसे भाषेंतले वाक्प्रचारही बदलत जातात. भाषेंत निरानिराळे वाक्प्रचार उत्पन्न होणें व ते रूढ होणें, हें भिन्न भिन्न संस्कृतींच्या संगमावरच अवलंबून आहे. यादवकाल हा स्वराज्याचाच काय पण परकीय आक्रमणाचा आपल्या देशास वारा देखील न लागलेला असा असल्यानें, तत्कालीं भाषेचें किंवा वाक्प्रचारांचें स्वरूप निर्भेळ मराठी असल्यास नवल तें काय ? प्रस्तुत काव्यांत याच कारणामुळें, (१) देश-धडी होणें (४१), (२) सरतें होणें (४६) (३) ब्रीदें उभारणें (८३), (४) वरि-पडें होणें (१००), (५) आड पडणें (२१७) (६) मूर्तीसीं येणें (२२६), (७) धडे पडणें (२३६), (८) नटणा

# वच्छहरण कथा

८०८२
आ.०५ ९२२८

# वच्छहरण कथा

ॐसच्चिदानंदायनमः : परब्रह्म परानंद स्वछंदोपात्तविग्रह ॥
जीवोद्धारविहार श्रीचक्रपाणे नमोस्तु ते ॥
जेआं पासौनि जगा जन्मु : जें परिपूर्ण आत्मारामु ॥
तें ध्याइलें परब्रह्मु : गुरुप्रसादें ॥ १ ॥
तेआं साकारां सगुणां : सर्वभावीं केलें नमनां ॥
त्रीभवनुंजीवनां : श्रीकृष्ण-रायां ॥ २ ॥
जें सकळतीर्थांचें जन्मस्थान : देवतां करीति आराधन ॥
तेआं श्रीचक्रधरांचें चरण : नमस्कारिलें ॥ ३ ॥
भक्त उद्धरावेआं अपारु : जें जें इश्वरां चें अवतारु ॥
तेआं साष्टांगीं नमस्कारु : केला मिआं ॥ ४ ॥
नमनु उद्धवादिभक्तां : नागार्जुनादिकां महंतां ॥
ब्रह्मविद्याशरणागता : श्रीप्रभूचेआं ॥ ५ ॥
नागार्जुनाचेनि प्रसादें : परमपुरुषाचेंनि बोधें ॥
श्रीकृष्णकथा ॐवी प्रबंधें : भणे मुनी केशवराजु ॥ ६ ॥
स्मरौ ईश्वराचे गुणां : आनंदें विकासु जाला मनां ॥
तो अनुवाद करीतुसें रसनां : वाणौ कवणु जाणे ॥ ७ ॥
महिमा मनां अगोचरु : परि कवींसी हांचि परिहारु ॥
जें स्वमतीं वाणावा ईश्वरू : जेणें पवित्र वाचा ॥ ८ ॥
निरौतें जीवु कांई जाणेंति : जेआंतें श्रुतीं भणतीं नेती ॥
परि भक्ति करितां स्तुती : दूषणु न लगें ॥ ९ ॥

जें अनुभवें जाणिजे : तें बोलु केविं वर्णिजे ॥
परि श्रवणेंवीणु सुख न पविजे : आणिकें परी ॥ १० ॥
डोळां अंजनें न शोभेंति : तरि निधानें न दीसेंति ॥
न होतां रवि दीसीं : अंधःकारू न वचें ॥ ११ ॥
तैसें हरिकथाश्रवणेंवीण : जीवा कांईं चोखाळेंपण ॥
तरि पर-ब्रह्माचें दर्शन : केंवि होअे ॥ १२ ॥
ययांचि कारणें आदि-नाथें : धरिलें मायावेषांतें ॥
यऱ्हवीं शुकादिक कांईं वाणिते : अरुपा निर्गुणांतें ॥ १३ ॥
उपमा श्लेष वर्णुक : एहीं रंजॐ सकळैंकु लोक ॥
कीं पवाडें संसारुमोचक : वाणौ मुकुंदाचे ॥ १४ ॥
प्राकृत जग मानवतीं : तैसी ॐडॐ कथासंगती ॥
कीं पढों परब्रह्माची कीर्ती : जें जीवणु संतांचें ॥ १५ ॥
नागरीं बोलीं स्छळं वाणिजे : सकल रसांतें पोखिजे ॥
की निरसां होऔंनि श्रीकृष्णीं भजीजे : यां दों कवणु चांगु? ॥ १६ ॥
पुराणिचे आखि बोल : परि प्रबंध-रचना सें नवल ॥
ते सुगंध कदंबीचे परिमळ : तैसें वेधकु होतीं ॥ १७ ॥
जो सुरवरांचां दातारू : सकळवेधु दीक्षागुरूं ॥
तो सर्वज्ञेनाथु श्रीचक्रधरू : जेथ कथा-नाअेकु ॥ १८ ॥
मणऔनि हे मंगलांचीं निधी : इयेंचेनि श्रवणें सकळा सिद्धीं ॥
परमार्थु निरवधि : हेंचि कारण ॥ १९ ॥
जैसी कुलस्त्रिअेची गुणसंपत्ती : भोगावी एकेंचि पतीं ॥
तैसी हरिकथारसी रती : भक्तावाचौनि नाहीं ॥ २० ॥

जे श्रवणांसी अमृतपाण : धर्माचें जन्मस्थान ॥
वस्तूतें दावितें दिव्यांजन : सकलजनांसीं ॥ २१ ॥
तैसे सकौतुक श्रीकृष्णचरित्र : वर्णिजैलु विचित्र ॥
जेणें चमत्कारैलु चित्त : संतजणांचें ॥ २२ ॥
जो चंद्रु चकोरांचें जीवन : अमृतें नीववी त्रिभुवन ॥
तोहीं गुणें एकें नीराजन : मानी कळांवंतु ॥ २३ ॥
तैसें सकलगुणभरितु : परमानंदैकनिरतु ॥
तो तोकडेआंहीं परगुणां संतु : संतोखतीं ॥ २४ ॥
जेआ संताचिआं संगती : निन्हां होअे निर्मळमती ॥
उपजे श्रीकृष्णीं भक्ती : अखंडितु ॥ २५ ॥
जैसा विकाशु पाद्मिणी : उदौलिआ तरणी ॥
तैसें संतजनांचां मनीं : श्रीकृष्णचारित्रु ॥ २६ ॥
सहजें अनुराग भक्तां : वरि आनंदनी श्रीकृष्णकथा ॥
जैसें चंद्रें चंद्रकांता : अमृतूं द्रवतीं ॥ २७ ॥
असुंख्यातु कवी वैकार : वाणितांति निरंतर ॥
परि नित्यनूतन मधुर : श्रीभागवतीकथा ॥ २८ ॥
जैसें अमृत नव्हे जूनें : उरंगे ना साडेपह्नर सोने ॥
तैसें श्रीकृष्णकीर्तीचें वाणनें : सदासुरंगमधुरा ॥ २९ ॥
जंवं मेरुसीं अचलता : चंद्रीं वसैलु अमृता ॥
तंवं वर्तैलु श्रीकृष्णकथा : तिहीं लोकीं ॥ ३० ॥
अवतरलासे कैवल्यकंदू : भणऔनि त्रीभुवनां जाला आनंदू ॥
हें सांगतसे मुनी नारदू : भक्तां भागवतांसीं ॥ ३१ ॥

सुरवनितां मनोहरूं : सकळं गंधर्व किंनरूं ॥
मिळौनि वाणितांति श्रीचक्रधरूं : राणेआंते ॥ ३२ ॥

आनंदें मुदीतुं गोपांगणां : ॐविअें गातांति यादवांचा राणा ॥
तो ध्वनी आइकौनि दिगंगणा : होंति मंगळरूपां ॥ ३३ ॥

भोगावतीचां तीरीं : वीणावाद्यु घेऔनि करीं ॥
वेधें गातांति राऊ मुरारी : नागकन्यां ॥ ३४ ॥

ऐसें लोकत्रयपावन : परममंगळ निधान ॥
मोक्षैकुसाधन : आनंदरूप ॥ ३५ ॥

शुकमुखें परिक्षिती : आइकितां सहारात्रें मुक्ती ॥
जेथ आत्मारामु रमती : निरंतरू ॥ ३६ ॥

तें सांडौनि कर्माभिमानु : होऔनि दत्तचित्त अवधानु ॥
करी कां श्रीकृष्णमहिमा श्रवणु : भक्तिभावें ॥ ३७ ॥

श्रीकृष्णगुणनामीं कराल आदरू : तरि तुम्हां तुटैलु संसारू ॥
जैसां दिनकरें अंधकारूं : नासौनि जाअे ॥ ३८ ॥

जैसें तरंगु सागरां : तैसें अनंतावतारूं ईश्वरां ॥
परि लीलां मुंचिजे संसारां : ऐसा एकु श्रीकृष्ण चि होअे ॥ ३९ ॥

आतां सांडा अन्यभजनें : कां नाइकां वेदपुराणें ॥
मुंचिजे ना आनां कव्हणें : एकु श्रीकृष्णसेवा ॥ ४० ॥

जेआची नामें उच्चारितु : नारद ब्रह्मानंदें पावतु ॥
तो ध्वनी आइकौनि देशधडी होतु : महापातकें ॥ ४१ ॥

कव्हणाहीं जपतपतीर्थां : यागदानेंव्रतां ॥
कृष्णमहिमेसीं समता : आथी चि ना ॥ ४२ ॥

तीर्थं जन्मैलीं श्रीचरणीं : सकळ देवतां जेआंची करणी ॥
तो कैवल्यनाथु श्रीचक्रपाणी : जैसें तोखें ॥ ४३ ॥

जे अज्ञानतमाची तरणी : कैवल्यपदाची निशानी ॥
ते श्रीकृष्णकथा वत्साहरणीं : सांघीजैलु ॥ ४४ ॥

जें जीवातें चोखाळीति : कां मनातें नीववीति ॥
भाक्तिभावातें पोखिती : श्रवणमात्रें ॥ ४५ ॥

वाचां जन्म सुफळ करावें : तिहीं लोकीं सरतेआं होआवें ॥
तेहीं तऱ्हीं श्रीकृष्णमहिमेतें वाणावें : सदा बुद्धिमंतीं ॥ ४६ ॥

भक्तीरसीं नाहीं आदरूं : जेआं कवी पाढिअें श्रृंगारू ॥
तेहीं तऱ्हीं सुंदरांचा सुंदरूं : राउ मुरारीचि वाणावा ॥ ४७ ॥

जेआंचे आईकौनि वरवेपणां : वेधु लागैला देवांगनां ॥
नेटकें रूपु देखौनि मदनां : भुलीं ठेलीं ॥ ४८ ॥

जो सकळविद्यांचें जन्मस्थान : नवां रसांचें विधान ॥
तोवांचौनि सदैवुं कवीजन : आण काईं वाणीतिं ॥ ४९ ॥

जेआंचां बहूंरूप खेळु खेळतां : योगिअें परमसिद्धि पावतां ॥
ताप-त्रयो निवारितां : सकळजनांचें ॥ ५० ॥

जै देउ रास-क्रीडा खेळींविला : तै मूर्ती श्रृंघारू जाला ॥
गौळनीं विनोदें नाचविला : तै हास्यरसू ॥ ५१ ॥

जै जसोदां भेडाविला : तै करुणारसू उठाविला ॥
बिखारू काळिआं जिंतिला : तै रुद्रु जाला ॥ ५२ ॥

मातें श्रीमुखं दाखविलें : तै अद्भुतांसी रूप जालें ॥
विश्वरूपु प्रकटिलें : तै भयानकूं ॥ ५३ ॥

जै दैत्यां करी संहारू : तै विभत्सु आण वीरू ।।
शान्तु तो निरंतरू : तेथचि असे ।। ५४ ।।
ऐसें नवरसु नाटकु : देउ खेळे जन-मोहकु ।।
निजरूपु तें ब्रह्मादिकु : ठाउकें न होअे ।। ५५ ।।
निर्गुण कां जालें सगुण : निराकारां साकारपण ।।
निराभिमानां दैत्यनिर्दळन : हें केवीं घडे ? ।। ५६ ।।
अरूपां रूप सुन्दरू : अमूर्तां मूर्ती मनो-हरू ।।
अद्वैतां अनंतावतारू : हें नवल देखा ।। ५७ ।।
अ-नामआ सहस्रनामां : कुमरें आंतैरें आत्मआंरामां ।।
आश्रमधर्मू परब्रह्मा : हें विरुद्ध देखा ।। ५८ ।।
जो असे भूत-ग्रामीं सकळीं : तो खेळे एकी गोकुळीं ।।
ब्रह्माडे नाभी-कमळीं : तो पाळकीं सूतें ।। ५९ ।।
साना होऔनि निऱ्हां थोरू : भीतरीं असौनि सकळां परू ।।
अकर्ता करी सृष्टिसंहारू : हें अघटीतु नोहे ? ।। ६० ।।
ऐसिआं विरूद्ध धर्मांचिआं प्रवृत्ती : एकी ईश्वरींचि आती ।।
ते वेद शास्त्रें तर्कें नेणती : जाणती भक्ती जनुं ।। ६१ ।।
हें जाणिजे तो परमार्गु : यया परौतां नाहीं अध्यात्मयोगु ।।
भणऔनि न करावां अति-प्रसंगु : भणे मुनी केशवराजु ।। ६२ ।।
कवन दैवें केलें गोकुळें : जें परब्रह्म होऔनि सांवळें ।।
असें गौळिआंचेंनि खेळेमेळें : मनुष्यवेखें ।। ६३ ।।
धन्य धन्य ते गोकुळ : जेथ परदैवं रांगतें बाळ ।।
डोंळस आंगें वेल्हाळ : गोपी परिअें देतीं ।। ६४ ।।

सकळ भुवनें जेआंचीं करणी : जो वाणिजे वेदीं पुराणीं ॥
तेआंतें लोणी देऔनि गौळणीं : नाचवितांतीं ॥ ६५ ॥

जो त्री-भुवनांचा दातारू : सकळ प्रामाणां अ-गोचरू ॥
तो होऔनि नंदाचा कुमरू : राखें वासुरुवें ॥ ६६ ॥

जो सकळ यज्ञांधीपती : जेयांतें आत्मारामु ध्यातीं ॥
तो गोवळें करौनि सांगांती : आखरीं राहिला ॥ ६७ ॥

पेंधा ऊडजा वांकुडा : सुदामा वामा बागडा ॥
बळ सुवळ सवंगडा : बलिभद्राचें ॥ ६८ ॥

हे नावांचे गोवळें मुखरीं : एरूं सहस्रसंख्या वेऱ्हीं ॥
मीनलें आखरीं : जेथ गो-पाळ-राऊ ॥ ६९ ॥

पावें तारपी मोहरीं : विचित्रां डांगां झेलितीं करीं ॥
नीगितां सिंगाचा गजेरीं : गगनु गार्जीनिलें ॥ ७० ॥

तंवं जाणीतिलें सुर-गणीं : खेळौं निगालें श्रीचक्रपाणी ॥
भणऔनि विमानारूढ होऔनी : पाहों आलें ॥ ७१ ॥

श्रीकृष्णां देखोनि मनें निवालीं : जंवं देवें क्रीडा केली गोकुळीं ॥
तंवं दूजी आली अंतराळीं : अ-मरावती ॥ ७२ ॥

आनंदें निर्भरू जालें : निजस्थानें विसुरैलें ॥
उन्मीखें पाहें ठेलें : राआं मुरारितें ॥ ७३ ॥

नव-लक्ष-धेनू नंदातें : एरें गो-धनें असंख्यातें ॥
तेतुलेंआं वासुरूआंते : पथीं लाविते जाले ॥ ७४ ॥

तंव थोवेंकारीं भणितिलें गोपाळीं : अरे कल्पी कल्पी करा वेगळीं ॥
एक टेकीतु महि बळें पाबळीं : एकु साउमे नीगेतां ॥ ७५ ॥

चारीतु हरित सोज्वळें तृणें : गोपु क्रमींति वनें उप-वनें ॥
एकें श्रीकृष्णां संन्निधानें : चालितांतीं ॥ ७६ ॥

सकलही चंदनें चर्चितें : एकें धातुचिआं उटीं घेतें ॥
कस्तुरीपरि-मळें बाहकातें : वरि मसीची बाउलीं ॥ ७७ ॥

लेइलें रत्नांचें लेणें : वरि पुष्पांचीं धारितीं भूखणें ॥
एकें घालीति गुंजांचीं आभरणें : माथां मोर-विसांवेठीं ॥ ७८ ॥

वेढीलिं सोने-सळा : देॐ इंद्रनीळु सांवळा ॥
वरि उटी मिरवें पातळा : विचित्रां धातूंचीं ॥ ७९ ॥

वन-पुष्पांचिआं माळां कंठीं : मिरवे रुळतिअें वीरगंठीं ॥
शिरीं राजवल्लभा वरी वेठी : मोक्तिकु मोर-विसाची ॥ ८० ॥

काखें सिंग वेताटी मोहरी : मगरज पावा साजे करीं ॥
हाटकोपरी बाउलीं तोडरीं : काढति देत्यांची ॥ ८१ ॥

बरवेपणां होईल दिठी : भणऔनि मसीटिळा ललाटीं ॥
तंवं निऱ्हा मिरविला जग-जेटी : गोपाळांमाजी ॥ ८२ ॥

ऐसा श्रंगारैला राॐ मुरारी : सवैल गोवळें नानां परी ॥
जा रे दैत्य व्हो भणतु पेंडारी : ब्रीदें उभारितांतीं ॥ ८३ ॥

ठाइं ठाइं ॐडवतु : सुछंदे ताळ घोळ वातु ॥
एकु सुहावें पवाडें पढतु : दैत्युविभांडाचें ॥ ८४ ॥

खेळों आदरिलें गो-पाळीं : शशी सिरणें चेंडुफळी ॥
एकु हमामा घालीति हुंवली : एकु वेली गातांतीं ॥ ८५ ॥

एकु विहंगमाची करीति कुंजनें : एकू वानरांचीं उत्पवनें ॥
एकु तगरांची जुंझणें : दावितांतीं ॥ ८६ ॥

एकें मयूरनृत्यें नाचेतीं : एकें राजहंसागती चालेतीं ।।
एकें तिंतुरवाउली धावेंती : श्रीकृष्णांपुढें ।। ८७ ।।
ऐसें नानांविध खेळ खेळतु : देउ्राआंसीं रूझी उपजवीतु ।।
पसाअेदानु मागतु : चरणसेवां ।। ८८ ।।
तंव कंसें धाडिला दैत्यांवरू : जेयां नांव अघासुरू ।।
तो घोर सापरूपुधरू : होऔनि आला ।। ८९ ।।
तो आंगें निऱ्हा उच्च थोरू : दीर्घु पर्वताकारू ।।
वदनाचा विस्तारू : जेवि अंतराळु ।। ९० ।।
जेणें वधिली पूतनाणि बकासुरू : तो गिळौ नंदाचा कुमरू ।।
एणें एकें गौळिआचा संहारू : साहजेंची होइल ।। ९१ ।।
ऐसी पैजा घेऔनि आला : वंदा-वन-मार्गीं राहिला ।।
जैसा काळ कळौ आला : महाकाळांतें ।। ९२ ।।
कीं पतंगु पावकातें : अंधकारूं दिनकरातें ।।
तैसें तो आपणपें देऔनि श्रीकृष्णातें : मुक्ती मागौं आला ।। ९३ ।।
तंव आंगवणेचे गोवळें : पातीनिलें तेआं जवळें ।।
रूपु देखोनि बोलों लागीनिलें : एकमेकां ।। ९४ ।।
हां रे हें जाणा पां कांइ : एक भणेति आम्हीं देखिलेचि नाहीं ।।
श्रीकृष्णातें पुसिजे तरी कांईं : निरुतें ठाकितें ।। ९५ ।।
बाळगोपाळु बोलेंती : हां रे पर्वतु देखा सर्पाकृती ।।
जैसें पूर्वेतें पश्चिमु भणती : दिग्मोहितु ।। ९६ ।।
घाटु टेंकुळिआं तेंचि दशन : उजुवाट तेंचि रसना ।।
कपाटुं तेंचि वदना : ययांचें भयानकू ।। ९७ ।।

श्रीकृष्णां सांडौनि साउमे निगालें : भणऔनि अन्य-मार्गीं पडिलें ।।
जैसें कां ज्ञानेंवीणु पथू चूकलें : साधकजणुं ।। ९८ ।।
पर्वतबुद्धीं साउमे जाती : शब्दें तरि सर्पु भणती ।।
जैसी कां अनात्मेआं आत्मप्रतीति : अज्ञानुजनां ।। ९९ ।।
अन्यथा-ज्ञानें प्रवर्तलें : भणऔनि काळा वरि-पडें जालें ।।
जैसें मायामोहीं जनु पडिलें : संसारकूपीं ।। १०० ।।
जैसें गतानुगतिकें लोकु : नेणोतिं पारमार्थिक सुखु ।।
न देखैंति ब्रह्मविद्येचें मुखु : जेविं कां पाखांडुमती ।। १०१ ।।
तैसें पुढीलें गोवळें भूलिलें : मागील देखोवेखी रीगालें ।।
एकु मैळलेनि मार्गें प्रवर्तलें : न विचारितां ।। १०२ ।।
ऐसेंनि अवघें रीगालें पोटीं : तेणें श्रीकृष्णु सूदलासें दृष्टीं ।।
एऱ्हवीं देना कां मीठीं : तेतुलेआंसीं ।। १०३ ।।
अ-संख्यातु वासुरुवें : तेसनींचि गोवळरुवें ।।
देखा एकी कुसीमाजी किडरुवें : सामावीलि कीं ।। १०४ ।।
तंवं भक्त-वच्छल श्रीकृष्णु पातला : रुप देखौनि विस्मितु जाला ।।
गोप वच्छें गिळौनि ठेला : आतां कांई कीजे ।। १०५ ।।
तडवा हाणौनि करौ मारू : तरि आपुलेआंचा होअे संहारू ।।
ऐसें विचारौनि सर्वेश्वरू : कांई करितां जाला ।। १०६ ।।
जैसें संसारामाजी अवतरौनु : उद्धरिले भक्तजनु ।।
तैसें तेआं सर्पमुखामाजी रिगौनु : आपुलीं रक्षितां जाला ।। १०७ ।।
उत्तरा संकटीं स्मरिला : तै चक्रधरु होऔनि पातैला ।।
मग गर्भस्थितु राखिला : जेणें परिक्षीति ।। १०८ ।।

जोहरीं लागलेआं वन्ही : कां कोपलेआं दुर्वासु मुनी ॥
तैं राखिलें संकटापासौनि : पांडवु जेणें ॥ १०९ ॥
जमलोकीं धाडी घालौनी : अर्जुनेनसीं क्षीराब्धां जाऔनी ॥
मृत्यापत्यें दिलेऽआणौनी : बाह्मणु तोखविला ॥ ११० ॥
तो आर्ताचां कैवारी : रीगाला सापामुखा माझारीं ॥
तंवं गजबजिलें अंबरीं : देवतांगणु ॥ १११ ॥
भणेंति ययाचा अवतारू : फेडावेआं भूमीचा भारू ॥
करावेआं दैत्यांचां संहारू : अधुना कैसें वर्तैल ॥ ११२ ॥
देऊ॰ अघासुरां सांपडिला : तंवं दैत्यां मनी हर्खु जाला ॥
परि सृष्टि-संहारु जेयांची लीळां : तें वळ जाणेचि ना ॥ ११३ ॥
श्रीकृष्णरुपु ह्रदई प्रवेशलें : तंवं अघासुरपणु गेलें ॥
आत्मस्वरुपु निर्मळ जालें : तेणें सन्निधानें ॥ ११४ ॥
भीतरी वाढीनिली श्रीमुर्ती : तंवं कुंठेली मनु-पवनाची गती ॥
इंद्रिआं जाली निवृती : जैसीं ब्रह्मविदां ॥ ११५ ॥
आत्मा ब्रह्मद्वारीं राहिला : परमात्मा श्रीकृष्णु बाहीरिं प्रकटैला ॥
मग परिवारूं वेगळा केला : दैत्यदेहांपासौनी ॥ ११६ ॥
कर्मेंद्रिया लयो पवनीं : ज्ञानेंद्रियां लयो मनीं ॥
मनपवनु निरंजनीं : स्वात्मस्वरुपीं ॥ ११७ ॥
आत्मा तेज-पुंजु निगाला : तेथची श्रीकृष्णीं लयां गेला ॥
जैसा सरितांसमुहो मीनला : सागरांसीं ॥ ११८ ॥
भीतरीं देवें कांहीं एक दीह्वले : भणऔनि प्रकाशवंतु जालें ॥
कीं तें विज्ञानु प्रकटीलें : तें महंतु जाणेतीं ॥ ११९ ॥

अघासुराचा वधु देखिला : तंवं सुर-गणां विस्मयो जाला ॥
मग आनंदभरितें सकळा : चरित्र गातें जालें ॥ १२० ॥
सन्निधीं उद्धरीलीं तृणचरें : एके मुक्ती पाववीलि वैरें ॥
भक्तां काई दीह्नलें उदारें : तें श्रीकृष्णुची जाणे ॥ १२१ ॥
जें श्रीकृष्णाचिआं जवळिकां : अवदींतीं कृमीं कीटकां ॥
तेसनीं नाहीं सनकादिकां : ब्रह्मसुखां ॥ १२२ ॥
सदैवें तेथींची तिर्यंचें : जेआं दर्शनु अच्यूताचें ॥
जें जीवनु श्रीउद्धवादिकांचे : भणे मुनी केशवराजु ॥ १२३ ॥
वधीनिला अघासुरू : देवीं केला जअेजअेकारू ॥
मग सपूजीतु श्रीकृष्ण सपरिवारू : आले वृंदावनां ॥ १२४ ॥
देवें वन प्रीतीं पाहिलें : भणऔनि श्रीमंत पावन जालें ॥
जेथिचें वृक्षु धन्य भणितलें : श्रीउद्धवादीकीं ॥ १२५ ॥
जैसें वृंदा-वन पावनु : तैसें वर्णौ नेणिजें महिमानु ॥
जें नीरंतरें क्रीडास्थानु : सर्वेश्वरांचें ॥ १२६ ॥
सुफळें तरूची जीवितें : आपण देउ॰ वाणी जेआंतें ॥
जेहीं नीववीलीं आर्त-भूतें : शरीरुसंपत्ती ॥ १२७ ॥
तरूची देखौनि नम्रतु : मनी जनु विस्मयो पावतु ॥
भणेंति फळपुष्पें पूजा करीतु : श्रीचरणकमळांची ॥ १२८ ॥
दर्शणें सदाफल जालें : स्पर्शें सात्वीक भाउ॰ प्रकटिलें ॥
इंद्रनीळकांती वेधिलें : तैसें सुनीळु दीसतांतीं ॥ १२९ ॥
आनंदें फल पुष्प रसु श्रवतां : पृथिवी साद्रव होऔनि गळतां ॥
तो पुडुरा होतसें अमृता : पाताळीचेआ ॥ १३० ॥

९२८३० २८।।५२

पापिॲं न देखतीं वृंदावनु : जेथ अखंड असेति सुरगणु ।।
तेथ मोकारा केलासे जनु : दिव्य फल-पुष्पांचां ।। १३१ ।।

वृंदावनाची सुनीळता : गगंणीसें प्रतिबिंबता ।।
सुमनसें उमटता : ते जैसें तारागणु ।। १३२ ।।

कीं दी असतां तारा न दिसें : ते ऊणे फेडावेआं दोसें ।।
वनश्रिआ वेढिलें जैसें : अंबरू नक्षत्रेसीं ।। १३३ ।।

वनां बाहिरीली आंगीं विशाळ : साल ताल तमाल ।।
आंगें जतन करीतें परिमळ : ते जेंवीं राखणांइतु ।। १३४ ।।

तेआं भीतरींली ऊळीं : गगनचुंबितां नारिॲळी ।।
उच्चां तेआं खर्जुरी पोफळी : आंदोळतांती ।। १३५ ।।

तेआंहीं आंतुली आंगीं : साकरनिंबोनीं नारंगी ।।
मधुकाकडिआं मातुलंगी : फनसु गंभीरी ।। १३६ ।।

वरिखतु रसाचें वडप : तैसें निबिडतरू द्राक्षिमंडप ।।
उघडिलें माणिकाचें मोप : तैसें पक्क दाळिंबु ।। १३७ ।।

कवण गणी तें चंपक : जेथ असंख्यातु पारिजातिक ।।
पल्लवीतु दीसती अशोक : लक्षसंख्या ।। १३८ ।।

चंदनाचा आवारू थोरू : माजी नीबिडु कल्प-तरू ।।
जेआं तळीं नंदाचां कुमरू : खेळें गोपाळेंसीं ।। १३९ ।।

तेआ जवळीं सरोवरें : चंद्र-मंडळांकारें ।।
दाखवीलीं श्रीचक्रधरें : संवंगडेआंसीं ।। १४० ।।

सुधाजलभरितें : जळक्रीडा खेळेंती दैवतें ।।
जेथें जाली निर्वैरें भूतें : उदकपाणें ।। १४१ ।।

गज सिंह शार्दूल : एकत्र मृग व्याघ्र चितळ ॥
श्रीकृष्णें नीववीलें पशुं सकळ : आनंदें रोवंतांतीं ॥ १४२ ॥

कनक-कमल विकाशत : भ्रमरांचिआं झांका वरी पडत ॥
तेथें राजहंसु चारा वाटित : अमृतकुंदांचें ॥ १४३ ॥

स्फुटिका शिलातळां वरी : गौरी पूजितांतीं विद्याधरीं ॥
वरू मागितांतीं राऊ मुरारी : आम्हां पती होआवा ॥ १४४ ॥

इंद्रनीळांचां सोवाणी : वरी बैसोनि पद्मासनीं ॥
योगिअें चितीति मनीं : काह्नो सांवळेआंतें ॥ १४५ ॥

एक मुनीजन ध्यानेंची रतु : एक आनंदें आपणपें विसरितु ॥
एकु काष्टीभूतें लयांगतु : परमतत्त्वीं ॥ १४६ ॥

एकु एकासीं निरोपिती : हांची श्रीकृष्णु कैवल्य-पती ॥
ह्राची परमगती : भक्तां जनांसीं ॥ १४७ ॥

एकु जीवु-परमात्मेआं ऐक्य भावितु : एकु सेव्य सेवकभावें उपासितु ॥
एकु भेदाभेदविवार्जितु : राहिलें निरालंबी ॥ १४८ ॥

एकु मध्यशक्तिचेनि आधारें : तिहीं वज्रांचेनि मारें ॥
शरीरें अजरामरें : करीतांती ॥ १४९ ॥

एकु मध्यमेचेनि उद्धाटें : लंघौनि तिन्हीं पीठें ॥
जाऔनि पूर्णगिरीचेनि घाटे : कळां अस्वादितांती ॥ १५० ॥

एकु षटचक्रांचेनि उजुकारें : पवनाचेनि उर्ध्वसंचारें ॥
मेरूचीं तिन्हीं शिखरें : लंघितांती ॥ १५१ ॥

एके सोऽहंप्रतीति राहिलें : एकें सहजानंदें बोधिलें ॥
एके उन्मनी अवस्थां पातिलें : साधकजनु ॥ १५२ ॥

ऐसीं सरोंवरें मुनीमंडितें : देखीनिली गोपींनाथे ।।
मग श्रीकरें धरौनि सु-दामेआंतें : देॐ साउमेआं निगालें ।। १५३ ।।
कामिनी प्रियाते आळंगितु : तैसिआं मंदारांवरी कल्पलतु ।।
नाना फलीं ॐतवरा होतु : श्रीकृष्णभेटीलागीं ।। १५४ ।।
एकां रसरूपें फळें : एक फुललें परिमळें ।।
अमृतांचीं कंदपत्रमुळें : तेआंचीं नांवें नेणो ।। १५५ ।।
योजनसुगंध पाडळ : आलिकुळामंद बकुळ ।।
सोनेकेतकी सु-परिमळ : दीसतांतीं ।। १५६ ।।
कुंकुमकेशरां जवळीं : कापूरकर्दलीचिआं ॐळीं ।।
तेथ क्षेण एकु वन-माळीं : उभा ठाकैला ।। १५७ ।।
जेथ वन-पुष्पजातीं : दिॅव्युपरिमळें उधाती ।।
तेथ लावनीचिआं मालतीं : कांई वाणौ ।। १५८ ।।
रत्नबद्धा खेडकुळिआं जवळी : विकाशेति तिहीं काळीं ।।
बाहाकाति आणुआणीं परिमळीं : सकल पुष्पजाती ।। १५९ ।।
जेआं कैलासीं उमावनीं : अमरावतिअेचा नंदन-वनीं ।।
सकलद्वीपीचिआं वृंदावनीं : रायां मुरारीचां ।। १६० ।।
जेथ सानुरागें सु-मनसें : मकरंदआस्वादनमिषें ।।
श्रीकृष्ण पावावेआं दोषें : मुनीं षट्पदु जालें ।। १६१ ।।
जेथ क्रीडैल श्रीमंत-सुंदर : भणऔनि मळयानील निरंतरू ।।
अनंगु राहिला स-परिवारू : रूपसौभाग्यालागी ।। १६२ ।
वेणुध्वनींचे ॐतवरू : तैसें मंकरंदमत्त भ्रमरू ।।
प्रियातें बोलावितांतीं द्विजवरू : पंचमालापीं ।। १६३ ।।

देखौनी मेघ-सांवळी श्रीमूर्ती : आनंदें मयुरें नृत्ये करीती ॥
शुकसारिका सवादेति : वेदांतसिद्धान्ती ॥ १६४ ॥

वेधें एऔनि वृंदावनां : आडी गातांतीं देवांगणां ॥
तेथ क्षेणु एकु श्रीकृष्ण मना : स्थीराविलें ॥ १६५ ॥

जेथ सदा ऋतुसीं ऋतु-पती : यक्ष याक्षिणी क्रीडा करींती ॥
वन-देवतां नाचेती : आनंदभरीतें ॥ १६६ ॥

असो हे शब्दरचना : वर्णौ नेणिजे वृंदावनां ॥
देउ पहावेआं जमुना : नीगते जाले ॥ १६७ ॥

कालिंदजल निर्मल : श्रीकृष्णकांतीश्यामल ॥
प्रतिबिंबैली भणऔनि सु-नील : होऔनि ठेलीं ॥ १६८ ॥

भक्तिभावें उळगितां : केवि वर्णावी सायुज्यता ॥
जेआंचिआं सन्निधीं सरूपता : जडा आली ॥ १६९ ॥

देखौनि श्रीचक्रपाणी : कैसी सं-भ्रमीतु जाली तरंगिणी ॥
कीं आनंदैली अंतकरणी : ते रोमांचु दाटिलें ॥ १७० ॥

कीं आलिंगावेआं श्रीकृष्णराजा : तिआं बहुतीं केलिआं भुजा ॥
तैसें तरंगु पढियासलें मज : कालींदिअेचें ॥ १७१ ॥

मग आनंदसागरीं मीनिली : तैसी निश्चलु जाली ॥
कीं देह-भाउ विसरैली : श्रीकृष्णवेधें ॥ १७२ ॥

कीं जन्मैली देवांचां चरणीं : तें उतावेळु फुण असें मणीं ॥
भणऔनि भेटों आली मंदाकिणी : कालिंदी नोहे ॥ १७३ ॥

कीं श्रीकृष्णाचिआं संगतीं : आमुची फिटैल अधोगती ॥
भगऔनि भेटों आलीं भोगावती : पाताळौंनि ॥ १७४ ॥

आधीची पढिजे पुराणीं । वरि स्पर्शैली देवांचा चरणीं ॥
तेथौनि तिर्थां शिरोमणीं : ऐसें बिरुद जालें ॥ १७५ ॥
सोमकांती बांधिलें घाट ; जेथ हीरेंलग वाळवंठ ॥
मुक्तीगर्भ सूक्तिसंपुट : दीसतांती ॥ १७६ ॥
श्रीकृष्णकांतीची फांकितुसे किळ : तैसें ठाईं ठाईं इंद्रनीळ ॥
रत्नकूटांची केवाळु मौवाळ : ऊदकाजवळीं ॥ १७७ ॥
कीं तें रत्नाकरांचे अर्धांग : भणऔनि आंगाथिलें ठीकलग ॥
तैसें एके वेळें सप्तांग : लेणें लेइलीं ॥ १७८ ॥
कीं कैवल्यनाथां श्रीचक्रपाणी : नवां रत्नांची ओवाळनी ॥
करी कमलांची उचलनी : तैसी दीसतुसें ॥ १७९ ॥
उभऔ कूळीं द्विजवृंदें : निजकर्मरतें निःशब्दें ॥
दृष्टीपूतें ठेविती पदें : जैसें मुनीराजु ॥ १८० ॥
एकांगुष्टतापिऔ बक : नासाग्रीं दृष्टी घालिती ढोंक ॥
यज्ञदीक्षीत तैसें चक्रवाक : प्रियातें सांडिती ना ॥ १८१ ॥
प्रकृतीपुरुषविवेकातें : जैसें परमहंस जाणते ॥
तैसें क्षीरा नीरा निवाडू करीतें ; निर्मळ राजहंस ॥ १८२ ॥
जेयाचेंनी जडें वेधिती : लतातरू रोमांचु दाटेती ॥
पशु चरों विसरेंती : तो ध्वनी आईकौनिआं ॥ १८३ ॥
जेआचेनी दृष्टीपातें : पांखिरूवें जाली आनंदभरितें ॥
हें कांई वाणावें श्रीकृष्णांतें : जेआंचां नामेंचि वेधु ॥ १८४ ॥
मेघीं झाकोळलेआं रवींचा प्रकाशु : न धरे पद्मिनीचा विकाशु ॥
तैसा गोपवेखें गुप्त परेशु : परि वेधु संचरताती ॥ १८५ ॥

हातिरुवें सिंहेसीं खेळतु : मुग व्याघ्रासीं कुरवाळें करितु ॥
मोरांचां पाखवां विश्रामतु : फाणिकु देखा ॥ १८६ ॥

मूखकु मार्जरांचिअें पालखतीं : अश्व महिखां परमप्रीती ॥
जमुनेचा पानिअेडा दीसतीं : निर्वैरें भूतें ॥ १८७ ॥

धन्य तेथिचीं जलचरें : जिअें अवलोकिलीं ईश्वरें ॥
वरौतीं एऔनि आनंदभरें : पाळांति श्रीमूर्तितें ॥ १८८ ॥

श्रीकृष्णांचें रूप सांवळें : जळां भीतरीं प्रतिबिंबेलें ॥
तें उतावेळुपणें आळंगिलें : सकल मत्स्यांदिकीं ॥ १८९ ॥

ब्रह्मादिकु भूलवीलें विज्ञानें : देवांगणां बरवेपणें ॥
चरांचरां वेधु जिअेचेनि गुणें : तें शक्ती वाणौ नेणें ॥ १९० ॥

ब्रह्मचारी गृहस्थ : वानप्रस्थ यतीं सुस्नात ॥
नित्यक नैमित्यकें कर्मं करीत : आश्रमुभेदें ॥ १९१ ॥

एक अघमर्षणीं रीगत : एक मृतिकांस्नानें करीत ॥
एक कर्मंचि तारकु मानित: नेणतीं पर-ब्रह्मातें ॥ १९२ ॥

घाटीं जपिआंचिआं कोडीं : कूर्मासनीं बैसिलें त्रिदंडी ॥
नमस्कारीं व्याकुळ एकदंडीं : जवळांचि देऊ देखतींना ॥ १९३ ॥

आश्रमधर्मांचेनि अभिमानें : कर्मयागाचेंनि यजनें ॥
ईश्वरतत्वांचें जाणणें : तें अरुतोंचि ठेलें ॥ १९४ ॥

नसतां प्रकाशसंपत्ती : अंधःकारातें दवडो पांती ॥
ईश्वरकृपेंवीणु जाणौ भणतीं : परा वस्तूतें ॥ १९५ ॥

जैसा जवळां असतां परमात्मा : ठाउवा न होअें विषयारामां ॥
तैसा श्रीकृष्ण मूर्त परब्रह्मा : न देखती कर्मासक्तें ॥ १९६ ॥

हा अपराधु नाहीं जनां : प्रवृती निवृतीची कारणां ।।
साउमीली आइकां कथानुसंधानां : भणे मुनी केशवराजु ।। १९७ ।।
ऐसी देखोनि जमुना : संतोषु जाला देवांचां मनां ।।
मग देतां जालां सूचना : गोपाळांसीं ।। १९८ ।।
हां रे वत्सां करा ऊदकपानें : बरवीं जमुनेचीं पुलिनें ।।
एथें करीं या [illegible] : खेळे-मेळें ।। १९९ ।।
तिअें वेळीं पा[illegible]दां सूदलीं : थडिवां चरावेआं टेंकिलीं ।।
मग आसनु रचिलें गोपाळीं : श्रीकृष्णांलागीं ।। २०० ।।
जो राउ कैवल्याचा दानी : तो बैसीनिला तिअें आसनी ।।
मग आपुलांलिआं मोटां घेऔनि : सकळै एतें जालें ।। २०१ ।।
गोपाळ तृप्त ब्रह्म-रसे : वरि देवांसीं प्रवृत्ती असे ।।
हें चरित्र करावेआं दोषें : ते भोजनुरचना ।। २०२ ।।
होआवेआं श्रीकृष्णां नीडें : एरूं रीगें एरा पुढें ।।
ऐसेंनीं अघवे चोहौंकडे : बैसितें जालें ।। २०३ ।।
पांळातां नेत्रु आनंदेती : भणऔनि अघवेंची अभिमुखें होती ।।
तिअेवेळीं विश्वतोमुख हे श्रुती : देवें साचु केलीं ।। २०४ ।।
तेआं परमानंद-चंद्राजवळी : गोपाळु तारांगनाचिआं ऊळी ।।
कीं देवशिरोमणीचिआं प्रभावळी : रत्नपंक्ती ।। २०५ ।।
सुनीळे गगनी मेघ-मंडळ : तैसें दीसतांती गोपाळ ।।
कीं ब्रह्मविद्येतें ऊळगेति सकळ : वेदुविद्यां ।। [illegible]०६ ।।
कीं परमात्मेआं जवळीं तत्वें : कीं आदिभैरवां भवंती भूतें ।।
तैसें आदिनाथातें ऊळगतें : देवताचक्र ।। २०७ ।।

कीं परमपुरुषांचिअें गळां : ब्रह्मगोळकांचिआं माळां ।।
तैसें श्रीकृष्णां जवळें गोपाळा : मिरंवतांतीं ।। २०८ ।।

जाळिआं मोटां सोडीतिं : आपुलांलीं अन्नें आणिती ।।
रुचिकरें शाकें वाणीतिं : श्रीकृष्णां पुढां ।। २०९ ।।

एकें वेडें विचित्रें अन्नें : चाखिलीं जगज्जीवनें ।।
गोपाळां प्रसादु भोजनें : होआवेआं ।। २१० ।।

मग देवांचा पांतिकरीं : अन्नें घातेली कमलदलांवरी ।।
एकीं सुरतरूचिआं मंजिरी : आंथुरैलिआं ।। २११ ।।

एकी घातेलीं कमलवनें : एक वृक्ष-त्वचांची भाजनें ।।
एकीं पोमिनीचीं पानें : करितांतीं ।। २१२ ।।

मग देवांचां राउ श्रीमुरारी : दधीभातु घेऔनि श्रीकरीं ।।
आवळें वेळें आंगुलिआं माझारी : मिरंवतांती ।। २१३ ।।

कीं तिअें ब्रह्मादिकें पदें : हातीं घेऔनि परमानंदें ।।
उदारपणांचेनि विनोदें : गोपाळां देआंवेआं ।। २१४ ।।

कीं तो राउ कैवल्याचा दानी : भणऔनि ब्रह्मविद्या हातीं घेऔनि ।।
पाळांतुसें देआंवेआं लागौनी : शरणागतांतें ।। २१५ ।।

उभा ठाकैला गोपिनाथु : बरंवेआंचां राउ श्रीमंतु ।।
रळियां रापदाळिया करींतु : गोपाळांसीं ।। २१६ ।।

आडनामीं वर्मी बोलावितु : गोपाळ हांसां आड पडतु ।।
नेर्वांची अमृतां दृष्टीं नीववीतु ।। सवंगडेयांतें ।। २१७ ।।

इंद्रनीळांची दिसी : नीलोत्पलांचीं कांती ।।
एकवटलीं तैसी सांवळी श्रीमूर्ती : मिरवतुसें ।। २१८ ।।

सकुमारें चरणकमलें : आनंदमकरंदुबहळें ॥
जेथ मुनीजनु अळि-कुळें : लुब्धें जालीं ॥ २१९ ॥
ध्वजवज्रपद्मांकितें : लावण्यें लक्ष्मी रंगली जेथें ॥
जिअें पुरविलींती मनोरथांतें : सेवकुजनांसीं ॥ २२० ॥
जेआंचिआं नखचंद्रदिप्ती : भक्तसोमकांतें द्रवेती ॥
योगजिनु-कुमुदें विकाशती : निवारी तापत्रयें ॥ २२१ ॥
जैसें परिसें लोह होअे कनकु : तैसें चरण-रजें जालें उदकु ॥
परि फेडी जगाचें महा-पातकु : संगमात्रें ॥ २२२ ॥
सुवृत्त ओहरते जंघायुगळ : घनीं पीटिलें तैसें जानुविभाग ॥
जेथ जन्मभूमी अनंग : ते न वर्णवे कटीस्थानु ॥ २२३ ॥
तेजाचां गुणीं विनिला : पहरें यशेनि रंगे-रंगिला ॥
तो पीतांबरू असें वेढिला : मालगंठी ॥ २२४ ॥
वरि मेखळा रत्नखचीती : जेथ क्षुद्रघंटिका रुणझणिती ॥
जैसिआं श्रुती भणती नेती : तेयां परब्रह्मातें ॥ २२५ ॥
नादु ब्रह्माचा घडला : कीं सांभववेधु मूर्तीसीं आला ॥
तो वेणु असें खोंविला : परिचिटांमाजी ॥ २२६ ॥
ब्रह्मगोळकां अ-पारां : भीतरीं एतेंजातें द्वारां ॥
तैसां नाभी-कमळीं भोंवरा : मिरवतुसें ॥ २२७ ॥
मुक्तीक्षेत्रीं आनंद-वल्ली : तैसी दिसें रोमावळी ॥
कीं मुनीजनभ्रमरांचिआं ओळीं : तिअें नाभिकमळीं ॥ २२८ ॥
त्री-भवनु सामाविलें भीतरी : तो उल्लासु दिसें ऊदरीं ॥
त्रि-वळी मिरवे जेआं वरी : जेवि मर्यादा केली ॥ २२९ ॥

जेआं वक्षस्छलातें ऊळगतां : लावण्यश्री जाली सायुज्यता ॥
तेथ कौस्तुभ सें मिरवता : पद्क एकावळीं ॥ २३० ॥

जे विरश्रिया वल्लभे वरिलें : अभय-दानीं वाखाणिलें ॥
ते भुजा-दंडु मिरविलें : श्रीमंत सरळ ॥ २३१ ॥

जेआंचेनि गजरें अभंग : त्रासु पावतीं दैत्यांचें संग ॥
ते काखें घातलें असें सिंग : मुरारि-मल्लें ॥ २३२ ॥

सुनीळे गगनीं विस्फुरतु : जैसीं कां विद्युल्लतु ॥
तैसा फूटा असें मिरवतु : स्कंदा-वरी ॥ २३३ ॥

त्री-रेखीं अलंकृतु : कंठु मिरवे सुवृतु ॥
जो प्रमदासें आलंगितु : वैजयंतियां ॥ २३४ ॥

कवण श्रीमुखाचें बरवेंपण : कैसें सदोंदीतु सुप्रसन्न ॥
तेआंचें इंदु लाहातां पाईकपण : वरि कलंकिआं न होता ॥ २३५ ॥

जेथिचें लावण्यु पांतां : जगाचेआं डोळेआं तढे पडता ॥
आनंदामृतपान होता : संसारतृप्तां ॥ २३६ ॥

एकैकीं अवअैवीचा बरवेपणी : मदनाची कीजे ऊवाळनीं ॥
तेआं श्रीमुखाची सारिखी वांटणी : चंद्रासीं कैंची ॥ २३७ ॥

जेथिचें अमृतघोळिलें बोल : फेडिती महा मोहाचें पढळ ॥
तें न वर्णवे श्रीमुखकमळ : आदिपुरुषां-चें ॥ २३८ ॥

हास्यु करितां गोपाळा : दंत-पंक्तीची फांकतुसे किळा ॥
ते सानुराग सु-निर्मळा : जैसी कां ब्रह्मविद्या ॥ २३९ ॥

सरळ सुप्रसन्न नयन : देखतांतीं त्रिभुवन ॥
ते सांगों जातांती श्रवण : जैसें कानें मातु तें ॥ २४० ॥

जेआंचेनि लीलांनुकारें : सृष्टी उपजे संहारें ॥
तिअें मिरवतांती धनुषाकारें : भ्रूमंडळें ॥ २४१ ॥

कमलकर्णिकां श्रवणीं : माजी गुंजाची खेवनी ॥
रत्नें होतांती ठेंगणीं : तें देखौनिआं ॥ २४२ ॥

अर्धचंद्रु टिळा भालस्थळीं : सुनीळें कुरळें तेंची भ्रमरांवळीं ॥
लुब्ध जाली परिमळीं : मुखकमलाचां ॥ २४३ ॥

मोरपिसांचिअें निहटीं : मिरवें सुढाळा मौक्तिकांचीं वेठीं ॥
बिरलीं रुळतिअें वीरगंठीं : जाति केतकीदळें ॥ २४४ ॥

गुणलावण्याचें निधानु : जो कमनीयु त्रीभुवनु ॥
तो न वर्णवे एकी रसनु : प्राकृता मसीं ॥ २४५ ॥

ऐसा सुंदर श्रीचक्रधरू : आरोगन करीतुसें स-परिवारू ॥
ब्रह्मादीकुं न लहाती अवसरू : गगनीं पांतु ठेलें ॥ २४६ ॥

पांतिकरां होतुसें भोजन : तें अमृतासीं नाहीं गोडपण ॥
ते व्हेळीं अन्नब्रह्म हें वचन : देवें साचु केलें ॥ २४७ ॥

देव अमृतपानु करीती : परि तेथौंनिआ पुढती ॥
जन्ममरणें निवारितीं : श्रीकृष्णप्रसादें ॥ २४८ ॥

तेआंचें देखौनि सदैव-पण : आपणपें धिःकारितीं सुरगण ॥
भणेंति सांडौनि मुकुटांचें भूषण : रांगो गोपाळां माजी ॥ २४९ ॥

याचां चरणेंसीं होअे संन्निधी : तरि तरीजैलु भव-जलधी ॥
तिर्यंचें पावतांती सिद्धी : ते आम्हां देवपणें नाहीं ॥ २५० ॥

एणें कैवल्यनाथें वीण : पारुखें ना आगमन ॥
तरि रीगौं ययां शरण : सर्वभावीं ॥ २५१ ॥

परि देवपणें नाहीं अधिकारू : हा ञ्ळगावेआ श्रीचक्रधरू ॥
एऱ्हवीं याचेंनि दास्यें संसारू : निभ्रांति तरतो ॥ २५२ ॥
उसिटें लाहावेआचें सायासु : तेथ सेवेंचि कवणि आसु ॥
एथ रीगों नअें आपैसु : ययांची कृपे वीण ॥ २५३ ॥
आघासुराचां मोक्ष देखौनु : विस्मयो पातिला चतुराननु ॥
वरि देवांचें बोल आइकौनु : कांइं वदतां जाला ॥ २५४ ॥
अवतरलासे कैवल्यदानीं : हा ध्वनी पडिलासे माझां कानीं ॥
तें पाहो आलां लोचनीं : तंवं नवल बळ देखिलें ॥ २५५ ॥
कें गोपाळ-त्रेखें खेळनें : कें आघासुरां मोक्षु देणें ॥
हें आम्हां देवां तें भूलविणें : पुरुखु सामान्यु नोहे ॥ २५६ ॥
आतां गोपाळवांसुरुवें चोरूं : मग जाणिजैलु हा निरधारूं ॥
मागिला सारिखा अवतारूं : कीं कांइं नवाइ सें ? ॥ २५७ ॥
ऐसें निर्धारिलें चित्तीं : एणें सत्यलोकींचेनि पतीं ॥
जेवं कैवल्यनाथां जाली प्रवृत्ती : आरोगणविनोदीं ॥ २५८ ॥
गोपाळें प्रसादुभोजनें आनंदैलें : मी माझेंपणु विसुरैले ॥
तंव देऊच्ची पाहावेंआं निगालें : वासुरूवांतें ॥ २५९ ॥
चरतें चरितें दूरि गेलीं : तेथौनि ब्रह्मेंनी नेलीं ॥
मग सर्वज्ञ-नाथें नटणा केली : भवंतीं पाहों ठेलें ॥ २६० ॥
तंवं एरीकडें चतुराननु : गोपाळ नेलें करीतु भोजनु ॥
जंवं श्रीकृष्ण मागौतें आलें जमनु : तंवं तेहीं न दखतीं ॥ २६१ ॥
जेआं ईश्वरांचिआं प्रवृत्तीं : ब्रह्मेआंचिआं कोडीं उपजेतीं ॥
तेआं वासुरूवें आणितां मागौती : सायास कवनु ? ॥ २६२ ॥

परि-चतुराननु भूलवावां : पवाडा थोरू करावां ॥
गोपगोधनां संबंधु देआवां : निजस्वरूपाचां ॥ २६३ ॥
या काजां देउ नेणता जाला : तंव ब्रह्मां निज-भुवनां गेला ॥
गोपवांसुरुवां सुरवाडु केला : राउळीचीं भणौनी ॥ २६४ ॥
कीं तें मज गमलें आन : करितां श्रीकृष्णांचें सन्निधान ॥
तेआं कांहीं जालें विघ्न : भणौनी ब्रह्मपदां नेलीं ॥ २६५ ॥
ना तरि जालेआं ईश्वराचें पण : पशुसीं तिहीं लोकीं विचरण ॥
हें दाखविलें समर्थपण : नारदादिकां ॥ २६६ ॥
कीं वस्तूचीं जवळीकुं जाली : भणऔनि सिद्धावस्था पातलीं ॥
ना तिअे ऋद्धी भोगावेआं नेलीं : सत्यलोकांसीं ॥ २६७ ॥
कीं श्रीकृष्णांचें उसिटें सेविती : तें ब्रह्मादिकां वंद्य होतीं ॥
साहानुक सत्यलोकु भोगिती : शेखीं कैवल्यपद ॥ २६८ ॥
असो हा बोलांचा विस्तारू : कांइं करिता जाला नंदाचा कुमरू ॥
जो आदिपुरूषाचा अवतारू : आर्त्त रक्षावेआं ॥ २६९ ॥
गोकुळां जाती जाली वेळ : तंव आपणची जालें वच्छें गोपाळ ॥
एऱ्हवीं गाईं स्त्रियांचें मन व्याकुळ : निऱ्हां होतें ॥ २७० ॥
जेथ अवतरलासें परमात्मा : तेथ दु:ख नाहीं भूतग्रामां ॥
तेआंचिअे दृष्टीपुढें संसारधर्मा : रीगावां नाहीं ॥ २७१ ॥
तेआतें आइकोनि जें भाविती : तें मायमोहीं सांडीजितीं ॥
आनंदसागरूं श्रीकृष्ण सेवितीं : तें होतीं जीवन-मुक्त ॥ २७२ ॥
आधींची देउ सर्वगतु : वरी तैसांची जाला मनोरथु ॥
तेंतुली रूपें धरौनि असें खेळतु : कांइं नवल्रु तेआं ॥ २७३ ॥

जेआंची जैसीं प्रकृती : जैसा वर्तणु जैसीं आकृती ॥
तें तो जाला कैवल्यपती : एकें वेळें ॥ २७४ ॥

एकु केविं जाला अनेकु : ऐसें बोलें नेणतां लोकु ॥
तरि सहस्रघटीं शशांकु : प्रतिबिंबतुसें ॥ २७५ ॥

जैसा मणि-गणीं तंतु : मेघांवलीं गगनांतु ॥
तैसा भूतीं विश्व-नाथु : कीं भूतें तेआं माजी ॥ २७६ ॥

हा कवनु करि निरधारू : जो वेदीं बोलतां अपारू ॥
जैं श्रीकृष्णु कृपा करी आदिगुरू : तैं भ्रांती फिटे ॥ २७७ ॥

जेआंचिअें घरींचीं कामारी : ब्रह्मांडें निजरूपें आकारी ॥
तो वासुरूवांचीं रूपें धरी : हें कांईं विशेषावें ? ॥ २७८ ॥

परि ईश्वराचीं लीलाप्रवृत्ती : भणऔनि निऱ्हासें वाखाणीजेंतीं ॥
जें आइकौनि जीवें मुंचती : संसारदु:खें ॥ २७९ ॥

दूधवडीची करडिं कांबरीं : रोदेचीं सोनेखैरीं ॥
निऱ्हां तेजाथिलीं भांगारीं : जुआं सांगडीं ? ॥ २८० ॥

एके मोहरीं मोरी पारडीं : एके वाघी चितळी पुंडीं ॥
आणिके देशसाया सांगडी : कोसी कनकवर्णी ॥ २८१ ॥

क्षीरसागराचें जाउपें तैसीं धवळीं : एकें शुद्धें तांबीं नेपाळी ॥
इंद्रनीळें प्रभेचीं नीळीं : विविधवर्णी ॥ २८२ ॥

धेनुसी होताति गर्भधानें : श्रीकृष्णातें चिंतितांति मनें ॥
तें बहत दीसतुसे काळें वानें : वासुरुवांसी ॥ २८३ ॥

गोपवनिताचें कवणु जाणें : जिआं उमटलें तोचि वाणें ॥
कीटकीं भृंगी होअे जेणें : तें कांईं तया नाहीं ? ॥ २८४ ॥

एक काळें गोरें सांवळें : एक काणें तारसें वेभळें ||
एक मीळखें मुरळें पींगळें : घोडमुखें || २८५ ||
एक बहिरें मुकें बोबडें : एक वेडें बागडें दीघडें ||
एक दांतिरें राखोडें फेंगडें : जामुन खुजें || २८६ ||
एक निऱ्हां सगुण साकारू : एक श्रीमंतु सुन्दरू ||
जैसें देवतांचें अवतारू : तैसें दीसतीं || २८७ ||
जेआंचा जैसा श्रृंगारू : जैसी वस्त्रें जैसा अलंकारू ||
तें तों जाला सर्वेश्वरू : आदिनाथू || २८८ ||
पावें तारपीं मोहरीं : सींगें डांगा पेंडारी ||
राजसां तामसां भावाची परी : ते हीं नटिला तो || २८९ ||
ऐसें अवगौनि मुरारी : येतुसें गोकुळा माझारी ||
तंवं संभ्रमु जालीं नरनारीं : तो वाणौ नेणिजे || २९० ||
जेआंचेनि तुषारें एकें पीजे : तेआं अमृताचां सागरू पाविजे ||
परमाणु दुर्लभ माणिजे : तेजेआंचा मेरू जोडे || २९१ ||
तैसें गोकुळजनांसीं जालें : जें न पाविजे कव्हणें बोलें ||
तें घरां पूसत आलें : परब्रह्म देखा ! || २९२ ||
आधीं वाणिजे जशोदानंदु : जेआं घरीं खेळे एकु गोविंदु ||
आतां घरोघरीं परमानंदु : गौळिआंचा ! || २९३ ||
सांडौनि सकळैक संगातें : योगिअें चिंतिति जेआंतें ||
पुत्र-भावें आलिंगितां तेआंतें : ते सुख कैसें होईल ? || २९४ ||
जरि मुखें मागिजेति शेषांतें : तरि वाणौ नेणिजे तेआंचेआं दैवांतें ||
जेआं घरीं लेकुरुवें सालंकृतें : परब्रह्मांची ! || २९५ ||

कवण ठाउ‍‌र्वेऱ्हीं सदैव-पण : जे वस्तु निराकार निर्गुण ॥
तें आळि करौनि मागे जेवण : गौळनीं ते ! ॥ २९६ ॥

अगाधु चाटु स्तवितां : न बोले वेदां बोलवितां ॥
तो गाई हंबारव करितां : पाठीं धावें ! ॥ २९७ ॥

योगियां नावरे कऱ्हणी परी : ठाउ नेंदीं यजितां स्वाहाकारी ॥
तो जेवीतुसें घरोंघरीं : गौळिआंचां ! ॥ २९८ ॥

जो तृप्त ब्रह्मरसें : आत्मारामु होऔनि असें ॥
तो देखा ढेंकुर देतुसें : ताकें दुधां ! ॥ २९९ ॥

देहां इंद्रिआंतें दंडौनी : जेआं पाठीं धावतीं मुनी ॥
तो गौळिआं शयनांसनुभोजनीं : सुल्लभु जाला ! ॥ ३०० ॥

यजितां अनेकीं अध्वरीं : न रीगेसी दीक्षीतांचां घरीं ॥
कां लोळसीं गौळिआं द्वारीं : श्रीकृष्णा तें तूंचि जाणसीं ॥ ३०१ ॥

परि भक्ति एकीं सुल्लभु मुरारी : हे जाणविलें ययां परी ॥
जो ‌ळगीजे सुरवरीं : तो गोवळ गौळिआं सीं ! ॥ ३०२ ॥

जरि भणावें विज्ञानु रचिलें : तरी सकळांसीं प्रेम वाढीनिलें ॥
हें न घडे आने बोलें : तुझिअें कृपें वीण ॥ ३०३ ॥

घरींचीं सांडौनि तान्ही : गाई बाइला पढिअेताति जाणी ॥
ते प्रीति सहस्रवदनीं : शेषु वाणौ नेणें ॥ ३०४ ॥

श्रीकृष्णरूपें डिंभें देखतां : ‌रसें पाण्हाउ न धरें माता ॥
तेणें दुग्धें भरीलिआ सरितां : गोकुळां माजी ॥ ३०५ ॥

कीं आदिपुरुष जाला दूधपीरू : तेआं करावेआं पाहोंनरू ॥
नारायणें धाडिला क्षीरसागरू : मज पांता ॥ ३०६ ॥

2८।८।७३

तेथ असें कैवल्यपती : भणऔनि घरां रीगालिआं सकलसंपत्ती ॥
ऋद्धिसिद्धीं अवसरू पांती : उ॰ळगावेआं ॥ ३०७ ॥
घरोंघरीं परगुणें : होतुसें मर्दना मादनें ॥
दीव्यु लावितांति चंदनें : सुगंधपुष्प-जातीं ॥ ३०८ ॥
षड्रसीं होतुसें आरोगणु : उ॰वाळौनिआं नींव लोणु ॥
वीडां देऔनि श्रीचरणसहवाणु : करतांतीं ॥ ३०९ ॥
क्षीरोदका पासवडेआं वरी : पहूडतुसें राउ॰ मुरारी ॥
वीजणें जाणवीति विद्याधरी : दास्य करीतांतीं ॥ ३१० ॥
पाहातेआं पाहारां दधिमंथनी : गौळनीं गातीं श्रीचक्रपाणीं ॥
तो ध्वनी आइकौनि श्रवणीं : देउ॰ उपहौडलें ॥ ३११ ॥
एकी गातीं श्रीकृष्णचरित्रातें : परिअें देतीं बालकांतें ॥
तियें आइकौनि निजकीर्तीतें : श्रीकृष्ण तोखतु ॥ ३१२ ॥
मंगलरागातें आळवीत : चतुर्विधा दंडीचे विद्यावंत ॥
एक सुहावीं रूपकें गात : राया गोविंदाचीं ॥ ३१३ ॥
बंदीजन मागध नागारी : पवाडें पढींति नानां परीं ॥
तेआं जाणाचा राउ॰ मुरारी : देत पसाअेदान ॥ ३१४ ॥
उ॰वाळौनिआं मंगलोच्यारू : मंत्रघोषु करीतिं द्विजवरू ॥
स्तवितातिं योगीश्वरू : कैवल्यपतीतें ॥ ३१५ ॥
तंवं उदैला दिनकरू : बलिभद्रेसीं नंदांचां कुमरू
निगाला वांसुरुवें चारूं : वृंदावनां ॥ ३१६ ॥
गोवर्धनाच्यां पाठारीं : गोधनें चारितांतिं खीरारीं ॥
तळवटीं असें राउ॰ मुरारी : वत्सपाळरूपें ॥ ३१७ ॥

तेआचां आइकौनि वेणुध्वनी : आनंद जाला धेनुंचां मनीं ॥
श्रीकृष्णरूपें वत्सें देखौनी : चरीं विसुरिलिआं ॥ ३१८ ॥

माडांचीं सप्रेमळें चित्तें : वरी वेधिलीं गोपिनाथें ॥
तिआ न सांभाळितीं आपणेआतें : तेथौनि उठावलिआं ॥ ३१९ ॥

गोपाळु माघारिआं वळिती : परि धेनू वंबाळैलिआं न संवरेतीं ॥
जैसिआं अ-निवारू शक्ती : ईश्वरीचिआं ॥ ३२० ॥

जैसें कर्म-मार्गातें सांडौनी : ब्रह्मज्ञानी प्रवर्तैलें मुनी ॥
तैसिआं निजपथांतें लंघौनी : आधाडा उतरितांती ॥ ३२१ ॥

तिआं स्नेहो दूधभरितां सरितां : आनंदसागरीं मिळतां ॥
कीं वत्सशिशुआंवरी वरिषतां : मेघवृष्टीं ॥ ३२२ ॥

कीं महंताची मती : दशोपनिषदांचिआं श्रुती ॥
कीं सांभवादिका मूर्ती : पाळांती ईश्वरां तें ॥ ३२३ ॥

वरौनि उतरतां गोवर्धना : कैसिआं तें धापसिआं पढिआंसलिआं मनां ॥
कीं अंतराळौनि देवांगना : श्रीकृष्णवेंधें ॥ ३२४ ॥

वत्सां मीनलेआं धेनु : दर्शनें निवालिआं तनु ॥
स्पर्शसुखातें तें सहस्रवदनु : वाणौ नेणें ॥ ३२५ ॥

तिअें वासुरुवें तरि जाणी : परि परमानंदु भरलासे मनीं ॥
तेणें धातुआदिकरौनी : अमृत उन्ळतांती ॥ ३२६ ॥

वत्सा करितां स्थनपानु : धेनुचां न सावरे पान्हु ॥
तेणें होतसें त्रीभवनु : क्षीरभरितु ॥ ३२७ ॥

जैसें योगिअें हृदइं प्रवेशवितीं : इंद्रियद्वारां ईश्वरमूर्ती ॥
तैसिआं धेनु चाटितां दीसेती : वासुरुवां तें ॥ ३२८ ॥

गौळीं आलें गोधनां पांठी : ते पुत्रमुखरूप देखौनि दृष्टीं ॥
आनंदु जाला तो अे सृष्टीं : निरौपमू ॥ ३२९ ॥
प्राकृतां अपत्यांचें आलिंगण : जालेआं भोंवतीं सकळै जन ॥
वरि तें कैवल्यानंदुघन : बालवेषें ॥ ३३० ॥
नेणतां कीजें अमृत-पानु : तरी मानवां होअें अमर-पणु ॥
तैसें पुत्रभावें ब्रह्मालिंगनु : दे निर्वाणसुखातें ॥ ३३१ ॥
सगुणा ईश्वराचिआं संगतीं : कैसीं जीवस्वरूपें नीवतीं ॥
तें निरौता खूणु जाणेंती : भक्त-योगीजनु ॥ ३३२ ॥
गाई गौळियांचें प्रेमु देखौनी : विस्मयो जाला रामाचां मणीं ॥
मग ज्ञानदृष्टीं ठाकौनीं : निहाळितां जाला ॥ ३३३ ॥
मग वदें बळिभद्र देऊ : हा देखो दिव्यशक्तींचा प्रभाऊ ॥
कीं हा आपणचि देवांचां देऊ : ऐसें खेळतुसें ॥ ३३४ ॥
कवण जाणें यांचें महिमाण : एणें मुखामाजी दाविलें त्रिभुवन ॥
राक्षसी पूतनेचें शोखण : केलें स्थनपाणु करितां ॥ ३३५ ॥
आणीक एकु नवल जालें : जै अर्जुनाचे रुख मोडिलें ॥
तैं आम्हां दिव्य-पुरुष दाखविलें : एणें श्रीकृष्णें ॥ ३३६ ॥
अनंता सृष्टी जेआंची करणीं : तो अवतरिला इअें मेदिनीं ॥
भक्तकैवारी श्रीचक्रपाणी : मायावेषें ॥ ३३७ ॥
जीवु प्रकृतीपासोनि उजिडें : जेणें भव-बंध विघडे ॥
तो हा करीतुसें पवाडें : आती रक्षावेआं ॥ ३३८ ॥
ऐसें निरधारिलें ज्ञान-पथें : मग पाळाइलें वत्सगोपाळांतें ॥
तवं अवघींचीं वस्तु-रूपें मूर्तें : पढियासलीं ॥ ३३९ ॥

एरें प्राकृतें कांईं जालीं : तंवं देखे ब्रह्मेनीं नेलीं ॥
भणें हांचि खेळतुसें अणेकीं खेळीं : स्वामी माझा ॥ ३४० ॥
तंवं शंकर्षणु देवांतें भणें : तुझें महिमानु कवण जाणें ॥
जेणें एके शक्तीचेनि गुणें : ब्रह्मां अपमानिला ॥ ३४१ ॥
देवा तुझें अवतरण : दुष्ट दैत्यु निदर्ळन ॥
शंरणागताचें उद्धरण : करावेआं ॥ ३४२ ॥
वस्तु संबंधें बोधु पातैला : भणऔनि स्तुती करौं लागेला ॥
तंवं हास्य करौनी श्रीकृष्णें मोहिला : बळिभद्रदेॐ ॥ ३४३ ॥
मग गात प्रभुचरित्रांतें : आनंदवीतु त्रीभुवनांतें ॥
पुढां करौनि वांसुरुवांतें : आले गोकुळां माजी ॥ ३४४ ॥
ययां परी प्रत्यदीनीं : देॐ खेळे गोकुळ—वृंदावनीं ॥
तवं से जालीं मनीं : चतुराननां ॥ ३४५ ॥
ब्रह्मेआचां क्षण एकु भरिला : तंवं संवत्सरू पालिटैला ॥
मग तो आपुलें केलें पाहौं आला : मर्त्यलोकां ॥ ३४६ ॥
तंवं विवरों लागैला चित्तीं : हा देखा सत्यलोकिचा पती ॥
अधुना गाईं स्त्रियां कांईं करीतीं : निन्हा मोहाकुळां ॥ ३४७ ॥
परि नेणें ईश्वरांचें महिमान : जेणें आनंदवीलें त्रीभुवन ॥
तेआंचीं होतीं तेआं व्याकुळपण : हें कैंवी घडे ? ॥ ३४८ ॥
सिंहाचें बळ विसरैला : जसा गजु मदां चढला ॥
तैसा असासितु बोलों लागैला : चतुराननु ॥ ३४९ ॥
चोरा शंखा पाठीं धावीनिला : हरिणाक्षु मारिला ॥
हिरण्यकशिपु विदारिला : अतुळबळिआं ॥ ३५० ॥

तें शक्तिसामर्थ्यु कें गेलें : कां तेणें अभिमानु सांडिलें ॥
कीं अवक्रिअे ब्रह्मु अवतरैलें : हें साच मानों ॥ ३५१ ॥
कीं मानुषपणां आवगला : भणऔनि सत्यलोकां एऊ॰ बिहाला ॥
कीं नवल प्रपंचु रचिला : तेणें देवराअें ॥ ३५२ ॥
ऐसें विवरतुं चतुराननु : आला निज-भुवनां पासौनु ॥
तंवं प्रतापु देखिला गहणु : विज्ञान—शक्तींचा ॥ ३५३ ॥
पावेआं सिंगाचां गजरीं : पडिसादु पडिताअें अंबरीं ॥
सुताळ ताल घोळ मोहरी : वातांतीं ॥ ३५४ ॥
विसरौनि देह-भावांतें : गातु श्रीकृष्ण-चरित्रांतें ॥
गोपवासरुवें आनंदभरितें : देखियेलीं ॥ ३५५ ॥
भणें मीं आला एथें : तंवं तिअें आणिली गोपि-नाथें ॥
ज्ञान-दृष्टीं पाहें मागौतें : तंवं देखें सत्यलोकीं ॥ ३५६ ॥
पुनरपि पाहे भू-मंडळीं : तंवं समवेतु वत्सगोपाळीं ॥
श्रीकृष्ण मिर्वतुसें गोकुळीं : जो सृष्टीं निरोपमु ॥ ३५७ ॥
ययां परि दों ठांईं पांतां : संदेहां पडिला सृष्टीकर्त्ता ॥
तंव आणिक एकु जाला देखतां : तें परिअेसां पां ॥ ३५८ ॥
सकळ हीं चतुर्भुज गोपाळ : करीं शंख चक्र गदा कमळ ॥
पीतांबरधारीं सुनिळ : कौस्तुभकंठी ॥ ३५९ ॥
पदकीं नीळेआंची खेवनी : भुजीं अंगदांची मिरवणी ॥
मकरकुंडलें श्रवणीं : झळकतांतीं ॥ ३६० ॥
सकल—मुकुट—पाटवर्धन : वन—माळां विराजमान ॥
आघवें श्रीवत्स—लंछन : देखिअेलें ॥ ३६१ ॥

तंवं निन्हां विस्मयो पातैला : मग मनीं निर्धारों लागैला ॥
तंवं एकैकू ब्रह्मा देखिला : एकैकापासीं ॥ ३६२ ॥
धरोनी साकारू मूर्तीतें : एकेकापासीं सकलें तत्वें ॥
उपासतातीं एकमेंकातें : शक्तिचक्रें ॥ ३६३ ॥
ब्रह्मा विष्णु महाकाळु : सकलहाहान दिग्पाळु ॥
सप्तसमुद्राष्टकुलाचळु : मूर्तधारी ॥ ३६४ ॥
आणिकें हीं महाभूतें खेचरें : क्षुद्रदेवतां जलचरें ॥
तिअें देखिलीं सपरिवारें : ऊळगतां ॥ ३६५ ॥
ते ह्वेळीं मज गमलें ऐसें : जे देवांतें थोरे विसुरासें ॥
भणऔनि दाखाळा पांतुसें : सर्वदळांचा ॥ ३६६ ॥
कीं देवतां तें सदा ऊळगतीं : परि तें रूप कहीं न देखतीं ॥
भणऔनि पाहों आलीं श्रीमुर्ती : परब्रह्माची ॥ ३६७ ॥
श्रीकृष्णांचीं नवलें कवतुकें : जो नारायणुनाभीकमळीं चुकें ॥
तो ब्रह्मांडें देखताअें अनेकें : भू–मंडळीं. ॥ ३६८ ॥
चतुराननां नाहीं मिती : ते ह्वेळीं भणो लागैला चित्तीं ॥
अघवें साचु कीं भ्रांतीं : तें जाणावे ना ॥ ३६९ ॥
जैसें साटकेचें अग्निस्छंभनु : तैसा जाला चतुराननु ॥
कवण मीं कवण स्छानु : ऐसा विसरौनि गेला ॥ ३७० ॥
एकैका गोपाळांची रिद्धी देखौनु : भूलैला चतुराननु ॥
परि एकैकासीं थोर अभिमानु : जाणुपणाचां ॥ ३७१ ॥
ऐसेंआं ब्रह्मेआंचिआं कोडी : रोमकूपीं असतीं एकी कडीं ॥
तेआं रूपाची थोरी केवढी : कवणुं जाणें ? ॥ ३७२ ॥

तेआं ईश्वराचें करणें : ठाउवें करीं आला ब्रह्मपणें ।।
सुखें असें ना लेकुरुवेंपणें : सत्यलोकीं ।। ३७३ ।।

सांडा सांडा अहंकारा : अनुसरा श्रीचक्रधरा ।।
मग जाणाल परात्परा : विचारातें ।। ३७४ ।।

तोची धेआवां मनीं : तेआंचें पवाडे आइकावे कानीं ।।
भणें केशवराजु मुनी : श्रोतेयांतें ।। ३७५ ।।

हेचि नारदु भणे ब्रह्मेआंतें : आझौई सांडौनि अहंकारातें ।।
उ‍ळगै श्रीकृष्णातें : भ्रांती फिटावेआं ।। ३७६ ।।

मग ब्रह्मसुतु गोकुळासीं आला : तेणें श्रीकृष्णु देखिला एकला ।।
विस्मयो पाऔनि भणों लागैला : नेणीजें चारित्र तुझें ! ।। ३७७ ।।

माते पितया देखतां : बळां भूलि ठाके सर्वथा ।।
तो बोलु कवणां सर्वज्ञनाथां : हें विचारि पां ।। ३७८ ।।

मशकांचें पाहात्रेआं ताराण : कांई सिंहाचें विचरण ।।
तुझी शक्ती विश्वमोहन : तेथ ब्रह्या कांई ? ।। ३७९ ।।

राउळीची चोरी केली थोरी : ते उपसाहावा जी मुरारी ।।
कां सृष्टिकर्त्ता पूर्वधरी : भणऔनियां ।। ३८० ।।

नारदाचेआं बोला हासिनिला : भणे म्हातारपणें भूलैला ।।
मग अपराधु उपसाहिला : कृपावंतें ।। ३८१ ।।

प्रसन्न जाला देवांचां राउ : आकर्षिला दिव्यशक्ती प्रभाउ ।।
तंवं देखिलें तें जालें वाउ : एकला श्रीकृष्ण साचु ।। ३८२ ।।

फीटली ब्रह्मेआंची भ्रांती : देउ देखिला आनंदमूर्ती ।।
चिद्घणु श्यामल–कांती : पुतळा कैवल्याचा ।। ३८३ ।।

आरोगितु निगाला : तेणेंचि वेषें नटला ॥
गोपवांसुरूवें पाहों लागैला : वनामाजी ॥ ३८४ ॥

तोचि दधी-भाताचा उंडा वामकरी : आवळें वेलें आलेआंचिआं फडतरीं ॥
धरिलिआं असतीं आंगूलिआं माझारीं : परमानंदे ॥ ३८५ ॥

मग दातारा जवळिकें आला : विनत्कंधरें नमस्कारू केला ॥
मग तो विणवितां जाला : करां जोडौनीं ॥ ३८६ ॥

भणे जालेआं रवीचा प्रकाशु : न दिसें खद्योतांचा अभासु ॥
तैसा माझियां बुद्धिचा विकाशु : तुज पुढे ॥ ३८७ ॥

परमाणुची केसनी थोरीं : परि मेरूसीं हीं करी सरी ॥
तैसीं मिआं केली परी : तूं सीं देवा ! ॥ ३८८ ॥

मशकां प्रौढी खगपतीसीं : विरुळेआं शेखेसीं सरीसीं ॥
तैसें मिआं केलें तुजसीं ॥ प्रभु आदिनाथा ! ॥ ३८९ ॥

कीं कोल्हा मदें न सांभाळी : सिंहेनसीं बोले बिरुदावली ॥
तैसीं मिआं केली थोरी आगळीं : तूंतें नेणौनिआं ॥ ३९० ॥

उदरीं करी चलनवलनां : तेआं दु:खां नाहीं गणनां ॥
मातेसीं निन्हा लोभाळुपणा : तेणें बालकें जीती ॥ ३९१ ॥

रोगिआं विरुद्ध बोलतां : वरि वैद्यु अवेळु कारितां ॥
तरि तेआं कैचें जीवितां : सांघे जी देवा ! ॥ ३९२ ॥

आठऔनि अपकारांतें : पृथिवी सांडी जरी धैर्यातें ॥
तरि चतुर्विधां भूतग्रामांतें : संवरितें कवण ? ॥ ३९३ ॥

देऊ सहजेची कृपाळु : शरणागत—जनवत्सलु ॥
आर्त्तांसीं निन्हां मयाळु : अनाथ—नाथु ॥ ३९४ ॥

आतां शरण आलों दातारा ! : अहो जी प्रभु श्रीचक्रधरा ! ॥
अ–निमित्य–बंधो करुणाकरा : सकळ हीं उपसाहावें ॥ ३९५ ॥

तूं न होतांसीं भृत्य–वत्सलु : न करितांसीं आनंदाचां सुकाळु ॥
तरि संसाररूप दुःकाळु : जीवां केवीं जातें ? ॥ ३९६ ॥

तूं न करितासीं उदारपण : नेदितांसीं आपुलें ज्ञान ॥
तरि घोर संसार–भ्रमण : जीव केवीं जातें ? ॥ ३९७ ॥

तूं नेदितांसीं आनंद–धणु : आपुलें सान्निधानु ॥
तरि जीवांसीं मोक्ष–साधनु : कवण करितें ? ॥ ३९८ ॥

तूं नेदितांसीं कैवल्यपती : आपुली नित्यभक्ती ॥
तरि परमानंदाची प्राप्ती : केवी होती ? ॥ ३९९ ॥

तूं निराकार निर्गुणु : जरि न होतांसीं सगुणु ॥
तरि पतितांचां कुढावा कवणु : करिता सांधैं ? ॥ ४०० ॥

तूं परब्रह्मीचा राणा : जरि न करितांसीं साकारपणा ॥
तरि जीवु बापुडे कवणा : उद्धरितें ? ॥ ४०१ ॥

तूं श्रीकृष्णा न करितासीं अवतारूं : तरि कवणु फेडिता भूमीचा भारू ॥
दैत्यांचां करौनि संहारू : कवण स्थापिते देवांतें ? ॥ ४०२ ॥

तूं न होतासीं आदिकारण : तरि आम्हां कैचें ब्रह्मपण ॥
कर्म–फळीं समर्थपण : देवांसीं कैंचें ? ॥ ४०३ ॥

तुझें सहजगुण ऐसें : अवतरलासीं मायावेषें ॥
कैवल्य देआवेआं दोषें : शरणागतांसीं ॥ ४०४ ॥

ऐसें अनंत अवतारूं : एकैकीं पवाडें केलें अपारूं ॥
वरि गुणवतीं परमाणु तारू : परि तें न वाणवतीं ॥ ४०५ ॥

मी देवा कांईं करीन स्तुती : सांघैं माझी केउतीं मती ॥
जो भूलवीला एकी शक्तीं : तुमचिआ ॥ ४०६ ॥
परि लेंकरुआंचें बोबडें बोलणें : मायबापां कोडिसवाणें ॥
तैसें माझें स्तुती करणें : श्रीकृष्णा तुजपुढें ॥ ४०७ ॥
दीपें ओंवाळिजे दिणकरू : क्षीराब्धां दुधाचां पाहोंनेरू ॥
तैसा तुज पुढां मतीचा विस्तारू : आइके सर्वज्ञनाथा ! ॥ ४०८ ॥
जरि होओ रवीची दिप्ती : तरि डोळें सकलांतें देखती ॥
तुझेनि प्रसादें वाणीजेती : चरित्रु तुझें ॥ ४०९ ॥
तुझियां पुण्यकथां नाइकितां : जीवां नाहीं पवित्रता ॥
तरि परमार्गीं योग्यता : केवि होओ ? ॥ ४१० ॥
ऐसें कवणुसें आचरितु : जेणें चोखाळे आत्मतत्त्वु ॥
एक तुझें च्चारित्रामृतु : वांचौनिआं ? ॥ ४११ ॥
जऱ्हीं देखिजैल्तु इंद्रियांतें : जाणिजैल्तु मनां-पवनातें ॥
तरि न पाविजे पर-पथातें : तुझिअे कृपेविण ॥ ४१२ ॥
यम-नियमु-आसनीं : सकलै योगुसाधनीं ॥
तुझेंनि बोलेंवीणु ब्रह्मज्ञानीं : रीगावां नाहीं ॥ ४१३ ॥
अहंकारें मुक्ति मानिती : परि आत्मतत्त्वां नेणती ॥
प्रकृती वेगळें न होतीं : कव्हणीं काळीं ॥ ४१४ ॥
पवनादिकीं धारणा : जीवां नाहीं चोखाळेपणा ॥
तेथ कर्मांचीं केउतीं गणना : मुक्तिमार्गीं ॥ ४१५ ॥
सहजेंची आवडे प्रकृती : वरि श्रवणीलिं फलांची श्रुती ॥
तेणें दुणाविली जीती : ते जीवें न संडे ॥ ४१६ ॥

जे प्रवर्तैलें कर्ममार्गी । नवसिअें सूति बंधनालागीं ॥
ते वदती नाशिलें वीत-रागीं : सांडिलें प्रकृतीतें ॥ ४१७ ॥

आपणेआं सारिखें न देखतीं : तेआंतें कर्मनष्ट ऐसें भणेतीं ॥
जैसिआं पण्यांगना हासेती : कुलस्त्रिआंतें ॥ ४१८ ॥

जैसा विरहिणीं चंद्रु ताविता : चंदनु न होअें नीववितां ॥
तैसें पाढियासती निवृतां : कर्मजडांसीं ॥ ४१९ ॥

एकु प्रवृत्ती उपदेशिती : एकु तिआंची तरलों भणती ॥
एकमेकांतें वाणितीं : निंदिती ब्रह्मविंदातें ॥ ४२० ॥

कर्मांचिअें वरगणें पडिलें : अर्थकामीं लुब्ध जालें ॥
ते तुजवीणे कवणाचेनि बोलें : निवृत्त होती ? ॥ ४२१ ॥

जेणें प्रपंच पदार्थु मैळें : तेणें धूतां कहींचि नुजळे ॥
अपवित्रु संगें कवणी वेळें : पवित्रु नोहें ॥ ४२२ ॥

तैसा कर्में कर्म-बंधु न फिटे : जेवि संबंधें मोहो न तुटे ॥
हे अघटितु घटे : जरि तूं कृपा करीसी ॥ ४२३ ॥

तैंची मुक्तीचें द्वार उघडे : जरि संतांचां संगु घडे ॥
उदंडे आइकींजेति पवाडें : श्रीकृष्णा तुझें ॥ ४२४ ॥

तरीची भवबंध तूटितीं : जरि भक्तांसीं होये संगती ॥
तुझीं लीलां नामें गाइजेती : जेहीं हाकारिला एसीं ॥ ४२५ ॥

जें पररूप निर्गुण : ते जाणवैल कवण ? ॥
नामरूपवर्णाची खूण : जेथ नाहीं ॥ ४२६ ॥

जें सर्व-गत निराकारू : मना वाचे अगोचरू ॥
कूटस्थ भणिजे अक्षरूं : कैवल्य रूप ॥ ४२७ ॥

परि हें सांवळें साकारूं : जेथ गुण असेति अपारूं ॥
तें तुआं लीळां धरिलें सुंदरू : मनुष्यरूप ॥ ४२८ ॥
याचें करों भणों वर्णनां : तरि श्रुतीसी न होअे गुण–गणना ॥
पवाडें सहस्रवदनां : वाखाणजेति ना ॥ ४२९ ॥
तूं सकलांचां पति : ऐसें हें देव तूंतें नेणती ॥
एऱ्हवीं अहंता कां उपजेति : देहांदिकीं ॥ ४३० ॥
तूं एकु कैवल्याचा राणा : ऐसें जीवां होतें जाणपण ॥
तरि कैचें जन्ममरण : संसारामाजी ॥ ४३१ ॥
अवधारी कैवल्यपती : आधींची जीवुं तूंतें नेणती ॥
वरि पडिलें महा-मोहांचा हातीं : तेणें बांधौनि ठेलें ॥ ४३२ ॥
अहंतेचें हुंवर गळां : ममतेचें हात–खोडें सकळां ॥
वरि कर्मांचिआं बहुती शांखळा : घातेलिआं ॥ ४३३ ॥
कामक्रोधीं विभांडिले : अहंकारें विचंबिलें ॥
निऱ्हां भीकें सवते केलें : मदमच्छरीं ॥ ४३४ ॥
तृष्णाजलीं बुडलीजतांती : व्याधि वियोगाचें घाअे पडितांती ॥
ते ह्वेळीं भले तें करों भणताती : काकुलतैलें ॥ ४३५ ॥
लोभाचिअें आधारिअें घातिलें : ज्ञानेंवीणु उपवासी पडिलें ॥
नाना मळीं मलीनु जालें : जीवु बापुडे ॥ ४३६ ॥
दीनानाथाचां कैवारी : सकलां बंध मोक्षु करी ॥
ऐसां न देखो सचराचरीं : तूं एक वाचौनि ॥ ४३७ ॥
तुआं देव सकळैं सोडविलें : सुभट दैत्यु विभांडिलें ॥
राऊ वांदौडी हौनि काढिलें : असंख्यातु ॥ ४३८ ॥

आपुलें नाम एकें धाडी : जें बंदिशाळे हौनि काढीं ॥
वळें शांखळां खांडी : मोहाचिआ ॥ ४३९ ॥

तुझें पवाडें जेथें चालती : तरि महामोहा तें विभांडौनि फेडिती ॥
बांदिअें काढौनि आणितीं : तुजपाशीं ॥ ४४० ॥

जें नेणतीं तुझा पथु : ते पडिलें संसारवनांतु ॥
जेआंचां आम्हीं नेणौ प्रांतु : ब्रह्मा भणें ॥ ४४१ ॥

अवतारीं काह्नो जगजेठीं : तुझेआं ज्ञानाची पडैलु दृष्टी ॥
तरि मोहोचि नाहीं इअें सृष्टीं : ऐसें होऔनी ठाकैलु ॥ ४४२ ॥

नाना फळीं फळतें : सुखदु:ख-रसातें श्रवतें ॥
जेथ कर्म–तरू आंदौलते : ब्रह्मकठाहवेऱ्हीं ॥ ४४३ ॥

विचित्रां वेधवेलीं : दिसतीं सहजें सिद्धांऽऽळीं ॥
भावाभावचिआं झाडौली : चहोंकडें ॥ ४४४ ॥

मार्गु लोपती विषये तृणें : इंद्रियें चौताळतीं हरिणें ॥
कऱ्हणां न एती संवरणें : जैसें प्राणाचे रोहीं ॥ ४४५ ॥

अहंकारूमद-भद्रजाती : लोभु मत्सरू महीषें जुंझती ॥
मोहादिव्याघ्रु धांवती : लाहासि अविद्येचिआं ॥ ४४६ ॥

वळें जगातें घिभांडुनु : डोडपणें राहिला मदनु ॥
जेथ क्रोधपंचाननु : त्रसितु धर्म–दिग्गजातें ॥ ४४७ ॥

गर्वाभिमानुपर्वता : जेथ दरी तृष्णा ममता ॥
अज्ञानांधारें पडिता : भ्रमाचें काळवषें ॥ ४४८ ॥

कालभुजंगाचिआं घेरणी : तैसिआं दिठीं डंकिती कामिनी ॥
काम-विखें विखारा सर्पिणी : घुधुवातांतीं ॥ ४४९ ॥

प्रियाप्रिये वशजालीं : दर्शनस्नेहदावानळीं ॥
तापत्रअें ज्वालावलीं : भूतें करपतांतीं ॥ ४५० ॥
आटविअें भीतरील अंधारें : ज्ञानरवीची प्रभा न संचरे ॥
भणऔनि दिशा भूलैलीं वनचरें : मोक्षमार्गीचीं ॥ ४५१ ॥
तूं आनंदघनु मुरारी : प्रकटलासीं वनां-माझारीं ॥
तरि वरुषें अमृत—तुषारीं : आर्त्तजनांवरी ॥ ४५२ ॥
नीववी आपुळां बोलीं : अवलोकीं कटाक्षीं सरळीं ॥
जीवांसि करीं नवाळी : कैवल्य-सुखाची ॥ ४५३ ॥
फेडावेआ अंधकारातें : कांईं वाणावें दिनकरातें ॥
तेवि जीवोद्धारावेआं तूतें : विणवावें न लगे ॥ ४५४ ॥
तूं सकळांचा दातारू : अवतरिलासी ईश्वरू ॥
तुझिअें दृष्टिपुढां संसारू : उभा न ठकें ॥ ४५५ ॥
तुझेआ संगाची थोरी न वर्णवे : जेणें झाडां जालीं वंद्यपणें ॥
देविका महिमा कवणु जाणें : तें सांघें श्रीकृष्णा ॥ ४५६ ॥
तुझिये-महिमेचा नेणवे पारू : तूं ज्ञानविज्ञानां दातारू ॥
वेधवतीदीक्षा-गुरु : चराचरासीं ॥ ४५७ ॥
तुझे पवाडें कांईं वाणुं : अवतरिलासीं चतुर्भुज होंउनु ॥
वसुदेऊदेवकींमोहनु : वालकु जालासीं ॥ ४५८ ॥
विषदानुदेती पूतनां : ते तुआं पाठवीली वैकुंठ-भुवना ॥
वैरें मुक्ती देवकीनंदना : भक्तां काईं देशीं ? ॥ ४५९ ॥
तुझा शक्ती पराक्रमु पांता : कांईं काकबकतृणावर्ता ॥
रुखु मोडिलें हें वाणितां : थोरी न दिसें ॥ ४६० ॥

परि नवल एकु जालें : जे नारद-शापें वृक्षत्व पातिलें ॥
तें तुझेंनि स्पर्शें उद्धरिलें : कुमर धनदाचें ॥ ४६१ ॥

आणीक हीं पवाडे गहन : करिसीं कालियाचें दमन ॥
गोवर्धनाचें उद्धरण : वामकरांगुळीं ॥ ४६२ ॥

केशिया उभा फाडौनी : चाणौर मोष्टिकु मोडौनि ॥
कंसादीकु वधौनी : बांदिऐ ऽऽडविसीं ॥ ४६३ ॥

जरा-संदु जीणसी समरीं : पांडवांचा होंसीं कैवारी ॥
गोपीसहितु द्वारकापुरीं : राज्य करीसीं ॥ ४६४ ॥

तूं अवतरिलासीं ईश्वरू : भणऔनि ते हीं प्रतापु न होअे थोरू ॥
परि वाणितां होतसें उपकारूं : आर्त्तजनांसीं ॥ ४६५ ॥

अहो जी प्रभु करुणाकरा : हे विणवणी अवधारा ॥
ऽऽळगो देआं श्रीचक्रधरा : आणिकें काज नाहीं. ॥ ४६६ ॥

जय जय परात्परा परमेश्वरा : जय निर्गुणा निराकारा ॥
जय प्रमाणां अगोचरा । परमपुरुषा ! ॥ ४६७ ॥

जय अनंतरूपा अव्यक्ता : जय निर्गुणा गुणातीता ॥
जय चराचरूभर्त्ता : विश्वरूपा ! ॥ ४६८ ॥

जय जय श्रीकृष्णा मेघश्यामा : जय अमूर्त्ता परब्रह्मा ॥
जय गोपी-वल्लभा आत्मयारामा : जगमोहना ! ॥ ४६९ ॥

जय जय त्रिभुवनजीवना : जय सकलानंदघना ॥
जय सकलफलनिधाना : आदिपुरुषा ! ॥ ४७० ॥

जय अगाधबोधदायका : जय शक्तिप्रदा वेधका ॥
जय सकलभूतां नंदका : आनंदमूर्ते ! ॥ ४७१ ॥

जय सुरवरवंद्या मुकुंदा : जय नित्यानंदकंदा ।।
जय आर्तां अभयप्रदा : कृपावंता ! ।। ४७२ ।।

जय सकळाधारू अपारा : जय सर्वगत साकारा ।।
जय गोपवेष पेंढारा : काह्नो जगजेठीं ! ।। ४७३ ।।

जय अनंतानंतमहिमा : जय अनामेआं सहस्रनांमा ।।
जय परदैवा परमधामा : परमात्मरूपा ! ।। ४७४ ।।

जयाव्यथा कमलनअेना : जय अच्युता प्रसंन्नवदना ।।
जय सकळजीवुजीवना : आनंदरूपा ! ।। ४७५ ।।

जय जय कैवल्यपती : जय भक्तजनां परमगती ।।
जय परममंगळमूर्ती : परमेश्वरा ! ।। ४७६ ।।

स्तुती करितां देऊ मानवला : ब्रह्मेआं नाभी-कारू दीह्नला ।।
मग तो वांसुरुवें आणितां जाला : क्षेणामाजी ।। ४७७ ।।

सत्यलोकीं आलखतीं बांधिलीं : तैसी अमृतें दृष्टीं पातलीं ।।
मग तिअें गोपवांसुरूवें उगानिलीं : गोपिनाथें ।। ४७८ ।।

मग देवाचेंनि राअें श्रीचक्रपाणी : ब्रह्मेआं दीधली पाठवणी ।।
मग तो लागौनि श्रीचरणीं : विणाविता जाला ।। ४७९ ।।

अवधारी कैवल्य-दानी : तूंची वसावा माझां मनीं ।।
सदां देखावांसी लोचनीं : श्रीकृष्णराया ! ।। ४८० ।।

जें पातलें तुझा योगु : तेआं भक्तांचां मज देईं संगु ।।
जेथ तुझिअें कथेचा प्रसंगु : होअे निरंतरू ।। ४८१ ।।

आपुलेआंचा देऊनि संबंधु : फेडिसीं महा-मोहाचा बंधु ।।
तरि तूं अगाधाचा अगाधु : सुखलभू होसीं ।। ४८२ ।।

जेआंची आइकौनि गुणकीर्ती : तन-मन-प्राणु नीवती ॥
तो तूं देखौनि कैवल्यपती : कवणु सांडौ शके ? ॥ ४८३ ॥
परि तूं भणतांसीं तें करितां : थेर लाभुसें गोपिनाथा ॥
भणऔनि घातिलें दंडवतां : चतुराननें ॥ ४८४ ॥
श्रीचरणीं ठेऔनि माथा : वदों लागैला सृष्टिकर्ता ॥
मी असैनु श्रीकृष्णा तुझा होता : मग ठाकें तें करीं ॥ ४८५ ॥
असो ब्रह्मा निघाला निज-भुवनां : हें चरित्रु आइकोनि सुरगणां ॥
जयजयकारी देवकीनंदनां : करीती पुष्पवृष्टी ॥ ४८६ ॥
तंवं सकैळीं सहितु गोपाळीं ? श्रीकृष्णें आरोगणा सारिलीं ॥
मग वांसुरुवें आणिलीं : जिअें चरुतें होतीं ॥ ४८७ ॥
मग पावेआचेनि सुसंदछंदें : हें चरित गातु परमानंदें ॥
वीजें केलें प्रभु-गोविंदें : गोकुळांमाजी ॥ ४८८ ॥
गोपाळु सांघैति घरोंघरीं : पडिलों सर्प-मुखा माझारी ॥
आजि राखिलों एणें मुरारी : नंदाकुमरें ॥ ४८९ ॥
पर्वतासारिखा थोरू : तो लीळां वधिला विषारू ॥
तेआं नामु अघासुरू : ऐसें देऊ भणेंति ॥ ४९० ॥
हें चरित्रु ब्रह्मा निज-भुवनीं : वैकुंठीं नारदु महिमानी ॥
अमरावतिअे वेधें सुरगणीं : गाईजतुसें ॥ ४९१ ॥
सदां एकैकें अवतारें : चरितें केलीं अपारें ॥
परि ययां एका पवाडेआं ईश्वरें : रूपें बहुतें धरिलीं ॥ ४९२ ॥
या चरित्राची महिमा : न-वर्णवे प्राकृतमती आम्हां ॥
जेथें देव-पिता महाब्रह्मा : भुलौनि गेला ॥ ४९३ ॥

जेहीं आराधिला ईश्वरू : तरावेआं घोर संसारू ॥
तेआं हा पवाडा निरंतरू : मनीं वसैलु ॥ ४९४ ॥
जेआं सकलापासौनि निवृत्ती : श्रीकृष्णीं परमप्रीती ॥
तेंचि जनु नीवतीं : एणें चरितामृतें ॥ ४९५ ॥
जेआंचें मनु विषयीं न वेचे : जे किंकरू परदैवां चें ॥
तेआंचिअें येई वाचें ? चरित मुकुंदाचें ॥ ४९६ ॥
जेतुलीं तीर्थें इएं क्षिती : वृत-दानें वाखाणेति ॥
तेतुलीं सरीं न पवतीं : श्रीकृष्णचरितेसीं ॥ ४९७ ॥
आणिकेहीं क्षेत्रें यागु यजनें : पवित्रता नाहीं कऱ्हणें ॥
एकें चरित्रश्रवणें : मुकुंदाचेनीं ॥ ४९८ ॥
धमनीचिआं कोंडी आईकींजतीं : परि केलिआं फळेंचि देतीं ॥
चरितुश्रवणें होअे भक्ती : परम-पुरुषांची ॥ ४९९ ॥
सुर-गणां लावीनिला वेधु : भक्तां केला निज-बोधु ॥
जनु पावविला परमानंदु : जेणें श्रीकृष्णें ॥ ५०० ॥
तो मिआ महिमा वर्णिला नेणतां : परि हा संतोष मानिला महंता ॥
जेणें जालें श्रवणामृता : हरिकथेचें ॥ ५०१ ॥
आनंदतु भक्त सकळ : श्रोतेआंचें मन हो निर्मळ ॥
जनु पाऊ परम-मंगल : भणे मुनी केशवराजु ॥ ५०२ ॥
हा सारासार वस्तू-विच्यारू : आइकावा करौनि आदरू ॥
भणें पंडित दामोदरू : श्रोतेआंतें ॥ ५०३ ॥

इति श्रीपरधर्म्मे महामोक्षैकसाधनें श्री—नागार्जुनोपदेशे
श्रीदामोदरपंडितविरचिते वच्छहरण—श्रीमद्भागवती—
कथासंपूर्णमगमत् ॥ छ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

( समाप्त )

पंडित दामोदरकृत

वंच्छहरण

# टीपा व स्पष्टीकरण

९८३२
२८।८।७३
७२२६

# टीपा व स्पष्टीकरण

आपली ग्रंथरचना निर्विघ्नपणें सिद्धीस जावी यासाठीं आपल्या इष्ट-देवतेला नमन करण्याची पूर्वसूरींची चाल आहे. येथें देखील पंडित दामोदरानें प्रस्तुत 'वच्छहरण' हा आपला काव्यग्रंथ असाच निर्विघ्नपणें पार पडावा यासाठीं, 'आशीर्नमस्क्रिया वस्तुनिर्देशोवा ऽपितन्मुखम्' या न्यायानें आपल्या महानुभाव पंथाचें आद्यदेवत जें श्रीकृष्ण त्याला वंदन केलें आहे. महानुभाव पंथाला महात्मा-पंथ, अच्युतपंथ, जयकृष्णीपंथ, भटमार्ग व परमार्ग अशीं नांवें असलीं, तरी तो मुख्यतः कृष्णोपासनेचा पंथ आहे. श्रीकृष्ण, श्रीदत्तात्रेय, द्वारावतीचे चांगदेव राऊळ, ऋद्धीपूरचे गुंडम राऊळ आणि श्रीचक्रधर हे महानुभावांचे पंचकृष्ण असून, या पांचांना ते पूर्णावतार मानतात. पंडित दामोदरानें म्हणूनच येथें गुंडम राऊळांना अथवा चक्रपाणीला वंदन केलें आहे. महानुभाव हे द्वैती आहेत. त्यांच्या मतें परमेश्वर, देवता, जीव व प्रपंच या चार वस्तू स्वतंत्र व नित्य असून, परमेश्वर हा नित्यमुक्त, देवता नित्यबद्ध, जीव बद्धमुक्त व प्रपंच हा जड अशी त्यांची विचारसरणी आहे. मूळ परब्रह्म हें परमेश्वस्वरूप, सर्वव्यापक सर्वात्मक असून तें अनादि ज्ञानानंदमय, अविक्रिय व सर्वसाक्षी आहे. पंडित दामोदरानें येथें श्रीचक्रपाणी श्रीकृष्णाला वंदन करतांना, त्यालाच परब्रह्म व परानंद असें संबोधलें असल्यामुळें, श्रीकृष्ण व परब्रह्म यांमध्यें अभेद कल्पिला आहे. परब्रह्म हें मूळ सत्, चित् व आनंद स्वरूप असल्यानें, त्याचाही त्यानें प्रथम निर्देश केला आहे. "हे परब्रह्मा, हे ब्रह्मानंदा, हे लीलेनें शरीर धारण करणाऱ्या व जडजीवांचा उद्धार हीच ज्याची लीला अथवा खेळ आहे अशा श्रीकृष्णा, तुला नमन असो" असा या नमनाचा एकंदरीनें अर्थ होईल. यादवकालीं संस्कृत भाषेला बरेंच महत्त्व असल्यामुळें, पंडित दामोदरानें आपल्या ग्रंथाच्या नमनाचा पहिला श्लोक संस्कृतांत रचला आहे. **स्वच्छंदोपात्तविग्रह**—स्वच्छेनें, लीलेनें ज्यानें शरीर धारण केलें आहे अशा. मूळ परब्रह्म किंवा परमेश्वर जरी निरवयव व निराकार असला, तरी कृपावशें तो सावयव व साकार होतो अशी महानुभावांची कल्पना असून, सृष्टिसंहारापर्यंत कुणी ना कुणी ईश्वरावतार जीवाला आत्मपद–मोक्ष–देण्याचें कार्य अविरत करीत राहणार आहे. **जीवोद्धारविहार**—जीवांचा उद्धार करणें हा ज्याचा खेळ आहे अशा. कृपेनें साकार

झालेला परमेश्वर, अवतार घेऊन जीवाला आपलें सन्निधान देतो व तें त्याचें संन्निधान दास्यमोचक होतें, प्रपंचापासून त्याची सुटका करून त्याला मोक्ष देतें. परमेश्वर हाच एकटा सोडविता, मोक्षदाता असें असल्यानें, परमेश्वराचें व्यक्त स्वरूपच महानुभावांनीं ग्राह्य मानलें आहे. कारण अव्यक्त स्वरूपांत व्यापार घडत नाहीं असें त्यांचें स्पष्ट मत आहे. याप्रमाणें जीवांना मोक्ष देण्यासाठीं स्वच्छेनें अवतार घेणाऱ्या श्रीकृष्णरूपी साकार परब्रह्माला पंडित दामोदरानें जें वंदन केलें आहे, तें त्यांच्या पंथमतांना अनुसरूनच आहे.

**ओं. १**—या ओवींत परब्रह्माचें ध्यान केलें आहे. "ज्या परब्रह्मापासून जगाचा जन्म झाला, व जें परिपूर्ण परमात्मा आहे, त्याचें ध्यान आपण गुरुप्रसादानें केलें आहे." परब्रह्माचें स्वरूप कळून त्याच्या ठिकाणीं अनुसंधान लागण्यास देखील गुरूची कृपा लागते, म्हणूनच कवीनें येथें गुरुप्रसादाचा उल्लेख केला आहे. **जेआं**—अपभ्रंशांत व प्राकृतांत कोणताही स्वर विकल्पाच्या सवलतीनें सानुनासिक होऊं शकतो. येथें आपणास असे स्वर एकवचनीं व अनेकवचनीं सर्रास सानुनासिक झाल्याचें आढळेल. म्हणून 'जेआं' तील 'आ' वर अनुस्वार आहे. वास्तविक त्याची आवश्यकता नाहीं. पुढें ओवी २ मध्येंही साकारां नमनां, त्रीभवनुं यांत असाच अनुस्वार आला आहे. **जन्मु**—जन्म. यांत शेवटचें अक्षर उकारांत आहे. अशी चाल अपभ्रंशांत फार आहे. ज्ञानेश्वरींतही प्रथमेचें एकवचन उकारांत करण्याची चाल दिसते. या ग्रंथांतही पुष्कळ ठिकाणीं नामाचें प्रथमेचें एकवचन उकारांत दिलें आहे. पहा—आत्मारामु. **पासौनि**—हें पंचमीचें एकवचन आहे. अशीं रूपें ज्ञानेश्वरींत आलीं आहेत. उदा. क्लेशौनि, काष्टौनि इ. हल्लीं आपण 'पासून' असें म्हणतों, व त्याचा उपयोग शब्दयोगी अव्ययासारखा आहे. पूर्वी 'पासून' यांतील 'उ' चा 'औ' करीत असत, व शेवटीं 'न' ला पादपूरक 'इ' लावीत असत. **गुरुप्रसादें**—ही तृतीया आहे.

**ओं. २**—या श्रीकृष्णालाच नमन केलें आहे. **तेआं साकारां**—जो श्रीकृष्ण साकार व सगुण असें परब्रह्म आहे त्याला. परब्रह्म वास्तविक निर्गुण निराकार आहे, पण तेंच श्रीकृष्णस्वरूपांत साकार व सगुण झालें आहे. **सर्वभावीं**—सर्व अष्ट सात्विक भावांनीं. स्तंभ, स्वेद, रोमांच, स्वरभंग, कंप, वैवर्ण्य, अश्रुपात, प्रलय अशा आठ भावांनीं. **त्रीभनुंजीवना**—स्वर्ग, मृत्यु व पाताळ अशा त्रिभुवनाचें जे जीवन आहे, जो आधार आहे, त्या श्रीकृष्णाला. येथें 'त्रि' हें ऱ्हस्व पाहिजे, पण तें दीर्घ लिहिलें आहे. 'भवनु' येथेंही उकार व अनुस्वार आहेच.

**ओं. ३**—या ओंवींत कवीनें श्रीचक्रधरांच्या पायांना नमस्कार केला आहे. **श्रीचक्रधर**-हा महानुभावपंथाचा मूळ संस्थापक असून, त्यांच्या पंचकृष्णापैकीं एक आहे. त्याला या पंथांत परमेश्वराचा एक पूर्णावतार असेंच मानण्यांत येतें. पंडित दामोदरानें मग आपल्या पंथसंस्थापकाच्या चरणांना वंदन करणें अगदीं साहजिक आहे. **जे सकळतीर्थांचें जन्मस्थान**—ज्या चक्रधरांच्या पायांपासून सर्व तीर्थें उगम पावतात, असे पाय. **देवता** इ. ज्या चक्रधरांच्या पायांचें आराधन देवता करतात. महानुभावपंथमताप्रमाणें इंद्र चंद्रादिक देवता या ईश्वराच्या अपेक्षेनें कनिष्ठ आहेत. देवतांत 'चैतन्यमाया' ही मुख्य आहे. या देवता आपल्या भक्तांना जास्तीत जास्त स्वतःचें पद देऊं शकतात, पण तें पद शाश्वत नसून आशाश्वत असल्यानें, साधकानें त्यांच्या उपासनेंत गुरफटावयाचें नसतें. देवतांना याच कारणास्तव 'वैरी' असें म्हटलें आहे. देवता याप्रमाणें ईश्वरापेक्षां कनिष्ठ असल्यानें व चक्रधर हा परमेश्वरच असल्यानें त्या चक्रधराच्या चरणाचे आराधन करतात असें येथें म्हटलें आहे. देवतांच्या या गौणत्वामुळें जीवानें ईश्वरभक्तींतच गुंग असलें पाहिजे.

**ओं. ४**—येथें परमेश्वराच्या सर्व अवतारांना कवीनें वंदन केलें आहे. **इश्वराचें अवतारु**—महानुभावांचा ईश्वर, जीवोद्धरणासाठीं वेळोवेळीं अवतार घेतो. कृष्ण, दत्तात्रय, द्वारकेचा चांगदेव, गोविंदप्रभु, व चक्रधर हे 'पंचकृष्ण' असेच ईश्वरावतार होत. या सर्व अवतारांना पंडित दामोदरानें नमस्कार केला आहे. **भक्त उद्धरावेआं**—सृष्टिसंहारापर्यंत कुणी ना कुणी ईश्वरावतार जीवाला आत्मपद, मोक्ष, देण्याचें कार्य अविरत करीत राहणार आहे. ईश्वराचे हे अवतार भक्ताला मोक्ष देण्यासाठीं असल्यानें, पंडित दामोदरासारख्या भक्तानें त्यांना येथें नमन करणें युक्तच आहे. **मिआं**—म्यां. **उद्धरावेआं**—उद्धारावया. प्राकृतांत, ग, द, ह, य, क, या व्यजनांबद्दल 'अ' घालतात. त्याचप्रमाणें येथें होऊन शेवटच्या 'य' चा 'इ' होऊन मागील 'व'त मिळाला आहे.

**ओं. ५**—श्रीकृष्णाच्या ब्रह्मविद्येचा आश्रय करणाऱ्या त्याच्या उद्धवादि भक्तांना व महानुभावपंथ संस्थापक श्रीचक्रधरांचा पट्टशिष्य जो नागदेवाचार्य, त्याला येथें वंदन केलें आहे. **उद्धव**—हा श्रीकृष्णाचा भक्त हें प्रसिद्ध आहे. अक्रुर, अर्जुन हे असेच श्रीकृष्णाचे भक्त होते. उद्धवाचा नामनिर्देश करून पर्यायानें त्यांना देखील कवीनें नमन केलें आहे. उद्धवाला श्रीकृष्णांनी

महाभागवताच्या एकादशस्कंदांत केलेला बोध, उद्धवगीता या नांवानें वाखाणला जातो. **नागार्जुनादिकां**—नागदेव. याच्या बापाचें नांव महादेवभट व आईचें आवाइसें. त्याची पत्नी गंगाइसा, व पुत्र महेश्वर. नागदेव तारुण्यांत अनेक ढांढाळांचा होता. पुढें रामदेव ऊर्फ दादोस याच्यामुळें तो निवळला, व त्याच्याचमुळें त्याची श्रीनगर ऊर्फ सिन्नर येथे चक्रधराशीं प्रथम भेट होऊन त्याचा तो पट्टशिष्य बनला. चक्रधरापासून नागदेवानें संन्यासदीक्षा घेतली होती. चक्रधराच्या पश्चात् नागदेवानें ऋद्धिपुरास गोविंदप्रभूची सेवा केली. शके १२०८ मध्यें गोविंदप्रभु वारल्यावर तो निंब येथें राहूं लागला. उर्वरित आयुष्यांत नागदेवानें चक्रधराच्या आदेशानुसार पंथप्रसार केला. 'स्मृतिस्थळां'त त्याच्या 'पाचास्यां गुरुकुळाचा' उल्लेख येतो. म्हाइभट, गोपाळपंडित, केशोबास, दामोदरपंडित, भास्करभट्ट असे थोर थोर विद्वान त्यानें आकर्षिले. **महंता**—"श्रीचक्रधर स्वामींचा असा सिद्धांत आहे कीं, साधकानें ज्ञान प्राप्त करून घेण्यापुरतेंच आचार्यांच्या जवळ रहावें. ज्ञान प्राप्त झालें कीं, अटन विजन व भिक्षाभोजन करून परमेश्वरस्मरणांत काळ घालवावा. साधकासाधकांची अनायासें भेट झालीच, तर त्यांनीं पांच सांत दिवसपर्यंत एकत्र राहून परस्परांत शास्त्रचर्चा करावी, कांहीं संदेह असला तर तो निवृत्त करून घ्यावा व नंतर विभाग करून आपापल्या मार्गास लागावें. जो महात्मा अतिवृद्ध झाला, ज्याच्यानें अटन, विजन व भिक्षाभोजन होत नाहीं आणि जो व्याधिग्रस्त आहे, अशा महात्म्यासाठीं आचार्यांकडून अशी योजना करण्यांत आली होती कीं, त्यानें आचार्यांच्या जवळ रहावें, व त्यांनीं त्याला परमेश्वराचा परमभक्त समजून त्याची प्रेमपूर्वक सेवा करावी. असले दोन, तीन, चार महात्मे एकत्र जमत जमत अनेक महात्म्यांचा संघ निर्माण झाला. त्या संघाला सध्यां 'मार्ग' असें म्हणतात. त्याचा एक ज्ञानवृद्ध महंत असतो. त्याच्याजवळ संन्यस्त पुरुष व संन्यस्त बाया राहतात. पण ते पुरुष व त्या बाया एकमेकापासून अलग असतात. त्यावर महंताचें कडक नियंत्रण असतें."—(महानुभाव पंथ—पृ. २९५. पं. बाळकृष्णशास्त्री महानुभाव.) अशा महंतापैकींच नागार्जुन ऊर्फ नागदेवाचार्य हे प्रमुख असल्यानें, पंडित दामोदरानें त्यांना नमन केलें आहे. **ब्रह्मविद्या शरणागता**—ब्रह्मविद्येला म्हणजे उपनिषदांतील ब्रह्मविषयक तत्त्वज्ञानाला शरण जाणाऱ्या, ब्रह्मज्ञानाचा आश्रय करणाऱ्या, उद्धवादिभक्तांना व नागार्जुनादि महंतांना.

कारण हे भक्त व महंत ब्रह्मविद्येचें नेहमींच चिंतन करणारे होते. **श्रीप्रभूचेआं**—श्रीकृष्णाच्यां. याचा संबंध ‘ उद्धवादि भक्ता ’कडे आहे.

**ओं. ६—नागार्जुनाचेनि प्रसादें**—पंडित दामोदर हा नागदेवाचार्यांचाच शिष्य असल्यामुळें, त्याच्या कृपाप्रसादानें व परमपुरुष जो श्रीकृष्ण परमात्मा त्याच्या ज्ञानानें प्रेरित होऊन आपण ही प्रस्तुत ‘ वच्छहरणा ’ची श्रीकृष्णकथा, ओवी वृत्तांत रचीत आहे, असें तो म्हणतो. **भणे मुनी केशवराजु**—चक्रधरोक्त सूत्रपाठाचे संकलनकार केसोबास किंवा केशीराज बास, हे मूळचे पापदंडी रामपुरीचे विद्वान् व्याख्याते होते. नागदेवाचार्यांशीं झालेल्या चर्चेनें केसोबासांच्या अंगीं विरक्ति बाणली, व त्यांचें शिष्यत्व पत्करून ते तरुणपणींच पंथांत प्रविष्ट झाले. केसोबासांचें मन पुनः संसाराकडे वळावें म्हणून त्यांच्या सासऱ्यानें प्रयत्नांची शिकस्त केली. पण तें व्यर्थ झालें. प्रत्यक्ष त्यांच्या पत्नीचेंही त्यांच्या वैराग्यापुढें कांहीं चाललें नाहीं. ‘ रत्नमालास्तोत्र ’ हा केसोबासांचा पहिला ग्रंथ संस्कृतांत असून, त्यांत त्यांनीं म्हाईमभटकृत ‘ लीलाचरित्रां’तील अनेक लीलांचा, संस्कृत श्लोकांत अनुवाद केला आहे. दामोदर पंडित व केसोबास हे दोघे नागदेवाचार्यांचे शिष्य असून, पंडितांच्या गानपटुत्वानें व विद्वत्तेमुळें, केशवराजाचा व पंडितांचा विशेष स्नेह असे. प्रस्तुत ‘ वच्छहरण ’ ग्रंथांत, दामोदरानें ‘ केशव पंडितांचें ’ नांव घातलें आहे, तर केशव पंडितानेंही उलट आपल्या ‘ रत्नमाला ’ स्तोत्रांत, दामोदर पंडितांचें नांव घातलें आहे. अशा रीतीनें दोघांनींही आपलें ग्रंथकर्तृत्व लपवून परस्परांचा सन्मान केला आहे. ‘वच्छहरणां’तील ‘भणे मुनि केशवराजु,’ ही शेवटची ओंवी ऐकल्यावर, पंडित दामोदरांची स्त्री हिरांबा म्हणाली, “ माझी माता परी वांझिरू : निराभिवाणी अहंकारू. ” हें ऐकून पंडित म्हणाले, “ हो ही आमची चुकी झाली, व ते त्या ओंवीवर हरताळ फांसूं लागले. यावर श्रीकविश्वराचार्य म्हणाले, “ परश्री संतापाचा ज्वरू : न भोगी ऐसा नाही नरू : एक पंडित दामोदरू : वाचौनिया ! ” व त्यांस लिहिलेली ओवी खोडूं दिली नाहीं. तेव्हां हल्लीं ग्रंथाचे शेवटीं असलेली ओंवी ( ५०३ ) दामोदरानें लिहिली, व ग्रंथ समाप्त केला. अशा तऱ्हेनें दोघांचींही नांवें प्रस्तुत ग्रंथांत आलीं आहेत. ‘ भणे मुनि केशवराजु ’ असें या काव्यांत जें वारंवार येतें, त्याचा हा असा इतिहास आहे. **भणे**–म्हणे. प्राकृतांत ‘ म्ह ’ बद्दल ‘ भ ’ येतें.

**ओं. ७**—“ ईश्वराचे गुण स्मरण करीत असतांना, त्या आनंदानें मनाचा

जो विकास होतो, त्याचें जिभेनें वर्णन करून सांगणें कोणाला शक्य आहे ? ” सारांश ईश्वराच्या गुणस्मरणापासून होणारा ब्रह्मानंद असा आहे कीं, त्यानें जो मनाचा विकास अथवा विस्तार होतो, तो तोंडानें, किंवा शब्दांनीं वर्णन करून सांगतां येण्यासारखा नाहीं. **स्मरौ**—स्मरूं. येथें सर्वत्र ‘उ’ बद्दल ‘औ’ केलेला आढळतो. **अनुवाद**—पुनरुच्चार, स्पष्टीकरण. **रसनां**—जिभनें अर्थात् शब्दांनीं. **करीतुसे**—आपण हा मनांचा विकास वर्णन करीत आहे, पण तो कसा वर्णन करायचा हें कोणाला ठाऊक आहे ? अर्थात् आपल्याला ही कला अवगत नाहीं, असें पंडित दामोदर विनयानें म्हणतो. **वाणौ**—वर्णूं. ( वर्णूं–वाणूं–वाणौं ). **कवणु**—कोण. ( कः पुनः-कउण–कौण–कोण ).

**ओं. ८**—“ ईश्वराचा महिमा मनाला अज्ञात आहे. कवि त्याचें वर्णन कसें करणार ? या शंकेचा परिहार किंवा निरसन असें कीं, कवि ईश्वराचें वर्णन स्वेच्छेनें करणार आहे. कारण त्यायोगानें त्याची वाणी पवित्र होते. ” ईश्वराचा महिमा जर अगोचर, अज्ञात आहे, तर कवीनें तो वर्णन करण्याचा प्रयत्न तरी कां करावा ? याला उत्तर असें कीं, असा माहिमा वर्णन केल्यानें कवीची वाणी पवित्र होणार असल्यानें, त्यानें हें ईश्वरमहिमा वर्णन करण्याचें काम स्वेच्छेनें पत्करलें आहे. **वाणावा**—वर्णावा.

**ओं. ९**—ज्या परमेश्वराच्या महिम्याबद्दल श्रुती देखील ‘नेति नेति’ असें म्हणतात, त्या महिम्याचें स्वरूप जीव तरी पूर्णपणें कसें जाणणार ? तथापि ( असें असलें तरी ) भक्तीनें भगवंताची स्तुति करण्यांत कांहीं दोष नाहीं. परमेश्वराचा माहिमा जर अगम्य आहे, तर ‘वच्छहरणा’सारखा ग्रंथ रचून तो महिमा वर्णन करून सांगणें कितपत युक्त होईल, या शंकेला कवि येथें उत्तर देत असून आपल्या श्रीकृष्णस्तुतिपर काव्यरचनेचें समर्थनच करीत आहे. **निरौते**—निरुतें—पूर्णपणें. पद्दा–“जो श्रीकृष्णु वेदा नव्हे ठाउका : निरूता नेणवे तिहीं लोकां। तेथ काइ पाटा फुटे आणिका : फुलीएचोनि ज्ञानें ॥–नरेंद्र–रुक्मिणीस्वयंवर, २९. **श्रुती भणती नेती**—ज्याचें पूर्ण ज्ञान श्रुतींना, वेदांना देखील झालें नाहीं. परब्रह्माचें वर्णन करतांना श्रुती देखील ‘नेति नेति’ असें म्हणतात. पद्दा–‘अथातः आदेशो नेति नेति ”–बृहदारण्यक २।३।६. **जेआतें**—ज्या परब्रह्माला. **जीवु कांई जाणाति**—अशा परब्रह्माला किंवा परमेश्वराला जीव तरी कसें जाणणार ? ज्याचें ज्ञान वेदांना होणें मुष्कील, तें जीवांना कोठलें व्हायला ? असें असलें तरी

भक्तीनें परमेश्वराची स्तुति करण्यांत दोष लागत नाहीं. आणि म्हणून आपण भक्तीनेंच केवळ हें श्रीकृष्णवर्णनपर काव्य करण्यास प्रवृत्त झालों आहों, असा पंडित दामोदराचा आशय आहे. **भक्ति**—भक्तीनें (तृ). **लगे**—लागे.

**ओं. १०**—" जी वस्तु अनुभवानेंच जाणावी लागते, ती शब्दानें कशी वर्णन करतां येईल ? पण येथें श्रवणाशिवाय दुसऱ्या कोणत्याही रीतीनें हें सुख प्राप्त होत नाहीं. " परमेश्वराच्या स्वरूपाचें सुख प्रत्यक्ष अनुभवानेंच घ्यावें लागतें, तें शब्दानें कांहीं सांगतां येणार नाहीं. पण त्या सुखाचा अनुभव श्रवणाशिवाय दुसऱ्या कोणत्याही रीतीनें मिळणार नाहीं. दामोदर पंडिताचें म्हणणें असें कीं, ईश्वरमहिमा अगम्य असला व तो प्रत्यक्ष अनुभवाशिवाय कळत नसला, तरी आपण जी हरिकथा रचणार अहो, तिच्या श्रवणानें तें सुख मिळूं शकेल. श्रवणाशिवाय परमेश्वरस्वरूपसुखाचा लाभ मिळण्याचा मात्र दुसरा उपाय नाहीं. येथें श्रवणभक्तीचें महत्त्व वार्णिलें आहे. **जाणिजे**—ज्ञायते, जाणलें जातें. **बोलु**—शब्दानें ( तृ ). **वीणु**—वीण—विना,—शिवाय. **पविजे**—पाविजे—( प्राप्यते ). **आणिकें परी**—अन्य रीतीनें, निराळया प्रकारानें, श्रवणाशिवाय अन्य उपायानें.

**ओं. ११**—येथें श्रवणाचें महत्त्व अधिक बिंबविण्यासाठीं कवि एक दोन दृष्टान्त देतो. " डोळयांत अंजन घातलें नाहीं, तर भूमिगत द्रव्याचा सांठाही दिसणार नाहीं. रवि उगवला नाहीं, तर दृष्टींतला अंधकारही जाणार नाहीं. " डोळयांत घातलेंलें विशिष्ट प्रकारचें काजळ, हें जसें भूमिगत द्रव्य दाखवायला समर्थ असतें, किंवा सूर्य हा जसा अंधकार घालवायला समर्थ असतो, तद्वत् हरिकथाश्रवण हें परब्रह्माचें दर्शन घडविण्यास समर्थ आहे, असा भाव. आपण रचणार असणाऱ्या 'वच्छहरण' या हरिकथेच्या श्रवणानें, श्रोत्यांना श्रीकृष्णस्वरूप परब्रह्माचें दर्शन होईल, हें कवीनें येथें दृष्टांतांच्या द्वारां ध्वनित केलें आहे. **डोळां**—डोळयांत ( सप्तमी ). पायाळू माणसानें डोळयांत एक विशेष प्रकारचें काजळ घातलें असतां, त्याला भूमिगत द्रव्याचा सांठा दिसतो, अशी यादवकालीन समजूत होती. ज्ञानेश्वरींतही हाच दृष्टान्त अनेक वेळां दिलेला आढळून येतो. पहा—" जैसें डोलेयां अंजन भेटे । तेव्हांलि दृष्टीसि पाटा फुटे । मग वास पाहिजे तेथ प्रकटे । महानिधि ॥—ज्ञानदेवी, १।२३. **दिशीं**—दृष्टिंतला. प्राकृतांत कांहीं ठिकाणीं 'ऋ' ची 'इ' होते. व 'ष्ट' बद्दल 'श' होतो. **नवचे**—जात नाहीं.

**ओं. १२**—“ त्याप्रमाणें हरिकथेच्या श्रवणाशिवाय जीवाला शुद्धपणा कुठला ? त्याशिवाय परब्रह्माचें दर्शन तरी कसें घडणार ? ” श्रवणभक्तीशिवाय परब्रह्म-दर्शनाचा अन्य उपाय नाहीं, हेंच कवीला सांगावयाचें असून, त्या अनुषंगानें आपण रचीत असलेल्या हरिकथेच्या श्रवणाचा त्यानें प्रस्ताव करून ठेवला आहे. **जीवां**—प्राण्याला. सृष्टिसंहारापर्यंत कुणी ना कुणी ईश्वरावतार जीवाला आत्मपद–मोक्ष–देण्याचें कार्य अविरत करीत असतो, पण मोक्षप्राप्तीपूर्वी जीवाला देहधारी होऊन ज्ञान मिळविलें पाहिजे. हेंच ब्रह्मज्ञान त्याला हरिकथा-श्रवणानें मिळणार आहे. जीव हा अनादिकालापासून अविद्यायुक्त असून, त्याला देहधारणा अपरिहार्य आहे. देहधारणेनंतरची पायरी ज्ञानप्राप्तीची. जीवाचें हें अज्ञान अथवा मलिनत्व हरिकथाश्रवणानें जाऊन त्याला शुद्धत्व येतें, तो ज्ञानयुक्त होतो. **कांई**–काय. **चोखाळेंपण**–निर्दोषत्व, शुद्धि. पहा–“ कीं रुक्मिणीचें रूप चोखाळ : पुनु सिशुपाळें वरिलें हें किडाळ ।–नरेंद्र, रुक्मिणी स्वयंवर ५८५.

**ओं. १३**—“ यासाठींच आदिनाथ जो श्रीकृष्ण त्यानें सगुण स्वरूप, मायवेष धारण केला. एऱ्हवीं रूपरहित व निर्गुण अशा श्रीकृष्णरूपीं परब्रह्माचें वर्णन, शुकादिक महर्षि करूं शकले असते काय ? ” भक्तांना आपल्या स्वरूपाचें वर्णन करतां यावें, यासाठींच निर्गुण परब्रह्मानें आपल्या मायेनें सगुण स्वरूप धारण केलें. ईश्वर अशा मायाशक्तीनें जीवोद्धारार्थ असेच अवतार घेतो. श्रीकृष्ण हा असाच एक अवतार आहे. **आदिनाथें**—महानुभवपंथ हा जयकृष्णपंथ असल्यामुळें, त्या पंथाचा आदिदेव श्रीकृष्णच होय. निर्गुण निराकार अशा परब्रह्मानें आपल्या योगमायेनें श्रीकृष्णादि अवतार घेतले, म्हणूनच शुकादि भक्तांना त्या परब्रह्माचें वर्णन करतां आलें. सगुणस्वरूपाचेंच वर्णन करणें शक्य, हें जाणून भक्तासाठीं परब्रह्मानें निरनिराळे अवतार घेतले. **वाणिते**–वर्णिते.

**ओं. १४**—कवीनें लोकांचें केवळ रंजन करणारें सगुण सालंकार काव्य रचावें, कीं त्यानें संसारबंधनापासून सोडविणारे श्रीकृष्णगुणवर्णनपर पवाडे गावे ? या दोनींपैकीं कोणती रचना करणें चांगलें, असा प्रश्न उपस्थित करून, पंडित दामोदर श्रीकृष्णाच्या पवाड्याच्या बाजूनें आपला कौल देतात. त्यांच्या मतें श्रीकृष्णगुण-वर्णनपर काव्य रचणें, हेंच कवीचें उद्दिष्ट असावें. **उपमाश्लेषवर्णुक**—या तीनही शब्दांचे कांहीं पारिभाषिक अर्थ आहेत काय, तें पाहण्यासाठीं इतर महानु-भावीय ग्रंथाकडे वळलें पाहिजे. दामोदर पंडिताच्या जवळपास झालेल्या आनेरा-

जवास या पंडितानें अर्थनिर्णय शास्त्रावर 'लक्षणरत्नाकर' नामक जो ग्रंथ लिहिला आहे, त्यावरील शाङ्गर्धर पुसदेकर महानुभाव याच्या 'द्वात्रिंशल्लक्षण-टीकें'त उपपत्ति लक्षणाच्या संबंधांत जें स्पष्टीकरण आलें आहे, त्याचा उतारा डॉ. मा. गो. देशमुख यांनीं आपल्या 'मराठीचें साहित्य शास्त्र' या ग्रंथाच्या पृ. १६२ वर दिला आहेः—"तेंचि सदृशत्व त्रिधा। गुणोत्कृष्टं प्रसिद्धं यदुपमानं तदुच्यते : तन्न्यूनमुपमेयं स्यादेतयोस्तुल्यतोपमा ॥ सानयासि थोराची उपमा ते उपमान बोलीजे : यथा मनुष्यमुखासि चंद्रोपमा :। : आणि सानयाची थोरासि दीजे तें उपमेय : यथा चक्रवर्तीचेया स्कंधासि वृषस्कंधाची उपमा दीजे सदृश्यत्वें कां समानत्वें : तेंचि उपमा बोलीजे : यथा सुवर्ण : पितळ : दुग्ध : तक्रवर्ण साजात्यान्वयें : गोडिया अप्रत्यन्वयें : यथा नेत्रासि भ्रमरोपमा मीनोपमा चपलार्थी : आकृत्यार्थी कमलांची **उपमा** : तें **साहित्य** : **उपमान** तें **वर्णुक** : **उपमेय** तो **श्लेष**." या सविस्तर उताऱ्यावरून, दामोदर पंडिताला अभिप्रेत असलेल्या उपमा, श्लेष व वर्णक या तिन्ही पारिभाषिक संज्ञाचें नेमकें स्पष्टीकरण होतें. श्लेष=उपमेय, वर्णक=उपमान. "उपमा, उपमेय आणि उपमान यांच्या साह्यानें मी सामान्यजनांचें मनोरंजन करूं, कां मुकुंदाचे संसारमोचक असें यशोवर्णन करूं" असें पंडित दामोदर विचारतो. यावरून अलंकारांना व विशेषतः साधर्म्यमूलक अलंकारांना तो काव्याच्या रंजकतेचें प्रमुख गमक मानतो असें दिसतें. **वर्णुक**—वर्णक. 'वर्णुक' मधील उकार हा उच्चार-सौकर्यार्थ अगर श्रुतिसुखार्थ आला आहे. **संसारमोचक**—जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सोडावणारे, मोक्ष देणारे. **पवाडे**—यशोवर्णन. **वाणौ**—वर्णूं.

**ओं. १५**—"सामान्यजनांना मानवेल अशी कथा पुढें मांडूं, कीं संतांचें केवळ जीवन अशी परब्रह्माची कीर्ति वर्णन करूं." यापैकीं आपण कोणतें करावें, असें पंडित दामोदर विचारतो. अर्थात् त्याला परब्रह्माची, श्रीकृष्णाचीच कीर्ति गावयाची आहे हें निर्विवाद आहे. **प्राकृतजन**—सामान्य लोक. अशा लोकांना शृंगार-रसाची लौकिक काव्यें आवडतात. **मानवतीं**—मान डोलावतीं, संमति देती, संतुष्ट होती. पहा—"तुझेया भावाचिये विनती-वरी : मी तोंड-निरूपें मानवीन मुरारी।"—नरेंद्र, रुक्मिणी स्वयंवर ६७३. ওडओ—ओडओ-वोडवो-वोडऊं= पुढें करूं. पहा—'कळिकापात्रें ओडवीलि भली। जाति कळिकांची ॥"—शिशुपाल-वध ७६४. लोकांना आवडेल तसलें काव्य करणें चांगलें, कीं परमार्थप्रवण काव्य

करणें चांगलें असाच हा प्रश्न आहे. **पढों**—पढूं, पठण करूं, वर्णूं. **परब्रह्माची**—श्रीकृष्णस्वरूपी परब्रह्माची अर्थात् श्रीकृष्णाची. **जीवणु**—जीवन. श्रीकृष्णाची कीर्ति ही संतांचें जीवन आहे.

**ओं. १६**—दामोदर पंडित आणखी विचारतो:—"सुसंस्कृत भाषेंत प्रसंग वर्णन करून निरानिराळ्या रसांचा परिपोष करावा, कीं, निरस झालें तरी हरकत नाहीं पण श्रीकृष्णाचें भजन करावें, या दोनीपैकीं कोणती गोष्ट चांगली?" सुसंस्कृत भाषेंत एकादा सरस प्रसंग वर्णन करणें चांगलें, कीं निरस कृष्णभक्ति चांगली? यांपैकीं अर्थात् कवीला, नीरस वाटली तरी कृष्णभक्तीच संमत आहे, व म्हणूनच त्यानें वच्छहरण कथेच्या रचनेचा हा उपक्रम केला आहे. **नागरीं बोलीं**-सुसंस्कृत भाषेंत. **स्छलं**-प्रसंग, एकादा लौकिक प्रसंग. **वाणिजे**-वर्णिजे, वर्णावा (विध्यर्थासारखा उपयोग.) **सकल रसातें**-शृंगारादि नवरसांना. **पोखिजे**-पोषिजे, परिपोष करावा. येथें 'प' बद्दल 'ख' झालें आहे.

**ओं. १७**—वास्तविक श्रीकृष्णकथा म्हणजे पुराणांतील, ऋषिप्रणीत असल्यामुळें, तिच्यांत नाविन्य तें काय असणार? या शंकेला कवि येथें उत्तर देतो. "श्रीकृष्णकथा ही ऋषिप्रणीत पुराणांचाच भाग असला, तरी त्यांवर केलेली काव्यरचना नाविन्यपूर्ण होते, व कदंबपुष्पाच्या सुगंधाप्रमाणें ती चित्तवेधकही होऊं शकते." पंडित दामोदर आपल्या काव्याचें हें समर्थनच करीत आहे. वच्छहरण कथा ही महाभागवतांतील एक कथा आहे, मग कवीनें तीच सांगितल्यास त्यांत नाविन्य तें काय? असें कोणी म्हटल्यास त्याचें उत्तर असें कीं, अशी पौराणिक भागावर केलेली काव्यरचना नाविन्यपूर्ण होते. कवीनें हा आत्मविश्वासच प्रकट केला आहे. **आरिख**-आर्ष, ऋषेरिदमार्षम्-ऋषिप्रणीत. प्राकृतांत 'र्ष' या मधील 'र' व 'ष' मध्यें 'इ' या स्वराचा समावेश होऊन 'रिष' झालें. त्याप्रमाणें आर्ष-आरिष. पुढें 'ष' बद्दल 'ख' येऊन 'आरिख' असें रूप बनलें. **प्रबंध रचना**-काव्यरचना. **सें**-असें. येथें संस्कृत संधिनियमास अनुसरून 'अ' चा लोप झाला आहे. **नवल**-नाविन्यपूर्ण. **ते**-प्रबंधरचना. **कदंबींचे**-कळंबपुष्पाच्या सुवासाप्रमाणें. **वेधकु**-चित्तवेधक. कथा पुराणांतरींची असली तरी कवीला त्यांत नाविन्य व वेधकपणा आणतां येतो असा भाव.

**ओं. १८**—येथून श्रीकृष्णकथेची महति वर्णिली आहे. ज्या कथेचा नायक

प्रत्यक्ष श्रीकृष्णच आहे त्या कथेची थोरवी काय सांगावी ? **श्रीचक्रधरू**— वास्तविक हा महानुभाव पंथाचा संस्थापक होय. पण महानुभावांच्या पंचकृष्णापैकीं हा शेवटचा श्रीकृष्णाचाच अवतार असल्यामुळें, चक्रधर व श्रीकृष्ण यांत अभेद कल्पिला आहे. **दातारू**—धनी. पहा–"धांवे तुकयाचा दातार आळंगिला वेगीं।'–तुकाराम गाथा १२२. **सकळवेधु**—सर्वांना वेध लावणारा, आकर्षण करणारा. परमेश्वरी दानाचे प्रकार चार सांगितले आहेत. अवतारधारी हें दान 'वेधेंचि देति कां बोधेंचि देति' आणि वेध 'दृक्, स्पर्श, आलाप व अंतःकरण' या क्रमानें संचरतात. चक्रधर हे भक्ताला असेच आकर्षीत. **दीक्षागुरु**—दीक्षा देणारा गुरु, श्रेष्ठ गुरु. पहा–"मग श्रीकृष्णुरावो वानिला कवतिकें: वेधवंती दीक्षागुरु।"–नरेंद्र, रुक्मिणीस्वयंवर ६३६. **सर्वज्ञनाथु**—सर्व जाणणारा, चक्रधरांना महानुभावपंथांत 'सर्वज्ञ' या नांवानेंच नेहमीं संबोधलें जातें. **श्रीचक्रधरू**—श्रीकृष्ण. **कथानाअेकु**—कथेचा नायक. प्राकृतांत 'य' बद्दल 'ए' लिहीत, व 'ए' बद्दल 'य' लिहीत. पहा–'यरव्ही'–ओंवी १२.

**ओं. १९**—श्रीचक्रधर, श्रीकृष्णच या कथेचा नायक असल्यामुळें, ही कथा सर्व मंगलांचा सांठा होऊन बसली आहे. **भणौनि**—म्हणून. श्रीकृष्ण या कथेचा नायक झाला म्हणून. **मंगलांची**—सर्व मंगल गोष्टींचा. **निधी**—सांठा. श्रीकृष्णाच्या नायकत्वामुळें या कथेला मंगलत्व प्राप्त झालें आहे. **हे**—कथा. **इयेचेनि**—या कथेच्या श्रवणानें सर्व सिद्धि प्राप्त होतात. **सिद्धी**—अणिमादि अष्टसिद्धी. या कथेचा नायक श्रीकृष्ण असल्यामुळें, ती श्रवण करणाऱ्याला सर्व सिद्धी प्राप्त होतात. **हेंचि**—ही कथाच निरंतर मोक्षाला कारण होते. **निरवधि**—निरंतर, अमर्याद. **परमार्थु**—मोक्ष. श्रीकृष्णच प्रस्तुत 'वत्सहरण' कथेचा नायक असल्यामुळें, ती निरंतरच्या मोक्षाला कारण होईल यांत शंका नाहीं.

**ओं. २०**—हरिकथेची गोडी भक्ताशिवाय दुसऱ्याला नाहीं, हें सांगतांना कुलीन स्त्रीच्या गुणांची उपमा देतात. "कुलीन स्त्रीच्या गुणांचा उपभोग घेण्याचा अधिकार जसा तिच्या पतीचा, तसा हरिकथेचा आस्वाद घेण्याचा अधिकार हरिभक्ताचा, इतराचा नाहीं." **हरिकथारसी**—हरिकथारूपी रसाच्या ठिकाणीं. **रती**—आवड, गोडी.

**ओं. २१**—हरिकथेचा महिमा व स्वरूप आणखी वर्णन करतात. जी हरिकथा कानांना केवळ अमृताचें पान होय. ऐकतांना जी अमृताप्रमाणें गोड लागते.

**अमृतपाण**—अमृताचें पान, पिणें. **धर्मांचें**—जी कथा धर्मांचें उगमस्थान आहे. जिच्यापासून सर्व धर्म उगम पावतात. **वस्तूतें**—परब्रह्माला. जी हरिकथा परब्रह्मरूपी भूमिगत द्रव्य दाखविणारे दिव्यांजनच आहे. पायाळूनें विशिष्ट अंजन डोळ्यांत घातलें असतां भूमिगत द्रव्य दिसतें, अशी पूर्वी समजूत होती. त्या विशिष्ट अंजनाचा पायाळूलाच उपयोग होई. पण हें हरिकथारूपी दिव्यांजन डोळयांत घातलें असतां सर्वांनाच त्या परब्रह्मरूपी भूमिगत वस्तूचा लाभ होतो, असा भाव.

**ओं. २२**—अशा प्रकारचें कौतुकपूर्ण कृष्णचरित्र, आपण वर्णन करणार असल्याचें पंडित दामोदर जाहीर करतो. वच्छहरणकथेची ही प्रस्तावनाच आहे. **वर्णिजैलु**-वर्णिलें जाईल. हें लभविष्याचें कर्मणिरूप आहे. शेवटचा उकार पादपूरक आहे. **जेणें**-ज्या श्रीकृष्णचरित्रानें. **चमत्कारैलु**-विकासित होईल. ‘ चमत्कार ’ या नामापासून हा धातु बनविला आहे.

**ओं. २३**—येथून एक दोन ओव्यांत संतमहिमा वर्णन करून त्यांच्या गुणग्राह-कतेची प्रशंसा केली आहे. आपल्या कृतीकडे संतांनीं असेंच गुणग्राहकतेनें पहावें अशी अपेक्षा कवीनें ध्वनित केली आहे. “ जो कलावान् चंद्र चकोर पक्ष्यांचें जीवन असून सर्व जगाला आपल्या अमृतानिस्यंदि किरणांनीं शांत करतो, तोच आपल्या भक्ताची कापसाच्या वातीच्या निरांजनानें केलेली आरति गोड मानून घेतो. ” चंद्रास ओंवाळण्याची चाल आपणास पुष्कळ ठिकाणीं आढळते. **चकारांचें**–चकोर पक्ष्यांचें. चकोर हे चंद्रकिरणावर जगतात असा कविसंकेत आहे. **नीववी**–शांत करी. **गुणें एके**-एका कापसाच्या वातीनें. **नीराजन**–ओंवाळण्याची आरति, नीलंजन. **कळांवंतु**—चंद्राला शुद्ध प्रतिपदेपासून पूर्णिमेपर्यंत, १६ कळा असतात. शुद्ध पक्षांत तो दर दिवशीं एकेका कलेनें वृद्धि पावतो. म्हणून त्याला कलावंत म्हटलें आहे. एवढा त्रिभुवनाला संतुष्ट करणारा चंद्र, जसे कापसाच्या वातीचें नीराजन गोड करून घेतो, तद्वतच संत श्रोते देखील दुसऱ्याच्या लहान गुणांनींही संतुष्ट होतात. म्हणून कवीच्या लहान काव्यगुणांनींही ते संतुष्ट होतील, अशी त्याची अपेक्षा पुढील ओवींत ध्वनित केली आहे.

**ओं. २४**—संत श्रोते हे चंद्राप्रमाणेंच दुसऱ्याच्या अल्प गुणावर संतुष्ट होणारे आहेत. म्हणून ते आपल्या थोड्याही काव्यगुणावर संतुष्ट होतील अशी आशा कवीनें ध्वनित केली आहे. **सकलगुणभारितु**—सर्व गुण ज्यांच्या

ग्रं. क्र. ७२२.६

अंगीं भरलेले आहेत असे संत. **परमानंदैकनिरत**—सदा ब्रह्मानंदांत निमग्न असणारे. अशा आनंदांत असणाऱ्यांना दुसऱ्याचे क्षुद्र दोष दिसतच नाहींत. **तो**—याबद्दल 'ते' असें असावें. कारण 'संतोखतीं' हें क्रियापद अनेकवचनीं आहे. **तोकडेआं**—( हिंदी ). तोकड्या–थोडक्या–अल्प, लहान अशा. **परगुणां**—दुसऱ्याच्या गुणांनीं. **संतोखतीं**—संतोषती. येथेंही 'ष' बद्दल 'ख' झाला आहे. या ओंवीच्या समानार्थक पहा. "परगुणपरमाणून्पर्वतीकृत्य नित्यम् । निजहृदि विकसंत : सन्ति सन्त : कियंत : ।।"

**ओं. २५**—संतसमागमाची महति येथें वर्णिली आहे. "ज्या संतांच्या संगतींत कोणाचीही बुद्धि, मन अत्यंत निर्मळ होतें, व तेथें अखंड कृष्णभक्ति उत्पन्न होते." **निऱ्हा**–अगदीं. पहा —"तरि त्यागु निऱ्हां दुआडु । वरि ईंद्रियांचा कैवाडु ।। २२८ –उद्धवगीता." **निर्मळ मती**–हे दोन शब्द निरनिराळे असावे.

**ओं. २६**—येथून ओं. ३० पर्यंत, श्रीकृष्णकथेची महति वर्णिली आहे. **तरणी**–सूर्य. सूर्य उगवला असतां कमलांचा जसा विकास होतो, तसाच्च श्रीकृष्णचरित्रानें संतजनांच्या मनांत विकास प्राप्त होतो. **पद्मिणी**–सूर्य-विकासी कमल.

**ओं. २७**—"अगोदर भक्तांच्या मनांत मुळचेंच श्रीकृष्ण प्रेम असतें, त्यालाच पुनः आनंद देणाऱ्या श्रीकृष्ण कथेची जोड मिळाल्यावर मग तेथें प्रेमाला केवढें भरतें येईल ? चंद्राच्या किरणांनीं चंद्रकांत मणि ज्याप्रमाणें अमृत स्रवतो, त्याप्रमाणें श्रीकृष्णकथेनेंही भक्तांच्या मनांतून श्रीकृष्ण भक्तीचा स्राव होतो" अशी कल्पना. चंद्राच्या किरणांनीं चंद्रकांत मणि द्रवतो, असा कविसमय आहे. पहा–'किंवा चंद्रकांत पाझरतो, जणु शीतांगी मत्प्रिया मला आलिंगी"–दत्त, 'विश्वामित्रीच्या काठीं. **चंद्रें**– ( तृ ). **चंद्रकांता**–( पंचमी घ्यावी ).

**ओं. २८**—अनेक कवि शास्त्रबहिष्कृत पवाडे गातात, वर्णितात. पण भागवती कथा ही त्याहून मधुर व नित्य नवी अशी आहे. भागवतांतर्गत कथा ही कृष्णचरित्र-विषयक असल्यानें, इतर कोणत्याही काव्यापेक्षां ती मधुर व नित्यनूतन आहे असें पंडित दामोदराचें मत आहे. म्हणूनच त्यानें 'वच्छहरण' ही भागवती कथा आपल्या काव्याला निवडली आहे. **बैकार**—बहिष्कार–बहिकार–बइकार–बैकार (शास्त्रबहिष्कृत) एवं पवाडे. **वाणितातें**—वर्णितात. **नित्यनूतन**—प्रत्येक वेळीं नवीन वाटणारी. पहा–'प्रतिक्षणं यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयताया :" या दृष्टीनें भागवती कथा नेहमीच रमणीय असते असा भाव.

**ओं. २९**—भागवती कथा कधींच जुनी होत नाहीं, याला एक दोन दृष्टान्त देतात. "अमृत जसें कधींच जुनें होत नाहीं, किंवा बावनकशी सोनें जसें विटत नाहीं, तसेंच श्रीकृष्णचरित्राचें वर्णन नेहमींच सतेज व मधुर असतें. महानुभावी लोक भगवद्गीता, भागवत व चक्रधरोक्तसूत्रपाठ हे ग्रंथ प्रमाण मानतात. म्हणूनच त्यांच्या काव्याचा विषय नेहमींच कोणती तरी भागवतीकथा असते. वच्छहरण, शिशुपालवध, रुक्मिणीस्वयंवर, महदंबेचे धवळे, ही सर्व श्रीकृष्ण-चरित्रपरच काव्यें आहेत. **नव्हे**–होत नाहीं. **उरंगे**–उरंगणे=विटणें, हीन रंग होणें. **साडे पन्नर**—साडेपंधर, साडे पंधरा रुपये तोळ्याचें चोख सोनें. चोख सोन्याचा रंग कधीं कमी झाला आहे? **वाणनें**—वर्णणें, वर्णन.

**ओं. ३०**—श्रीकृष्णकथा ही अक्षर व निरंतरची कशी आहे, हेंही दोन दृष्टान्त देऊन सांगतात. "जोंपर्यंत मेरूपर्वतांत अचलतेचा गुण असेल व चंद्र-किरणांत जोंपर्यंत अमृत असेल, तोंपर्यंत श्रीकृष्णकथा ही तिन्ही लोकांत नांदेल." तात्पर्य मेरूची अचलता नष्ट होणें जसें शक्य नाहीं, किंवा चंद्राकिरणांतील अमृत लोपणें जसें केव्हांच शक्य नाहीं, त्याप्रमाणें कृष्णकथादेखील कधींच नष्ट होणें शक्य नाहीं. ती तिन्हीं लोकांत यावच्चंद्रदिवाकरौ टिकून राहील. **वर्तैलु**–वर्तेल, टिकून राहील. **तिहीं लोकीं**—स्वर्ग, मृत्यु, पाताळ, या तिन्हीं लोकांत. श्रीकृष्ण-कथा ही तिन्हीं लोकांत सारखीच प्रिय आहे असा भाव.

**ओं. ३१**—"कैवल्याचा उगम अशा श्रीकृष्णानें पृथ्वीवर अवतार घेतल्या-मुळें त्रिभुवनाला आनंद झाला आहे, ही गोष्ट नारदमुनींनीं सर्व श्रीकृष्णभक्तांना जाहीर केली." **कैवल्यकंदु**—मोक्षाचा गड्डा, मोक्षाचें उगमस्थान. श्रीकृष्ण हा मोक्ष देणारा असल्यानें त्याला कैवल्यकंद असें म्हटलें आहे. **भणौनि**—म्हणून. **भागवतासि**—श्रीकृष्णाचे भक्त.

**ओं. ३२**—श्रीकृष्णाच्या अवतारानें स्वर्गांत देखील देवांगनांना, गंधर्व-किन्नरांना आनंद झाला आहे. त्यामुळें ते सर्व मिळून श्रीकृष्णाचें गुणवर्णन करतात. **सुरवनिता**—देवांच्या स्त्रिया, देवांगना. देव, देवांगना, गंधर्व, किन्नर हे स्वर्गांत राहतात. त्या सर्वांनाच श्रीकृष्ण प्रिय असल्यामुळें, त्यांनीं त्याचें सामुदायिक गुणवर्णन केलें आहे. **श्रीचक्रधरूं**—चक्रधराला, श्रीकृष्णाला. **राणेआंते**—राजाला. श्रीकृष्ण या द्वारकेच्या राजाला.

**ओं. ३३**—आतां पृथ्वीवर देखील गोपांगना श्रीकृष्णाचें गुणगान करतात. **मुदीतुं**—आनंदित झालेल्या. श्रीकृष्णावतारानें आनंदित झालेल्या. **गोपांगणा**—

गोपाळांच्या स्त्रिया, गोपी. **ओंविअें**—ओंवी वृत्तांत. गोपी श्रीकृष्णाचे गुण ओंवी वृत्तांत गातात. **तो ध्वनी**—तो त्यांच्या गाण्याचा ध्वनि ऐकून अष्टदिशा-रूपी अंगना मंगलरूप होतात. गोपीनीं गायलेल्या गाण्याच्या ध्वनीनें निनादित झालेल्या अष्टदिशा, मंगल झाल्या. त्या दिशांत श्रीकृष्णकथेचें स्वर भरून राहिल्या-मुळें, त्या मंगल झाल्या असा अर्थ. **दिगंगणा**—दिशारूपी अंगना, स्त्रिया. या दिशा ८ आहेत हें प्रसिद्ध आहे. प्राकृतांत 'न' व 'ण' चा विशेष विवेक नसे. तीच चाल मराठीनें उचलली आहे. बालकवीनेंही अष्टदिशांवर अष्टनायिकांचें असेंच रूपक कल्पिलें आहे. पहा–पूर्वादिशेशीं गोफ खेळतो कृष्ण गडी बाई !–बालकवीची कविता–अरुण.

**ओं. ३४**—आतां पाताळांतही असेंच श्रीकृष्णगुणगान चालल्याचें वर्णन करतात. **भोगावतीच्या**–पाताळांतील गंगेच्या. **नागकन्या**–नागांच्या कन्या. पाताळांत नागांची वस्ती आहे अशी कल्पना आहे. या नागकन्या देखील मोठ्या आवडीनें श्रीकृष्णाचें वर्णन करतात. **वेधें**–आवडीनें, लोभानें.-

**ओं. ३५**—अशी ही श्रीकृष्णकथा तिन्ही लोकांना पवित्र करणारी, सर्व मंगल वस्तूंचें केवळ भांडार अशी असून, मोक्षाचें एकमेव साधन व ब्रह्मानंदस्वरूपी आहे. श्रीकृष्णकथाश्रवणानें ब्रह्मानंद प्राप्त होऊन मोक्षही मिळतो. अशी ही अत्युच परमार्थसुख देणारी आहे.

**ओं. ३६**—" ज्या कथेंत परमात्मा श्रीकृष्ण निरंतर रमतो, ती शुकाचार्यांच्या तोंडून परीक्षितिराजानें ऐकतांच त्याला सहा रात्रींत मोक्ष मिळाला." **जेथ**–ज्या कथेंत. शुकाचार्यांनीं परीक्षितीस सात दिवसांत भागवत सांगितलें. सात दिवसांत साहा रात्री येतात. म्हणून सहा रात्रींत परीक्षितीला मोक्ष मिळाल्याचें सांगितलें आहे. **आत्मारामु**—श्रीकृष्ण.

**ओं. ३७**—" तर सर्व कर्तृत्वाचा अभिमान सोडून व आपलें मन व लक्ष श्रीकृष्णकथेकडून लावून श्रीकृष्णमाहिमा अत्यंत भक्तिभावानें ऐकावा." **कर्माभिमान**—अहंकर्तृत्वाचा अभिमान. येथें कवीनें श्रीकृष्णाचा महिमा लक्षपूर्वक व भक्तीनें ऐकण्याची विनंति आपल्या श्रोत्यांना केली आहे.

**ओं. ३८**—येथून ४३ ओवीपर्यंत, श्रीकृष्णगुण व नाममहात्म्य सांगितलें आहे. **श्रीकृष्णगुणनामीं**—श्रीकृष्णाच्या गुणांच्या व नामाच्या ठिकाणीं. **तुटैल संसारू**—संसार नष्ट होईल, तुमचें संसाराचें बंधन तुटेल. अर्थात् मोक्ष मिळेल.

**दिनकरें**—सूर्याकडून जसा अंधार नष्ट होतो, तसा श्रीकृष्णगुणांनीं व नामांनीं संसार नष्ट होतो. **नासौनि**—नासून.

**ओं. ३९**—" सागरावर जशा लाटा येतात जातात, तसेच ईश्वर, आज हा तर उद्यां तो, असे विविध अवतार घेतो. पण प्राणिमात्राची संसारापासून सुटका करील तर तो एकटा श्रीकृष्णच. " ईश्वर जीवोद्धारार्थ अनेक अवतार घेतो, पण श्रीकृष्णावतार हाच एकटा जीवाला संसारबंधनापासून मुक्त करणारा आहे. **लीलां**—लीलेनें ( तृ ) सहज.

**ओं. ४०**—श्रीकृष्णाच्या अनन्य सेवेचा येथें पुरस्कार केला आहे. **सांडा**—सोडा, टाका. **अन्यभजनें**—अन्य देवतांची भक्ति. इंद्र, चंद्रादि देवता या ईश्वराच्या अपेक्षेनें कनिष्ठ आहेत. म्हणून अशा देवतांची भक्ति सोडून श्रीकृष्णभक्ति करण्यास सांगितलें आहे. **वेदपुराणें**—वेद व पुराणें सुद्धां ऐकूं नका, हे ग्रंथ पढण्याचें श्रम घेऊं नका. **मुंचिजेना**—कारण दुसऱ्या कोणाकडूनही प्राणी संसारापासून सोडविला जात नाहीं. एकट्या श्रीकृष्णाच्या सेवेनें मात्र प्राणी संसारापासून सुटतो. **श्रीकृष्णसेवा**—(तृ.) श्रीकृष्ण सेवेनें. **आना**—अन्य.

**ओं. नं ४१**—**जेआचीं**—ज्या श्रीकृष्णाचीं नांवें घेतांना, नारदाला ब्रह्मानंद प्राप्त होतो. त्या नामांचा तो प्रतिध्वनि ऐकून महापातकें देशोधडीला लागतात. महापातकें पळून जातात. **नामें**—अनेक नांवें. विष्णुसहस्रनाम प्रसिद्धच आहे, यांत विष्णूची हजार नांवें ग्रथित केलीं आहेत. **ध्वनी**—ईश्वर नामोच्चाराचा ध्वनि. **देशधडी होतु**—वाताहात होई. **महापातकें**—ब्रह्महत्या, सुरपानं स्तेयं गुर्वंगनागमः । महांति पातकान्याहुस्तत्संसर्गश्च पंचमम् ।—मनुस्मृति ११।५५. श्रीकृष्णाच्या नामाचा प्रभाव असा आहे कीं, त्यामुळें हीं महापापें देखील नष्ट होतात.

**ओं. ४२**—पुण्य मिळविण्याच्या किंवा मुक्ति देण्याच्या बाबतींत जगांतील कोणताही जप, तप, तीर्थ, यज्ञ किंवा व्रत हीं श्रीकृष्णाच्या माहिम्याशीं बरोबरी करूं शकत नाहींत, हें या ओवींत स्पष्ट करतात. जप, तीर्थ व व्रतें हीं चित्तशुद्धीचीं तपःसाधनें आहेत. या साधनांनीं साधकाचें चित्त शुद्ध झाल्यावर त्याला ब्रह्मज्ञान मिळून मुक्ति मिळते. असा हा मार्ग थोडा कष्टतर आहे. पण श्रीकृष्णाच्या भक्तीचा मार्ग हा मोक्षाचा अत्यंत सोपा व सरळ असा राजमार्ग असल्यामुळें, श्रीकृष्णाच्या महिम्याशीं इतर जपतपतीर्थादि साधनांना बरोबरी करतांच येत

नाहीं, असें म्हटलें आहे. **श्रीकृष्णमहिमेंसीं**—ही सहार्थी तृतीया आहे. अशा प्रकारचीं उदाहरणें, ज्ञानेश्वरींत पुष्कळ आहेत. उदाहरणार्थ आदरेंसीं—ज्ञाने. १।५५. प्रपंचेंसीं—ज्ञाने. ६।४७३. **आथी**—( अस्ति ) आहे या अर्थी. पहा—"जैसा स्वभावो मायेबापांचा । अपत्य बोले जऱ्हीं बोबडिया वाचा । तऱ्हीं अधिकाधिक तेयांचा । संतोखुचि आथि ॥-ज्ञाने. १।६४. **समता**—बरोबरी.

**ओं. ४३**—सर्व तीर्थांहून व देवताहून श्रीकृष्ण हा श्रेष्ठ आहे. कारण सर्व तीर्थांचा व देवतांचा जन्मच मुळीं त्याच्यापासून आहे. **तीर्थें जन्मैलीं**—गंगा ही विष्णूच्या, श्रीकृष्णाच्या पायापासून जन्मल्याचें प्रसिद्ध आहे. पहा ओ. ३. **सकळ देवता इ.**—परब्रह्म परमेश्वर हाच मोक्ष देणारा असून, इंद्र, चंद्रादि इतर देवता त्या मानानें गौण होत. स्वर्गातील ३३ कोटी इंद्रादिक देवता किंवा सत्य, कैलास, वैकुंठ वगैरे स्थानीं राहणारे ब्रह्मा, विष्णु, महेश इत्यादि देव, हे परमेश्वर नसून परमेश्वर हा सर्व देवांहून निराळा व अत्यंत श्रेष्ठ आहे. म्हणून येथें या देवता परमेश्वरानेंच उत्पन्न केल्या आहेत असें म्हटलें आहे. **कैवल्यनाथु**—मोक्षाचा दाता. ( ज्ञानादेव तु कैवल्यम्. ) **जैसें तोखें**—ज्या कथेनें संतुष्ट होईल ( अशी कथा आतां सांगितली जाईल असें कवि जाहीर करतो. ) **तोखें**—तोषें, संतुष्ट होई.

**ओं. ४४**—येथून 'वच्छहरण' ही जी श्रीकृष्णचरित्रपर कथा कवि सांगणार आहे, तिचें महत्त्व वर्णिलें आहे. **अज्ञानतमाची तरणी**—ही कथा अज्ञानरूपी अंधकाराला नष्ट करणारा सूर्यच होय. या कथेच्या श्रवणानें जग, जीव, प्रपंच व ईश्वर याबद्दलच्या अज्ञानात्मक कल्पना नष्ट होऊन परमेश्वराचें खरें ज्ञान प्राप्त होतें असा भाव. **कैवल्यपदाची निशानी**—ही कथा म्हणजे मोक्षपदाला चढविणारी शिडीच होय. या कथेच्या श्रवणानें परमेश्वर, श्रीकृष्णाचें खरें ज्ञान होऊन त्यायोगें मोक्ष प्राप्त होतो. ही कथा मोक्षाचें असें साधन आहे. **निशानी**—( निःश्रेणी )—सोपान, ( शिडी ). आजकालही चालू वऱ्हाडी भाषेंत शिडीस 'निशानी' असें म्हणतात. पहा—"तो हा कैवल्यपदाची निसाणी । सकल सीधांतां तरणी" ॥ २७ ॥- ऋद्धिपूरवर्णन. **वत्साहर्णी**—वच्छहरण या प्रकरणीं. हें प्रकरण किंवा कथाभाग महाभागवताच्या दशमस्कंधाच्या १४० व्या अध्यायांत आला असून, श्रीकृष्ण व गोपाळांचीं वासरें ब्रह्मदेवानें हरण केल्याचा अद्भुत प्रसंग त्याचा विषय झाला आहे. ब्रह्मदेवानें सत्यलोकाला नेलेली गोप,

वासरें, पुनरपि परत भूलोकीं आणण्याचें अद्भुत कार्य श्रीकृष्णानें केल्यानें, ही कथा म्हणजे श्रीकृष्णाच्या अलौकिक गुणांचें वर्णन करणारीच अशी आहे. **सांधीजैलु**—सांगितली जाईल.

**ओं. ४५**—आतां या कथेचें आणखी सामर्थ्य सांगतात. **जे**—जी कथा. **चोखाळती**—शुद्ध करणारी. प्राणी हा मूळचाच अज्ञानी किंवा मलयुक्त असल्यामुळें, त्याला ईश्वराच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान देऊन शुद्ध करणारी ही श्रीकृष्णकथा आहे. **नीववीति**—शांत करणारी. प्राण्याच्या मनाला ज्ञानानें शांति देणारी. **पोखिती**—पोषण करणारी. श्रीकृष्णभक्तीचें पोषण करणारी. **श्रवणमात्रें**—केवळ श्रवणानें वर सांगितलेली इतकीं फलें अनायासें देणारी ही कथा आहे, असा भावार्थ.

**ओं. ४६**—या कथेचें वर्णन कोणी कां करावें तें सांगतात. "ज्यांना म्हणून आपल्या वाणीनें आपला जन्म सफल करावयाचा असेल, व तिन्ही लोकांत कृतकृत्य व्हावयाचें असेल, त्या बुद्धिमान् माणसानें तरी निदान श्रीकृष्णाचा महिमा वर्णन करावा." आपण 'वच्छहरण' ही श्रीकृष्णकथा सांगत आहों, त्याअर्थी आपला जन्म सफल झाला असून, या कथेनें झालेल्या ज्ञानानें आपण तिन्हीं लोकांत कृतकृत्य झाल्यासारखे पंडित दामोदराला वाटत असल्याचें त्यानें येथें ध्वनित केलें आहे. **सरतेआं होवावे**—सरते-ग्राह्य, मान्य, कृतकृत्य. हा वाक्संप्रदाय जुन्या वाङ्मयांत पुष्कळदां येतो. पहा-तऱ्हीं न्यून तें पुरतें। अधिक ही सरतें। करूनि घेयावें हें तुमतें। विनविलें मियां ॥-ज्ञाने-१।८० "तुका म्हणे माती। केली कस्तूरीनें सरती।"-तुकाराम. **वाणावें**—वर्णावें.

**ओं. ४७**—ज्यांना नुसता शृंगाररसच चाखायचा आहे, त्यांनीं सुद्धां श्रीकृष्णचरित्रच वर्णन करावें. कारण हें चरित्र शृंगाररसपर असल्यामुळें, अशा रसिक माणसांचें समाधान या कथेनेंच होईल, असा भाव येथें व्यक्त केला आहे. भक्तिरसाची नसली तरी केवळ शृंगाररसाची ज्याला अपेक्षा आहे, त्यानें देखील श्रीकृष्णचरित्राचा अवलंब केल्यास त्याची ही अपेक्षा पुरी होईल, असा हा अभिप्राय आहे. सारांश श्रीकृष्णचरित्रानें सर्व रसांच्या श्रोत्यांची अपेक्षा पुरी केली जाईल, असा विश्वास येथें व्यक्त केला आहे. **पढिअें**—आवडता. ज्या कवीला नुसता शृंगाररसच प्रिय आहे, त्यानें देखील श्रीकृष्णचरित्राचा विषय आपल्या काव्यासाठी निवडण्यास हरकत नाहीं. पहा-'गणेशे मनोरथमुद्रा

दीधली । कविता पढींए सेश भरिली ।–नरेंद्र, रुक्मिणीस्वयंवर ५. **जेआं कवी**—( द्वितीया ) ज्या कवीला.

**ओं. ४८**—श्रीकृष्णाचें स्वरूपवर्णन येथून लागतें. **जेआंचें**—ज्या श्रीकृष्णाचें, मुरारीचें. **बरवेपणां**—सौंदर्य. ज्याच्या सौंदर्याच्या केवळ श्रवणानें देवांगना देखील आकर्षित झाल्या. श्रीकृष्ण हा वेधवंती दीक्षागुरु असल्यानें, दुसऱ्याला आपल्याकडे अकर्षित करण्याचें सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं होतेंच. **नेटकें**—सुंदर, रेखीव, पाणीदार. श्रीकृष्णाचें सुंदर स्वरूप पाहून, प्रत्यक्ष मदन देखील भुलला ! सौंदर्यात मदनाची बरोबरी करणारा कोणी नाहीं. पण तोही श्रीकृष्णाच्या रूपाला भुलला, हें सांगण्यांत येथें व्यतिरेक अलंकार होतो. 'नेटके' या शब्दाकरितां पहा–' तें स्वातीस्तव अब्दिशुक्तिपुटकीं मोतीं घडे नेटकें !– हरिपंडित, नीतिशतक. **भुली ठेली**—भूल पडली, भुलला. **ठेली**—राहिली.

**ओं. ४९**—श्रीकृष्ण हा सर्व विद्यांचा, कलांचा व रसांचा उगम असल्यामुळें, कवींना आपलें काव्य रचण्यास त्याच्याशिवाय दुसरा विषय नाहीं. मग दुसऱ्या कोणाचें वर्णन ते करणार ? **सकळ विद्या**—या विद्या १४ असून कला ६४ आहेत. या सर्वांचा जन्म श्रीकृष्णचारित्रांत झालेला आहे, असें कवीनें ध्वनित केलें आहे. **नवा रसाचें**—शृंगार, वीर, करुण, रौद्र हास्य भयानकाः। बीभत्साद्भुत शांताश्च नव नाट्ये रसाः स्मृताः॥–भरत नाट्यशास्त्र. श्रीकृष्णाचें चरित्र हें नवरसात्मक असल्यामुळें, तें सर्व रसांचें भांडार आहे असें म्हटलें आहे. **तो वाचौनि**—येथें 'वाचौनि' या शब्दयोगी अव्ययामागें प्रथमा विभक्ति आहे. ज्ञानेश्वरींत शब्दयोगी अव्ययामागें द्वितीया, तृतीया, चतुर्थी किंवा षष्ठी येते. जसें–उपायेविण, पापावाचौनि. **आण**—अन्य. ( अन्य-आन-आण )

**ओं. ५०**—श्रीकृष्णाचें लीलात्मक सामर्थ्य येथें वर्णन केलें आहे. **बहुरूप**—श्रीकृष्ण हा अनेक अवतार घेऊन विविध प्रकारच्या लीला भक्ताकरतां करणारा आहे. मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंहादि आपल्या दशावतारांत, त्यानें भक्तासाठीं अनेक खेळ अगर लीला केल्या आहेत हें प्रसिद्ध आहे. **योगिअें इ०**—योगी लोकांना देखील मोक्षाची सिद्धि देणारा तो आहे. **पावता**—देणारा. **परमसिद्धि**—मोक्षपद. **तापत्रय**—आधिदैविक, अध्यात्मिक, व आधिभौतिक अशा तीन दुःखांचा येथें उल्लेख केला आहे. प्राकृतांत विसर्गाचा नामाच्या प्रथमेच्या एकवचनीं 'ओ' होतो, तो येथें राहिला आहे. या 'ओ 'चाच

अपभ्रंशांत ‘ उ ’ होतो. आपणास ‘ उकारांत ’ नामें या ग्रंथांत पुष्कळ सांपडतात. श्रीकृष्ण सर्वच भक्तांचें तापत्रय घालवितो असा अर्थ.

**ओं. ५१**—या ओंवीपासून ५४ ओंवींपर्यंत, श्रीकृष्ण हा ‘ नवां रसांचें निधान ’ कसा आहे, तें स्पष्ट केलें आहे. श्रीकृष्णाच्या चारित्रांतील प्रत्येकीं रसाचे निदर्शक असे प्रसंग निवडून काढून ते कवीनें येथें दिले आहेत, व त्याद्वारां श्रीकृष्णाचें चरित्र नवरसात्मक आहे हें दाखविलें आहे. “ ज्यावेळीं गोपीनीं श्रीकृष्णाला रासक्रीडेनें खेळविला, त्यावेळीं तो मूर्तिमंत श्रृंगाररसच झाला, व ज्यावेळीं गोपीनीं त्याला थट्टेनें नाचविला, त्यावेळीं तो मूर्तिमंत हास्यरसच झाला. ” अशाप्रकारें त्याच्या ठिकाणीं या दोन रसांचा अनुभव त्या त्या प्रसंगीं भक्तांना मिळाला. “ श्रृंगाराद्धिभवेत्धास्यः ” या न्यायानें कवीनें श्रृंगाररसानंतर केलेल्या हास्याचा उल्लेख औचित्यपूर्ण आहे.

**ओं. ५२**—यांत करुण व रौद्र रसाचे प्रसंग उल्लेखले आहेत. “ ज्यावेळीं यशोदेनें ( उखळाला बांधून ) श्रीकृष्ण भिवाविला, त्यावेळीं करुणरसाचा उठाव झाला, व ज्यावेळीं त्यानें काळिया सर्प, मर्दन करून जिंकला, त्यावेळीं तेथें रौद्ररसाचा परिपोष झाला.” **जसोदां**—यशोदा ( तृतीया. ) प्राकृतांत ‘ य ’ बद्दल ‘ ज ’ व ‘ श ’ बद्दल ‘ स ’ येतें. **भेडाविला**—भिवाविला. ‘ भी ’ धातूचें प्रयोजक रूप–‘ आव ’ या प्रयोजक प्रत्ययामागें ‘ ड ’ घालण्याची चाल गुजराथीवरून घेतली आहे. **उठाविला**—उत्थापिला ( प्रयोजक ) उठाव झाला. **विखारू**—सर्प. **जिंतिला**—जिंकिला, **तै रुद्रु जाला**—त्यावेळीं तो रौद्ररसाची मूर्ति झाला.

**ओं. ५३**—**मातें** इ० आईला, यशोदेला आपण माती खाल्ली नाहीं हें दाखवितांना आपल्या मुखांत श्रीकृष्णानें जें विश्वरूपदर्शन दाखविलें, त्यावेळीं तेथें अद्भुतरस प्रत्यक्ष अवतरलासें वाटलें. **विश्वरूप**—व ज्या वेळीं गीतेच्या ११ व्या अध्यायांत वर्णिलेलें ‘ दंष्ट्राकरालानिच ते मुखानि ’ अशा स्वरूपाचें आपलें विश्वरूपदर्शन अर्जुनाला प्रत्यक्ष दाखविलें, त्यावेळीं तेथें भयानक रस मूर्तिमंत अवतरला. **श्रीमुख**—श्रीकृष्णाचें सुंदर मुख. श्रीकृष्णाच्या वस्तूंना देखील मागें ‘ श्री ’ लावून त्यांचा निर्देश केला जातो. उदा. श्रीपलंग, श्रीगिरी इ० **रूप जालें**—प्रकट झाला, आकार आला.

**ओं. ५४**—ज्या वेळीं श्रीकृष्णानें दैत्यांचा संहार केला, त्यावेळीं बीभत्स व वीर हे दोन रस तो झाला. शांत रस तर त्याच्या ठिकाणीं निरंतरचाच आहे. ”

त्याला दुसरा प्रसंग सांगण्याची गरज नाहीं. दैत्यांचा संहार करतांना अस्थि, मेद, मांस, रक्त इत्यादिकांचा संबंध येत असल्यामुळें, अशा संहारांत घृणा उत्पन्न करणारा बीभत्स रस वर्णिला आहे. संहार करतांना वीर रसाची आपेक्षा असतेच. तशीच ती श्रीकृष्णाच्या ठिकाणीं कल्पिली आहे. **तेथेंचि असें**–श्रीकृष्णाच्या ठिकाणीं मूळचाच शांत रस आहे. तो शांतरसाची मूर्तिच आहे.

**ओं. ५५—नाटकु**—नाटकांत नवरस असतात. श्रीकृष्णाच्या चरित्रांत वर वर्णन केल्याप्रमाणें नवरसप्रधान प्रसंग असल्यामुळें, त्याचें चरित्र म्हणजे एक नाटकच होय. श्रीकृष्णाला नवनाटकसूत्रधार असें विशेषणही लावण्यांत येतें. **निजरूप**—श्रीकृष्णाचें खरें स्वरूप मात्र ब्रह्मादिकानांहीं समजत नाहीं. त्याच्या परब्रह्मस्वरूपाचें आकलन ब्रह्मेशादि क्षुद्र देवतांना होणें कठिण, असें महानुभाव पंथाच्या मताप्रमाणें येथें ध्वनित केलें आहे.

**ओं. ५६**—या ओंवीपासून श्रीकृष्णाचें निर्गुण स्वरूप व त्याचें सगुण स्वरूप यांतील विरोध दाखविला असून, निर्गुण, निराकार अशा परब्रह्माला, लौकिक जीवन व चरित्र कसें संभवतें याची परिस्फुटता केली आहे. " निर्गुण परब्रह्म सगुण कां झालें, निराकार अशा परब्रह्माला श्रीकृष्णाच्या अवतारांत साकारपण कां आलें, व अशा मूळच्या निरभिमानी, कर्तृत्वरहित परब्रह्मानें, श्रीकृष्णाचा अवतार घेऊन दैत्यांचा संहार कां व कसा केला, याचें उत्तर पुढें ६१ ओंवींत ' भक्तीच्या ' पुरस्कारानें दिलें आहे.

**ओं. ५७—अरूपां**—रूपरहित अशा परब्रह्मानें श्रीकृष्णासारखें सुंदर रूप धारण करणें, **अमूर्ता**—अशा परब्रह्माला श्रीकृष्णासारखा सुंदर आकार प्राप्त होणें. **अद्वैत**—एकमेव अशा परब्रह्मानें मत्स्य, कूर्मादि अनेक अवतार धारण करणें, हें आश्चर्य नव्हे काय ? पण हा प्रश्न शास्त्रानें सुटावयाचा नसून भक्ती-तत्त्वानें सुटतो, हेंच कवीला सांगावयाचें आहे.

**ओं. ५८**—परब्रह्मांत असणारे हे परस्पर विरुद्ध धर्म, केवळ भक्तांनांच कळतात. भक्तानांच त्यांचें आकलन होतें. **अनामआ**–नामरहित अशा परब्रह्माला हजार नांवें प्राप्त व्हावीं, हें वर वर पाहतां चमत्कारिक वाटतें, पण भक्तजन अशीं सहस्रनामें परब्रह्माला सगुणोपासनेंत देतात, हें त्याला उत्तर आहे. **सहस्रनामां**—महाभारतांर्गत विष्णुसहस्रनाम प्रसिद्धच आहे. **कुमरें इ०**—निर्गुण निराकार अशा परब्रह्माला मुलें किंवा स्त्रिया कल्पिणें हें विरुद्ध नाहीं काय ? **कुमरें**—

मुलगे. श्रीकृष्णाला असे मुलगे होतेच. **आंतौरे**—अंतौरी–अंतुरी–स्त्री. येथें 'आंतौरें' हें अनेकवचनी रूप आहे. पहा–"तैसें प्रकृति जालेपणें। पुरुषा गुण भोगणें। उदासु अंतौरिगुणें। आंतुडविजे ॥ १००८ ॥—ज्ञाने. अ. १३. **आत्म-आरामा**—(द्वितीया), संधि न करतां तसाच शब्द ठेवला आहे. पहा, वर 'अनाम-आ.' **आश्रमधर्मू**—गृहस्थाश्रमाचे गुणधर्म. परब्रह्म म्हणायचं, आणि त्याला एकाद्या लौकिक व्यक्तीप्रमाणें गृहस्थाश्रमाचे, (विवाह, मुलें, बायका असा परिवार असणें) गुण चिकटविणें हें परस्पर विरुद्ध किंवा विसंगत वाटण्याचा संभव आहे. पण कवि या विरोधाचा परिहार पुढें करणार आहे.

**ओं. ५९**—पुनः जो परमात्मा प्रत्येक प्राणिमात्रांत भरून राहण्याइतका व्यापक आहे, त्यानें गोकुळांत एकाद्या लहान मुलाप्रमाणें खेळावें, किंवा ज्या परब्रह्माच्या (श्रीकृष्णाच्या) नाभिकमळाच्या ठिकाणीं अनेक ब्रह्मांडें सामावलीं आहेत, त्यानें नंदाच्या घरीं मूल होऊन पाळण्यांत निजावें, हें तरी अघटित नव्हें काय? **भूतग्रामीं**–प्राणिमात्रांच्या समुदायांत. परमात्मा हा प्रत्येक प्राणिमात्रांत आहे. **नाभी–कमळीं**–बेंबीच्या ठिकाणीं. शेषशायी विष्णूच्या बेंबींतून ब्रह्मदेवाची उत्पत्ति झाल्याची पौराणिक कल्पना आहे. तिला अनुलक्षून हें वर्णन दिसतें. ज्याच्या बेंबींतून अनेक ब्रह्मांडें जन्म पावतात, इतकें ज्याचें व्यापक सामर्थ्य व व्यापकत्व, त्यानें श्रीकृष्णावतारांत मूल होऊन नंदाघरीं वावरावें, हें विचित्र नव्हें काय? **पाल्हकीं**–पालखीं–पाळण्यांत. पहा–"आधारशक्तीचा अंकिं। वाढविसि तूं कौतुकिं। हृदय–कोशपालकीं। हालवीसि पैं. ॥ ज्ञाने. १२।५. **सूतें**–(सूणें या प्राकृत क्रियापदापासून सूणें–घालणें, ठेवणें.)=ठेवला जातो. येथें कर्मणी प्रयोगाप्रमाणें उपयोग केला आहे. हा अधिकालंकार आहे.

**ओं. ६०**—परब्रह्माचे आणखी परस्पर विरुद्ध गुण वर्णिले आहेत. लहान असूनही जो अत्यंत मोठा आहे, सर्वांच्या शरीरांत असूनही जो त्यांच्यापासून निराळा आहे, स्वतः कांहीं न करणारा, उदासीन असूनही जो सृष्टिसंहाराचें कृत्य करतो, हें अघटित नाहीं काय? **साना**–लहान. **निन्हां**–अगदीं. **भीतरीं**–आंत. **परूं**–निराळा, स्वतंत्र. **अकर्ता**–परब्रह्म किंवा पुरुष कांहींच करीत नसून वास्तविक सर्व कर्तृत्व प्रकृतीचें आहे.

**ओं. ६१**—परब्रह्माच्या ठिकाणीं असे परस्पर विरुद्ध गुण कसे असतात, याचें उत्तर येथें कवि देत आहे. **विरुद्धधर्मांचिआं**–वर ५६–६० या ओंव्यांत

वर्णन केलेले परब्रह्माचें परस्पर विरुद्ध गुण. **प्रवृत्ती**–गुणधर्म. **एकीं** इ०–हे गुण-धर्म एकट्या ईश्वराच्या ठिकाणीं असतात. **आती**–आथी = अस्ति = असतात. **ते**–हे परस्पर विरुद्ध गुण, वेद, व तर्कादिशास्त्रें जाणत नाहींत. परमेश्वराच्या ठिकाणीं असे परस्पर विरुद्ध गुण कसे असतात, हें तर्कशास्त्रानें किंवा अन्य शास्त्रानें जाणतां येणार नाहीं. याचें आकलन फक्त भक्तीचेंच होईल. भक्तीनें या विरोधाचा परिहार होतो असा भाव.

**ओं. ६२**–भक्तीनें हें जाणतां येतें. हाच परमार्ग किंवा श्रेष्ठमार्ग होय. महानुभावपंथालाही परमार्ग असें नांव असून, त्यांत भक्तीला दिलेल्या प्राधान्यावरून भक्ती हा परमेश्वराच्या ज्ञानाचा श्रेष्ठ मार्ग, असें येथें म्हटल्यास त्यांत नवल नाहीं. **यया**–इ०–या भक्तीमार्गाशिवाय दुसरा अध्यात्मयोग नाहीं. या भक्तीमार्गाशीवाय अध्यात्म किंवा परब्रह्मज्ञानाचा दुसरा मार्ग नाहीं. म्हणून येथें याबद्दल अधिक विस्तार करण्याचें कारण नाहीं, असें कवीचें निवेदन. **मुनी केशवराजु**–दामोदर पंडितानें येथे आपल्याबद्दल आपल्या मित्राचें हें नांव घातलें आहे. यासंबंधीं मागें ओं. ६ वरील टीपा पहा. **अतिप्रसंगु**–ग्रंथ विस्तार, अतिरेक. पहा–'ते आणिन श्रोतेंयांचेया मनां : पुन होईल अती-प्रसंगु ॥–नरेंद्र, रुक्मिणीस्वयंवर ७२९. अशा प्रकारच्या ठाम तात्विक सिद्धांताच्या बाबतींत, ग्रंथ-विस्तार करून घोळ घालीत बसणें कवीला आवडत नाहीं.

**ओं. ६३**—येथून ६७ पर्यंत, श्रीकृष्ण ज्या गोकुळांत बालपणीं राहिला त्याचें भाग्यवर्णन करतात. कवीला यामुळें तें स्थान धन्य वाटतें. **कवन इ०**—"हें गोकुळ कोणत्या देवानें निर्मिलें कीं, तेथे परब्रह्मानें सांवळया श्रीकृष्णाच्या स्वरूपांत अवतार घेऊन मनुष्यवेषानें गवळ्याबरोबर खेळावें?" **कवन**–कवण—कोण. **दैवें**–देवानें. **खेळेमेळें**–खेळीमेळींनें. **गोकुळें**–(तृ) गोकुळानें. कधीं कधीं नामें एकारांत दृष्टीस पडतात. गोकुळाचें हें केवढें भाग्य!

**ओं. ६४**—गोकुळाची धन्यता. **परदैव**—परब्रह्म, परमेश्वर. **डोळस**-सुंदर. पहा–" बहुतां बाइलांतु लक्षुमी रूपस : परि तियेपासौनि हे डोळस॥—नरेंद्र, रुक्मिणीस्वयंवर १९३. **वेल्हाळ**—सुंदर, नाजुक. **आंगें** - शरीरानें. **परिअें**—झोकें. ज्याला गोपी पाळण्यांत घालून झोकें देतात. पहा–" माझेनि स्मरणें जाण । परिये देणें बालका।–एकनाथी भागवत १२।१७९. " हृदयाकाशपल्लकीं परिये देसी निजे।"–ज्ञाने. १२।५. गोकुळांत श्रीकृष्णानें बालकस्वरूपांत वावरावें हेंच गोकुळाचें भाग्य.

**ओं. ६५**—" ज्यानें चतुर्दश भुवनें घडविलीं, वेद व पुराणें ज्याचें वर्णन करतात, त्याला यकःश्चित् गौळणी लोणी देऊन नाचवितात, ( हें आश्चर्य नव्हे काय ? ) येथेंही अधिकालंकार साधला आहे. **भुवनें**—अतल, वितल, सुतल इत्यादि १४ भुवनें. ही सर्व परमेश्वराचीच करणी आहे. अशी ज्याची अवाढव्य कृति किंवा सामर्थ्य, त्यानें लोण्याच्या गोळ्यासाठीं गोपींत नाचावें हें विशेष नाहीं काय ?

**ओं. ६६**—पुनः तीच कल्पना अन्य रीतीनें मांडली आहे. " जो श्रीकृष्ण त्रिभुवनांचा पति आहे, सर्व प्रमाणांना जो अगम्य आहे, तो नंदाचा मुलगा होऊन वासरें राखतो ( हें अलौकिक नव्हे काय ? ). **प्रामाणां**—प्रमाणां. प्रत्यक्ष, अनुमान व शाब्द अशी तीन प्रमाणें आहेत. या तीन प्रमाणांनींच ज्ञानाची पारख केली जाते. **वासुरुवें**—वासरूं या उकारांत नपुंसगलिंगीं नामाचें प्रथमेचें अनेकवचन. असे प्रयोग ज्ञानेश्वरींत पुष्कळ अढळतात. उदा. गोरुवें, ह्यातिरुवें. इ.

**ओं. ६७**—" जो परमेश्वर सर्व यज्ञांचा अधिपति, प्रत्येकाच्या शरीरांतील आत्में ज्या श्रीकृष्ण परमात्म्याचें ध्यान करतात, तो गवळ्यांची यःकश्चित् संगत करून गांवाजवळच्या मोकळ्या जमिनींत वावरतो ( हें अघटितच ). **सकळ यज्ञां-धींपती**—सर्व यज्ञाचा आधिपति श्रीकृष्ण आहे. कारण गीतेंतही म्हटलें आहे. "अहं हि सर्व यज्ञानां भोक्ता च प्रभुरेवच । न तु मामभिजानंति तत्त्वेनातश्च्यवंति ते ॥—गीता—९।२४. **सांगातीं करोनी**—संगतीला घेऊन. **आखरीं**—गांवाजवळच्या जमिनींत. पहा—" मग गोसावीं माहांडुळासि बीजें केलें : गांवापुर्वे आखरीं लांकाचा गाडा मोडला होताः—श्रीगोविंदप्रभुचरित्र, २५२.

**ओं. ६८**—येथें श्रीकृष्णाच्या व बळरामाच्या सवंगड्यांचीं नांवें आलीं आहेत. **पेंधा**—स्थूल. **उ॰डजा**—कौतुक भाव दर्शिवणारा. **सुदामा**—हा श्रीकृष्णाचा दारिद्री मित्र प्रसिद्धच आहे. **वामा**—( वामन ) ठेंगणा. **बागडा**—वेडेवांकडे बोलणारा; मशकऱ्या. **बळ**—बळवान्. **सवंगडा**—बळिभद्राच्या ( बलरामाच्या ) बरोबर चालणारा.

**ओं. ६९**—याप्रमाणें नांवाचें. मुख्य, पुढारी गोवळे, गोप श्रीकृष्णाबरोबर असले, तरी इतर आणखी हजारावर गोप त्याच्याबरोबर होते. वरील नांवें फक्त पुढाऱ्यांचीं दिलीं आहेत. **मुखरीं**—पुढारी, प्रमुख. **मीनले**—मिळाले, जमले. **गोपाळरा॰**—श्रीकृष्ण. **वेऱ्हीं**—वर

**ओं. ७०**—या गोपांनीं कोणतीं वाद्यें घेतलीं होतीं, तीं येथें दिलीं आहेत. बहुधा हीं सर्व तोंडानें वाजविण्याचीं वाद्यें आहेत. **तारपी**—वाद्य विशेष. **मोहरी**—पुंगी, मुरली. पहा–रामविजय २५।१४३. तुकाराम २३८६. **डांगा**–काठ्या. **नीगेतां**—निघत असतां. शिंगाचा गजर निघत असतां, आकाश दणाणून गेलें. **गाजीनिलें**—गर्जिन्नलें–गाजलें. जुन्या मराठींत भूतकालवाचक धातुसाधित अव्ययापुढें, 'ल' जोडण्याची चाल आहे. संस्कृतमध्यें 'त' या भूतकालवाचक धातुसाधित प्रत्ययाऐवजीं, पुष्कळ धातूंना 'न' लवतात. हीच रीत मराठीनें व हिंदीनें पद्यामध्यें उचललेली आहे. मराठी कवितेंत या 'न' पुढें 'ला' जोडतात. पहा–ते दोन्हीं शब्द अचाट । मीनले एकावट ॥–ज्ञाने, १।४७. कधीं कधीं 'न' द्वित्त होतो. जसे–'धर्माप्रति धाविन्नला'–एकनाथ–रुक्मिणीस्वयंवर. येथें आपणास "गाजीनिले" असें रूप गर्जितलें–गर्जिनलें–गर्जिन्निलें–गाजीनलें–गाजीनिलें, अशा पायऱ्यांनीं आलें आहे. 'निलें' यांतील 'इ' पादपूरक आहे. ओं. ६९ व ७० यांना आधारभूत असे भागवतांतील श्लोक पहा–'प्रबोधयन् शृंगरवेण चारुणा विनिर्गता वत्सपुरःसरो हरिः॥ १ ॥ तेनैव साकं पृथुकाः सहस्रशः स्निग्धाः सुशिग्वेत्रविषाणवेणवः। स्वान्स्वान्सहस्रोपरिसंख्ययान्वितान्वत्सान्पुरस्कृत्य विनिर्ययुर्मुदा ॥ २ ॥ अ. १२. श्रीकृष्ण गोपाळासह वनांत जातांना ही त्यांची तयारी आहे.

**ओं. ७१**—श्रीकृष्ण वनांत खेळावयास निघाल्याचें कळतांच, देव विमानांतून त्याला पाहण्यास धावले आहेत. 'खेळौं निघालें,' व 'पाहों आले' हीं तुमंतें आहेत.

**ओं. ७२**—श्रीकृष्णानें जेव्हां गोकुळांत क्रीडा केली, तेव्हां त्याला पाहून देवांचीं मनें संतुष्ट झालीं, शांत झालीं. श्रीकृष्णाला पाहण्यास देव आकाशांत जमल्यामुळें, आकाशांत दुसरी अमरावतीच अवतारल्याप्रमाणें भासलें. **अंतराळीं**—आकाशांत. **अमरावती**—इंद्राची राजधानी. इंद्र सर्व देवांचा राजा आहे. **दूजी**–दुसरी.

**ओं. ७३**—श्रीकृष्णाकडे तन्मयतेनें पाहणाऱ्या देवांची स्थिति वर्णन केली आहे. देव आनंदानें इतके भरून गेलें कीं, आपण कोठून आलों हेंही ते विसरून गेले. स्वस्थानाचा त्यांना विसर पडला. **विसुरैले**–विसरले. **उन्मीखें**–निर्निमेष दृष्टीनें, एकच टक लावून, पापणीला पापणी न लावतां ते श्रीकृष्णाकडे

नुसते पहात राहिले. पहा– " देॐ उन्मेख सूक्ष्मेक्षणु विघ्नराजु–ज्ञानदेवी १।१५.

**ओं. ७४**—" नंदाच्या नऊ लाख गाई, दुसऱ्याही असंख्य आणखी गाई, व तितक्याच वासरांना, ते गोपाळ वनाच्या मार्गाला लावते झाले. " **तेतुलेआं**—तितक्या. **पथीं लाविते जाले**—वाटेला लावते जाले.

**ओं. ७५**—हीं जनावरें वाटेला लागतात इतक्यांत, त्या पथकाचे नाईक असे जे गोपाळ होते ते म्हणाले:-" अरे! वासरे कळपाकळपांत वेगळीं करा. वासरांचे वेगळे वेगळे कळप करा. **कल्पीं**—कळपीं. ( प्रचलित मराठींत ' ल ' व ' प ' मध्यें अ शिरला आहे ) तुकड्या तुकड्यांत. **थोवेकारीं**—पथकाच्या नायकांनीं, सवंगड्यांनीं. गोपाळांचे म्होरके आणखी काय म्हणाले, तें दुसऱ्या ओवींत दिलें आहे. **एक टेकितु इ०**—" बळानें कमकुंवत आहेत अशांचा एक कळप जमिनीवर टेकूं दे, व एक कळप सरळ पुढें जाऊं दे. " **बळें पावळीं**—बळानें कमकुंवत, अशक्त अशीं. **महि टेकितु**—जमिनीवर बसोंत, व दुसरा कळप समोर जाऊं दे. **साउमे**—समोर. **नीगितां**—निघोंत.

**ओं. ७६**—" गाईंना व वासरांना हिरवीं सुंदर गवतें चारीत, गोपाळ या वनांतून त्या वनांत जात होते, तर कांहीं (गोपाळ) श्रीकृष्णाबरोबर चालत होते." **हरित**–हिरवींगार. **सोज्वलें**–निर्मळ, स्वच्छ. **संन्निधानें**–संन्निध्यानें, सामीप्यानें. बरोबरीनें. त्यांना श्रीकृष्णाची जवळीक हवी होती.

**ओं. ७७**—या व पुढील ओंवींत गोपाळांचें स्वरूप व त्यांनीं घेतलेले वेष यांचें वर्णन आलें आहे. " सर्वच गोपाळ चंदनचर्चित होते. कांहींनीं काव, गेरू, पिवडी यांची उटी अंगाला लावली होती. कस्तुरीच्या सुवासानें सर्वच गोपाळ भरून राहिले असून, त्यांनीं अंगावर काळ्या शाईच्या बावल्या काढल्या होत्या." **एकें**–कांहींजणांनीं. **धातुचिआं**–गैरिक धातूच्या, गेरु, काव, पिवडी इत्यादींच्या. **वाहाकाते**–वाहाकणें = स्फुरणें, भरून राहणें. वायुसंयोगें परिमळ येणें, सुगंधी पसरणें. पहा वच्छहरण १५९. **वरि**–अंगावर. **मसीची**–काळ्या शाईची. **बाउलीं**–टिकल्या, चित्रें.

**ओं. ७८**—" रत्नाचे अलंकार त्यांनीं घातले असून, त्यावर फुलांचीं भूषणें त्यांनीं धारण केलीं होतीं. कांहींनीं गुंजांचे अलंकार घातले असून, डोक्यावर मोरपिसांचा तुरा होता." **लेणें**—अलंकार, दागिनें. **वेठी**–तुरा. पहा. ' मिरवे सुढाळा मौक्तिकांचीं वेठी '— वच्छहरण २४३. ' तया मुकुटाचे

तळवटीं। मुक्तमयुरपत्रांची वेठी।'—एकनाथ-रुक्मिणी-स्वयंवर. **मोरविसां**—मोरपिसांची. 'प' बद्दल 'व' घालण्याची चाल. या ७७ व ७८ ओंव्यांना, "फलप्रवालस्तबकसुमनःपिच्छधातुभिः। काचगुंजामणिस्वर्णभूषिता अप्यभूषयन्॥–महाभागवत १२।४, या श्लोकांचा आधार असून, वामनपंडितांच्या 'वनसुधेंतील' खालील श्लोकही समानार्थक म्हणून पाहण्यासारखे आहेत. "फुलांचे गळां घालिती दिव्य हार, स्वनाथासवें ते करीती विहार॥ स्वकौशल्य ज्या गुंजमाळांत, नाना गळां घालिती, ते करिती तनाना। शिरीं बांधिती मोरपत्रें, विचित्रें, शरीरावरी रेखतीं दिव्य चित्रें॥ नसोनी उणे रत्नमुक्तां सुवर्णा, उगाळूनियां मृत्तिकावर्ण वर्णा॥—वनसुधा १।१६,१७,१८.

**ओं. ७९**—येथून ८२ पर्यंत, श्रीकृष्णाचें शारीरवर्णन केलें आहे. **सोनेसळा**—जरीच्या धारा असलेलें वस्त्र (जो नेसला आहे). **इंद्रनीळ** इ०—इंद्रनीळ मळ्याप्रमाणें जो श्रीकृष्ण सांवळा आहे. ज्याच्या अंगावर गैरिक धातूंची रंगीबेरंगी पातळ उटी शोभत होती." **विचित्रा**—रंगीबेरंगी.

**ओं. ८०**—श्रीकृष्णाच्या गळयांत वन्यपुष्पांच्या माळा असून पाठीवर केसांची बांधलेली वीरोचित गांठ शोभत होती, व डोक्यावरील राजवस्त्रावर मोत्याचा व मोरांच्या पिसाचा तुरा होता. **वीरगंठी**—केसांचा झुंबाडा-पहा–"तंव आबैसीं श्रीमुगुटु वीचुरीलाः वीरिगुंठी घातलीः"–श्रीगोविंदप्रभु-चरित्र १८५. "अविरत कुरळांची मस्तकीं वीरगुंठी"–सामराज, रुक्मिणीहरण ८।११८. **रुळतिअे**—रुळणारी, हलणारी. **राजवल्लभ**—राजाला योग्य असें वस्त्र. पहा—'राजवल्लभें पांगुरावेलें वेडें : नेणें सुख विशेषु'—ऋद्धिपुरव. ३२५. "परिवंटु दाटिला राजवल्लभा : फुटेयाचा—नरेंद्र, रु. स्वयंवर १७२.

**ओं. ८१**—श्रीकृष्णानें कोणतीं वाद्यें घेतलीं होतीं, तीं सांगितलीं आहेत. **वेताटी**—वेताची छडी. पहा–"वेताटि ही गोमटी"–वामनपंडित. **मरगज**—मरकत-पांचूचा. श्रीकृष्णाचा पावा पाचेचा असल्यानें तो हिरवा होता. **हाटकोपरी**—श्रीकृष्णाच्या पायांतील सोन्याच्या वाळ्यावर त्यानें मारलेल्या दैत्याचीं चित्रें काढलीं होतीं. 'हाटकोपरी'–(सोन्यावर) हें 'तोडरीं' याकडे घ्यावयाचें. **तोडरीं बाउली घालणें किंवा काढणें**—तोडरांवर दैत्याचीं चित्रें काढणें, हें श्रीकृष्णानें दैत्यावर मिळविलेल्या जयाचें चिन्ह होतें. **तोडर**—पादभूषण.

**ओं. ८२**—“ श्रीकृष्णाच्या सौंदर्याला दृष्ट लागेल, म्हणून त्याच्या कपाळीं काळ्या शाईचा टिळा लावला होता. पण उलट यामुळें तो जगजेठी श्रीकृष्ण त्या सर्व गोपाळांत अधिकच शोभला.” **वरवेपणा**—सौंदर्य. **तंव**—तर, उलट. दृष्ट न लागावी म्हणून काळें काजळ वगैरें कपाळाला लावण्याची चाल फार पुरातनची दिसते.

**ओं. ८३—सवैल**—सांगाती, सोबती. पहा–“ सुदेवो म्हणे सवैलातें। कैसें तुमचें दैव पुरतें.”–नरेंद्र, रुक्मिणीस्वयंवर. **गोवळे**—गोपाळ. **जा रे इ०** “ पेंडारी भणतु, ” जा रे दैत्य हो. ” मग गोवळे ब्रीदें उभारतांती ” असा या ओळीचा अन्वय आहे. “ जा रे, पळा रे दैत्य हो ! **पेंडारी**—पेंड = दैत्यसमूह त्याचा अरि म्हणजे शत्रु (श्रीकृष्ण) भणतु = म्हणतो (म्हणे). **ब्रीदें उभारतातीं**—असुरनाश आणि भक्तरक्षणाचे तोडर प्रसिद्ध करताती. ‘ ब्रीदें उभारतातीं ’ याचा संबंध गोपाळाकडे आहे. “ जा रे दैत्य हो ” हीं Monsters ! go back अशीच श्रीकृष्णाची घोषणा आहे. कारण अघासुर लवकरच श्रीकृष्णाच्या नाशाकरितां गोकुळावर येणार होता. म्हणून “ यापुढें आतां दैत्याची भीति नाहीं, दैत्यांनीं आतां पळाळें पाहिजे ” हें श्रीकृष्णानें सर्वांना जाहीर केलें, व गोपाळांनींही तशीं असुरनाश दर्शविणारीं ब्रीदें, जय चिन्हें धारण केलीं. **ब्रीदें**—बिरुदें. बाणा, **उभारितांतीं**—प्रकट करतात.

**ओं. ८४**—गोपाळ श्रीकृष्णाचें गुणगान कसे करीत होते, त्याचें वर्णन केलें आहे. **ठाइं ठाइं**–स्थानीं स्थानीं, ठिकठिकाणीं. **ऽऽडवतु**–पुढें येत होते. श्रीकृष्णाकडे जोरानें वळत होते. **सुछंदें इ०**–अत्यंत प्रेमानें झांजांचा गजर करीत होते. **टाळघोळ**–झांजा वगैरे वाद्यांचा मोठा गजर. **वातु**–वाजवीत होते. **एकु इ०**–कांहींजण मोठ्या आवडीनें दैत्यसंहारक श्रीकृष्णाचे पवाडे गात होते. **सुहावें**–आवडीनें. पहा–“ आणि शद्बादिक सुहावें। साहाजे रंगें हालावें। विषयपल्लव नवे। नीच होंति ॥–ज्ञाने– १५।१६०. **पवाडे**-गीते. **दैत्यु-विभांडाचे**-दैत्याचें निर्दलन करणाऱ्याचें (श्रीकृष्णाचे). **पढतु**–गात होते.

**ओं. ८५**—येथून ८८ ओंवीपर्यंत, गोपाळांच्या विविध खेळांचें वर्णन दिलें आहे. **खेळों आदरिलें.**–खेळ आरंभिले. **शशी सिरणें**–हातांत हात धरून वर्तुळाकृतीनें मग धरलेल्या हातांतून शिरणें तें शशि=वर्तुळ, तयांत शिरणें, पुनः निघणें असा खेळ. **एकु इ.**–कांहीं गोपाळ हमामा व हुंबळी घालीत होते.

**हमामा**—वांकून पोटांत कोंपर दडपणें आणि हांसणें. **हुंबळी**—नाचत गाल फुगविणें आणि मुठीनीं गालफुग्यावर मारणें. **एकु इ.**—कांहीं जण पुनः एक लांब गाणें गात होते. **वेली**—लांब गाणें.

**ओं. ८६**—"कांहीं जण पक्ष्यांच्या ओरडण्याचें अनुकरण करीत होते. तर कांहीं वानरांप्रमाणें उड्या मारीत होते. तर आणखी कांहींजण बकऱ्यांच्या टकरांची नक्कल करून दाखवीत होते." **विहंगम**—पक्षी. **उत्पवनें**—उड्डाणें, उड्या. **तगर**—मेंढा. कानडींत 'ठगर' म्हणतात. **जुंझणें**—युद्ध, टक्कर. तुलनार्थ पहा—"कैश्चिद्भृंगैः प्रगायंतः कूजंतः कौकिलैः परे"—भागवत १०।७.

**ओं. ८७**—"कोणी मोरांच्या नाचाचें अनुकरण करीत होते, तर कोणी हंसाप्रमाणें चालून दाखवीत होते; तर आणखी तित्तिरपक्ष्याप्रमाणें श्रीकृष्णा-पुढें पळून दाखवीत होते. **राजहंसा गति**—'राजहंसा' हें 'गती' चें विशेषण आहे. दोनी शब्द एकाच विभक्तींत आहेत, ही रीत संस्कृतची आहे. **तितुरवाउलीं**—तित्तिरपाउलीं. येथेंही 'प' बद्दल 'व' आलें आहे. तित्तिर पक्ष्याच्या पावलानें धावून दाखवीत होते. पहा—"विच्छायाभिः प्रधावन्तो गच्छंतः साधु हंसकैः ॥ बकैरुपविशंतश्च नृत्यंतश्च कलादिभिः ॥" भागवत—१०।८. या क्रीडावर्णनास वामनपंडितांचा अनुवादही समानार्थक आहे. पहा—"खगाचिया साउलिच्याच संगे । ते धांवती हास्यरसप्रसंगें ॥ हंसाचिया दाखविती गतीतें । जे लाधले हंसगुरूगतीतें ॥ मुखें वासुनी लोचनभ्रूतटातें । उभारूनियां वांकुल्या मर्कटातें ॥ अहो ! दाविती शब्द तैसे करीती । असे खेळती बाळ निःशंकरीती ॥ वनीं खेळती मेघनीळासमोर । प्रमोदें करी नृत्यलीलास मोर ॥ तयासारिखे नाचती तोंक सारे । खुणावूनि अन्योन्य 'कीं तो कसा रे !'" ॥.—वनसुधा १।२४—२६.

**ओं. ८८**—**देउॅरायासीं**—श्रीकृष्णास. **रूंझी**—हर्ष. **उपजवीतु**—उत्पन्न करीत होते, देत होते, व त्याची चरणसेवा हे प्रसाददान त्याच्याजवळ मागत होते. **पसाअेदान**—प्रसाददान. पहा—"आतां विश्वात्मकें देवें । एणें वाग्यज्ञें तोषावें । तोषौनि मज देयावें । पसायदान हें ॥—ज्ञानें १८। १७७२. गोपाळ श्रीकृष्णाच्या चरणसेवेला उत्सुक होते, असा भाव.

**ओं. ८९**—श्रीकृष्णाच्या हांतून आपलें मरण आहे, हें समजल्यामुळें, श्रीकृष्णाला बालपणींच मारून टाकण्यासाठीं कंसानें शकटासुर, वत्सासुर, असे राक्षस व पूतनेसारखी राक्षसी गोकुळाला पाठविली होती. त्या सर्वांना श्रीकृष्णानें

यमसदनाला पाठविल्यामुळें, कंसानें पुनः श्रीकृष्णाला मारण्यासाठीं आतां अघासुराची योजना केली आहे. विजापूरच्या पादशहानें शिवाजीचें पारिपत्य करण्यासाठीं अफझलखान पाठविला, तसाच हा पौराणिक प्रकार वाटतो. **तंव इ०**—इतक्यांत कंसानें कृष्णवधार्थ अघासुर नांवाचा दैत्य पाठविला, व तो सापाच्या रूपानें गोकुळाला आला. त्या दैत्याचें वर्णन ओं. ८९ पासून सुरू होतें. **दैत्यांवरू**—दैत्यश्रेष्ठ. **सापरूपधरू**—सापाचें रूप धारण करणारा. आपलें खरें रूप कळूं नये, म्हणून राक्षस भिन्न भिन्न रूपें धारण करून येत, हें प्रसिद्ध आहे.

**ओं. ९०—आंगें**—शरीरानें. **निऱ्हा**–अत्यंत, अगदीं. **वदनाचा** इ. त्या दैत्याच्या तोंडाचा विस्तार आकाशाप्रमाणें पसरलेला ( व्यापक ) होता. **अंतराळु**—आकाश.

**ओं. ९१**—त्या दैत्याचा आशय येथें सांगितला आहे. "ज्यानें (श्रीकृष्णानें) पूतना व बकासूर मारले, तो नंदाचा मुलगा आपण गिळून टाकूं. या एकट्या श्रीकृष्णाच्या संहारानें सहजच सर्व गवळयांचा संहार होईल." श्रीकृष्ण हा गवळयांचा प्रमुख असल्यामुळें, त्याला मारला कीं सर्व गवळी मेलेच म्हणून समजा, असा साधा हिशेब अघासुरानें मनाशीं घातला होता. **पूतनाणि**—पूतना+आणि या दोन शब्दाचा संधि केलेला आहे. **गिळौ**—गिळूं. **साहजेंची**—सहजच, विनायास.

**ओं. ९२**—अघासुर कंसापुढें श्रीकृष्णवधाची पैज मारून आला होता. अफझलखानानें सुद्धां शिवाजीला मारण्याची अशीच पैज विजापूरदरबारांत मारली नव्हती काय ? **पैजा**—पैज. " पैजा " शब्द ज्ञानेश्वरींत आला आहे. पहा—'अमृताचेनि पैजा जिंके.' **वंदावन**–वृंदावन. अघासुर या वृंदावनाच्या वाटेवरच राहिला. कारण श्रीकृष्ण या वृंदावनांत क्रीडेसाठीं नेहमींच येत असे. प्राकृतांत कोठें कोठें 'ऋ' चा 'अ' होतो. **जैसा काळ इ०**–काळ महाकाळास ग्रासावयास यावा, त्याप्रमाणें म्हणजे काळाकडून महाकाळाला ग्रासणें जसें अशक्य, त्याप्रमाणें अघासुराकडून श्रीकृष्णाचा नाश होणें अशक्य होतें. येथे काळसर्परूपी अघासुर, महाकाळ (श्रीकृष्ण काळ्या रंगाचा होता) श्रीकृष्णास ग्रासावयास आला आहे. श्रीकृष्ण काळाचाही काळ असल्यामुळें, त्याला अघासुरानें गिळणें कसें शक्य होतें ? पहा–" कालः कलयतामहम् "–भगवद्गीता १०।३०. **कळौ**—कवळों, कवळूं. थोड्याशा शक्तीच्या माणसानें आपल्याहून किंतीतरी बलाढ्य अशा माणसाशीं

सामना देण्यासारखीच ही अघासुराची श्रीकृष्णवधाची अपेक्षा हास्यास्पद होती.

**ओं. ९३**—" पतंगानें (अग्निवर झेप घालतांना) आपलें सर्वस्व त्याला द्यावें, किंवा अंधकारानें सूर्याला स्वतःला अर्पण करावें, त्याप्रमाणेंच अघासुरानेंसुद्धां श्रीकृष्णाला स्वतःस अर्पण करून श्रीकृष्णापासून मुक्तिच जणु मागण्यासाठीं तो आला होता ! पतंगाला अग्नीपुढें स्वात्मदानाशिवाय किंवा अंधाराला सूर्यापुढें आत्मविलीनीकरणाशिवाय दुसरें गत्यंतरच नाहीं, तद्वत् अघासुराला सुद्धां श्रीकृष्णापुढें स्वात्मार्पणाशिवाय दुसरा उपाय नव्हता. अशा या परमेश्वर-स्वरूपीं स्वात्मार्पण करून अघासुर जणु त्याच्याकडून मुक्तीच मागण्यास आला होता ! तात्पर्य, श्रीकृष्णाच्या हातून तो मरणार हें निश्चित होतें असा भाव. कवीनें हेंच थोड्या काव्यात्मकतेनें मांडलें आहे. अघासुर श्रीकृष्णाच्या हातून मरण्यासाठींच जणु आला होता, व अशा रीतीनें देवाच्या हातून मरण आल्यावर त्याला मुक्ति ही ठेवलेलीच होती ! म्हणूनच जणु तो आला होता, हा कविसमय होय. **आपणपें**—आपणपें, स्वतःला, आपणाला.

**ओं. ९४**—"मग त्यांतले जे पराक्रमी गोपाळ होते, ते त्या अघासुराजवळ आले, व त्याचें सर्परूप पाहून, त्याबद्दल परस्परांत चर्चा करूं लागले. **आंगवणेचे**—पराक्रमी, सामर्थ्यशाली. पहा "–तेथ लागु दे अनंगाची आंगवणः भावकळना तें ॥ ४४७ ॥ नरेंद्र, रुक्मिणी स्वयंवर. **पातीनिले**—पातले, प्राप्त झाले, आले. **लागीनिलें**—लागले. ( यासाठीं ७० व्या ओंवींतील ' गाजीनिले ' यावरील टीप पहा. )

**ओं. ९५**—गोपाळांचें आपापसांतलें बोलणें येथें दिलें आहे. " अरे ! तुम्हीं हें काय तें ओळखलंत कां ? " तर त्यांतलें कांहीं जण यावर म्हणाले " आम्हीं अशी वस्तूच कधीं पाहिली नाहीं. आतां श्रीकृष्णाला विचारलं तरच खरं काय तें कळेल." **निरुतें**—खरें, **ठाकितें**—ठाकते. पटेल, प्रत्यक्ष होईल, पहा– " माझें ठाकावया चिद्रूप ! "–एकनाथ भागवत ११।२५७. गोपाळांची श्रीकृष्णावर सर्वच बाबतींत भिस्त होती, हें येथें दिसून येतें.

**ओं. ९६**—अघासुराचा आकार पाहून गोपाळ त्याच्याबद्दल निरनिराळे तर्क करतात. त्यांना तो प्रचंड सर्पाकृती अघासुर, पर्वताप्रमाणें वाटला व त्यांची दिशा-भूल झाल्याप्रमाणें झालें. **जैसेइ०**—ज्याप्रमाणें दिशाभूल झालेल्या माणसानें

पूर्वेला पश्चिम म्हणावें, तसें त्यांचें झालें. **दिग्मोहितु**—दिशामूढ झालेले, दिशाभूल झालेले. या ओंवीला समानार्थक पहा–" ऐसें विचारूनिच राजवाटे निजे, पहातां गिरिराज वाटे। मोठा धरी देह भुजंगमाचा जो नाशकर्ता स्थिर जंगमाचा ॥ ७ "–वामनपंडित, वनसुधा,–२. हें वर्णन भागवत दशमाच्या अध्याय १२।१६ च्या आधारें केलें आहे.

**ओं. ९७**—त्या अघासुराचे दांत म्हणजे घाट व टेकड्याच. **टेकुळिया**-टेकडिया, टेकड्या. **उजुवाट तेचि रसना**–त्याची जीभ म्हणजे एक सरळ लांब रस्ताच होता. **कपाट्ट तेंचि वदना**–त्याचें तोंड म्हणजे एक भलें मोठें दारच होतें. **कपाट**–दार, दरवाजा. **ययाचें**–ज्या अघासुराचें.

**ओं. ९८**—गोपाळ त्या अघासुराच्या तोंडांत कां पडले, याचें कविकल्पनेनें स्पष्टीकरण केलें आहे. श्रीकृष्णाला सोडून हे गोपाळ पुढें गेले, म्हणून ते भलत्या मार्गांत पडले, गोत्यांत आले. त्यांनीं त्याला सोडलें नसतें, तर राक्षसाच्या तोंडांत पडण्याची आपत्ति त्यांच्यावर कां ओढवली असती ? ईश्वराला सोडतात ते असेच आडमार्गाला लागतात असा भाव. **जैसें इ.**–" साधकजन ज्ञान मिळण्यापूर्वी जसे परमार्थाचा मार्ग चुकतात, तसेच हे गोपाळदेखील श्रीकृष्णाचें खरें ज्ञान अजून न झाल्यामुळें, त्याला सोडून अन्य मार्गाला लागले. **पथ**–परमार्थाचा, ब्रह्मज्ञानाचा मार्ग. **साउमे**–समोर. पहा–" तेथ साउमा घेआवा उवावो। तंव मांडला आनुप्रस्ता ॐ ॥ ज्ञाने. १६।६१.

**ओं. ९९**—" तो (अघासुर) पर्वतच आहे अशा समजुतीनें ते (गोपाळ) समोर गेले व त्याचा शब्द ऐकतांच ते त्याला साप म्हणूं लागले. याप्रमाणें त्यांना (गोपाळांना) त्याचें ( अघासुराचें ) खरें स्वरूप समजलें. " ज्याप्रमाणें आत्म्याचें अस्तित्व न मानणाऱ्या अज्ञानी लोकांना आत्मप्रतीति व्हावी, परब्रह्म साक्षात्कार होऊन त्यांना आत्मापरमात्म्यैक्य प्रतीत व्हावें, तसेंच गोपाळांनाही अघासुराचें खरें ज्ञान झालें." येथें दिलेल्या उपमा, बुद्ध्याच पंडित दामोदरानें तत्त्वज्ञानांतल्या दिलेल्या आहेत. त्यामुळें या तत्त्वज्ञानाचें ज्ञान वाचकांना सहज होतें. **अनात्मेआं**—अनात्म्यांना, आत्मा आहे असें न मानणाऱ्यांना, शरीरालाच आत्मा समजणाऱ्या अज्ञानी लोकांना. वास्तविक आत्मा हा शरीरापासून भिन्न असून तो अविनाशी आहे, हेंच खरें ज्ञान होय. हें ज्यांना नसतें ते अज्ञानी. अशा अज्ञान्यांना आत्म्याचें वरील स्वरूप

कळल्यावर जसें वाटेल, तसें त्या गोपाळांना अघासुराचें खरें स्वरूप कळून वाटलें. **आत्मप्रतीति**—आत्म्याचें अनुभवजन्य ज्ञान.

**ओं. १००**—ते गोपाळ अघासुराच्या खोट्या स्वरूपानें भुलल्यामुळें, त्याचें खरें स्वरूप त्यांना न कळल्यामुळें, अघासुराच्या तोंडांत पडले. खोट्या ज्ञानाच्या अनुसंधानानें ते वागले, म्हणून काळाला ते प्राप्त झाले. त्यांनीं जर अघासुराचें खरें ज्ञान करून घेतलें असतें, तर ते असे मृत्युमुखांत पडले नसते. ईश्वराचें खरें ज्ञान करून न घेतां जे त्याच्या खोट्या ज्ञानांतच गुरफटून राहतात, ते मृत्युमुखांत पडतात, त्यांना मोक्ष मिळत नाहीं. **जैसे इ०**—ज्याप्रमाणें लोक मायेच्या मोहानें संसाराच्या विहिरींत पडतात, त्याप्रमाणें ते गोपाळही श्रीकृष्णाबद्दलच्या अज्ञानानें अघासुररूपी काळाच्या तोंडांत पडले. **अन्यथा ज्ञानें**—शरीर हाच आत्मा, अशा खोट्या ज्ञानानें, किंवा श्रीकृष्ण हाच परमात्मा हें न कळणें हेंच विपरीत ज्ञान, त्यानें ते गोपाळ गुरफटल्यामुळें, ते काळाच्या स्वाधीन झाले. श्रीकृष्णाच्या खऱ्या स्वरूपावर जर त्यांचा विश्वास असता, तर अघासुराच्या तोंडांत जाण्याची पाळी त्यांच्यावर आली नसती. श्रीकृष्णापासून दुरावल्यामुळें हें असें झालें ! **काळा**—मृत्यूला. **वरिपडे जालें**—प्राप्त झालें, सांपडलें. पहा—“ म्हणौनि हा सांडिसील। तरि पापा वरपडा होसील ॥– ” ज्ञाने, २।२०१. “ आणिक नका करूं चेष्टा। व्हाल कष्टा वरपडे ॥ ”–तुकाराम अभंग. **संसारकूपीं**—संसाररूपीं अंधार विहिरींत, जन्ममरणाच्या अनंत फेऱ्यांत.

**ओं. १०१**—“ ज्याप्रमाणें एकामागून एक जाणारे जगांतले प्राकृत लोक परब्रह्माचे सुख किंवा मोक्षसुख जाणत नाहींत, किंवा ज्याप्रमाणें पाखांडी लोक ब्रह्मविद्येचें, वेदांत तत्त्वज्ञानाचें तोंड देखील पाहत नाहींत, तें पाहण्याची त्यांची पात्रताच नसते, ( त्यामाणें ते गोपाळ देखील त्या अघासुराच्या रूपानें भुलेले ) असा भाव. **पाखांडुमती**—वेदविरोधक, ईश्वरावर श्रद्धा न ठेवणारे, नास्तिक. **ब्रह्मविद्या**—परब्रह्माविषयींचें ज्ञान.

**ओं. १०२**—“ त्याप्रमाणें पुढें होते ते ( आघाडीचे ) गोपाळ भुलले, व मागें होते, ते त्यांच्या मागून त्यांचें पाहून ( त्या सापाच्या पोटांत ) शिरले. कांहींजण अघासुराची जीभ ही एक मळलेली वाटच आहे असें समजून, कांहीं एक पुढचा मागचा विचार न करतां, त्या वाटेनें चालले. ( त्याच्या जिभेवरून

पोटांत चालले. ) **भूलिले**—भ्रांत झाले, दिग्मूढ झाले. **मागील**-मागून येणारे. **देखोवेखीं**-आचरण प्रत्यक्ष पाहून. पहा—" तीएचेया देखोवेखीं तीएतें पुसपुसों शूद्रीही तैसीची वर्ते ।"—दृष्टांतपाठ. ८५. **रीगाले**—शिरले. **मैळलेनि**-मळलेल्या ( इंग्रजी-Beaten track ). **न विचारतां**-विचार न करतां.

**ओं. १०३**—" याप्रमाणें बहुतेक गोपाळ त्या सर्परूपी अघासुराच्या पोटांत शिरले, व तितक्यांत श्रीकृष्ण त्याच्या दृष्टीस पडला. नाहींतर त्यानें तितक्या सर्वांनाच मिठी मारून गडप केलें नसतें काय ?" श्रीकृष्ण त्याच्या दृष्टीस पडला म्हणून कांहीं गोपाळ तरी त्याच्या जबड्यांतून वांचले. श्रीकृष्णाला पाहिल्यावर अघासुराला आणखी गोपाळ गिळतां आले नाहींत, असा भाव. **अघवे**-अवघे, ब्रेच. **तेणें**-अघासुरानें. **सूदलासे**-घातला. दृष्टीचे टप्यांत आणला, अर्थात् पाहिला. **मीठीं देणें**-गिळणें. **तेतुलेआंसीं**-तितक्या सर्वांना.

**ओं. १०४**—**तेसनीची**—तेवढीच, तितकीच. **गोवळरुवें**—गोपाळ. **किडरुवें**—सापानें ( तृ ). त्या सापानें आपल्या एका कुशींतच सर्व वांसरें व गोपाळ सामावून टाकलीं. **सामावणें**—एकरूप होणें, ऐक्य पावणें. पहा—" स्त्रीशूद्रादि प्रतिभे सामाविलें ।'-ज्ञाने. १८।१६९९. **देखा**—पहा.

**ओं. १०५**—**तंव** वासरें व गोपाळ यांना गिळण्याचें काम होत आहे, इतक्यांत श्रीकृष्ण तेथें आला. **रुप देखौनि**—अघासुराचें हें सर्पाकृति प्रचंड शरीर पाहून, श्रीकृष्ण आश्चर्यचकित झाला. **गोपवच्छे इ०**—" हा अघासुर तर गोप व वासरें गिळून बसला, आतां काय करावें ? असा श्रीकृष्णाला विचार पडला.

**ओं. १०६**—यांत श्रीकृष्णाच्या मनांत आलेले विचार दिले आहेत. " या अघासुराला काठीनें मारावा, तर त्याच्या पोटांत गेलेल्या आपल्या गोपाळांचा व वासरांचाच संहार होणार ! " असा विचार करून तो सर्वेश्वर श्रीकृष्ण काय करता झाला, पुढें त्यानें काय केलें तें पहा. अघासुराच्या मरणानें त्याच्या पोटांत गेलेल्या गोप-वांसरांनाही मरण येणार, मग त्याला मारून कसें चालेल, असा मोठा सूज्ञ विचार श्रीकृष्णाला सुचला आहे. **तडवा**—पाल उभारण्यासाठीं वापरलेली दांडी. पहा—" मग गोसावीं एका तडवयाची दांडी काढीली : आणि तीएचि पाठि घेतली । " गोविंदप्रभुचरित्र-२१६. **करौ**—हातानें. **आपुलेआंचा**—आपल्यांचा, गोपाळ-वासरांचा.

**ओं. १०७**—श्रीकृष्णानें अघासुराच्या पोटांत गेलेल्या गोप-वासरांचें कसें रक्षण केलें तें येथें सांगितलें आहे. " मृत्युलोकांत अवतार घेऊन श्रीकृष्णानें जसे आपले उद्धवादि भक्तजन उद्धरले, तसेच येथें अघासुराच्या तोंडांत आपण शिरून त्यानें आपल्या गोपवासरांचें रक्षण केलें. भक्तांचें किंवा आपल्या लोकांचें रक्षण करण्यासाठीं अवतार घेणें किंवा परकायाप्रवेश करणें यासारखीं कृत्यें करण्याचें श्रीकृष्णाचें व्रतच होतें.

**ओं. १०८**—आपल्या भक्तांना संकटकाळीं श्रीकृष्ण कसा पावत आला आहे, त्याचीं उदाहरणें या ओंवीपासून ओं. ११० पर्यंत दिली आहे. हीं सर्व उदाहरणें पांडवांना अनुलक्षून दिलीं आहेत. पांडव हे महान् कृष्णभक्त असल्याचें प्रसिद्धच आहे. **उत्तरा** इ०—अभिमन्यूची पत्नी उत्तरा, इच्या पोटांतील गर्भाचा नाश अश्वत्थाम्यानें आपल्या ब्रह्मास्त्रानें केला. उत्तरेच्या विनंतीवरून श्रीकृष्णांनीं तो गर्भ पुनः जिवंत केला. तोच पुढें परिक्षिति म्हणून प्रसिद्ध झाला. **चक्रधर**—श्रीकृष्ण आपलें सुदर्शन चक्र घेऊन उत्तरेच्या हांकेला धांवला. चक्रधर हा महानुभावांचा संस्थापक आहेच, त्याचा व श्रीकृष्णाचा येथें या उल्लेखानें कवीनें अभेद सूचित केला आहे.

**ओं. १०९—जोहरीं**—अग्निप्रलयांत. पांडवांना लाक्षागृहाच्या अग्निप्रलयांतून श्रीकृष्णांनीं वांचविलें, त्या प्रसंगाला हें अनुलक्षून आहे. **कां कोपलेआं इ०**—पांडवांचें सत्त्व घेण्यासाठीं दुर्योधनाच्या सांगण्यावरून कोपिष्ट दुर्वास इच्छाभोजन मागूं लागले. पांडव वनवासांत असल्यामुळें, इच्छाभोजन घालणें त्यांना शक्य नव्हतें. अशावेळीं श्रीकृष्णानें येऊन दुर्वासऋषीला इच्छाभोजनानें तृप्त केलें व द्रौपदीची व पर्यायानें पांडवांची लाज राखली. या दोन संकटांतून श्रीकृष्णानें पांडवांना वांचविलें.

**ओं. ११०—जमलोकीं इ०**—द्वारकेंत एका ब्राह्मणाचे पुत्र जन्मतःच मरत असत. या गोष्टीचा दोष ब्राह्मणानें श्रीकृष्णावर लादल्यामुळें, श्रीकृष्णांनीं अर्जुनासह यमलोकावर हल्ला करून ब्राह्मणाचे सर्व मृतपुत्र परत आणले अशी महाभागवतांत कथा आहे. **जमलोकीं**—यमलोकावर. **धाडी घालणें**—स्वारी करणें, हल्ला चढविणें. पहा–" जयाचिये धाडिचा धाकु यमा । जो त्रिगर्त देशिचा सुश्रमा ॥–नरेंद्र, रुक्मिणीस्वयंवर–२१७. **अर्जुनेनसीं**—( सहार्थी तृतीया ) अर्जुनासह. **मृत्यापत्यें**—मृतापत्यें ( द्वि ). मृतपुत्र.

**ओं. १११**—तो पीडितांचा पक्षपाती श्रीकृष्ण ज्यावेळीं त्या अघासुररूपी महासर्पाच्या पोटांत शिरला, त्यावेळीं हें पाहून देव अकाशांत घाबरून गेले. आतां श्रीकृष्णाचें काय होणार अशी त्यांना भीति पडली. **गजबाजिलें**—घाबरून गेले, त्यांची धांदल उडाली.पहा–" गजबजली बाळा तेथे । येकीं आंगेसीं धरिंती माथे ।–नरेंद्र, रुक्मिणीस्वयंवर–३९०" तेणे महाघोषनिर्घातें । शेषकूर्म अवाचितें । गजबजोनि भारातें । सांडूं पांति ॥ ५४ ॥ ज्ञाने–१.

**ओं. ११२**—देवांना आतां यापुढें आपलें कसें होईल याची काळजी पडली. ते म्हणाले–" ज्याचा ( श्रीकृष्णाचा ) अवतार भूमीचा भार हलका करण्यासाठीं व दैत्यांचा संहार करण्यासाठीं आहे, ( तोच जर अघासुराच्या तोंडांत सांपडला ) तर आतां पुढें कसं होईल ? पृथ्वीवर पाप वाढलं कीं पृथ्वीला भार होतो व असुर तर अशीं पापें प्रत्यही करतात. म्हणून असुरांना मारून पापें होण्याचें बंद करणें व अशा रीतीनें पृथ्वीचा भार हलका करणें, यासाठीं श्रीकृष्णासारख्या ईश्वराचा अवतार होतो अशी कल्पना आहे. पहा– ' शेषाचा भार हलका करायला सरड्यानें धांवण्याचें कारण नाहीं–" तोतयाचें बंड—केळकर. **भणोति**—म्हणूं लागले. **ययाचा**—ज्याचा ( ज्या श्रीकृष्णाचा ). **फेडावया**—कमी करण्यास. पहा–" थोडी तेथ आणीक घालीतिः बहु तेथ फेडिति । बाइला म्हणति " राउळो । घातली आतां फेडीता कां ? "–गोविंदप्रभुचरित्र ११.

**ओं. ११३**—" अघासुराला देव सांपडला म्हणून त्याच्या मनाला आनंद वाटला. ( त्याला वाटलें शत्रूला आपण हस्तगत केला ). पण सृष्टीचा संहार ही ज्या श्रीकृष्णाची केवळ लीला, त्याचें सामर्थ्य तो राक्षस कसा जाणणार ? " सर्व सृष्टिसंहार करण्याचें ज्या श्रीकृष्णाचें सामर्थ्य, किंबहुना सृष्टिसंहार हा ज्याचा केवळ खेळ, हाताचा मळ, त्याला त्या राक्षसाचा वध करणें कितीसें अवघड होतें ? पण हें श्रीकृष्णाचें सामर्थ्य अघासुरानें जाणलें नव्हतें, म्हणून श्रीकृष्ण सांपडल्याचा त्याला आनंद झाला. **हर्खु**—हर्ष.

**ओं. ११४**—श्रीकृष्ण अघासुराच्या पोटांत शिरला, त्यावेळीं साहाजिकच त्याचें स्वरूप त्याच्या हृदयांत प्रवेशलेंच. आणि अशा रीतीनें श्रीकृष्ण परमात्म्याचें स्वरूप त्या अघासुराच्या हृदयांत प्रवेशल्यावर म्हणजे त्याला ब्रह्मसाक्षात्कार झाल्यावर, त्या अघासुराचें राक्षसत्व तात्बडतोब गेलेंच. **तेणे इ०**—त्या श्रीकृष्णाच्या सांनिध्यानें त्याच्या हृदयांत परब्रह्मस्वरूपाचा स्वच्छ प्रकाश पडला. **आत्म-**

**स्वरूप**—श्रीकृष्णाचें परब्रह्मस्वरूप. **निर्मळ जालें**—प्रकाशित झालें, स्पष्ट झालें. **संन्निधानें**—प्रत्यक्ष सहवासानें. महानुभाव तत्त्वज्ञानांत " दर्शन, अनुसरण, सेवा, संबंध, यातें संन्निधान बोलिजे–" पहा दृष्टांतपाठ ८४. अघासुराला श्रीकृष्णाचें असें संन्निधान प्राप्त झाल्यावर मग त्याचें राक्षसत्व कसें शिल्लक राहील ?

**ओं. ११५**—" अघासुराच्या हृदयांत जसजशी श्रीकृष्णाची मूर्ति ठसूं लागली, त्याच्या स्वरूपाचा साक्षात्कार त्याला जसजसा अधिकाधिक होऊं लागला, तसतशी त्याच्या मनरूपी पवनाची अर्थात् मनाच्या संकल्पाची गति कुंठित होऊं लागली." त्याचें मन निर्विकल्प होऊन तें श्रीकृष्णावर स्थिरावलें असा भावार्थ. मनांत अनेक संकल्प उठूं लागले, कीं तें वाऱ्यासारखें वाहूं लागतें. म्हणून मनावर पवनाचें रूपक केलें आहे. मन निर्विकल्प होणें म्हणजेच परब्रह्माच्या ठिकाणीं त्याचा लय लागणें होय. हीच खरी समाधि अवस्था होय. **इंद्रिया इ०**— " ब्रह्मवेत्यांची जशी इंद्रियनिवृत्ति होते, तशीच अघासुराचीही इंद्रियनिवृत्ति झाली. त्याचे सर्व इंद्रियव्यापार बंद पडले." ब्रह्मानंदीं टाळी लागल्यावर, त्याचा इंद्रियांवर ताबा राहिला नाहीं. सारांश श्रीकृष्ण अघासुराच्या शरीरांत शिरतांच त्याची निर्विकल्प समाधि लागली. त्याच्या आत्म्याचें परमात्म्याशीं ऐक्य झालें.

**ओं ११६**—अघासुराचा आत्मा याप्रमाणें परब्रह्माच्या ( श्रीकृष्णाच्या ) ठिकाणीं स्थिर झाला, तर इकडे श्रीकृष्ण परमात्माच मुळीं त्याच्या शरीरांतून बाहेर पडला. सारांश अघासुराचा अंत झाला. कारण त्याचा आत्मा श्रीकृष्णरूपी परमात्म्यांत लय पावला होताच, व आतां तो परमात्मा श्रीकृष्णच त्याच्या आत्म्यासह शरीरांतून बाहेर पडल्यावर, मग अघासुराचें अस्तित्व कसें राहणार ? अशा रीतीनें त्याचा अंत झाल्यावर मग श्रीकृष्णानें, त्या राक्षसानें गिळलेला आपला गोप-वासरांचा परिवार त्या राक्षसाच्या देहापासून वेगळा काढला, त्यांची दैत्याच्या पोटांतून सुटका केली.

**ओं. ११७-कर्मेंद्रिया**—पाय, हात, मलद्वार, मूत्रद्वार व जिव्हा हीं पांच कर्मेंद्रियें असून त्यांचा लय प्राणवायूंत होतो. प्राण गेला कीं याचा व्यापारही नष्ट होतो. म्हणून त्यांचा लय पवनाच्या प्राणवायूंत कल्पिला आहे. **पवनीं**—प्राणवायूंत. **ज्ञानेंद्रियां**—डोळे, कान, नाक, रसना व त्वचा, हीं पांच ज्ञानेंद्रियें, मनांत लय पावतात. मनाचा ताबा या इंद्रियांवर असल्यानें, त्याचें कर्तृत्व मनांतच समाप्त

होतें. पण या मनाचा व प्राणवायूचा लय शेवटीं निरंजन, निर्विकल्प अशा परब्रह्मांत होतो. अघासुराचा लय शेवटीं श्रीकृष्ण परमात्म्यांत झाल्यानें, त्याचें मन व प्राणवायु व त्यांच्यांत अनुक्रमें लय पावणारी त्याचीं कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें, श्रीकृष्णांतच विलीन झालीं. तो सर्वतोपरीं श्रीकृष्णांत विलीन झाला असा अर्थ.

**ओं. ११८**—" अघासुराच्या शरीरांतून त्याचा तेजःपुंज आत्मा निघून तो श्रीकृष्णरूपीं परमात्म्यांत विलिन झाला. याप्रमाणें तेथें आत्मापरमात्म्यैक्य झालें. ज्याप्रमाणें अनेक नद्या सागराला मिळाव्या त्याप्रमाणें हें आत्मा-परमात्म्याचें मीलन झालें." समानार्थक पहा—" यथा नदीनां बहवोंबुवेगाः। समुद्रमेवाभिमुखा द्रवंति ॥ तथा तवामी नरलोकवीराः। विशंति वक्त्राण्यभिविज्वलंति ॥ "—गीता ११।२८. अघासुराचा येणेप्रमाणें अंत झाला. ओं. ११४–११६ व ११८ यांना समनार्थक श्लोक पहा—" स्वभक्तांसि जो देव सर्वस्व दे हा। अघाच्या मुखीं वाढवीतो स्वदेहा, ॥ जसा वायु दाटे, तसें दुःख वाटे। निघे प्राण तो ब्रह्मरंध्रींच वाटे ॥ १ ॥ भुजंगांतुनी मूर्ति जेव्हां निघाली। अघज्योति तैं झेप येऊनि घाली। तयांतूनि बाहेर जो देव यावा। नभीं दाखवी तेज तो दिव्य यावा ॥ २ ॥ सवत्सें मुलें जीं मृतें त्यांस देवें। पहातांचि तीं ऊठती हो सदैवें। तयायुक्त बाहेर जेव्हां निघाला। हरी मुक्ति दे ज्योतिरूपा अघाला ॥ ३ ॥ "—वामनपंडित, वनसुधा–४.

**ओं. ११९.**—" श्रीकृष्ण अघासुराच्या शरीरांत शिरल्यावर त्यानें त्याला ( अघासुराला ) कांहीं एक विशेष वस्तु दिली असली पाहिजे, म्हणूनच त्याचें अतरंग आत्मज्ञानानें प्रकाशमान झालें. किंवा अद्भुत: चमत्कार करण्याचें तें त्याचें सामर्थ्य होतें, तें महंतच जाणोंत." **दिह्लें**—' दिह्ल ' हें ' दा ' पासून झालेल्या ' दिण्ण ' या पाली किंवा प्राकृत अव्ययाचें रूप आहे. यालाच ' लें ' हा प्रत्यय लागून ' दिह्लें ' असें रूप बनलें आहे. **विज्ञान**—अद्भुत चमत्कार करण्याची परमेश्वराची शक्ति. पहा—" वेधां बाहाळि जाली : विज्ञानें भलीं थोरावलीं ।–उद्धवगीता, ४७.

**ओं. १२०**—श्रीकृष्णाकडून अघासुराचा वध झालेला पाहून देवांना विस्मय व आनंद वाटला.

**ओं. १२१—सन्निधीं**—श्रीकृष्णानें आपल्या जवळचीं वासरें उद्धरलीं, तर ( अघासुर, पुतना यासारख्या ) कांहीं वैऱ्यांना देखील त्यानें मोक्ष दिला. **एके मुक्ती इ०**—अघासुरासारख्या राक्षसाला त्याच्या केवळ श्रीकृष्णाबद्दलच्या

वैरामुळें, त्याच्या हातून मरण येऊन मुक्ति मिळाली. भक्तांना मात्र श्रीकृष्णानें काय दिलें तें एक श्रीकृष्ण जाणें. **तृणचरें**—वासरें.

**ओं. १२२**—" श्रीकृष्णाच्या जवळ असणाऱ्या किड्यामुंग्यांना जें ज्ञान होतें, तेवढें सनकादिकांना ब्रह्मसुखानेंही मिळत नव्हतें. श्रीकृष्णाची संन्निधान भक्ति, अर्थात् निर्गुण परब्रह्माच्या चिंतनापेक्षां परमार्थदृष्ट्या अधिक फलप्रद होती, असा भाव. **जवळिकां**—जवळ असणाऱ्या, **अवदीप्ती**—तेज, प्रकाश, ज्ञान.

**ओं. १२३**—" उद्धवादि भक्तांचें केवळ जीवन असें श्रीकृष्णाचें दर्शन तेथील ज्या पशुपक्ष्यांना मिळतें, ते भाग्यवान् होत. श्रीकृष्णाचा दर्शनमहिमा वर्णन केला आहे. **तिर्यंचे**—पशुपक्ष्यादि. **भणे इ०**—मागें ओं. ६ प्रमाणेंच हा केशवराजाचा उल्लेख येथेंही पुनः आला आहे.

**ओं. १२४**—अघासुराचा वध करून व देवांचा जयजयकार स्वीकारून, श्रीकृष्ण आपल्या गोपाळांच्या परिवारासह आतां वृंदावनास येतात.

**ओं. १२५**—श्रीकृष्णानें हें वृंदावन मोठ्या प्रेमानं पाहिलं म्हणूनच तें श्रीमंत व पवित्र झालें. जेथल्या वृक्षांना उद्धवादि भक्तांनीं सुद्धां 'धन्य' असें म्हटलें. वृंदावनांतल्या वृक्षांना श्रीकृष्णाचें सान्निध्य व दर्शनसौख्य लाभत असल्यानें, उद्धवादि श्रीकृष्णाच्या भक्तांना ते वृक्ष धन्य वाटावे, यांत कांहीं नवल नाहीं.

**ओं. १२६**—" जें वृंदावन सर्वेश्वर अशा श्रीकृष्णाचें नित्याचें क्रीडास्थान आहे, तें ज्या प्रमाणांत पवित्र होतें, त्याप्रमाणांत त्याचा महिमा वर्णन करतां यावयाचा नाहीं."

**ओं. १२७**—ज्या झाडांनीं आपल्या विस्तारानें तापलेल्या प्राणिमात्रांना शांत केलें, व ज्यांना प्रत्यक्ष श्रीकृष्णच वाखाणतो, त्या झाडांचें जीवन सफल झालें होतें ( असेंच म्हटलें पाहिजे ). श्रीकृष्णाची स्तुति ज्यांना प्राप्त झाली त्याचें भाग्य काय वर्णावें ? **आपण दे३०**—प्रत्यक्ष श्रीकृष्ण. **वाणी**—वर्णी, वर्णन करतो. **नीववीलीं**—शांत केली. **शरीरुसंपत्ती ( तृ )**—आपल्या विस्तारानें, आपल्या छायेनें, व पुष्पफळांनीं.

**ओं. १२८**—" फलभारानें लवलेल्या झाडांची नम्रता पाहून मुनींना देखील' विस्मय, आश्चर्य वाटे. आपण वास्तविक झाडाइतके नम्र नाहीं, याबद्दल त्यांना मनांतून लाज वाटत होती. मग ते ( मुनीजन ) म्हणत, " हीं झाडें आपल्या

फलपुष्पांनीं श्रीकृष्णाच्या चरणकमलाची पूजा करतात," (म्हणून तीं इतकीं नम्र झालीं आहेत.) मुनीजनांनीं देखील नम्रता हा गुण वृंदावनांतील त्या झाडांपासून शिकावा, अशी तेथील झाडें होतीं असा भावार्थ.

**ओं. १२९**—श्रीकृष्णाच्या दर्शनानें, व त्याच्या स्पर्शानें त्या झाडांना कोणते गुण प्राप्त झाले ते सांगतात. "श्रीकृष्णाच्या दर्शनानें वृंदावनांतलीं झाडें नित्य फलसमृद्ध झालीं. त्याच्या स्पर्शानें त्या झाडांच्या ठिकाणीं अष्ट सात्विक भाव प्रकट झाले, व इंद्रनीलमण्यासारख्या अंगकांतीनें आकर्षित झाल्यामुळें, त्याच्या कांतीचा त्यांना सारखा वेध लागल्यामुळें, तीं झाडेंही मग तशींच निळीं दिसूं लागलीं." सारांश वृंदावनांत श्रीकृष्णाचें दर्शन व स्पर्शसुख मिळण्याचे प्रसंग रोज घडल्यामुळें, तेथील वृक्षांना एकाद्या साधकाप्रमाणें किंवा भक्ताप्रमाणें अष्ट सात्विक भाव प्राप्त झाले, व श्रीकृष्णाकडे त्यांचें सारखें ध्यान लागल्यामुळें, त्याच्या निळ्या कांतीसारखीच् निळी कांती त्यांना प्राप्त होऊन, जणु काय त्यांना सरूपता प्राप्त झाली! श्रीकृष्ण हें आपल्या 'वेधांचे' ज्ञान देणारे असल्यानें, दृक-स्पर्श-आलाप व अंतःकरण अशा क्रमानें त्यांनीं या वृक्षांना हें ज्ञानदान केलें होतें असा भाव.

**ओं. १३०**—"श्रीकृष्णाच्या या समागमसुखानें झालेल्या ब्रह्मानंदानें वृंदावनांतल्या झाडांचा फलरस व पुष्परस वाहून, व जमीन सुगंधित करून तो गळत असतां, जणु काय तो पाताळांतल्या अमृतांत भरच घालीत होता!" वृंदावनांतल्या झाडांचा हा फलरस व पुष्परस गळून तो पाताळापर्यंत जाण्याइतका विपुल होता, व तो इतका मधुर होता कीं, त्यानें पाताळांतल्या प्रत्यक्ष अमृताशीं मिळणी केली तरी वावगें वाटूं नये! माधुर्याच्या व अमरपण देण्याच्या बाबतींत अमृताशीं त्या फलपुष्परसाची अगदीं बरोबरी होती, कोणत्याही बाबतींत कमीपणा नव्हता असा भावार्थ. **श्रवतां**–स्रवतां, वाहत असतां. **साद्रव**–सपरिमळ, सुगंधित. पहा–"तैसें परमेश्वरसंनिधानीं पुरुपु साद्रउ ऐसा दीसे"–दार्ष्टांतिक–दृष्टांत पाठ २७. **पुड्‌रा**—पुरवठा, पुरवणी. तो फलपुष्परस पाताळांतल्या अमृतांत भरच घालीत होता!

**ओं. १३१—पापिअे**—पापी लोक. त्यांना वृंदावन पाहण्याचें भाग्य कोठलें? **तेथ इ०**—तेथें लोकांना फलपुष्पांची मोकळीक होती! कोणाला आडकाठी नव्हती. **मोकारा**—मोकळिया, मोकळीक. पहा–"आम्हां बांधिलिया मोकारा: कवण घाली :–" ऋद्धिपुरवर्णनें ६५.

**ओं. १३२**—" वृंदावनाची नीलकांति गगनांत प्रतिबिंबित झाली असतां, तेथील उमललेलीं पुष्पें आकाशांतील जणु तारांगणेंच होती ! " **गगंणींसे**—( गगनीं+असे ) गगनांत ( प्रतिबिंबित झालीं ) असतां. **सुमनसें**—पुष्पें. या ओंवींतील उपमा अत्यंत हृद्य असून, पुढील ओंवींतील कवीची उत्प्रेक्षाही बहारीची आहे. **उमटतां**—उमलत असतां, उठून दिसत असतां.

**ओं. १३३**—" किंवा दिवसा नक्षत्रें दिसत नाहींत हा कमीपणा घालविण्यासाठींच जणु काय, ( नक्षत्रांनीं आकाशाला वेढावें त्याप्रमाणें ) वनश्रीनें वृंदावनाला वेढून टाकलें होतें ! " तेथील फुलें ही नक्षत्राप्रमाणें तेजस्वी असल्यामुळें, व वृंदावनही आकाशाप्रमाणें निळें असल्यामुळें, नक्षत्रांचा दिवसा न प्रकट होण्याचा कमीपणा, तेथें नित्य विकासणाऱ्या वृंदावनपुष्पांनीं भरून काढला. अशी ही कविकल्पना आहे. **दी**—दिवस. **दोसें**—उद्देशानें, करितां, साठीं हें अव्यय ज्ञानेश्वरींतही अनेक वेळां येतें. पहा–" हें एकैक ऐसें । नाना परि भाषावसें । स्तोत्र करूनि तुज दोसें । मज सामर्थ्य असे ।।' ज्ञाने–१८।११ प्रस्तुत काव्यांतही हें अव्यय ओं. १६१ व ४०४ मध्यें पुनः आलेलें आहे.

**ओं. १३४**—येथून ओं. १३९ पर्यंत, वृंदावनांतील वृक्षांचें वर्णन दिलें आहे. झाडांची एक रांग, तिच्या आंत दुसरी, तिच्या आंत पुनः तिसरी अशी या वनाची एकंदरींत रचना आहे. " वनाच्या अगदीं कडेचे ( बाहेरचे ) विशाल आकाराचे साल, ताल, तमालादि वृक्ष, अगदीं जातीनें ( आपणहून ) तेथील सुवासाचे जणु रक्षणकर्तेच झाले होते ! " वृंदावनांतल्या पुष्पांचा सुवास बाहेर जाऊं नये, पांपी लोकांना मिळूं नये म्हणून हे विशाल वृक्ष अगदीं बाहेर उभा राहून त्या सुवासाचें रक्षणच जणुं करीत होते ! **राखणाइतु**—राखणायित–रक्षणयिता–रक्षणयितृ. राखण करणारे. **आंगें**—जातीनें, आपणहून. साल, ताल, व तमाल असे उंच वाढणारे वृक्ष, नाहीं तरी उद्यानाच्या बाहेरच्या कडेलाच लावतात, त्यावर ही संबंधोत्प्रेक्षा केली आहे.

**ओं. १३५**—" त्या वृक्षांच्या आंतली रांग, गगनाचें चुंबन घेणाऱ्या नारळींची, व उंचच उंच अशा डोलणाऱ्या खजुरी व पोफळींची होती. " **भीतरीली**—आंतली. **गगनचुंबित**—आकाशाला भिडणारी, उंचच उंच अशी. **उच्चां**–उंच. **खर्जुरी**-खजुरीचें झाड. **पोफळी**–सुपारीचें झाड. **आंदोळतांती**—झोंके घेतात. उंचपणानें हीं झाडें वाऱ्यानें डोलत, त्याचें हें मनोहर शब्दचित्र दिलें आहे.

**ओं. १३६**—त्याही (या नारळी पोफळींच्या) आंतल्या बाजूला, साखर-लिंबू व नारंगी (संत्री), मधुकाकड्या (वाळकें) व म्हाळुंग इ० झाडें होती. **मधुकाकड्या**—गोड वाळकांच्या जातीचीं झाडें. (पण वाळकांचा वेल असतो!) **मातुलंगी**—म्हाळुंगी. **फनसु**—फणस हें या फळामुळें गंभीरच दिसतात.

**ओं. १३७**—येथें द्राक्षांचे व डाळिंबांचें वर्णन आलें आहे. तेथील द्राक्षांचे मांडव इतके दाट होते कीं, त्यांतून रसाची वृष्टि जमिनीवर होत होती! पिकलेलीं लाली लाल डाळिंबें म्हणजे तर माणकांचें उघडलेलें भांडारच होतें! कवीची ही कल्पना अत्यंत संपन्न व हृद्य आहे. **वरिखतु**—वर्षतु वर्षत=गळत होती. **वपड**—वृष्टी. पहा–अमृताचेनि वडपें : श्रृंगाराचें दपनें सिंपें ॥–शिशुपालवध–३१९. **उघडिले**—फांकलेली डाळिंबें, एकाद्या जवाहिऱ्यानें माणकांचा बाजार उघडावा त्याप्रमाणें भासत होतीं! **मोप**—पेटी, भांडार.

**ओं. १३८**—यानंतर पुष्पवृक्ष येतात. **कवण गणी** इ. त्या चाफ्यांची गणना तरी कोण करणार! इतके ते असंख्य होते. **चंपक**—चांफा. पारिजातक व अशोकही तेथें लक्षावधी होते.

**ओं. १३९**—"यानंतर चंदनवृक्षांचा विस्तारही मोठाच असून, त्यांच्या आंत कल्पतरूंची दाट झाडी होती, व त्यांच्याच खालीं श्रीकृष्ण आपल्या सवंगड्यांशीं खेळत असे." **कल्पतरु**—हा इच्छिलेलें देणारा वृक्ष आहे. अशाच वृक्षाखालीं श्रीकृष्ण खेळणार! आपल्या मित्रांना इच्छिलेलें सर्व मिळावें अशा हेतूनेंच त्यानें ही निवड केली होती. **आवार**—कुंपण, तट, वेढा. पहा–"कीं गंधर्वनगरीचें आवार।"–ज्ञाने. ९।१७२. वरील वृक्षवर्णनाला समानार्थक असें वर्णन पहा–"झाडें पुष्पफळें करूनि सुफळें केळी बरीं पोफळें। नरेळें सजळें विचित्र उजळे ही रम्य सीताफळें॥ तैसीं ही प्रबळें स्वसंचितबळें जीं तुंबळें जांबळें। पुष्पें हीं विमळें अशोक बकुळें कुंदादिकांचीं कुळें॥–वामन पंडित, वनसुधा ४।८.

**ओं. १४०**—येथून १५३ ओंवीपर्यंत वृंदावनांतील सरोवरांचें वर्णन लागतें. **तेआंजवळीं**—या झाडांजवळच सरोवरें होतीं. **चंद्रमंडळाकारें**—चंद्राप्रमाणें वर्तुळाकृती व ज्याच्या पाण्याचा पृष्ठभाग चंद्रबिंबाप्रमाणें स्वच्छ होता अशीं. या सरोवरवर्णनासही समानार्थक पहा–"पाळीयुक्त तळीं असी न सुतळीं स्वर्गीं न वा भूतळीं। वायूतें विमळीं जळीं सकमळीं जी पाळिती शीतळीं॥

अंतर्बाह्य अली महाशतदळीं भृंगावळी सांवळी । बिंदू त्याच दळीं कसा डळमळी घे पैज मुक्ताफळीं ॥ ८ ॥ –वामनपंडित, वनसुधा, ४.

**ओं. १४१—सुधाजलभरितें**—अमृताप्रमाणें गोड असलेल्या पाण्यानें परिपूर्ण असलेलीं तीं सरोवरें. **दैवतें**—जेथें श्रीकृष्ण जलक्रीडा खेळत होता. अशा स्वरोवरांतील पाणी प्याल्यानें, तेथील प्राणिमात्र परस्परांतील वैरभाव विसरले होते. बाणाच्या कादंबरींतील जाबाली ऋषीच्या आश्रमवर्णानाची येथें आठवण होते. पहा–" अयमुत्सृज्य मातरमजातकेसरैः केसरिशिशुभि : सहोपजातपरिचय : प्रक्षरत्क्षीरधारमापिबति कुरंग-शावकः सिंहीस्तनम् । एष मृणालकलापाशंकिभिः शशिकरधवलं सटाभारमामीलितलोचनो बहुमन्यते द्विरदकलभैराकृष्यमाणं मृगपतिः । इदमिह कपिकुलमपगतचापलमुपनयाति मुनिकुमारेभ्यः स्नातेभ्यः फलानि । एते च निवारयंति मदांधा अपि गंडस्थलीभांजि मदजलपानानिश्चलानि मधुकरकुलजानि जातदयाः कर्णतालैः करिणः । "

पुनः कालिदासाच्या 'ऋतुसंहारांती'ल निदाघवर्णन असेंच तुलना करण्या-सारखें आहेः–" अवाङ्मुखो जिम्हगतिः श्वसन्मुहुः । फणी मयूरस्य तले निषीदाति ॥ १३ ॥ न हंत्यदूरेपि गजान्मृगेश्वरो । विलोलजिव्हश्चलिताग्रकेसरः ॥ १४ ॥ प्रवृद्धतृष्णोपहता जलर्थिनो न दंतिनः केसरिणोऽपि बिभ्यति ॥ १५ ॥ कलापिनः क्लांतशरीरचेतसः । न भोगिनं घ्नंति समीपवर्तिनं । कलापचक्रेषु निवेशिताननम् ॥ १६ ॥ उत्प्लुत्य भेकस्तृषितस्य भोगिनः । फणातपत्रस्य तले निषीदति ॥ १८ ॥ विषाग्निसूर्यातपतापितः फणी । न हंति मंडूककुलं तृषाकुलः ॥ २० ॥"

**उदकपाणें**—जलपानानें. वृंदावनांतील सरोवरांच्या पाण्याचा हा गुणच कीं, तें प्याल्यावर शत्रुत्व कोणांत टिकून राहायचेंच नाहीं. म्हणूनच परस्परांत जन्मजात वैरभाव असणारे पशु देखील त्या पाण्याच्या प्राशनानें अगदीं मित्राप्रमाणें वागतांना दिसत होते.

**ओं. १४२**—निर्वैर झालेले हे पशूच येथें दिले आहेत. **शार्दूल**—व्याघ्र, राक्षस, असेच याचे अर्थ देण्यांत आले आहेत. पण या ओंवींत वाघाचा निराळा निर्देश आहे. यावरून सिंह, वाघ याहून हा कोणी निराळा प्राणी असावा अशी कांहींची कल्पना आहे. **मृग**—हरिण, **चितळ**—चित्रमृग. यांस लहान शिंगें असून, पाठीवर पांढरे ठिपके असतात. **नीववीले**—शांत केले, संतुष्ट केले. **रोवंतातीं**—(रोमंथाति)–रंवथ करतात, बागुल करतात. पशूंचें चर्वित-चर्वण प्रसिद्ध आहे.

**ओं. १४३-कनककमल**—सुवर्णकमल. तेथील सरोवरांत सुवर्णकमलें विकसत होतीं. **झांका**—समूह. पहा-" तेथ राजहंसाचिया झाका । ते संख-भेरी आढाऊं आईका ।-नरेंद्र, रुक्मिणीस्वयंवर- ७४७. त्या सुवर्ण-कमलावर भ्रमरांचे समूह, थवे येऊन पडत होते. **अमृतकुंदांचे**—" अमृतकंदांचे " असें असावे. अमृतासारख्या गोड अशा तेथील कमलकंदाचा ( कमलांच्या गड्डयांचा ) चारा राजहंस परस्परांत वाटीत होते. कमलकंद हा राजहंसांचा चारा हें प्रसिद्धच आहे.

**ओं. १४४—स्फुटिका**-वृंदावनांतील सरोवराच्या काठीं स्फटिक मण्याच्या शिला बसण्यासाठीं कल्पिल्या होत्या. **गौरी** इ.—अशा या स्फटिकांच्या शिला-तलावर त्या सरोवरांच्या काठीं गंधर्वकन्यका " आपणास श्रीकृष्ण पति मिळावा " या इच्छित संकल्पानें गौरीची पूजा करीत होत्या, गौरीजवळ तसा वरच मागत होत्या. श्रीकृष्णाच्या मनोहर रूपानें व पराक्रमानें त्या मोहित झालेल्या असल्यानें, तोच पति मिळावा म्हणून त्या गंधर्वकन्या गौरीची पूजा करीत होत्या. आपल्या-कडे विवाहविधींत 'गौरीहर' पूजण्याची चाल सर्वांच्या परिचयाची आहे. **होवावा**—व्हावा, असावा.

**ओं. १४५**—इकडे विद्याधरकन्या गौरीची पूजा करण्यांत गुंतल्या होत्या, तर दुसरीकडे त्या सरोवरांच्या इंद्रनीलमण्याच्या पायऱ्यांवर पद्मासन घालून योगी लोक, श्रीकृष्णाचें चिंतन करण्यांत निमग्न झाले होते. **इंद्रनीळाच्या सोवाणी**—इंद्रनीळमण्याच्या सोपानावर. ही सरोवराची संपन्नता सांगितली आहे. मेघदूतांतील यक्षाची वापी अशीच, " वापीचास्मिन्मरकतशिलाबद्धसोपानमार्गा । " आहे. हा उदात्तालंकार होतो. **पद्मासनीं**—पद्मासन घालून. पद्मासन हें योग-मार्गांतील एक आसन आहे. उजवा पाय डावे मांडीवर व डावा पाय उजवे मांडीवर व उजवे गुडघ्यावर उजवा, व डावे गुडघ्यावर डावा हात ताठ ठेवून, मान व पाठ सरळ ताठ करून बसणें. अशा आसनांत योग्यांचें श्रीकृष्णचिंतन एकाग्रतेनें तेथें चालू होतें.

**ओं. १४६**—या ओंवीपासून पुढील ७ ओंव्यांत वृंदावनाच्या सरोवरावरील मुनिजनांचें तपश्चर्यावर्णन दिलें आहे. " कांहीं मुनिजन श्रीकृष्णाच्या ध्यानांतच निमग्न होते, तर कांहीं ब्रह्मानंदांत निमग्न झाल्यामुळें, आपणाला विसरून गेले होते. कांहीं मुनी पुनः लाकडासारखे ताठ होऊन परमत्त्वामध्यें ( श्रीकृष्णरूपी

परब्रह्मामध्यें ) लय पावले होते." ते उन्मनी अवस्थेंत होते असा भाव. **काष्ठीभूत**—लाकडासारखे, लाकूडच झालेले, 'अभूततद्भावे च्विः "–पाणिनी.

**ओं. १४७**—"ते मुनीजन परस्परांना 'श्रीकृष्ण हाच मोक्षदाता, हाच सर्व भक्तांचें आश्रयस्थान ' असे सांगत होते." हे भक्तीमार्गी दिसतात. **निरोपिती** सांगती. याला समानार्थक पहा–"कथयंतश्च मां नित्यं तुष्यंतिच रमंतिच।"– भगवद्गीता. **परमगती**–श्रेष्ठ प्रकारचें आश्रयस्थान.

**ओं. १४८**—"कांहीं मुनिजन आत्मा व परमात्मा यांचें ऐक्य अनुभवीत होते, तर दुसरे कांहींजण परमेश्वर हा सेव्य व भक्त हा सेवक या भावानें उपासना करीत होते." पहिले अद्वैतमार्गी होते तर दुसरे द्वैतमार्गी होते. अशा रीतीनें तेथें परमेश्वराची उपासना भिन्न भिन्न मार्गांनीं चालली होती असा भावार्थ. "ब्रह्म–सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः" हा शंकराचार्यांचा अद्वैतवाद, तर भगवंत व. भक्त यांमध्यें सेव्य–सेवक भाव आहे, ते कदापि एक होणार नाहींत हा मध्वाचार्यांचा द्वैतवाद होय. मध्वाचार्य महानुभाव पंथापूर्वीं अगदीं थोडीच वर्षें होऊन गेले होते. **एकुभेदाभेदविवर्जितु**—ज्यांच्या बुद्धींतील वस्तुवस्तुतील भेद अथवा अभेद ही भावनाच नष्ट होऊन जे निरुपाधिक अशा परब्रह्माच्या ठिकाणीं राहिले आहेत. **निरालंबीं**—निराश्रय अशा परब्रह्माच्या ठिकाणीं. पहा—"जिहीं सकळभूतांचियां हितीं। निरालंबीं अव्यक्तीं। पसरलिया आसक्ती! भक्तीवीण" ॥–ज्ञाने. १२।६०.

**ओं. १४९**—"कांहीं जण इडा, सुषुम्ना व पिंगला यांपैकीं मध्यमा जी सुषुम्ना नाडी ( शक्ति ), तिचा आधार घेऊन व पुरुषार्थचक्र, विशुद्धचक्र व अग्निचक्र या तीन चक्रावर ( वज्रांवर ) आघात करून, शरीरांतील अग्नीमध्यें फुकट जाणाऱ्या अमृताच्या उपयोगानें आपलें शरीर अमर करीत होते." या व पुढील दोन ओंव्यांत, हटयोगांतर्गत आत्मा ब्रह्मांडी नेण्याची प्रक्रिया सांगितली आहे. सुषुम्नेनें षट्चक्रभेदन करून ब्रह्मरंध्रांतील चित्कलेच्या आस्वादानें अमर होण्याची हीं योग्यांची सर्व खटपट आहे.

**ओं. १५०**—"कांहीं जण सुषुम्नेवर जोर देऊन व आधारचक्र, मूलचक्र व नाभिचक्र या तीन पीठांना ओलांडून व अग्निचक्राच्या द्वारानें ( पूर्णगिरि ) जाऊन ब्रह्मरंध्रामध्यें असणाऱ्या चित्कलेचा आस्वाद घेत होते." **मध्यमा**— सुषुम्ना नाडी अथवा शक्ती. **उद्घाटें**—वर चढविण्यानें. **तिन्हीं पीठें**—सहा

चक्रापैकीं, आधारचक्र, मूलचक्र व नाभिचक्र या तीन चक्रांना किंवा पीठांना ओलांडून, या चक्रांतून सुषुम्नेला वर चढवून, पूर्णगिरीच्या घाटानें म्हणजे अग्निचक्राच्या द्वारानें, वर ब्रह्मरंध्रांत असणारा मकरंद अथवा चित्कलास्वाद घेतात.

**ओं. १५१**—" कांहीं जण नाभिचक्र, मूलचक्र, आधारचक्र, अग्निचक्र, विशुद्धशक्र व पुरुषार्थचक्र या शरीरांतील सहा चक्रांच्या सरळमार्गानें जाऊन, प्राणायामानें, पुरुषार्थचक्र, विशुद्धचक्र व अग्निचक्र हीं मेरूचीं तीन शिखरें ओलांडून, आत्मा ब्रह्मांडीं नेत होते."

वरील वर्णन पांतजल किंवा हटयोगाचें आहे. प्राणायामानें चित्त एकाग्र करून आत्मा ब्रह्मांडीं नेण्याचे, हे निरनिराळे अवघड अथवा थोडे त्याहून सरळ असे प्रकार सांगितले आहेत. सर्वांचें उद्दिष्ट चित्कलेचें आस्वादन हेंच होय. अशा प्रकारचें वर्णन ज्ञानेश्वरींत सहाव्या अध्यायांत विस्तारानें आलें आहे. पहा—" इडा पिंगळा एक वाटती । गाठीं तिन्हीं सुटती । साही पदर फुटती । चक्राचे हे ॥ " ६।४४. गोरक्षगीतेंतही असें हटयोगाचें वर्णन आलें आहे. **मेरुशिखर**—वर वर्णन केलेल्या षट्चक्रांच्याही वर मेंदूच्या वरती अधर असें 'सहस्रदळकमळ' नांवाचें सातवें चक्र आहे. त्यासच मेरु ( अथवा त्रिकुट ) शिखर म्हणतात. ब्रह्मरंध्र हें मस्तकाचें छिद्र जेथें पाठीच्या कण्याच्या वरच्या अंगास टेकल्यासारखें होतें, तें.

**ओं. १५२**—कांहीं साधक जन 'सोऽहं' किंवा 'तत्त्वमसि' इत्यादि वाक्यांची प्रतीति होऊन राहिलेले होते, तर कांहींना परब्रह्माच्या सहजानंदाचा बोध झालेला होता, तर आणखी कांहीं उन्मनी अवस्थेला प्राप्त झाले होते. **उन्मनी अवस्था**—जागृति, स्वप्न, सुषुप्ति आणि तुरीया याहून पलीकडली जी पांचवी अवस्था ती. या अवस्थेंत वृत्ति मायेच्या उपाधीपासून मुक्त होऊन, ब्रह्माच्या ठिकाणीं लीन होते. पहा-' कल्पनेची लहरी नाहीं । मन निमग्न चैतन्यडोहीं । स्वरूपावांचूनी नाठवे कांहीं । तेचि उन्मनी ॥ '-निगमसार ८।२६.

**ओं. १५३**—ही मुनिमंडित सरोवरें पाहून श्रीकृष्ण आपल्या हातानें सुदाम्याचा हात धरून पुढें निघाले. यापुढें ओं. १५४–१६१ यांत वृंदावनांतील फुलझाडांचें वर्णन आलें आहे. **श्रीकरें**—आपल्या हातानें. श्रीकृष्णाचा हात तो श्रीकरच.

**ओं. १५४**—"प्रेयसीनीं आपल्या प्रियकरांना आलिंगावें, त्याप्रमाणें कल्पलता मंदारवृक्षांवर वळघल्या होत्या." मंदार व कल्पलता यांना दिलेली उपमा अत्यंत अनुरूप आहे. श्रीकृष्णाच्या भेटीसाठीं असंख्य फलांनीं वृक्षांना नुसता बहर आला होता. **उ॰तवरा**—उत्कर्ष, भर, हाच शब्द ओं. १६३ मध्यें पुनः येतो.

**ओं. १५५**—"कांही वृक्षांना रसभरित फळें होतीं, तर कांहीं सुवासिक फुलांनीं फुलले होते. कांहींचीं कंदमुळें व पानें अमृताची (अमृतासारखी गोड) होतीं. त्यांचीं नावें कांहीं ठाऊक नाहींत, इतकीं तीं पुष्कळ होतीं." सारांश वृंदावनाच्या त्या भागांत फळझाडें, फुलझाडें, मुख्यतः असून इतरहि अनेक झाडें होतीं.

**ओं. १५६**—पुष्पवृक्ष सांगितले आहेत. **योजनसुगंध**—ज्यांचा सुवास एक योजनभर पसरलेला होता असे. **पाडळ**— पाटलवृक्ष. **अळिकुळामंद**—भ्रमरांनीं चावलेलें (सेविलेलें) असे. अमंद = violently bit. पहा—अमंददष्टौष्ट करावधूननम्-किरातार्जुनीयम् ८।६. **सोनकेतकी**—सुवर्णकेतकी, सोनकेवडे. पहा—"सुवर्णकेतकीपरि जो दिसतो, रंग नव्हे तो दुसरीचा—" सौभद्र-किर्लोस्कर.

**ओं. १५७**—**कुंकुम केशरां**—कुंकुम (तांबडे लाल) असे केसरवृक्ष, त्यांच्याजवळ कर्पूरकर्दळीच्या रांगा होत्या. **कर्पूर कर्दळी**—ज्यांच्या बुंध्यांतून कापूर निघतो अशा केळी. अशा सुवासिक वृक्षराजींत श्रीकृष्ण क्षणभर उभा राहिला.

**ओं. १५८**—"ज्या वृंदावनांत आपोआप उगवलेल्या वनपुष्पांच्या जाती अशा अमोघ सुगंधानें बहरून गेल्या होत्या, तेथें मुद्दाम लावलेल्या मालती (किती बहरून गेल्या असतील) तें काय वर्णन करावें!" वन्यपुष्पांचा सुवास जर तेथें इतका दरवळला होता, तर मुद्दाम ज्यांची लावणी केली आहे, अशा मालतीच्या पुष्पांचा सुगंध तेथें केवढा दरवळला असेल! "दूरीकृताः खलु गुणैरुद्यानलता वनलताभिः—" हें कालिदासाच्या शाकुंतलांतील वचन येथें आठवतें. **उघाती**—(उधाणें) उत्कर्ष पावती, बहरती, दरवळती. **लावनीचिआं**—लागवड केलेल्या, पेरणीच्या. पहा—"वोळी धरी चंद्द पवनु चतुरू : शृंघारू लावणी करी"—नरेंद्र-रुक्मिणीस्वयंवर-७७९. "जो खांडावेया धा॰ घाली। कां लावणी जेणें केली"—ज्ञाने, १२।१९८.

**ओं. १५९**—"तेथील सर्व पुष्पजाती रत्नखचित हौदाजवळ तिन्ही त्रिकाळ फुलून आपल्या सुवासानें विविध प्रकारें भरून राहिल्या होत्या." तीं विविध प्रकारचीं फुलझाडें, आपला सुवास सतत पसरीत होतीं. **खेडकुळिआं**—

उद्यानांतील पाण्याचे लहान हौद. **रत्नबद्धा**—रत्नांनीं बांधलेलें ( दगडांनीं नव्हे ). **बाहाकाति**—पहा टीपा-ओ. ७७. **आणुआणीं**—भिन्नभिन्न ( ' परिमळीं ' याचें विशेषण ).

**ओं. १६०**—" ज्या पुष्पजाती कैलासांतल्या उमावनांत व इंद्राच्या अमरावतींतील नंदनवनांत होत्या, त्या सर्व द्वीपांतल्या ( आणलेल्या ) पुष्पजाती श्रीकृष्णाच्या वृंदावनांत होत्या." सारांश सर्व द्वीपांतलीं फुलझाडें तेथें संग्रहित केली होती. **उमावन**—शंकराचें कैलासांतील उद्यान. **नंदनवन**—इंद्राचें त्याच्या अमरावतींतील उद्यान.

**ओं. १६१**—" जेथें ( ज्या वृंदावनांत ) मकरंद चाखण्याचें कारण पुढें करून पण वास्तविक श्रीकृष्णाचें दर्शन घेण्याच्या उद्देशानें मुनिजन अत्यंत प्रेमानें भृंग होऊन राहिले आहेत." वृंदावनांत श्रीकृष्ण नित्य येतात, तर आपणास त्यांचें दर्शनसौख्य जवळून अनुभवावयास मिळावें, म्हणून मुनिजन जणुं भ्रमर झाले आहेत. भ्रमरावर ही कवीनें केलेली उत्प्रेक्षा हृद्य आहे. **सानुरागें**—प्रेमानें, भक्तीनें. **सुमनसें**-शुद्ध मनानें. **मकरंदआस्वादनमिषें**-मकरंद-मध-चाखण्याच्या निमित्तानें. ( हें निमित्त पुढें करून ). **श्रीकृष्ण पावावेआ दोषें**-श्रीकृष्ण मिळविण्याच्या उद्देशानें. **दोषें**-उद्देशानें, साठीं ( अव्यय ) पहा—ओंवी १३२ व तिच्यावरील टीपा. **षट्पद**-भृंग. यांना सहा पाय असतात.

**ओं. १६२**—ज्या ठिकाणीं ( ज्या वृंदावनांत ) श्रीकृष्ण क्रीडा करील व मग आपणांस त्याच्या दर्शनाचें भाग्य लाभेल, यासाठीं मलयमारुत व मदन हे आपल्या सर्व परिवारासह तेथें येऊनच राहिले होते ( जणु ). वृंदावनांत नेहमींच मलय पर्वतावरचा वारा वाहात असून, वसंत ऋतूंत होणारा मदनसंचारही तेथें झाला होता. शृंगाररसाला अत्यंत अनुकूल असें तेथें वातावरण होतें असा भाव. **मलयानीळ**—मलय पर्वतावर चंदनाची झाडी असल्यामुळें, वसंत ऋतूंत त्या पर्वतावरून येणारा वारा चंदनसुगंधित असतो. वृंदावनांत असा वारा श्रीकृष्णासाठीं नेहमींच वाहात होता. शिवाय श्रीकृष्णाचें रूप तर इतकें नयनमनोहर कीं, प्रत्यक्ष मदनाला त्याचा लाभ घेण्यासाठीं वृंदावनांत मुक्काम ठोकावासा वाटला. **अनंगु**- ज्याला अंग नाहीं,असा मदन. **रूपसौभाग्यालागीं**-श्रीकृष्णाच्या स्वरूपाचें भाग्य लाभण्यासाठीं.

**ओं. १६३**—वृंदावनांत कसें काव्यमय वातावरण होतें, त्याचें हें वर्णन या व पुढील ओंवींत आणखी केलें आहे. " मधु पिऊन मत्त झालेल्या भृंगांचा

तेथील गुंजारव हा मुरलीच्या आलापाप्रमाणें असून, तेथील पक्षीही पंचमालापांनीं आपल्या प्रियकरांना बोलावीत होते. भुंग्यांचा सतत चाललेला वृंदावनांतील गुंजारव हा मुरलीरवाप्रमाणें वाटत होता, तर पक्ष्यांचें कूजन आलापयुक्त गायनाप्रमाणें भासत होतें. सारांश तेथें गायनवादनाचा प्रकार साहजिकच होता. ऽन्तवरू—मागें पहा टीपा, १५४. ओं. **मकरंदमत्त**—पहा–"मधुमत्त मधुकर भ्रमती गुंजारव किति तरी करिती"–देवल, शापसंभ्रम. **द्विजवरू**—पक्षी (विशेषतः कोकिळ). **पंचमालापीं**—गायनांतील जे षड्ज, ऋषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत, व निषाद असे सप्त स्वर आहेत, त्यांत पंचम हा कोकिळांच्या कंठांत असतो. तेथील पक्षी आपल्या प्रियकर–प्रेयसीशीं पंचमालापांत बोलत, यावरूनच तेथील रम्य वातावरणाची कल्पना येते.

**ओं. १६४**—श्रीकृष्ण मेघासारखा श्यामल होता, म्हणून त्याला पाहून मोर आनंदानें नाचत होते. वर्षाकालीं मेघांना पाहून मोर नाचतात हें प्रसिद्ध आहे. पहा–"वनीं देखतीं मेघनीळास मोर। प्रमोदें करी नृत्यलीला समोर"–वामनपंडित, वनसुधा. **शुकसारिका**—ज्या वृंदावनांतील राघू व मैना परस्परांत वेदांताच्या सिद्धांतांची चर्चा करीत होते. वास्तविक तेथें वेदांताची चर्चा कांहीं पंडितांत चाले, ती ऐकूनच ते पोपट व मैनाही तशी चर्चा करीत. सारांश तेथील वातावरण काव्यगायनानें जसें लालित्यपूर्ण होतें, तसेंच ते वेदांतचर्चेनें पांडित्यपूर्णही होतें असा भाव. **शुक**—पोपट. **सारिका**—मैना. **सवादेति**—संवादेति, चर्चा करीत होते. **वेदांतसिद्धांत**—"ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः" असा एकादा सिद्धांत.

**ओं. १६५—वेधें**—आकर्षणानें. देवांगना श्रीकृष्णाच्या आकर्षणानें तेथें येऊन आलापयुक्त गायन करीत होत्या, किंवा पर्वत शिखरावर बसून श्रीकृष्णाचें गुणगान करीत होत्या. **आडी**—आलापयुक्त गायन, किंवा पर्वत शिखरावर. **देवांगणा**— देवांगणा, देवपत्नी.

**ओं. १६६**—ज्या वृंदावनांत साही ऋतूंचे अधिपती आपापल्या ऋतूंसह वसति करून होते. सारांश साही ऋतूंचा एकत्र अनुभव व आस्वाद वृंदावनांत व्यावयास सांपडे. **यक्ष यक्षिणी**—यक्ष, गंधर्व, किन्नर हे सर्व स्वर्गांत राहतात. यांना यौवनाशिवाय दुसरें वय नसतें, व अमृताशिवाय दुसरें पेय नसतें.

**ओं. १६७**—म्हणजे इतकें वर्णन करून पुनः "आपणाला वृंदावनाचें वर्णन करतां येत नाहीं" असें म्हणायला कवि पुनः तयारच! पुढें ओं. १६८ पासून

आतां श्रीकृष्ण यमुना नदी पहावयास निघाले आहेत. म्हणून तेथून ओं. १९८ पर्यंत, यमुनेचें वर्णन लागतें. **जमुना**—यमुना.

**ओं. १६८**—यमुनेच्या काळया पाण्यावर कवि येथें संबंधातिशयोक्ति करतो. "मूळचें यमुनेचे पाणी निर्मळ पांढरेंच होतें. पण श्रीकृष्णाची सांवळी कांति तिच्यांत प्रतिबिंबित झाल्यामुळें, ती नदी यानंतर जी निळी झाली ती कायमचीच झाली ! श्रीकृष्णाच्या अंगचा गुण तिनें घेतला ! **होऔनि ठेली**—होऊन राहिली.

**ओं. १६९**—"ज्या श्रीकृष्णाच्या सांनिध्यांत जडवस्तूंनाही त्याचेंच रूप प्राप्त व्हावें, त्यालाच जर भक्तिभावानें शरण गेल्यास जी सायुज्यता मिळेल ती काय वर्णन करावी ?" **अ्ळगतां**—आश्रय करतां, शरण जातां. **सायुज्यता**—सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता असे भक्तीचे चार प्रकार आहेत. सायुज्यता म्हणजे परमेश्वर स्वरूपी मिळून जाणें. सरूपता म्हणजे परमेश्वर स्वरूप पावणें. येथें श्रीकृष्णाचें सान्निध्य लाभल्यामुळें, यमुनेसारख्या जड वस्तूलाही सरूपता प्राप्त झाली. कारण तीही श्रीकृष्णासारखी कृष्णवर्ण झाली.

**ओं. १७०**—यमुनेच्या भोंवऱ्यावर ही कवीनें उत्प्रेक्षा केली आहे. "श्रीकृष्णाला पाहून यमुनेला जो विस्मय व आनंद वाटला, व त्यायोगानें तिच्या शरीरावर जे रोमांच आले, तेच जणुं हे भोवरे होत." विस्मय व आनंद वाटला म्हणजे अंगावर ( रोमांच ) कांटे उभे राहातात. यमुनेचे हे कांटे भोंवऱ्यांच्या रूपानें व्यक्त झाले आहेत. **संभ्रमीतु**—भोंवऱ्यांनीं युक्त. ( विस्मयांकित ). **तरंगिणी**—नदी ( यमुना ). **कीं**—जणु काय. या वाचक शब्दानेंच येथे उत्प्रेक्षा होते. **दाटले**—भरले, गर्दी केली. पहा—"कीं दाटत कस्तुरीयेचे मेघ माजिरे । कीं पिल्लीं पसरिलीं गगन-सागौरें ।—" नरेंद्र, रुक्मिणीस्वयंवर ४७२.

**ओं. १७१**—कवि येथें यमुनेच्या लाटांवर उत्प्रेक्षा करतो. जणु काय श्रीकृष्णाला आलिंगन देण्यासाठींच आपले अनेक हात तिनें पुढें केले आहेत, असे कालिंदीचे ते तरंग ( लाटा ) मला भासले." यमुनेच्या लाटा म्हणजे तिचे श्रीकृष्णाला आलिंगन देण्यासाटीं पुढें केलेले हातच जणु, अशी हीं कवीनें कल्पना मांडली आहे. तरंगांना हस्ताची दिलेली उपमा संस्कृत काव्यांत आढळते. रघुवंश १३।६३ मध्यें "तरंगहस्त" असें रूपक आलें आहे. **भुजा**—हात. **पढियासलें**—भासलें. पहा—ब्रह्माचि अवीद्यावशें ॥ जिवरूपें पढियासें—उद्धवगीता, ५५९. **कालींदिअेचे**—यमुनेचे.

**ओं. १७२**—यमुनेच्या संथ प्रशांत प्रवाहावर, ही रूपकोत्प्रेक्षा केली आहे. "श्रीकृष्णाच्या आकर्षणानें तिचें देहभान हरपल्यामुळें, ती अशी ब्रह्मानंद-सागराला मिळाल्याप्रमाणें निश्चल झाली." नद्या सागराला मिळाल्या, कीं त्या निश्चल होतात, कारण तेथें त्यांची गति थांबते. येथें यमुना श्रीकृष्णरूपी परब्रह्माच्या आनंदसागराला मिळाल्यामुळेंच जणु अशी प्रशांत झाली असावी, अशी कविकल्पना. सारांश श्रीकृष्णस्वरूपीं ब्रह्मानंदांत निमग्न झाल्यामुळेंच ती अशी संथ व निश्चल झाली !

**ओं. १७३**—"किंवा ही कालिंदी (यमुना) नसून मंदाकिनी (गंगा) आहे. कारण श्रीकृष्णाच्या (विष्णूच्या) पायापासून जन्म झाल्यापासून गंगा श्रीकृष्णाला भेटायला उतावीळ झाली होती, म्हणून ही आतां त्याला भेटायला आलेली गंगाच आहे, यमुना नव्हे." येथें अपह्नुति अलंकार साधला आहे. (प्रकृतं प्रतिषिध्य अन्यत्स्थापनम्). **जन्मैली**—गंगा विष्णूच्या पायापासून उगम पावल्याचें प्रसिद्ध आहे. म्हणून तिला विष्णुपादोदक म्हणतात. जन्मल्यापासून तिची भेट श्रीकृष्णाशीं झाली नव्हती, म्हणून ती त्याच्या भेटीबद्दल उतावीळ झाली. **ते**—मंदाकिनी. स्वर्गातल्या गंगेला मंदाकिनी म्हणतात. **भणौनि इ०**—अशी ही श्रीकृष्णाला भेटायला आलेली स्वर्गंगा आहे, कालिंदी नव्हे. येथें कालिंदीचा निषेध करून मंयाकिनीची स्थापना केली आहे. **फुण**—पुनः **मणीं**—मनीं.

**ओं. १७४**—कवि यमुनेवर आणखी उत्प्रेक्षा करतो. "किंवा श्रीकृष्णाच्या संगतीनें, आपली झालेली अधोगति थांबावी, म्हणून ही पाताळाची भोगावतीच जणु (श्रीष्णाला) भेटायला वर आली !" स्वर्गांत गंगेला मंदाकिनी, पृथ्वीवर भागीरथी व पाताळांत भोगावती अशीं नांवें आहेत. स्वर्गापासून पाताळापर्यंत अशी गंगेची अधोगति (खालीं येणें किंवा अधःपात) चालली असून, ती एकदा श्रीकृष्णाच्या सांनिध्यानें कायमची थांबवावी, यासाठींच पाताळीची गंगा (भोगावती) गोकुळांत श्रीकृष्णाला भेटायला आली आहे. तात्पर्य, ही यमुना नसून, जणु काय पाताळगंगाच होय. **अधोगती**—खालीं खालीं जाणें, अधःपात, अवमान. **पाताळौनि**—पाताळाहून.

**ओं. १७५**—यमुना ही गंगाच समजून कवि वर्णन करतो. "मूळची पुराण-प्रसिद्ध व त्यांतूनही पुनः श्रीकृष्णाच्या (विष्णूच्या) चरणांचा स्पर्शलाभ

मिळालेली, व म्हणूनच तेव्हांपासून सर्व "तीर्थांत अग्रगण्य" अशी तिची ( गंगेची ) कीर्ति झाली." श्रीकृष्णाच्या चरणस्पर्शानेंच तिला सर्व तीर्थांचें अग्रगण्यत्व लाभलें. **शिरोमणी**—डोक्यावर धारण करण्याचा मणि अर्थात् प्रमुख. **विरुद्**—ब्रीद. 'ब्र' मध्यें एक उकार शिरला आहे. बिर्+उ+द.

**ओं. १७६**—आतां नदीला बांधलेल्या घाटाचें व तिच्या वाळवंटाचें वर्णन करतात. **सोमकांती**—चंद्रकांत मण्याचे. यमुनेला चंद्रकांतमण्याचें घाट बांधले होते. तिचें वाळवंट साध्या वाळूचें नसून हिऱ्याच्या खड्यांचें होतें. तेथें पुनः ज्यांच्या पोटांत मोतीं आहेत अशा शिंपांचीं संपुटं दिसत होतीं. सारांश गोकुळांतल्या यमुनेचं वाळवंट हिऱ्यामोत्यांच्या वाळूचें होतें. येथें यामुळें उदात्ता-लंकार साधला आहे. **नग**-रत्न. **मुक्तिगर्भ**-ज्याच्या गर्भांत, पोटांत मोतीं आहेत असे. **सूक्तिसंपुट**-शिंपल्यांचीं तोंडें. पहा—'ज्ञानवैराग्य शुक्तिसंपुटीं'—एकनाथ, रुक्मिणीस्वयंवर.

**ओं. १७७.**—"तेथें (त्या यमुनेच्या वाळवंटांत) ठिकठिकाणीं, श्रीकृष्णाच्या सुनीळ अंगकांतीप्रमाणेंच इंद्रनीलमणी चमकत होते, व अगदीं पाण्याजवळची बारीक वाळू, अत्यंत मृदु असून ती रत्नांच्या चूर्णाची होती." **किळ**-प्रभा, तेज. श्रीकृष्णाची सुनीळ कांति जशी चहोंकडे फांकली होती, त्याप्रमाणेंच ठिक-ठिकाणीं इंद्रनील मणि पडलेले दिसत होते. **केवाळु**—बारीक वाळू. नदीच्या अगदीं पाण्याजवळची वाळु नेहमींच अधिक बारीक व मुदु असते. पण यमुनेच्या पाण्याजवळची वाळु अनेक रत्नांच्या चूर्णाची होती. रत्नांच्या पुडीची ती झालेली होती. येथेंही "उदात्तं वस्तुनः संपन्महतांचोपलक्षणम्" असाच उदात्तालंकाराचा प्रकार झाला आहे.

**ओं. १७८**—यमनेच्या वाळवंटांत नवरत्नांची एवढी समृद्धि कां व कशी दिसत होती, यावर पुनः कवि उत्प्रेक्षा योजीत आहे. "ती यमुना (रत्नांचें केवळ भांडार अशा) समुद्राची पत्नी (अर्धांग) होती, म्हणूनच तिनें आपल्या सर्वांगावर हे रत्नजडित अलंकार एकावेळींच धारण केले होते जणु!" प्रत्यक्ष रत्नाकराच्या पत्नीनें जर असे रत्नांचे अलंकार खच्चून अंगावर घातले नाहींत, तर तें चमत्कारिक दिसेल, म्हणूनच तिनें ते येथें धारण केले असावे! **अर्धांग**—पत्नी. ही पतीचें अर्धें शरीरच होय. **रत्नाकर**—रत्नांचा आकर, खाण, भांडार. **अंगाथिले**—अंगिकारले, अंगावर घातले. "बळाथिले," "तेजाथिले" अशीं

रूपें मुक्तेश्वरापर्यंत आपणास पहावयास सांपडतात. **ठीकलग**—रत्नजडित. पहा–"हातसरां–मागां हातकडगें । मुदियांची जोडी ठिकलगें ॥–" नरेंद्र, रुक्मिणिस्वयंवर. **सप्तांग**—सात अलंकार घालण्याचे स्त्रियांचे सात अवयव. हात, पाय, कटि, कंठ, नाक, कान, मस्तक अशा सात ठिकाणीं स्त्रिया अलंकार घालतात. **लेणें**—अलंकार. यमुनेच्या वाळवंटांत जीं रत्नें सर्वत्र विखुरलेलीं दिसत होतीं, ती तिनें आपल्या (सप्तांगावर) सर्वांगावर एकदम चढविलेले अलंकारच होते, असा भावार्थ.

**ओं. १७९**—हा जो रत्नांचा सर्वत्र थाट यमुनेच्या वाळवंटांत दिसत होता, त्यावरून कवीला यमुनेवर आणखी उत्प्रेक्षा सुचते. त्याला ही यमुना म्हणजे श्रीकृष्णाला नवरत्नांनीं ओंवाळणारी प्रत्यक्ष लक्ष्मीच अवतरली आहे, उद्भूत झाली आहे, अशी दिसते. **कैवल्यनाथा**—मोक्ष देणाऱ्या. **कमलांची**—लक्ष्मीच. (प्रत्यक्ष) **उचळूनी करी**—उत्थान करी, एकदम वर आली. ही यमुना नसून नवरत्नांनीं श्रीकृष्णाला ओंवाळणारी लक्ष्मीच होय असें कवीला वाटलें. कारण यमुनेचें तें वाळवंट असें नवरत्नांकितच होतें.

**ओं. १८०**—"(यमुनेच्या) दोनी तटावर आपापल्या कामांत गर्क झालेले, व म्हणूनच शब्द न करणारे पक्ष्यांचे थवे असून, ते मुनिश्रेष्ठांप्रमाणें आपल्या दृष्टीनीं पावन केलेलीं आपलीं पावलें टाकीत होते." **कूळीं**—तटावर. **द्विजवृंदें**—पक्ष्यांचे समूह, थवे. **निजकर्मरतें**—आपापल्या व्यापारांत निमग्न झालेले. **दृष्टिपूतें**—आपल्या नजरेनें पावन झालेलीं, अर्थात् आपल्या दृष्टीनें न्याहाळलेलीं. पक्षी पायाकडे प्रथम पाहून मग पाऊल टाकतात, या स्वभावोक्तीचा येथें उल्लेख आहे. **ठविती पदें**—पाऊल टाकीत होतें व त्यांच्या (कर्मरतत्व, निःशब्दत्व, व दृष्टीपूतत्व) गुणांमुळें ते मुनिश्रेष्ठाप्रमाणें भासत होते.

**ओं. १८१**—हेच विविध पक्षी आपापल्या कर्मांत अगर तपश्चर्येंत गर्क झाल्याप्रमाणें कसे दिसत होते, त्याचें येथें व पुढील ओंवींत वर्णन आलें आहे. **एकांगुष्ठतापिसें**—पायाच्या एकाच अंगठ्यावर उभे राहून जणु तप करणारे (बगळे). **नासाग्रीं इ०**—आपल्या नाकाच्या टोंकाला दृष्टि लावून जणु ध्यान करणारे ढोंक पक्षी. परमेश्वराचें ध्यान करतांना मुनिजन नासाग्रीं दृष्टि लावतात, तशीच जणु या ढोंक पक्ष्यांनीं आपली दृष्टि आपल्या चोंचीच्या टोंकाला लावली होती.

पहा–" नासिकाग्र दृष्टी ती वळली । निर्लज्जचि जाहला, टकमक मुख तें बघण्याला–" सौभद्र. ( किर्लोस्कर ) **ढोंक**—पक्षीविशेष. **यज्ञदीक्षित इ०**—चक्रवाक-पक्षी यज्ञाची दीक्षा घेतलेल्या यजमानाप्रमाणें आपल्या सहचरीला एक क्षणभरही सोडून राहत नव्हते. यज्ञाची दीक्षा घेतलेल्या यजमानाला जसें आपल्या पत्नीला विसंबतां येत नाहीं, तसेच हे चक्रवाकही आपल्या सहचरीला क्षणभर विसंबत नव्हते. बगळयांचे एका पायावर उभे राहून मासा पकडण्यापूर्वीचें ध्यान, ढोंक पक्ष्याचें आपल्या चोंचीच्या टोंकाला दृष्टी लावून बसणें, व चक्रवाक पक्ष्यांची आपल्या सहचरीच्या सतत सहवासाची आसक्ति, या स्वभावोक्तीला जपतप-यज्ञादि नित्यनैमित्तिक कर्में करणाऱ्या तपोधनांच्या हालचालीची दिलेली उपमा जितकी विनोदी तितकीच हृद्य आहे. **यज्ञदीक्षित**—यज्ञाचें कंकण बांधलेले, दीक्षा घेतलेले. पत्नी असल्याशिवाय अशी दीक्षा घेता येत नाहीं.

**ओं. १८२**—" ज्याप्रमाणें परमहंस परिव्राजक वेदांतांत प्रकृति–पुरुषाची छाननी करतात, त्याप्रमाणें पांढरे शुभ्र राजहंस पक्षी, पाणी व दूध यांचे पृथः-करण करीत होते." **प्रकृतिपुरुष विवेकातें**—सांख्यमतानें जग हें प्रकृती-पासून उत्पन्न झालें असून, पुरुष हा उदासीन आहे. प्रकृति ही २४ तत्त्वांची झाली असून, २५ वा पुरुष तिच्यापासून अगदीं भिन्न आहे, इत्यादि जो विचार त्याला प्रकृतिपुरुषविवेक म्हणतात. हा विचार जसे ज्ञानी परमहंस यती करतात, त्यांना जसा प्रकृति व पुरुष यांमधला फरक कळतो, तद्वतच यमुनेच्या प्रवाहा-वरील राजहंसांना दूध व पाणी वेगळें कसें करावें हें समजत होतें. पहा " हंसोहि क्षीरमादत्ते तन्मिश्रं वर्जयत्यपः "–शाकुंतल. **निवाडु**—भेद, भिन्नता. " नाना घनीभूत सुवर्ण । जैसें निहाळितां साधारण । मग अळंकारीं बरवेपण । निवाडु दावी ॥–ज्ञाने. १।४४. येथेंही दूध व पाणी वेगळे करण्याच्या राजहंसाच्या नैसर्गिक गुणाला यतीच्या प्रकृति व पुरुष वेगळे करणाऱ्या बुद्धीची दिलेली वेदांतिक कल्पना भव्य व मार्मिक वाटते. **करीतें**—करणारे. ( कर्ते ).

**ओं. १८३**—" ज्याचा ( श्रीकृष्णाचा ) शब्द ऐकून जडवस्तू देखील आकर्षित होतात, लतांना व तरूंना देखील ज्याच्या शब्दानें रोमांच ( कांटा ) येतात, व जनावरें देखील चरण्याचें विसरतात." श्रीकृष्ण हा शब्दवेधी आहे. त्याचें बोलणेंच असें कांहीं गोड होतें कीं, त्यामुळें कोणीही त्याच्याकडे आकर्षित व्हावें ! **तो ध्वनी**—श्रीकृष्णाचा शब्द.

**ओं. १८४**—" ज्या श्रीकृष्णाच्या शब्दाप्रमाणेंच त्याच्या एका दृष्टिक्षेपानें, पाखरें आनंदित होतात, त्या, आपल्या केवळ नामानें आकर्षित करणाऱ्या श्रीकृष्णाचें वर्णन तरी कसें करावें ! " **पांखिरुवें**—पांखरें. अनेकवचनीं ' रु ' चें ' रुवे ' होतें. **वेधु**—आकर्षण.

**ओं. १८५**—सूर्याचा प्रकाश मेघानें झांकला असतां, सूर्यविकासी कमलिनी उमलत नाहीं, त्याप्रमाणेंच गोपवेषांत असल्यानें, श्रीकृष्णपरमात्माही गुप्त झालासें वाटत होतें. गवळ्याच्या रूपामुळें श्रीकृष्णाचें परमेश्वरत्व गोकुळांतील लोकांना जाणवावें तसें तें जाणवत नव्हतें. **परि इ०**-पण ते त्याच्या आकर्षणानें सर्व व्यापार, सर्व क्रिया करीत होते. गोपाळांना श्रीकृष्णाचें परमेश्वरत्व अतिपरिचयानें समजत नव्हतें, तो परमेश्वर आहे हें ज्ञान त्यांना झालें नव्हतें, पण त्याच्या व्यक्तित्वाच्या आकर्षणानें ते त्याच्याशीं भक्तिभावानेंच वागत होते. वेधु ( तृ )—आकर्षणानें. कारण श्रीकृष्ण शब्दवेधी, रूपवेधी व नामवेधी होता. **परेशु**—परवस्तूचा ईश, परमात्मा.

**ओं. १८६**—या व पुढील ओंवींत पुनः पशूंच्या निर्वैरत्वाचें वर्णन केलें आहे. परस्पर शत्रू म्हणून गणलीं गेलेलीं जनावरें, तेथें अगदीं मित्रभावानें वागत होतीं. मागें १४१ ओंवींत असेंच वर्णन आलें असून, तें याहून अधिक विस्तृत आहे. **हातिरुवें**-हत्ती. **पांखवां**-पिसाऱ्याखालीं. पहा—" फणी मयूरस्य तले निषीदाति "—ऋतुसंहार. **फणिकु**-नाग, सर्प.

**ओं. १८७—मूखकु**-[ मूषक ] उंदीर. हा मांजराच्या मांडीवर बसलेला. **पालखतीं**—मांडीवर. पहा-" रायाचिये पालखतीचिये पालकीं । अस्थानि-आंतु बैसली भीमकी । "-नरेंद्र, रुक्मिणीस्वयंवर-११२. " आलखट पालखट मांडी " असें आपण आजही म्हणतो. **महिखां**-महिषां. **पानिअेडां**-पाणोठ्यावर. पहा—ज्ञाने. ९।१२४, १६।२२८. " सत्रावियेचें पाणियाढें "——एकनाथी भागवत-९।१२७. यमुनेच्या पाणोठ्यावर सर्व प्राणिमात्र निर्वैर झाले होते. तें पाणी पिऊन त्यांनीं आपला नैसर्गिक वैरभाव टाकला होता. त्या पाण्याचाच तो गुण होता, व त्या पाण्याला तो गुण श्रीकृष्णामुळें आला होता.

**ओं. १८८**—यमुनेंतील चलचर प्राणीदेखील कसे धन्य, तें सांगतात. **वरौतीं**—पाण्याच्या पृष्ठभागांवर. **पाळांति**—( पाळांतणें )-टेहळणें, न्याहाळणें, अवलोकणें. पहा पुढील ओं. ३३९. यमुनेंतील मासे, कासवें इत्यादि जलचर प्राणी पृष्ठभागांवर येऊन श्रीकृष्णदर्शनाचा लाभ घेत होते. म्हणून ते धन्य !

**ओं. १८९**—श्रीकृष्णाचें यमुनेच्या पाण्यांत प्रतिबिंबित झालेलें श्यामल रूप मत्स्यादि जलचरांनीं अत्यंत उत्सुकतेनें आलिंगलें. **उतावेळुपणें**—हावरेपणानें. त्यांना देखील श्रीकृष्णरूपाचें एवढें वेड असा भाव !

**ओं. १९०**—"श्रीकृष्णानें भिन्न भिन्न भक्तांना त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणें आपल्या अंगच्या भिन्न गुणानें मोहित केलें. आपल्या विज्ञानानें [अद्भुत शक्तीनें] त्यानें ब्रह्मदेवाला भुलविलें, तर आपल्या सौंदर्यानें देवांगनांना भुलविलें. पण सर्व चराचर किंवा जडाजड वस्तूंना त्यानें आपल्या ज्या गुणानें आकर्षण लावलें, त्या शक्तीचें मात्र वर्णन करतां येत नाहीं." श्रीकृष्णाची ही वेधवंती शक्ती अवर्णनीय आहे, असा कवीचा आशय.

**ओं. १९१**—येथपासून १९६ पर्यंत, भक्तीशिवाय केवळ कर्ममार्गाची उपासना करणाऱ्यांची निंदा केली आहे. यमुनेवर आपापल्या ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यास या चार आश्रमधर्मानुसार, साधक संध्याब्रह्मयज्ञासारखीं नित्य कर्में व व्रतासारखीं नैमित्तिक कर्में, स्नानानें शुद्ध होऊन करीत बसले होते. **आश्रमुभेदें**—वरील चार निरनिराळ्या आश्रमाप्रमाणें.

**ओं. १९२**—**अघमर्षणीं**—स्नानसंध्या करतांना, हातांतील पाण्यावर नाकांतील वायु सोडून त्या पाण्यानें जमिनीवर आघात करणें. संध्येंतील अघमर्षण मंत्र, " ॐ ऋतंच सत्यं चाभीद्धात्तपसोऽध्यजायता । " इ. या मंत्रोच्चारानें रोजचें पाप जातें असा समज आहे. अशा मंत्रांत कोणी गुंतून राहत. **एकु मृत्तिका इ.**—कांहीं मातीचें स्नान करण्यांतच आनंद मानीत. मृत्तिकास्नान, गोमयस्नान अशीं पुण्यकारक स्नानें लोक आचरतात. **एकु कर्मीचि इ.**—हीं नित्यनैमित्तिक कर्मेंच आपणाला संसारांत तारक होणार आहेत, असें कांहीं मानणारे तेथें होते. पण हे सर्व कर्ममार्गी लोक, ब्रह्म मात्र जाणत नव्हते. हे कर्में करण्यांत मशगुल झाले असले, तरी ब्रह्मज्ञान यांपैकीं कोणालाच झालें नव्हतें. म्हणून यांचीं हीं कर्में फुकट होतीं असा भाव.

**ओं. १९३**—यमुनेच्या घाटावर जप करणारे क्रोडों होते. **कोडी**—कोटी. पुनः त्रिदंडी संन्यास घेतलेले असे कूर्मासन घालून ध्यानधारणा करणारेही तेथें होतें, एकदंडी नुसते नमस्कार घालणारेही तेथें होते. पण अशा देहकष्टाच्या कर्मांत गुंतून ईश्वराराधना करणारे हे कर्ममार्गी हटयोगी लोक, आपल्या अगदीं जवळ असलेल्या देवाला मात्र पाहूं शकत नव्हते. श्रीकृष्णासारखा ईश्वर आपल्या

जवळच आहे, हें ज्ञान मात्र त्यांना झालें नव्हतें. **त्रिदंडी**—हा संन्याशांतील एक प्रकार असून, यांत संन्यासी हा शिखा, सूत्र, व कच्छ या तीन वस्तूंचा त्याग करीत नाहीं, व त्यांस पुनः गृहस्थाश्रमांत येतां येतें, अशी समजूत आहे. काया, वाचा व मन या तिघांवर ज्यानें ताबा मिळविला आहे, अशा तपस्व्यालाही त्रिदंडी संन्यासी म्हणतात. **कूर्मासन**—हें योगशास्त्रांत सांगितलेलें एक आसन आहे. याचे चार प्रकार आहेत. [ १ ] वज्रासनाप्रमाणें बसावें परंतु पाय कुल्ल्याखालीं न घेतां, ते घोटे जमिनीला टेकतील व बोटें साफ दिसतील असे दोन्ही बाजूंना बाहेर काढावे. हात बगलेवर ठेवून आंगठे बगलेंत भरावे व हातांना बांक न देतां चारी बोटें बाहेर स्पष्ट दिसतील अशीं छातीला टेकून ठेवावी. यानें पायाचे घोटे, मांड्या, दंड यांस चांगला व्यायाम होतो. यांत कुल्ले टांचेवर टेकणें किंवा जमिनीवर टेकणें असे दोन प्रकार आहेत. असें आसन घालून तेथें त्रिदंडी संन्यासी बसले होते. **एकदंडी**—काया, वाचा व मन यापैकीं एकावर संयम घातलेले असे, नमस्कारावर भर देऊन होते.

**ओं. १९४**—" पण हे सर्व कर्ममार्गी साधक, आपापल्या आश्रमधर्माच्या अभिमानानें व कर्ममार्गाच्या काटेकोर आचरणानें प्रेरित झाले असल्यानें, त्यांनीं परमेश्वराला जाणणें हें एकीकडेच राहिलें होतें." ईश्वराचें ज्ञान एकीकडे तर ते भलतीकडे असा त्यांचा प्रकार होता. **अरुतें**—एकीकडे, अलीकडे. **ठेलें**—राहिले.

**ओं १९५**—यांचा हा कर्मोपासनेचा मार्ग म्हणजे जवळ उजेड नसतांना अंधाराला घालविण्याच्या प्रयत्नाप्रमाणेंच निष्फळ होता. हे कर्ममार्गी साधक, ईश्वरकृपेशिवाय, त्याच्या भक्तीशिवायच त्या परब्रह्माला ओळखूं, असे म्हणत होते. पण त्यांचा हा समज चुकीचा होता. **प्रकाशसंपत्ती**—प्रकाशरूपी संपत्ति, प्रकाशशक्ति. पंडित दामोदरानें येथें कर्ममार्गाहून भक्तिमार्ग श्रेष्ठ व सुलभ मानला आहे. **दवडों पांति**—दवडूं पाहतात, घालवूं पाहतात.

**ओं. १९६**—ज्याप्रमाणें विषयांमध्यें सुख मानणाऱ्यांना जवळ असलेला परमात्मा ओळखूं येत नाहीं, त्याप्रमाणेंच या कर्ममार्गी, कर्मांत गुंतून राहिलेल्या साधकांना, श्रीकृष्ण हें मूर्तिमंत ( सगुण ) परब्रह्म आहे, याची जाणीव नव्हती. **विषयारामा**—विषयामध्यें, " मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्णसुखदुःखदाः । आगमापायिनोऽनित्यास्तांतितीक्षस्व भारत ॥" यांत सांगितलेले इंद्रियांचे विषय. यांमध्यें सुख मानणाऱ्यांना.

**ओं. १९७**—“साधक लोक याप्रमाणें कर्मासक्त होऊन परमेश्वराला जाणत नाहींत, हा दोष साधकांचा नसून तो प्रत्येक माणसांत प्रवृत्ति किंवा निवृत्ति हा गुण ज्याप्रमाणांत पुढें येईल किंवा उचल खाईल, त्यावर अवलंबून आहे. तर आतां यापुढें वच्छहरणाची कथा आयका असे पंडित दामोदर ( केशवराजाच्या नांवानें ) म्हणतो.” विषयासक्त होणें हें त्या माणसाच्या कलावर अवलंबून आहे, असें कवीचें मत आहे. जीं माणसें प्रवृत्तिपर, जागतिक व्यवहार खरे मानून चालणारीं आहेत तीं विषयासक्त होतात, तर जीं वैराग्यवृत्तीची व जगन्मिथ्या मानणारीं आहेत, तीं विषयासक्त होत नाहींत असा भाव.

**ओं. १९८**—**देवांचां**—देवांच्या, श्रीकृष्णांच्या. मग पुढील कार्यक्रमाची सूचना त्यांनीं आपल्या सवंगड्यांना दिली.

**ओं. १९९.**—श्रीकृष्ण गोपाळांना सूचना देतातः- **उद्कपानें**—वासरांना पाणी पाजवा. **पुलिनें**—वाळवंटे. या वाळवंटांत वनभोजनें करण्याचा बेत श्रीकृष्णानें गोपाळांपुढें मांडला आहे.

**ओं. २००.**—“त्यावेळीं कांहीं वासरें पाणोठ्यावर घातलीं होतीं, तर कांहीं नुक्तीच चरायला ( यमुनेच्या ) तीरावर गेलीं होतीं. अशा वेळीं त्या गोपाळांनीं श्रीकृष्णाला बसण्यासाठीं तेथें एक आसन तयार केलें.” **सूदलीं**—घातलीं. पाणी पाजण्यासाठीं यमुनेच्या पाणोठ्यावर नेली होतीं. **थडिवां**—तीरावर. **टेंकिलीं**—लागलीं. पहा मागें. “एक टेकितु माहिबळें पावळीं-” ओं. ७५.

**ओं. २०१.**—ज्या श्रीकृष्णाला भक्तांना मोक्ष देण्याचें सामर्थ्य आहे, तो गोपाळांनीं तयार करून ठेवलेल्या आसनावर बसला. मोक्षपद देणारा श्रीकृष्ण अगदीं साध्या, तेंही दुसऱ्यांनीं तयार केलेल्या अशा आसनावर बसावा, हा महान् विरोध होय. अलौकिक पुरुषाचें लौकिकत्व तें हेंच. **तिअें**—त्या आसनावर, गोपाळांनीं तयार केलेल्या आसनांवर. **मोटां**—गाठोडी, ( जेवणाची ). वनभोजनासाठीं घरून आणलेल्या आपापल्या मोटा घेऊन सर्व गोपाळ जमले.

**ओं. २०२**—“अगोदरच ते गोपाळ श्रीकृष्णापासून मिळणाऱ्या ब्रह्मानंदाच्या रसानें तृप्त झालेच होते, त्यांतूनही पुनः ( या वनभोजनाच्यावेळीं ) त्यांची प्रवृत्ति ( मन ) श्रीकृष्णाशीं समरस झालेली होती. अशा स्थितींत ही वनभोजनाची कल्पना कांहीं भूक भागविण्यासाठीं योजलेली नव्हती. तर प्रस्तुत ‘वच्छहरण’

कथेंत वर्णिलेला अद्भुत चमत्कार करून आपली लीला दाखवावी, या उद्देशानेंच श्रीकृष्णाकडून ही वनभोजनरचना करण्यांत आली होती. आपलें चरित्र किंव अद्भुत सामर्थ्य दाखविण्याची एक संधि म्हणूनच हा भोजनप्रसंग कल्पिला होता. कारण या भोजनप्रसंगामुळेंच ब्रह्मदेवाला वच्छहरणाची कल्पना आली व श्रीकृष्णानाही त्याचें गर्वहरण करतां आलें. **देवासीं प्रवृत्ती**—श्रीकृष्णाशीं झालेलें तादात्म्य. **दोषें**—उद्देश. ( येथे 'तोषे' हा शब्द भावेप्रतींत चुकून पडला असावा. )

**ओं. २०३**—"श्रीकृष्णासन्मुख होण्यासाठीं, एक गोपाळ दुसऱ्याच्या पुढें घुसूं लागला. याप्रमाणें [ अशा अहमहमिकेनें ] सर्व जण [ श्रीकृष्णाच्या ] चोहोंबाजूला बसते झाले!" **नीडें**—नीटें, सन्मुख, जवळ. **रीगें**—शिरे, घुसे. **ऐसेंनी**-याप्रमाणें. या ओवीला समानार्थक पहा-"निजमुख कवणाही आडदृष्टी असेना। स्वुनि बसावे ऐसी भोंवतीं बालसेना ॥ हरिवदन पहाया सर्व दृष्टी भुकेल्या। म्हणुनि बहुत पंक्ती मंडलाकार केल्या ॥" किंवा "असे कर्णिका अंबुजामाजि जेवीं। मुलांमध्यभागीं बसे कृष्ण जेवी" ॥-वामनपंडित, वनसुधा. ४ **अघवे**—सर्व ( गोपाळ )

**ओं. २०४**—"श्रीकृष्णाला पाहत असतां, डोळ्यांना आनंद होत होता म्हणून सर्व गोपाळ, श्रीकृष्णाच्या सन्मुख होत होते. त्यावेळीं श्रीकृष्णानें 'विश्वतोमुख' हें वेदवाक्य खरें करून दाखविलें." कारण आपलें मुख पाहाण्यासाठीं प्रत्येक गोपाळ आपल्या सन्मुख होण्याची खटपट करीत आहे असें पाहून, आपल्याला सर्व बाजूनें तोंडें असल्याचा चमत्कार त्यांनीं करून दाखविला व त्यामुळें गोपाळ कोठेंही बसले तरी श्रीकृष्णाचें मुख त्यांना अनायासें पाहतां आलें. पण या बरोबरच "ॐ विश्वतश्चक्षुरुत विश्वतोमुखो विश्वतो बाहुरुत विश्वतःपात्। संबाहुभ्यां धमति संपदत्रैर्द्यावाभूमि जैनयन्देव एकः ॥" या परुषसूक्तांत म्हटल्याप्रमाणें श्रीकृष्णाला सर्व बाजूंनीं मुखें आहेत हें सिद्ध झालें. वेदवाक्याचा पडताळा प्रत्यक्षच त्यांनीं आणून दाखविला. **साचु**—खरीं. वेदांतलें पुरुष किंवा ईश्वरवर्णन खरें आहे, असा प्रत्यय आणून दिला.

**ओं. २०५.**—येथून २०९ ओंवीपर्यंत, श्रीकृष्णाभोंवतीं जमलेल्या गोपाळांवर कवीनें विविध उत्प्रेक्षा केल्या आहेत. अशा उत्प्रेक्षांतच पंडित दामोदराचें कवित्व सांठविलेलें आहे. "त्या परमानंदरूपी चंद्राजवळ ते गोपाळ म्हणजे नक्षत्रांच्या ओळीच होत्या. चंद्राभोवतीं तारागण असावे, त्याप्रमाणें

श्रीकृष्णाभोंवतीं ते गोपाळ." **कीं**—किंवा. "ते गोपाळ म्हणजे श्रीकृष्णाच्या प्रभावळीला बसविलेल्या रत्नपंक्तीच जणु." **प्रभावळी**—देवतामूर्तींच्या पाठीमागें चांदी किंवा इतर धातूची केलेली माहिरप. अशा महिरपींत बसविलेलीं रत्नें म्हणजेच ते गोपाळ. सारांश ते गोपाळ म्हणजे श्रीकृष्ण जो देवाधिदेव त्याची प्रभावळच होते. **देवशिरोमणि**—देवांचा ललामभूत, देवाधिदेव.

**ओं. २०६.**—"निळया आकाशांत काळे मेघ दिसावे, त्याप्रमाणें श्यामल श्रीकृष्णाच्या सांनिध्यांत ते गोपाळ शोभत होते. किंवा ते गोपाळ म्हणजे वेदांतर्गत विद्या (वेद आणि वेदांगें) असून, त्या जणुकाय श्रीकृष्ण रूपी ब्रह्मविद्येचा आश्रय करीत होत्या." सर्व वेदवेदांगांनीं ब्रह्मविद्येला जसे श्रेष्ठ मानलें आहे, त्याप्रमाणें त्या गोपाळांनीं श्रीकृष्णाला आपला प्रमुख मानलें होतें. **ओळगेति**—सेवा करिती. पहा–"रत्नवती शृंघारिणी : चंद्रहंसा अवसरिणी । दृष्टी ओळगे मंत्रिणीः सिंधुमती" ॥–नरेंद्र रुक्मिणीस्वयंवर १०४.

**ओं. २०७**—"किंवा परमात्म्याजवळ २४ तत्त्वें असावी, किंवा आदिभैरवाच्या सभोंवतीं भूतें असावीं, त्याप्रमाणें, हे गोपाळ म्हणजे आदिनाथाचा [श्रीकृष्णाचा] आश्रय करणारे देवताचक्रच होतें जणु." श्रीकृष्णाभोंवतीच्या गोपाळांच्या समूहाला महानुभाव तत्त्वज्ञानांतील उपमा दिल्या आहेत. **तत्त्वें**—सांख्यांचीं २४ तत्त्वें. सांख्याच्या पुरुषाभोंवतीं ज्याप्रमाणें २४ तत्त्वें असतात, त्याप्रमाणें श्रीकृष्णाभोंवतीं ते गोपाळ होते. **आदिभैरवांभंवतीं भूतें**—महानुभावपंथांत दत्त व कृष्ण या अवतारांना उपास्यदेवतांचा मान असून बाकीच्या लक्षावधि देवतांना स्वतंत्र मूलद्रव्य बनविलें आहे. जीव व परमेश्वर यांच्याप्रमाणेंच देवताही नित्य आहेत. सूत्रपाठांतील "अन्यव्यावृत्ति" प्रकरणांत [१] कर्मभूमीच्या देवता, [२] अष्टदेवयोनि देवता [३] अंतराळीच्या देवता, [४] स्वर्गींच्या देवता, [५] कैलास–वैकुंठ–सत्यलेकींच्या देवता [६] क्षीराब्धीच्या देवता [७] अष्टभैरव [८] विश्वरूप देवता व [९] चैतन्य माया, अशा देवतांचा निर्देश केला आहे. या देवतांचे उच्च देवता व नीच देवता असे दोन विभाग पडतात. देवतेची उच्चनीचता तिच्या स्वरूपाच्या परिणामावरून ठरते. यावरून चैतन्यमाया ही सर्वांत श्रेष्ठ देवता असून कर्मभूमीच्या देवता या नीच होत.

'सूत्रपाठांत' चैतन्यमाया व अष्टभैरव या देवतांचें विशेष वर्णन आलें आहे. परमेश्वराच्या खालोंखाल चैतन्यमायेचेंच प्रस्थ असून, जीवांचे सर्व व्यापार तिच्या

अनुरोधानें चालतात. अष्टभैरवही कांहीं कमी योग्यतेचे नाहींत. स्वतः त्यांनाही आपण प्रतिसृष्टिकर्ते व संहारकर्ते असा अभिमान असतो. अष्टभैरवांची (१) करालि (२) विकरालि (३) उमापति (४) पशुपति (५) सदाशिव (६) ब्रह्मा (७) विष्णु (८) महादेव अशीं आठ नांवें आहेत. प्रपंच सुद्धां कार्यरूप व कारणरूप असा दोन प्रकारचा मानला असून, त्यापैकी कारणरूप प्रपंच अनादिसिद्ध व अष्टभैरवास्थित आहे, असें महानुभावांचें मत आहे. या प्रत्येक भैरवापासून पुनः आठ आठ भूतांचा समूह उत्पन्न होतो. पण '**भूत**' म्हणजे ज्याला पुढें अवच्छेद जाऊं शकत नाहीं, असा प्रपंचाचा शेवटचा अंश होय. या आट भूतांत पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या पंचमहाभूतांचा व सत्व, रज, तम या तीन गुणांचा समावेश होतो. याप्रमाणें या अष्टभैरवापासून प्रत्येकीं आठ आठ अशीं एकंदर ६४ भूतें निर्माण होतात. म्हणून या अष्टभैरवापैकीं प्रत्येकाभोंवतीं जसा भूतांचा घोळका असतो, तसा श्रीकृष्णाभोंवती या गोपाळांचा होता असा अर्थ. **देवताचक्र**—महानुभावपंथांत देवतांना परमेश्वर मानीत नसले, तरी ते देवतांचा दर्जा कमी लेखीत नाहींत. परमेश्वर, जीव व प्रपंच या तीन पदार्थांप्रमाणेंच देवताही अव्यक्तरूप अनादीचा स्वतःसिद्ध जातित्वानें एक स्वतंत्र पदार्थ आहे. त्यांत माया एकटी असून तिच्या आधीन अनंत ब्रह्मांडें आहेत. प्रत्येक ब्रह्मांडांत ८१०१२५००९ देवता असल्यानें, या अनंत ब्रह्मांडांतील देवतांची संख्या अनंत आहे. सृष्टीच्या आरंभीं ईश्वराच्या प्रेरणेनें सृष्टीचा व्यापार चालविण्यासाठीं प्रत्येक ब्रह्मांडांतील अव्यक्त देवता मूर्तिमंत होतात, त्यांना कोणी उत्पन्न करीत नाहीं. या मूर्तिमंत देवतांना 'ब्रह्मांडस्थ देवता' असें म्हणतात. जीवांनीं नित्यमुक्ति मिळेपर्यंत शुभाशुभ कर्में करावींत व ब्रह्मांडस्थ देवतांनीं त्यांचीं फळें द्यावींत, असें देवताचक्र चालू आहे. हें देवताचक्र इतकें विशाल व भानगडीचें आहे कीं, श्रीचक्रधरस्वामी म्हणतात—"एथौनि देवताचक्र निरूपिता पृथ्वी एसनें कर्डीत : मेरु एसनी खडी न पुरे :"—(पहा–'महानुभावपंथ'–पृष्ठ९५–९६–पं. बाळकृष्णशास्त्री महानुभाव)—**तैसें आदिनाथातें** इ०—वर वर्णन केलेलें देवताचक्र ज्याप्रमाणें परमेश्वराचा आश्रय करून असतें, (त्याच्या आधीन असतें,) त्याप्रमाणें हे गोपाळही श्रीकृष्णाभोंवती त्याचा आश्रय करून होते. **उ्गळतें**—सेवा करणारें.

**ओं. २०८.**—"किंवा परमेश्वराच्या गळ्यांत ज्याप्रमाणें अनंत ब्रह्मांडांच्या माळा आहेत, त्याप्रमाणें श्रीकृष्णाजवळ हे गोपाळ शोभत होते." देवतांचा

आठवा थोवा विश्वेचा होय. विश्व म्हणजे व्यापक. आपल्या पोटांतील जीव-देवताप्रपंचाच्या ब्रह्मांडाला विश्वेची ब्रह्मांडस्था व्यापून असते. म्हणून ती व तिला व्यापून असणारे तिचें अव्यक्त स्वरूप दोन्ही 'ब्रह्मच' होत. विश्वेच्या पलीकडे माया होय. विश्वेचें स्वरूप एका ब्रह्मांडस्था व्यापून असतें. अशीं अनंत विश्वें अहित आणि या अनंत विश्वांना व्यापणारें मायेचें अव्यक्त स्वरूप आहे. माया ही देवताचक्रांतील सर्वांत पलीकडची देवता असल्यामुळें, एकाच नव्हे तर अनंत ब्रह्मांडांतील देवतांची ती स्वामिनी होय. पण ही स्वामिनीदेखील आपल्याला व्यापून असलेल्या ईश्वराच्या ठिकाणीं पतिव्रतेप्रमाणें मनोभावें वेंचलेली असते. (पहा. महानुभाव तत्वज्ञान-पृ. ६७-६९. डॉ. कोलते). एका ब्रह्मांडाला व्यापून राहणारे व्यक्ताव्यक्त विश्वेचें स्वरूप, अशा अनंत विश्वांना किंवा ब्रह्मांडांना व्यापून असलेली माया, तिला व्यापणारें सत्ब्रह्म, व त्याला व्यापणारें ईश्वररूप या सर्वांनाच 'ब्रह्म' म्हणतात. म्हणून येथें "परमपुरुषाच्या गळयांत ब्रह्मगोळकांच्या माळा" असें म्हटलें आहे. ब्रह्मांडें जशीं परमेश्वराधीन आहेत, तसे हे गोपाळ श्रीकृष्णाधीन होते असा भाव.

**ओं. २०९**—गोपाळ आपापल्या शिदोऱ्या श्रीकृष्णापुढें सोडीत होते. **जाळिआं**—जाळयांत, वनांत. (रानझुडपांच्या जाळयांत) **शाकें**-पालेभाज्या. श्रीकृष्णापुढें ते गोपाळ आपण आणलेल्या शाकभाज्यांचें वर्णन करीत होते.

**ओं. २१०—जगज्जीवनें**—जगाला अन्न देणाऱ्या त्या श्रीकृष्णानें, केवळ गोपाळांना आपला प्रसाद मिळावा म्हणूनच त्यांनीं आणलेली वेडीं विचित्र अन्नें चाखून पाहिलीं. जगज्जीवन म्हणायचा व त्यानें हीं वेडीं विचित्र अन्नें चाखायचीं हा विरोध आहे. पण गोपाळांना प्रसाद मिळावा या बुद्धीनें त्यानें तीं चाखलीं, या म्हणण्यानें त्या विरोधाचा परिहार केला आहे.

**ओं. २११—पांतिकरीं**—पंक्तीस बसणाऱ्यांनीं (गोपाळांनीं). **कमलदलांवरी**-कमळाच्या पानावर. गोपाळांनीं आपण आणलेल्या अन्नाच्या शिदोऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या पानांवर वाढल्या. कमळाचीं पानें जेवणास घेतात. **एकीं**—कोणी कोणी कल्पवृक्षाचे तुरे, जेवण्यासाटीं जमिनीवर आंथरले होते. **मंजिरी**-तुरा, मोहोर.

**ओं. २१२—कमलवनें**-कमलांचे समूह. कोणी कोणी गोपाळांनीं जेवणासाटीं कमळंच मांडलीं. **वृक्षत्वचांची भाजनें**—झाडांच्या सालीचीं भांडीं. कोणी

कोणी झाडांच्या सालींचा भांड्याप्रमाणें उपयोग केला. वनभोजनांत वेळ मारून नेण्यासाठीं असें नेहमींच करावें लागतें. **पोमिनींची**—‘पद्मिनी’ याचें हें प्राकृतरूप असावें. याचाही अर्थ ‘कमळाचीं पानें’ असाच होईल. **घातैली**—अंथरलीं, वाढलीं.

**ओं. २१३**—मग आपल्या हातावर दहीभात घेऊन व हातांच्या बोटांमध्यें आवळ्याची डीळ घेऊन श्रीकृष्ण तेथें [ पंक्तींत ] शोभला.—**वेलें**–वेळ=दुफाटी, Y या आकाराची डीळ. श्रीकृष्णांनीं आवळ्याची डिरीं बोटांमध्यें धरली होती.

**ओं. २१४**—श्रीकृष्णाच्या या वेळच्या वृत्तीवर कवीनें नेहमींच्या आपल्या पद्धतीला अनुसरून अध्यात्मिक उत्प्रेक्षा केली आहे. “श्रीकृष्णांनीं तळहातावर धरलेला दहींभात व आवळ्याची डिरी म्हणजे जणुकाय आपल्या गोपाळांना देऊं केलेलीं ब्रह्मपदेंच होतीं.” ब्रह्मपद काय श्रीकृष्णाच्या नेहमींच हातांत होतें, पण तेंच आपल्या सोबत्यांना देण्याच्या निमित्तानें त्यांनीं हा दहींभात व आवळे हातावर घेतले होते, अशी कविकल्पना. तो दहींभात श्रीकृष्णाहातचा भक्षण केल्यावर, गोपाळांना ब्रह्मपद मिळणारच असा ध्वनीही त्यांतून व्यक्त केला आहे. **उदारपणाचेनि विनोदें**—उदारपणाच्या भावानें, वृत्तीनें, अर्थात् औदार्यानें.

**ओं. २१५.**—“किंवा श्रीकृष्ण हा मोक्षाचा राजा असल्यानें, जणुकाय ब्रह्मविद्या आपल्या तळहातावर घेऊन आपल्या शरणागत भक्तांना ती देण्यासाठीं तो वाटच पाहत आहे जणु.” श्रीकृष्णानें हातावर घेतलेला तो दहींभात म्हणजे ब्रह्मविद्याच असून, ती आपल्या गोपाळांना देण्यासाठींच त्यानें हातावर धरली आहे, अशी कवीनें मोठी रम्य व भव्य कल्पना लढविलेली आहे. **कैवल्याचा**—कैवल्याच्या, मोक्षाच्या. **पाळांतुसे**—पाहत आहे, न्याहाळत आहे.

**ओं. २१६.**—श्रीकृष्णाचा खेळीमेळीचा स्वभाव. **वरवेआंचा**—सुंदरांचा. श्रीकृष्ण सुंदरांचा राजा आहे. **रळिया रापदळिया**—रळिया=बोलणें, विनोद, थट्टा. पहा–“ तूं या विश्वाची अनादि आदी। बैससी जिये सभासदीं। तेथे सोयरीकीचिया संबंधीं। रळी बोलों॥–ज्ञाने. ११।५४४. **रापदळिया**—शरीरचेष्टा, अंगविक्षेप. श्रीकृष्ण सलगीनें गोपाळाशीं थट्टामस्करी करीत होते. त्यांना दुसरीं नांवें ठेवून खोंचून बोलत होते, तेंच पुढील ओंवींत वर्णन केलें आहे.

**ओं. २१७**—**आडनामीं**—दुसऱ्या विनोदी नांवांनीं. दुसरी थट्टेखोर नांवें देऊन श्रीकृष्ण गोपाळांना हाका मारीत होते. **वर्मी**—खोंचून, बोलत होते.

**हासां आड पडतु**—हासून आडवे पडत होते, गोपाळांची हासून हांसून मुरकुंडी वळत होती, हांसे आवरेना म्हणून ते आडवे पडत होते. **तेवींचि**—त्यावेळीं ( श्रीकृष्ण ) संवगड्यांना आपल्या अमृतमय दृष्टीनें शांत करीत होते, संतुष्ट करीत होते. हा थट्टाविनोद करतांना श्रीकृष्णाच्या डोळ्यांत मित्रप्रेम एवढें तरळत होतें कीं, त्यामुळें ते गोपाळ समाधान पावत होते.

**ओं. २१८**—येथून २४६ ओंवींपर्यंत, श्रीकृष्णाच्या सुंदर शरारीराचें वर्णन लागतें. ' इंद्रनीलमण्यांची दीप्ति व निळ्या कमळांची कांति या दोनी एकवटाव्या त्याप्रमाणें श्रीकृष्णाची श्यामल मूर्ति शोभत होती.'

**ओं. २१९**—चरणांचें वर्णन. **आनंदमकरंदुबहुळे**—ब्रह्मानंदाच्या मधानें प्रचुर अशीं. ज्या पायांच्या दर्शनानें ब्रह्मानंद सुख मिळतें असे. पहा-' आनंदामोदबहळ । सात्विकाचें मुकुळ । '-ज्ञाने. १५।६. **जेथ**—ज्या (श्रीकृष्णाच्या ) चरणकमलाच्या ठिकाणीं मुनिजनरूपी भृंगसमूह लुब्ध होतो. मुनिजन ज्या पायांना लागतात ते, पाय.

**ओं. २२०**—**ध्वजवज्रपद्मांकितें**—श्रीकृष्णाचे पाय, ध्वज, वज्र व पद्म या सामुद्रिक चिन्हांनीं अंकित झाले होते. अशीं चिन्हें तळव्यावर असणें हें भाग्याचें लक्षण आहे. पहा-" वज्रांकुशध्वज ऊर्ध्व ऱ्हस्वांबुज । चिन्हें देखे पृथ्वीमंडळीं ॥—भरतभाव-वामन पंडित-६१. **रंगलीं**—ज्याचें संवाहन करण्यांत लक्ष्मी देखील देहभान विसरली आहे. पहा-' लक्ष्मी तुझे पायातळीं '-देवदास, व्यंकटेशस्तोत्र. **पुरविलींती**—पूर्ण केले आहेत.

**ओं. २२१**—" ज्या पायांच्या नखरूपी चंद्राच्या प्रकाशानें भक्तरूपी चंद्रकांतमाणि द्रवतात. ज्या पायांच्या दर्शनानें, भक्त भक्तीनें विरघळून जातात. चंद्राच्या किरणांनीं चंद्रकांतमाणि द्रवतो असा कविसंकेत आहे. श्रीकृष्णाच्या पायाचीं नखें ही चंद्रच होतीं ( तीं इतकीं तेजस्वी होतीं ) व त्यांच्या प्रकाशाच्या स्पर्शानें भक्तरूपी चंद्रकांत विरघळले, असा भाव. **नखचंद्रदिप्तीं**—( तृतीया विभक्ति. ) **योगीजनुकुमुदें**—योगीजनरूपी कमलें. ज्या पायांच्या दर्शनानें मुनिजनांना आनंद प्राप्त होतो. **तापत्रयें**—आधिभैतिक, आधिदैविक व आध्यात्मिक असे तीन प्रकारचे ताप, जे ( श्रीकृष्णचरण ) घालवितात. **कुमुदें**—चंद्रविकासी कमलें. चरणांना चंद्राची उपमा दिल्यावर योगीजनांना चंद्रविकासी कमलांची उपमा सार्थच आहे.

**ओं. २२२.**—"परिसाच्या स्पर्शानें लोखंड सोनें व्हावें, त्याप्रमाणें श्रीकृष्णाच्या चरणधूळीनें उदक सोनें झालें आहे. पण श्रीकृष्णाचा चरणस्पर्श एवढेंच करून राहत नाहीं, तर आपल्या संसर्गानें तो जगाचीं महापातकें नष्ट करतो." श्रीकृष्णाच्या चरणस्पर्शानें जगाची महापातकें जातात, हा त्याचा विशेष आहे. तुलनार्थ पहा—" स्पर्शमणि वनिताकर साचे । करिती जें कांचन लोहाचें।" —एकच प्याला—गडकरी. **संगमात्रें**—अल्पशा संसर्गानेंहीं.

**ओं. २२३.**—येथें श्रीकृष्णाच्या मांड्या, पोटऱ्या व कंबर यांचें वर्णन केलें आहे. **जंघायुगळ**—दोन पोटऱ्या. **सुवृत्त**—वर्तुळाकार. **उन्हरतें**—उतरतें उतरतें, निमुळतें. **जानुविभाग**—मांड्या. **घनीं इ०**—घणांनीं बडविल्याप्रमाणें घोटीव अशा मांड्या. **कटीस्छानु**—ज्या कंबरेपासून मदनाचा जन्म झाला, तें कसें वर्णन करतां येणार ? **अनंग**—मदन.

**ओं. २२४.**—आतां श्रीकृष्णाचा पीतांबर. **तैजाचा**—तेजाच्या धाग्यांनीं जणु विणलेला असा झगझगीत. **पह्लरें येशेंनि**—सोन्याच्या ( यशानें ) रंगानें रंगला होता. अर्थात् तो पीत व लखलखित होता. **वेढिला**—वेष्टिला—नेसला. **मालगंठी**—मल्लासदृश गांठ देऊन कासोटा घालणें. एवं पीतवर्णी पीतांबर. पहा—" मादनें जालें देवकीच्या बाळा : मालगंठी नेसला सोनेसळा : । महदंबचे धवळे—पूर्वार्ध—६९.

**ओं. २२५—वरि**—या पीतांबरावर श्रीकृष्णानें रत्नखचित कंबरपट्टा ( मेखला ) घातला असून, तेथें लहान लहान घागऱ्या रुणझुणत होत्या. **क्षुद्रघंटिका**—घागऱ्या. पहा—" त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका अर्थध्वनि । " —ज्ञाने १।७. त्या घागऱ्या कशा रुणझुणत होत्या, याला कवि एक पारमार्थिक उपमा देतो. "ज्याप्रमाणें परब्रह्माचें वर्णन करतांना वेद ( उपनिषदें ) 'नेति नेति' असे शब्द काढतात, त्याप्रमाणें त्या घागऱ्यांच्या रुणझुणण्यांचा ध्वनि होता. परब्रह्माचें स्वरूप अगम्य असल्यानें श्रुतींनीं 'तें असें नाहीं, असें नाहीं' या शब्दांत वेळ मारून नेली आहे.

**ओं. २२६**—" श्रीकृष्णानें कडोसरीला खोवलेला वेणु म्हणजे परब्रह्माचा आवाजच होता, किंवा ती विश्वचैतन्याची विद्याच साकार होऊन आली होती." **वेणु**—पावा. **परिवटांमाजी**—कंडोसरीस. पहा.—" वंशीं नादतटीं तिला कटिंतटी खोवूनि पोटीं पटीं—" वामन—वनसुधा—४।३१. **नादु**—परब्रह्माचा

ध्वनि, म्हणजेच तो वेणुरव होय. **सांभववेधु**—ब्रह्मानंद, अत्यंतिक आनंद. ब्रह्मानंदाचें साकार स्वरूप म्हणजेच ती वेणु. त्या वेणूच्या स्वरानें ब्रह्मानंद प्राप्त होई, असा भावार्थ. पहा–" तया आनंदाचें आरोचक : शांभव वेधाची कुळिक :—उद्धवगीता–१७६. **सांभव**—प्रत्येक देवतेची एक विद्या आहे. यांचे प्रामुख्यानें चार थोवे केलेले आहेत. [ १ ] शांभव [ २ ] शाक्तेय [ ३ ] महाणव व [ ४ ] आणव. शांभव थोव्यांत दोन विद्यांचा अंतर्भाव होतो. एक 'समळ शांभव' व दुसरी 'शुद्ध शांभव.' 'समळ शांभव' ते विश्वेची विद्या आणि 'शुद्ध शांभव' ते चैतन्याची विद्या. या दोन्ही विद्यांना 'शांभव' म्हणण्याचें कारण असें कीं, त्या शंभूच्या म्हणजे परमेश्वराच्या जवळील देवतांच्या विद्या होत. पैकीं माया ही तर त्र्यंश परमेश्वराच्या म्हणजे शंभूच्या जवळ सार्वकाळ असते, म्हणून तिचें नांव यथार्थ आहे. पण विश्वेच्या विद्येला 'शांभव' म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, ती शांभव मायेच्या जवळ आहे.–( डॉ. कोलते–महानुभावांचें तत्वज्ञान. पृ. ३५५–३५६ ). **वेधु**—येथें ही विश्वचैतन्य विद्याच मूर्तिमंत अवतरली, असें श्रीकृष्णाच्या वेणूवरून वाटलें.

**ओं. २२७**—येथें श्रीकृष्णाच्या नाभिकमळीं असणाऱ्या भोंवऱ्याचें वर्णन केलें आहे. " श्रीकृष्णरूपी ब्रह्मांडगोलाच्या आंत येण्याजाण्याचें द्वारच जणु असें जें नाभिकमळ, त्यांवर केंसाचा भोंवरा शोभत होता." **नाभीकमळीं**—श्रीकृष्णाची बेंबी, ही श्रीकृष्णाच्या ठिकाणीं असणाऱ्या ब्रह्मांडांत येण्याजाण्याचें जणु दारच होतें. तेथे हा भोवरा शोभत होता.

**ओं. २२८**—श्रीकृष्णाच्या बेंबीपासून हृदयापर्यंत वर जाणाऱ्या रोमावळीवर कवीनें उत्प्रेक्षा केली आहे. 'मोक्षाच्या जमिनींत ब्रह्मानंदाची वेल लावावी, तशी ही रोमावळी दिसत होती. किंवा ती रोमावळी म्हणजे नाभिकमळावर मुनिजनरूपीं भ्रमरांची पंक्तीच होती जणु!' श्रीकृष्णाची बेंबी म्हणजे मोक्षाची जमीनच होती, तेथें लावलेली ही रोमावळीरूपी वेल ब्रह्मानंदाचीच असणार! अर्थात् ती रोमावळी पाहून भक्ताला ब्रह्मानंद होई असा भावार्थ! किंवा श्रीकृष्णाची नाभि हें कमळ मानल्यास, त्यावर ज्या मुनिरूपी भुंग्यांच्या झुंडी उड्या घालीत, त्यांचें निदर्शक म्हणजे ही रोमावळी! भृंगांच्या ओळी काळया असल्यामुळें, रोमावळीवर त्यांची केलेली उत्प्रेक्षा हृद्य वाटते. पहा– " नाभीस्थानीं सुखोली विकसतु भ्रमरीं सुंदरा रोमराजी "–भास्कर कविकृत ईशस्तुति.

**ओं. २२९**—आतां श्रीकृष्णाच्या पोटावरील त्रिवळीचें वर्णन. "श्रीकृष्णाच्या पोटांत जें त्रिभुवन सामावलें होतें, त्याचा आनंद त्याच्या पोटांत मावेना म्हणून या त्रिवळीनें जणु काय तो थेपवून धरला होता." ही त्रिवळी म्हणजे त्या आनंदाची मर्यादारेखा होती जणु !" **उल्लासु**—आनंद. **त्रिवळी**–स्त्रियांच्या वर्णनांतही ही त्रिवळी येते. पहा–"वलित्रयं चारु बभार बाला"–कुमारसंभव. **जेवि मर्यादा**—जणु काय या त्रिवळीनें त्या उल्लासाला बांधच घातला ! नाहींतर तो यापेक्षांही अधिक झाला असता !

**ओं. २३०**—वक्षःस्थलांचें वर्णन. "ज्या श्रीकृष्णाच्या वक्षःस्थलाचा आश्रय करतांना लावण्यश्रीला सायुज्यता मुक्ति प्राप्त झाली. सारांश त्या वक्षःस्थलाशीं लावण्यश्रीचें तादात्म्य झालें, म्हणजे जें वक्षःस्थल केवळ लावण्य होतें, त्या वक्षःस्थलावर कौस्तुभ, पदक व एकावळी हें श्रीकृष्णाचे अलंकार रुळत होते. **कौस्तुभसें**—कौस्तुभ + असें; असें दोन शब्द एकत्र केले आहेत. कौस्तुभ हा वैजयंती माळेचा मध्यमणि, चतुर्दश रत्नापैकींच आहे हें प्रसिद्ध आहे. पहा–लक्ष्मीः कौस्तुभ पारिजातक सुरा धन्वंतरीश्चंद्रमा" **एकावळी**—एकपदरी माळ.

**ओं. २३१**—"जे ( श्रीकृष्णाचे ) वीरश्रीच्या वल्लभानें, अंगीकारले आहेत व जे भक्तांना अभय देण्यांत वाखाणले आहे, ते सुंदर व सरळ ( आजानु ) असे भुजदंड शोभत आहेत." **विराश्रिया**—इ०-ज्यांनीं वीरश्री गाजविली आहे, व भक्तांना अभय देणारे म्हणून ज्यांची कीर्ति आहे, असे श्रीकृष्णाचे बाहु सुंदर व लांबसडक आहेत.

**ओं. २३२**—ज्याच्या अखंड गजरानें दैत्यांच्या समूहांना भय उत्पन्न होई, तें शिंग श्रीकृष्णानें काखेंत खोवलें आहे." **त्रासु पावती**—भय पावती. **संग**—संघ, समूह. **मुरारिमल्लें**—श्रीकृष्णानें.

**ओं. २३३**—"निळ्या आकाशांत ( पांढरी ) वीज चमकावी, त्याप्रमाणें श्रीकृष्णाच्या ( निळ्या ) खांद्यावर ( पांढरा ) फूटा शोभत होता." **फूटा**—शेला–पहा–"अवएवीं सीरे ऐसा विल्हळु : तो फुटा पांगुरविला पातळु । जैसा कळिकेवरि परिमळु । कनक–कमळांचीये ॥–नरेंद्र, रुक्मिणीस्वयंवर ४०७. **स्कंदावरी**—खांद्यावर. "श्रीमुकुटीं टोपरें ॐ ळगवीती : गोसावी फुटा प्रावर्णु करितीः"—भावे देवव्यासकृत पूजावसर ( नित्यदिनचर्या ).

**ओं. २३४**—" जो वैजयंती ( माळेनें ) एखाद्या प्रमदेप्रमाणें आलिंगिला आहे, तो श्रीकृष्णाचा तीन रेषांनीं अलंकृत असा भरदार कंठ शोभत होता." **त्रीरेखीं**-तीन वळ्यांनी. गळ्याला त्या तीन रेघा शोभा देत होत्या. **सुवृत्तु**—गोल, भरदार. **प्रमदासें**—( प्रमदा+असे. ) **वैजयंतियां**—वैजयंती माळेनें. या माळेनें एकाद्या प्रेयसीप्रमाणें श्रीकृष्णाच्या कंठाला विळखा घातला होता.

**ओं. २३५**—श्रीकृष्णाच्या मुखाचें सौंदर्य काय वर्णावें ! **वरवेंपण**—सौंदर्य. **तेआंचें इ०**—" चंद्रावर जर डाग नसता, तर तो श्रीकृष्णाच्या मुखाचा सेवक होण्यास लायख झाला असता. पण तो जर कलंकित आहे, तर त्या मुखाची चाकरी करण्याची देखील चंद्राची पात्रता नाहीं. कारण श्रीकृष्णाचें मुख निष्कलंक आहे. **लाहातां**—लाभलें असतें. **पाईकपण**—चाकरी. हा प्रतीपालंकार होईल.

**ओं. २३६**—" ज्या मुखाचें लावण्य पाहात असतां, जगाच्या डोळ्यांना तटस्थता प्राप्त होई. **तढे पडणें**—तटस्थता येणें, दृष्टि स्तिमित साभिनिवेश होणें. जगाचे डोळे त्याकडे सारखे लागत असत. **संसारतृप्तां**—संसारांत तृप्तता पावलेल्यांना देखील श्रीकृष्णाच्या मुखदर्शनानें परमानंद होई. **पांता**—पाहतां. **पडता**– पडत–एक काना यमकासाठीं जास्त दिला आहे.

**ओं. २३७**—" श्रीकृष्णाच्या प्रत्येक अवयवाच्या सौंदर्यावरून मदनाला ओवाळून टाकावा लागेल, इतके ते अवयव सुंदर होते ! मग त्या मुखासारखा भाग चंद्राच्या तरी वांट्याला कसा येणार ? मदनाची जर ही स्थिति तर चंद्राला तरी त्या मुखाचें सौंदर्य कुठलें वांटणीला यायला ? सारांश मदन व चंद्र हे सौंदर्याचे उपमानभूत असणारे देखील सौंदर्यांत कमी होते, यावरून श्रीकृष्णाच्या असामान्य सौंदर्याची कल्पना होते.

**ओं. २३८**—ज्या ( मुखां ) तलि अमृतांत घोळलेले शब्द, अज्ञानांचें पटल नाहींसे करतात, त्या श्रीकृष्णाच्या मुखकमलाचें वर्णन करतांच येणार नाहीं." **अमृतघोळिलें**—अमृतांत घोळलेले, बुडवून काढलेले, अर्थात् अत्यंत मधुर शब्द. **महा मोहाचे**—मोठ्या अज्ञानाचें. शरीर हाच आत्मा अशा मतांत दिसणाऱ्या अज्ञानाचें. **पढळ**—पटल, पडदा. ( जवनिका ). ज्या श्रीकृष्णाच्या

मुखांतल्या मधुर व ज्ञानयुक्त बोलांनीं भक्ताचें अज्ञान दूर होते, तें आदिपुरुष श्रीकृष्णाचें मुख कोण वर्णन करील ? तें अवर्णनीय आहे असा भावार्थ.

**ओं. २३९**—" गोपाळांच्या पुढें श्रीकृष्ण हास्य करीत असतां त्यांच्या शुभ्र दंतभक्तीची प्रभा सभोंवती फांकत होती. अशी ती स्वच्छ व प्रेमनिर्भर दंतकांति म्हणजे जणु ब्रह्मविद्यान्त्र." ब्रह्मविद्या अशीच स्वच्छ व सानुराग, प्रेमपूर्ण असते, म्हणून ही अध्यात्मिक उपमा देण्यांत आली आहे. **किळा**— कीळ–कांति.

**ओं. २४०**—" श्रीकृष्णाचे सुप्रसन्न व रेखीव नेत्र, त्रिभुवनाची टेहळणी करतात, व तें ( नयन ) कानांत एकादी गोष्ट सांगण्यासाठीं कानाकडे जातात," असें भासतात. सारांश श्रीकृष्णाचे डोळे आयत आहेत, किंवा आपांग आहेत असा भाव. आपांगनेत्र हें सौंदयाचें लक्षण आहे. **श्रवण**–कानांना सांगायला जातात, कानापर्यंत पोंचतात. **जैसें इ०**–ज्याप्रमाणें एका गोष्ट कानांत सांगावी त्याप्रमाणें. **मातु**–गोष्ट ( कानडी ).

**ओं. २४१**—आतां श्रीकृष्णाच्या भुंवयांचें वर्णन करतात. " ज्यांच्या केवळ विक्षेपानें जग निर्माण होतें व नाहींसे होतें, त्या ( श्रीकृष्णाच्या ) धनुष्याकृति भुंवया शोभतात." श्रीकृष्णानें नुसती भुंवयांची खूण केली, कीं जग निर्माण तरी व्हावें किंवा नाश तरी पावावें ! ही श्रीकृष्णाची सृष्टिरचनेची अगर संहाराची लीला ज्या भुंवयांच्या हालचालीनीं दर्शविली जाते, त्या भुवयां फारच सुंदर आहेत. **लीलानुकारें**—लीलेलें ( सहज ) केलेल्या विक्षेपानें, हालचालीनें. **धनुषाकारें**—धनुष्याच्या आकाराच्या भुंवया सुंदर म्हणून प्रसिद्ध आहेत. प्रो. फडक्यांच्या ' दौलत ' कादंबरीच्या नायिकेच्या भुंवया अशाच आहेत.

**ओं. २४२**.—" श्रीकृष्णाच्या कानांत कमलांच्या कळ्या असून त्यांत ( लाल ) गुंजा खोवल्या होत्या. तें पाहून रत्नें देखील हलकीं वाटतात." **कर्णिका** कलिका. पहा–' जे स्थिर करावी चीत्त–कर्णिकाः माझां ठाईं "–उद्धवगीता–६६६. **खेवनी**—खोवनी, खोचणी, जडणी. **ठेंगणी होणें**—हलकीं, कमी किंमतीची वाटणें. **माजी**—मध्यें.

**ओं. २४३**.—यांतील कल्पना अत्यंत मनोहर आहे. श्रीकृष्णाच्या कपाळीं अर्धचंद्राकृति टिळा होता. त्याचे काळे कुरळे केंस हे जणु एक भ्रमरांची ओळच

असून, ती श्रीकृष्णाच्या मुखकमलाच्या सुवासाला लुब्ध झाली होती. भृंग हे कमलाला नेहमींच लुब्ध असतात. सारांश श्रीकृष्णाचे सुंदर कुरळे केस मुखावर लोळत होते, असा भाव. पहा-" लोळत कच मुखमधुवरि । त्यासि तोचि कर निवारी ।-विद्याहरण, खाडिलकर. **कुरळें**—कुरळे केस.

**ओं. २४४.**—" श्रीकृष्णाच्या डोक्यावरील मोरपिसांजवळच पाणीदार मोत्यांचीं टोपरें होतीं. त्याच्या केसांच्या झुंबाळ्यांत जाईचीं फुलें व केवड्याची पानें गुंफलीं होतीं." **निहटीं**—जवळ. **वेटीं**—टोपरें. पहा-' डोइये मोरपिसांची वेंटीः पीलीचें नेसला होताः-गोविंदप्रभुचरित्र-१५४. **रुळतिअे वीरगंठीं**—पाठीवर रुळणाऱ्या ( इकड तिकडे हलणाऱ्या ) केसाच्या झुंबाळ्यांत. पहा-तंव आबैसीं श्रीमुगुटु वांचुरीला : वीरगुंठी घातली :-गोविंदप्रभुचरित्र-१८५. **विरलीं**—गुफलीं. **जाति**—जाईचीं फुलें. **केतकीदळें**—केवड्याचीं पानें.

**ओं. २४५**—जो श्रीकृष्ण गुणांचें व सौंदर्याचें भांडार आहे, व जो त्रिभुवनांत सुंदर आहे, तो माझ्यासारख्या यःकश्चित् माणसाकडून एका जिभेनें वर्णन करणें शक्य नाहीं. **रसनु**—रसना-जीभ. सहस्र जिव्हांचा शेष सुद्धां वर्णू शकेल किंवा नाहीं याची जेथें शंका, तेथें एका जिभेच्या माणसाकडून हें काम कसें होणार ? असा ध्वन्यर्थ.

**ओं. २४६—श्रीचक्रधरू**—श्रीकृष्ण. **आरोगन**-भोजन. ब्रह्मादि देवांना असा अपूर्व भोजनसमारंभ पाहण्याचा प्रसंगच लाभला नव्हता. **अवसरू**—प्रसंग. म्हणून ते आकाशांत हा समारंभ पहात राहिले. **पांतु ठेलें**-पाहत राहिले.

**ओं. २४७**—श्रीकृष्णाचें पंक्तींतल्या गोपाळांसह जें भोजन होई, तितकी गोडी प्रत्यक्ष अमृतालाही नसे. त्यावेळीं ' अन्न हेंच ब्रह्म ' हें वेदवचन श्रीकृष्णांनीं खरें करून दाखविलें." **पांतिकरां** —पगंत करणाऱ्यासह. त्या अन्नाला जी गोडी आली, ती श्रीकृष्णाच्या सांनिध्यामुळें आली व श्रीकृष्ण तर परब्रह्मच होता, त्यामुळें परब्रह्मामुळें अन्नाला गोडी येते, म्हणजे अन्न हेंच परब्रह्म आहे, अशी सर्वांना प्रतीति आली. **हें वचन**—" अन्नं ब्रह्मेति व्यजानात् " हें उपनिषद्वाक्य.

**ओं. २४८**—देव देखील स्वर्गांत अमृत पितात, ( पण त्यानें त्यांचें जन्ममरण कांहीं चुकत नाहीं ); तें चुकविण्यासाठीं त्यांना श्रीकृष्णाची कृपाच मिळवावी

लागते. श्रीकृष्णाच्या कृपाप्रसादानेंच देवांना मोक्ष मिळतो, अमृतापासून कांहीं तो मिळत नाहीं. मग अशा अमृतपानांत अर्थ काय ? त्यापेक्षां गोपाळांशीं केलेल्या श्रीकृष्णाच्या पंक्तिलाभानेंच वास्तविक मोक्ष मिळेल. अमृत पिणाऱ्या देवांची स्थिति, श्रीकृष्णाशीं वनभोजन करणाऱ्या गोपाळांहून मुळींच स्पृहणीय नाहीं, हें येथें स्पष्ट केलें आहे.

**ओं. २४९**—देवांना गोपाळांच्या भाग्याचा हेवा वाटतो. गोपाळांचें भाग्य पाहून देव आपणालाच धिःक्कारूं लागले, व म्हणूं लागले कीं, 'हा मुगुटांचा अलंकार टाकून गोपाळांतच रांगूं या.' **सदैवपण**—भाग्य. **आपणपें**—आपल्याला. 'पें' हा द्वितीयेचा प्रत्यय आहे. देवांनीं स्वतःचाच धिकार केला. **मुगुटांचे भूषण**—आपला मुगुट घालून मिरविण्याचा व्यर्थ मोठेपणा टाकून देऊन, लहान होऊन गोपाळांत रांगावें, असें देव म्हणूं लागले. गोपाळांत रांगण्यानें श्रीकृष्णाचें सांनिध्य लाभून जसा तात्काळ मोक्ष मिळतो, तसा स्वर्गांत देव होऊन मिळत नाहीं, हें देवांच्या लक्षांत आलें.

**ओं. २५०**—देवांचे विचार आणखी दिले आहेत. देवांना पृथ्वीवरील श्रीकृष्णभक्तींत वाढलेले गोपाळ व पशुपक्षी आपल्यापेक्षां कितीतरी धन्य वाटतात ! "या श्रीकृष्णाच्या पायांचें जर सांनिध्य लाभेल, तर आम्हींही हा संसार–सागर तरून जाऊं. पशुपक्ष्यांना जी सिद्धी ( मोक्ष ) गोकुळांत मिळते, ती देव होऊनही आम्हांला प्राप्त होत नाहीं." अशी ही देवांच्या मनाची रुखरुख आहे. महानुभावपंथाच्या मताप्रमाणें संसार हा दुःखमय असल्यामुळें, त्याच्यापासून कायमची सुटका होण्यासाठीं मनुष्यानें अशा पुनरावृत्तिरहित पदाचा–मोक्षपदाचा–शोध केला पाहिजे. हें पद एका परमेश्वराचेंच ( श्रीकृष्णाचेंच ) असतें. इतर देवदेवतांचीं पदें तशीं पुनरावृत्तिरहित नसतात. म्हणून इतर देवदेवता परमेश्वराहून खालच्या मानल्या आहेत. **तिर्यंचे**—वांकड्या गतीनें व सरपटत जाणारे प्राणी. ( अघासुरासारखे सर्प ). **सिद्धी**—मोक्षपद.

**ओं २५१**—"या मोक्षपद देणाऱ्या श्रीकृष्णाशिवाय जन्ममरण बंद पडणार नाहीं. म्हणून सर्व भावांनीं ( अष्ट सात्विक भावपूर्वक ) यालाच शरण जाऊं या." अशी देवांची विचारसरणि आहे. इंद्रादि देव, स्वर्गनरकादि पदें देतात, पण कैवल्यपद एकटा परमेश्वरच देतो, असा महानुभावांचा सिद्धांत आहे. **पारुखेना**—कुंठित होत नाहीं, बंद पडत नाहीं. पहा–"एक तळिएचां अभंगीं :

राहिली ते तन्वांगीं : पुणु झाडाचा नाचु तिये रंगीं : पारुखेचि नां ॥–उद्धवगीता–४६३. **रीगों**—जाऊं. पहा–“ सद्गुरुचरणि शरण रिगोनी मरणां मारुया. ” ॥–पदसंग्रह. **आगमन**—जन्ममरणाची यातायात.

**ओं. २५२**—“ आपण देव आहों म्हणून आम्हाला श्रीकृष्णाची सेवा करण्याचा अधिकार नाहीं. नाहींतर याची सेवा करून आम्हीं देखील हा संसारसागर खात्रीनें तरून गेलों असतों,” अशी देवांची हळहळ. आपण व्यर्थ देव झालों, हा मोठेपणा फुकट होय, असा त्यांचा भाव. महानुभाव तत्त्वज्ञानाचा असा सिद्धांत आहे कीं, इंद्रादि देवता जरी सदोदित परमेश्वराच्या दर्शनाची आकांक्षा धरीत असल्या, तरी त्यांना परमेश्वराचें दर्शन मागें कधीं झालें नाहीं व पुढेंही कधीं होणार नाहीं. म्हणून या देवता अनादि कालापासून ईश्वराहून वेगळ्या आहेत व त्या नेहमीं तशाच राहणार. पंडित दामोदरानें महानुभावपंथाची दीक्षा घेतली असल्यानें, त्यानें देवतांच्या तोंडीं असे त्या पंथाच्या तत्त्वज्ञानाचे उद्गार घालणें साहजिकच आहे. **ऊ्ळगावेआ**–सेवा करण्यास. **निभ्रांति**–निश्चयपूर्वक, खात्रीनें.

**ओं. २५३**—देवांच्या मनांत त्या वनभोजनप्रसंगांत सामील होऊन श्रीकृष्णाचें उष्टें अन्न मिळविण्याची व त्याचें सान्निध्यसुख घेण्याची प्रबळ इच्छा आहे. पण त्यांच्या ‘ देवपणामुळें ’ त्यांना तें शक्य नाहीं. म्हणून ते म्हणतातः– “ श्रीकृष्णाचें उष्टें ( अन्न ) मिळवायला जर आम्हापुढें एवढ्या अडचणीं आहेत, तर त्याच्या सेवेची आम्ही इच्छा कशी धरायची ? म्हणून त्याच्या कृपेशिवाय या भोजनसमारंभांत आपणहून शिरूं नये हेंच उत्तम ! ” देवांनीं असा सूज्ञ विचार केला आहे. **उसिटें**—उष्टें–उषिटे–उसिटे. ‘ ष ’ व ‘ टे ’ मध्यें ‘ इ ’ हा वर्णागम होऊन, ‘ ष ’ चा ‘ स ’ झाला आहे. **आसु**—आस, इच्छा. **ययांची**—श्रीकृष्णाच्या.

**ओं. २५४**—येथून ब्रह्मदेवाचा विस्मय वर्णन केला आहे. खरा कथेला प्रारंभ या ओंवीपासून झाला असें म्हणतां येतें. “ अघासुराला श्रीकृष्णानें मोक्ष दिला हें पाहून ब्रह्मदेवाला विस्मय, आश्चर्य वाटलें. त्यांतून पुनः देवांचे हे ( वर वर्णन केलेले ) शब्द ऐकून तो म्हणाला.” अघासुरासारख्या क्षुद्र सरपटणाऱ्या प्राण्याला व त्यांतूनही शत्रूला ( मारून ) श्रीकृष्णानें मोक्ष दिला, याचें ब्रह्मदेवाला

आश्चर्य वाटलें. त्यांत पुनः देवांनीं श्रीकृष्णाच्या गोकुळांतील जीवनाच्या केलेल्या वर्णनानें भरच पडली.

**ओं. २५५**—ब्रह्मदेव म्हणतो, " हा ( श्रीकृष्ण ) मोक्ष देण्यासाठींच पृथ्वीवर अवतरला आहे, अशी वार्ता माझ्या कानावर आली. तें प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहाण्यासाठींच मी आलों! तर खरोखर मी आश्चर्यच पाहिलं!" श्रीकृष्णानं तसा अवतार खरंच घेतल्याचं ब्रह्मदेवाला दिसून आलं! **ध्वनी**—वार्ता. **आलां**—आलों. **बळ**—सामर्थ्य, महिमा.

**ओं. २५६**—" कुठें तें गोपाळ वेषानें ( श्रीकृष्णाचें ) खेळणें, व कुठें तें अघासुराला मोक्ष देणें? हें ( श्रीकृष्णाचें अद्भुत कृत्य ) म्हणजे आम्हां देवांना निवळ भुलविणें आहे. हा ( श्रीकृष्ण ) पुरुष सामान्य दिसत नाहीं. ( हा खरा अवतारी आहे )." गोपाळासह खेळणें व अघासुराला मोक्ष देणें या कृत्यांत ब्रह्मदेवाला विरोध दिसला. सामर्थ्यशाली पुरुषांच्या वर्तनांत असाच विरोध असतो. म्हणून श्रीकृष्ण हा अलौकिक आहे असें ब्रह्मदेवानें म्हटलें. या ओंवींतील 'कें' 'कें' नीं केलेली वाक्यरचना संस्कृतांतील 'क्व क्व' या वाक्यरचनेप्रमाणेंच आहे. पहा—" क्व वयः क्व परोक्षमन्मथो मृगशावैः सममेधितो जनः!"—कुमारसंभव.

**ओं. २५७**—आतां श्रीकृष्णाची परीक्षा पाहण्यासाठीं ब्रह्मदेव वासरें चोरून नेण्याचा विचार करतो. यावरूनच प्रस्तुत काव्याला 'वच्छहरण' असें नांव दिलें आहे. श्रीकृष्णाचा हा अवतार त्याच्या मागील अवतारांप्रमाणेंच आहे, कीं त्यांत कांहीं नावीन्य आहे, याची ब्रह्मदेव परीक्षा करूं इच्छितो. **निरधारूं**—निर्धार, खरेपणा. **नवाइ**—नवीनपणा, नाविन्य. **सें**—असें.

**ओं. २५८**—" ज्यावेळीं मोक्षदाता श्रीकृष्ण भोजनानंदांत गर्क होता, त्यावेळीं ( इकडे ) ब्रह्मदेवानें या[illegible]णें मनाशीं ठरविलें." **निर्धारिलें**—निश्चित केलें. **सत्यलोकींचेनि**—सत्यलोकाच्या पतीनें, अर्थात् ब्रह्मदेवानें. **जाली प्रवृत्ती**—इच्छा झाली. **आरोगणविनोदीं**—भोजनानंदांत निमग्न होण्याची इच्छा झाली, भोजन करण्याची इच्छा झाली.

**ओं. २५९**—" सर्व गोपाळ श्रीकृष्णाच्या प्रसादाचें जेवण मिळालें म्हणून आनंदून, देहभान विसरून गेले होते. इतक्यांत श्रीकृष्णही वासरें कुठें आहेत तें

पाहायला निघाले.” **मी माझेंपण**—स्वतःला विसरून जाण्याइतके तन्मय झाले, देहभान विसरले.

**ओं. २६०**—( इकडे ) वासरं चरत चरत लांब गेलीं, व तेथून तीं ब्रह्मदेवानं हरण केलीं. ( वास्तविक श्रीकृष्णाला हें सर्व अंतर्ज्ञानानें ठाऊक होतेंच ) पण त्यानें आपणास यांतलें कांहीं ठाऊक नसल्याचें नाटक, बहाणा केला, व वासरांच्या शोधार्थ तो सभोवतीं पहात राहिला. **चरते चरितें**—चरत चरत. **सर्वज्ञनाथें**—श्रीकृष्ण, जो ज्ञानियाचा केवळ राजा आहे त्यानें. **नटणा**—नाटक, बहाणा.

**ओं. २६१**—( श्रीकृष्ण वासरांना शोधतो ) इतक्यांत दुसरीकडे ब्रह्मदेवानें भोजन करीत असलेले गोपाळही हरण केले, आणि श्रीकृष्ण जेव्हां यमुनेच्या काठीं परत आले, त्यावेळीं गोपाळही गेलेले त्यांना दिसले. गोपाळही त्यांना कुठं दिसेनात. **चतुराननु**-ब्रह्मदेव. **मागौते**-परत. **दखती**-देखती. वासरां-प्रमाणेंच गोपाळांचेंही हरण झालेलें त्यांनीं पाहिलें.

**ओं. २६२**—ज्या ईश्वराच्या केवळ इच्छामात्रेंकरून कोटी ब्रह्मदेव उत्पन्न व्हावेत, त्याला तीं वासरें परत आणण्यांत श्रम ते काय असणार ? कोटी ब्रह्मदेव निर्माण करण्याचें सामर्थ्य ज्याच्या अंगांत आहे, त्याला ब्रह्मदेवानें हरण केलेलीं वासरें परत आणणें काय अवघड होतें ? **कोडीं**-कोटी संख्या. **प्रवृत्तीं**-इच्छेनें. **सायास**-श्रम.

**ओं. २६३**—पण श्रीकृष्णाचा उद्देश निराळाच होता. “ब्रह्मदेवाला जरा फसवावा, आपण एक अद्भुतकृत्य करून दाखवावें, व आपल्या परब्रह्मस्वरूपाचा अनुभव गोपाळांना व वासरांनाही घडवावा”, हा त्याचा मुख्य उद्देश होता. **पवाडा**—कीर्ति, अद्भुत कृत्य. **संबंध**—सांनिध्य, समागम.

**ओं. २६४**—“ या कारणासाठीं श्रीकृष्णानें अज्ञान पांघरलें. पण इतक्यांत ब्रह्मदेव आपल्या सत्यलोकाला निघून गेला, व आपण हरण केलेलीं गोप-वासरें श्रीकृष्णाच्या घरची [ देवाघरची ] म्हणून त्यानें त्यांना मोठ्या सुखांत ठेवलें.” **सुरवाडु करणें**-सुखांत ठेवणें. **राऊळींचीं**—देवाची, राजमंदिरींची.

**ओं. २६५**—ब्रह्मदेवानें वासरें सत्य लोकाला म्हणजे ब्रह्मपदाला कां नेलीं, यावर कवीनें येथून २६८ ओंवीपर्यंत, उत्प्रेक्षा केल्या आहेत. वास्तविक श्रीकृष्णा-

जवळच्ीं वासरें सत्यलोकाला जाण्यांत त्यांची अधोगतिच होती. कारण श्रीकृष्णाच्या सांनिध्यांतून ब्रह्मदेवाजवळ जाण्यांत, म्हणजे कैवल्य (मोक्ष) पदापासून ब्रह्मदेवासारख्या दुय्यम देवाच्या लोकीं जाण्यांत, तीं (वासरें) वरच्या पायरींवरून खालच्या पायरीवरच उतरलीं होतीं! म्हणून कवि म्हणतो, "मला तर निराळेंच वाटतें! श्रीकृष्णाचें सांनिध्यसुख उपभोगीत असतां, या त्यांच्या सुखांत कांहीं व्यत्यय आला असावा, म्हणूनच त्यांना असें (सत्यलोकीं जाण्याचें) हलकें फल मिळालें." श्रीकृष्णाचें सान्निधानसुख जर त्या वासरांना अखंड लाभलें असतें, तर त्याचा हा असा अधःपात झाला नसता!

**ओं. २६६**—"किंवा ईश्वरत्व प्राप्त झाल्यावर पशूंना तिन्हीं लोकांत संचार करतां येतो, हें आपलें सामर्थ्य श्रीकृष्णांनीं दाखविलें," यासाठीं तीं वासरें ब्रह्मदेवाच्या सत्यलोकांत गेलेलीं होती अशी कल्पना! त्या वासरांना श्रीकृष्णाच्या सान्निध्यानें ईश्वरत्व प्राप्त झालेंच होतें, व म्हणून तीं पशू असूनही त्यांना कोणत्याही लोकांत संचार करता येतो, हें आपलें अद्भुत सामर्थ्य नारदादि भक्तांना दाखविण्यासाठींच श्रीकृष्णांनी जणु हा सत्यलोकीं वत्सहरणाचा देखावा दाखविला, अशी कविकल्पना! **ईश्वराचेंपण**—ईश्वरत्व. "माझ्या कृपेंतले पशु देखील त्रिभुवनांत संचार करूं शकतात," हा आपला महिमाच जणु श्रीकृष्णांनीं या वत्सहरणप्रसंगानें दाखविला!

**ओं. २६७.**—"किंवा या वासरांना परब्रह्माचें (वस्तूचें) सांन्निध्य लाभलें होतें, म्हणून त्यांना सिद्धावस्था अथवा ब्राम्ही स्थिती प्राप्त झाली होती." वासरांना श्रीकृष्णरूपी परब्रह्माचें निकटत्व लाभलें, त्याचें फल जी सिद्धावस्था, म्हणजे परब्रह्मांत मिळून जाण्याची स्थिति, ती तर त्यां वासरांना प्राप्त झालीच होती. पण या अत्युच्च स्थितीला पोंचतांना, मध्यंतरीचा जो ऋद्धि-सिद्धींचा टप्पा, तो उपभोगण्यासाठींच जणु काय त्या वासरांना सत्यलोकाला नेण्यांत आलें होतें. श्रीकृष्णाच्या सान्निध्यानें त्या वासरांना कैवल्यपद (ब्रह्मी स्थिति) मिळालेंच होतें. पण आतां तीं सत्यलोकाला गेलीं याचा अर्थ असा कीं, त्या कैवल्यपदाच्या अगोदरचा जो ऋद्धिसिद्धि उपभोगण्याचा टप्पा, तो त्यांनीं गांठला होता. वास्तविक हाही त्यांचा अधःपातच होता. कारण ब्राम्हीस्थिति ज्यांना प्राप्त झाली आहे, त्यांना ही रिद्धिसिद्धींची-अद्भुत चमत्कार करून दाखविण्याची-ही मधली पायरी महत्त्वाची वाटत नाहीं. खरा ब्राम्हीस्थिति प्राप्त करून घेणारा योगी, ऋद्धिसिद्धी-

**ओं. २७१**—" जेथें परमात्म्याचा अवतार होतो, तेथील प्राणिमात्रांना दुःख मुळींच ठाऊक नसतें. त्याच्या दृष्टीपुढें संसाराच्या धर्मांना थारा नाहीं." श्रीकृष्ण हा परमात्म्याचाच अवतार गोकुळांत झाल्यामुळें, तेथील गोप-वासरांना दुःखाचा वारा लागत नव्हता, व श्रीकृष्णाची दृष्टि सतत त्यांच्यावर असल्यानें, त्या दृष्टीच्या प्रभावानें जन्ममरणादि संसारधर्मांना मग त्या गोकुळांतील गोपाळ-वासरांत जागाच नव्हती. सारांश तीं गोप-वासरें मोक्षपदाला पोंचलीं होतीं, असा भाव. **भूत-ग्रामां**—भूतांचा समूह, प्राणिमात्र. **संसारधर्मां**—जन्ममरणाच्या फेऱ्यांना. **रीगावा**—शिरकाव.

**ओं. २७२**—" श्रीकृष्णाबद्दल ऐकवाऐकवीच्या गोष्टीवरून जे त्याच्याबद्दल कल्पना करतात, ते मायेच्या मोहांत सांपडून बुडतात. पण ब्रह्मानंदाचा समुद्र अशा श्रीकृष्णाची जे कोणी प्रत्यक्ष सेवा करतात, ते मात्र जीवन्मुक्त, जीवंतपणीच मोक्षाचे अधिकारी होतात." ऐकवाऐकवीचें ज्ञान हें अन्यथा व मिथ्या ज्ञान असतें, व अशा मिथ्या व खोट्या ज्ञानावर आधारून जर श्रीकृष्णाबद्दल कल्पना लढविल्या, तर अशा कल्पना लढविणारे लोक कायमचेच अज्ञानांत बुडून जातात. पण श्रीकृष्णाची प्रत्यक्ष सेवा करणारे मात्र मोक्षाला जातात. सारांश शाब्दिक मिथ्या ज्ञानापेक्षां, सगुण भक्तीच अधिक फलदायी आहे, असा भाव.

**ओं. २७३**—" देव मुळांतच सर्वांच्या ठिकाणीं आहे, त्यांतून पुनः प्रत्येक गोपाळाच्या ठिकाणीं असण्याचें त्यानें मनांत आणलें. मग तितक्या गोपाळांचीं रूपें घेऊन तो खेळला, यांत त्यानें नवल तें काय केलें ?" श्रीकृष्ण हा सर्वगत, सर्व भूतमात्रांत आहेच. मग सांप्रत त्यानें ( ब्रह्मदेवानें हरण केलेल्या ) गोपाळांचीं रूपें घेतलीं, यांत आश्चर्य वाटण्यासारखें काय आहे ? सर्वगामी असण्याचा देवाचा जो मूळचा गुणधर्म, तोच सांप्रत त्यानें कृतीनें दाखविला. यांत त्याच्या दृष्टीनें नाविन्य असें कांहीं नाहींच. अशीं रूपें घेणें हा त्याचा नित्याचाच धर्म असल्यानें, त्यांत नाविन्य कांहीं नाहींच, असा भाव.

**ओं. २७४.**—" वत्सांची व गोपाळांचीं रूपें घेतांना, ज्याचा जसा स्वभाव, वागणूक, व आकृति होती, त्या त्याप्रमाणें श्रीकृष्णानें एकसमयावच्छेदानें त्यांचीं रूपें घेतलीं." इतक्या भिन्न भिन्न आकृति व स्वभाव त्या गोप-वासरांचे असतां, एकट्या श्रीकृष्णानें एकसमयावच्छेदानें सर्वांचीं रूपें घेतलीं, यावरून " एकं सद्विप्रा बहुधा वदंति " या वेदवचनाची त्यानें सत्यता पटवून दिली.

वरच संतुष्ट राहत नाहीं. तसेंच या वासरांचें झालें असा भावार्थ. **वस्तूची**—परब्रह्माची. **जवळीक**—सांनिध्य. **सिद्धावस्ता**—ब्राम्हीस्थिति, जीवन्मुक्तावस्था. **ऋद्धि**—ऐश्वर्य, समृद्धि. पहा–" कां तपोबळें ऋद्धी । पातलियां भ्रंशे बुद्धी "–ज्ञाने. १।१८८. कैवल्यपदापेक्षां इतर देवतांचीं पदें कमी दर्जाचीं आहेत, असा महानुभावांचा सिद्धांत आहे. वासरांना मिळालेलें हें सत्यलोकपद ऋद्धिसिद्धि देणारें असलें, तरी कैवल्यपदाच्या अपेक्षेनें तें खालचेंच आहे.

**ओं. २६८**—गोकुळांतील वासरें, ब्रह्मदेवानें आपल्या सत्यलोकाला कां नेलीं, यावर कवि आणखी अध्यात्मिक उत्प्रेक्षा करतो. " किंवा जे कोणी श्रीकृष्णाचें उष्टें भक्षितात, ते ब्रह्मादि देवांना वंद्य होतात. गोपाळांनीं श्रीकृष्णाचें उष्टें खाल्लेंच असल्यानें, ते ब्रह्मदेवाला वंद्य झाले, व म्हणूनच ते (गोपाळ) सांप्रत सत्यलोकाचा उपभोग घेत आहेत. आतां यानंतर शेवटीं त्यांना कैवल्यपद मिळणारच आहे." गोपाळ हे श्रीकृष्णाचें उष्टें सेवन करतात, त्यामुळें ते ब्रह्मादि देवतांना जसे वंद्य होतात, तसे ते मोक्षाचे अधिकारीही झालेले आहेत. पण शेवटीं त्या मोक्षपदाला जातांना त्या अगोदरचा जो सत्यलोकचा टप्पा, तो ते (गोपाळ) सध्यां उपभोगीत आहेत. आणि म्हणून ते ब्रह्मदेवाकडून तेथें नेले गेले आहेत, असा अर्थ. सारांश हे गोपाळ आज जे सत्यलोकांत आहेत, ते जणुकाय कैवल्यपदाच्या खालच्या पायरीवरच, आहेत. कैवल्यपदाच्या अपेक्षेनें सत्यलोक कमी दर्जाचा. **उसिटे**–उष्टे. **साहानुक**–सांप्रत. **सेखीं**–शेवटीं.

**ओं. २६९**—पंडित दामोदराला आपण ग्रंथविस्तार करतो याची जाणीव आहे. **आर्त**—पीडित भक्तजन. **आदिपुरुषाचा**—श्रीकृष्ण हा महानुभाव मताप्रमाणें परब्रह्माचाच अवतार होता.

**ओं. २७०**—" गाई चारून संध्याकाळीं गोकुळाला परत जाण्याची वेळ झाली (व इकडे तर गोप व वासरें जाग्यावर नाहींत) असें पाहून श्रीकृष्ण स्वतःच ते (ब्रह्मदेवानें नेलेले) गोपाळ व वांसरें झाला. नाहींतर वासरें व आपलीं मुलें (संध्याकाळीं) परत आलीं नाहींत म्हणून गाईचें व गोपाळांच्या आयांचें मन अत्यंत दुःखित झालें असतें." पण श्रीकृष्णानेंच ह्या गोपवासुरांचीं रूपें घेतल्यानें खरा प्रकार उघडकीस आला नाहीं, व गाई व गोपाळांच्या आया दुःखित झाल्या नाहींत. जणु काय कांहींच घडलें नाहीं अशी त्यांची समजूत होती! **निन्हां**—पहा ओं. २५ टीपा.

**ओं. २७१**—" जेथें परमात्म्याचा अवतार होतो, तेथील प्राणिमात्रांना दुःख मुळींच ठाऊक नसतें. त्याच्या दृष्टीपुढें संसाराच्या धर्मांना थारा नाहीं." श्रीकृष्ण हा परमात्म्याचाच अवतार गोकुळांत झाल्यामुळें, तेथील गोप–वासरांना दुःखाचा वारा लागत नव्हता, व श्रीकृष्णाची दृष्टि सतत त्यांच्यावर असल्यानें, त्या दृष्टीच्या प्रभावानें जन्ममरणादि संसारधर्मांना मग त्या गोकुळांतील गोपाळ-वासरांत जागाच नव्हती. सारांश तीं गोप–वासरें मोक्षपदाला पोंचलीं होतीं, असा भाव. **भूत–ग्रामां**—भूतांचा समूह, प्राणिमात्र. **संसारधर्मां**—जन्ममरणाच्या फेऱ्यांना. **रीगावा**—शिरकाव.

**ओं. २७२**—" श्रीकृष्णाबद्दल ऐकवाऐकवीच्या गोष्टीवरून जे त्याच्याबद्दल कल्पना करतात, ते मायेच्या मोहांत सांपडून बुडतात. पण ब्रह्मानंदाचा समुद्र अशा श्रीकृष्णाची जे कोणी प्रत्यक्ष सेवा करतात, ते मात्र जीवन्मुक्त, जीवंतपणीच मोक्षाचे अधिकारी होतात." ऐकवाऐकवीचें ज्ञान हें अन्यथा व मिथ्या ज्ञान असतें, व अशा मिथ्या व खोट्या ज्ञानावर आधारून जर श्रीकृष्णाबद्दल कल्पना लढविल्या, तर अशा कल्पना लढविणारे लोक कायमचेच अज्ञानांत बुडून जातात. पण श्रीकृष्णाची प्रत्यक्ष सेवा करणारे मात्र मोक्षाला जातात. सारांश शाब्दिक मिथ्या ज्ञानापेक्षां, सगुण भक्तीच अधिक फलदायी आहे, असा भाव.

**ओं. २७३**—" देव मुळांतच सर्वांच्या ठिकाणीं आहे, त्यांतून पुनः प्रत्येक गोपाळाच्या ठिकाणीं असण्याचें त्यानें मनांत आणलें. मग तितक्या गोपाळांचीं रूपें घेऊन तो खेळला, यांत त्यानें नवल तें काय केलें ?" श्रीकृष्ण हा सर्वगत, सर्व भूतमात्रांत आहेच. मग सांप्रत त्यानें ( ब्रह्मदेवानें हरण केलेल्या ) गोपाळांचीं रूपें घेतलीं, यांत आश्चर्य वाटण्यासारखें काय आहे ? सर्वगामी असण्याचा देवाचा जो मूळचा गुणधर्म, तोच सांप्रत त्यानें कृतीनें दाखविला. यांत त्याच्या दृष्टीनें नाविन्य असें कांहीं नाहींच. अशीं रूपें घेणें हा त्याचा नित्याचाच धर्म असल्यानें, त्यांत नाविन्य कांहीं नाहींच, असा भाव.

**ओं. २७४.**—" वत्सांची व गोपाळांचीं रूपें घेतांना, ज्याचा जसा स्वभाव, वागणूक, व आकृति होती, त्या त्याप्रमाणें श्रीकृष्णानें एकसमयावच्छेदानें त्यांचीं रूपें घेतलीं." इतक्या भिन्न भिन्न आकृति व स्वभाव त्या गोप–वासरांचे असतां, एकट्या श्रीकृष्णानें एकसमयावच्छेदानें सर्वांचीं रूपें घेतलीं, यावरून " एकं सद्विप्रा बहुधा वदंति " या वेदवचनाची त्यानें सत्यता पटवून दिली.

**ओं. २७५.**—" एकटा श्रीकृष्ण अनेक गोपाळ व वासरें कसा झाला ? ' अशी अज्ञानी लोक जर शंका घेतील, तर ( तिचें समाधान असें कीं ) एकच चंद्र शंभर घटांमध्यें प्रतिबिंबित होतोच." आकाशांत प्रकाशमान होणारा एकटाच चंद्र, खालीं पृथ्वीवर ठेवलेल्या शंभर पाण्याच्या घागरींत जसा प्रतिबिंबित झालेला दिसतो, तसा एकटा श्रीकृष्ण परमात्मा, हा गोपाळ–वासरांच्या शरीरांत प्रतिबिंबित झाला, असें मानतां येतें. आत्मा–परमात्म्यांचा हा बिंबप्रतिबिंबभाव, या चंद्र-घटांच्या दृष्टान्तानें मांडण्यांत आला आहे. या दृष्टान्तावरून श्रीकृष्ण प्रतिबिंबरूपानें प्रत्येक गोप–वासरांत वावरल्यास नवल नाहीं. परमात्मा एकच असून तो अशा रीतीनें अनेक होऊं शकतो याची ही उपपत्ति आहे. **शशांकु**—चंद्र.

**ओं. २७६**—" ज्याप्रमाणें मण्यांच्या ओळींत एकच दोरा असतो, किंवा मेघांची ओळ एकाच आकाशांत असते, त्याप्रमाणें अनेक प्राणिमात्रांत हा परमेश्वर असतो, किंवा हे प्राणिमात्र त्याच्या ठिकाणीं असतात." मणि–तंतु या दृष्टान्ताप्रमाणें अनेक प्राणिमात्रांत एक परमेश्वर असतो हा सिद्धांत, तर आकाश–मेघावली या दृष्टांताप्रमाणें एकाच परमेश्वराच्या ठिकाणीं अनेक प्राणिमात्र असतात हा सिद्धांत सिद्ध होतो. **मणिगणीं** इ.–पहा–" सूत्रे मणिगणा इव–" या भगवद्गीतेच्या वचनाचाच हा अनुवाद आहे. " यथा आकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान्। तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय " ॥ ६ ॥ या गीतेच्या नवव्या अध्यायांतील श्लोकांत, या ओंवींतलीच कल्पना स्पष्ट केली आहे.

**ओं. २७७**—" पण वेदांनाही ज्या प्रश्नाचा निर्णय करणें कठीण झालें, तो निर्णय कोण करणार ? जेव्हां आदिगुरु श्रीकृष्ण कृपा करील, त्यावेळीं हा ( एक परमेश्वर अनेक कसा झाला ) संशय फिटेल." पंडित दामोदरानें हा कूट प्रश्न सगुण भक्तीच्या उत्तरानेंच सोडविण्याचा प्रयत्न केला आहे.

**ओं. २७८**—" ज्याच्या ( श्रीकृष्णाच्या ) घरचे कामकरी चाकर देखील आपणहून ब्रह्मांडें निर्माण करतात, त्या ( श्रीकृष्णानें ) वासरांचीं रूपें धारण केलीं यांत विशेष तें काय ? " ब्रह्मदेवादि देवता या श्रीकृष्णाच्या अपेक्षेनें कमीच असल्यानें, त्यांना त्याच्या घरचे कामारी असें संबोधलें आहे. असे हे ब्रह्मादिदेव जर आपापलीं सत्यलोक, वैकुंठ, कैलास, स्वर्ग अशीं ब्रह्मांडें उत्पन्न करूं शकतात, तर या सर्वांचा आधिदेव जो श्रीकृष्ण, त्यानें यःकश्चित् वासरांचीं रूपें धारण केलीं यांत विशेष असें कांहींच नाहीं. **विशेषावें**–यांत विशेष असें वर्णन करण्यासारखें

१२२६

काय आहे ? **कामारी**–[ सं. कर्मकारी ]–काम करणारे, चाकर. पहा–" माझीं होति कामारीं । तियें वांचौनि येरे मारी । किंबहुना चराचरीं । ईश्वरु मी ॥३५१॥–ज्ञाने. १६. पुनः " कामारी बाटिक सेवेचे सेवक–" तुकाराम अभंग.

**ओं. २७९**—" पण ही [ रूपें घेण्याची प्रवृत्ति ] ईश्वराची लीला आहे अशी सर्वत्र ख्याति आहे. कीं जी लीला ऐकून पाणिमात्र आपल्या संसारदुःखांतून सुटतात." **लीलाप्रवृत्ती**—लीला करण्याचा स्वभाव. ईश्वराचा हा स्वभाव पुरातन आहे. पहा " लोकवत्तु लीलाकैवल्यम्–ब्रह्मसूत्रें. **निऱ्हासें**—निऱ्हा+ असें. निश्चितपणानें. **वाखाणीजेतीं**—वाखाणली जाते. **जें**–या ईश्वराच्या स्वभावाचें वर्णन ऐकून प्राणिमात्र जन्ममरणाच्या चक्रांतून सुटतात. त्यांना ईश्वराच्या या लीलाप्रवृत्तीचें आकलन होऊन, त्याच्या स्वभावाचें खरें ज्ञान होतें, व त्यामुळें संसाराचाही अर्थ त्यांना समजतो.

**ओं. २८०**—येथून २८२ पर्यंत, ब्रह्मदेवानें हरण केलेल्या वासरांचे विविध रंग दिले आहेत. यांत कवीची बहुश्रुतता व सूक्ष्मावलोकन दिसून येतें. **दुधवडीची कराडें**—दूधवड देशाची करडीं, कांबरी. **कांबरी**—कबऱ्या रंगाची, भुरकट काळीं (सं. कर्बुर). **रोदेचीं सोनेखैरीं**—रोद देशाचीं पीतवर्णी, पिवळीं. **निऱ्हा** इ.—सोन्याची झळाळी दिलेली. **भांगारीं**—तांबड्या–पांढऱ्या ठिपक्यानीं युक्त. **तेजाथिलीं**—तेज झिलई दिलेली. 'आथिला' असें रूप जोडून केलेली क्रियापदें मुक्तेश्वरापर्यंत आढळतात. पहा–" विराटनगरीं वळाथिला । कीचक गंधर्वी मारिला ॥ "–विराटपर्व. ३. **जुआं सांगडीं**—जोडीची, एकत्र सांगड घातलेली, जोडीजोडीची. **जुअ**–( युग्म ) जोडी.

**ओं. २८१**—**मोहरीं**–तोंडावर पांढरी. **पारडीं**–मलीन वर्णाची. **मोरीं**–सर्व शरीर काळें किंवा तांबडें असून, त्यावर पांढरे ठिपके असलेलीं, तोंडावर चित्रविचित्र रंग असलेलीं. पहा–' आपला मंत्र नव्हे बरा । माझा बैल चुकला मोरा । "–तुकाराम ४४४०. **वाघी**–वाघाच्या रंगाचीं. **चितळी**–चित्रमृगाच्या रंगाचीं. **पुंडी**–शुभ्रमुखी असून पीतवर्णी. उसांत ' पुंडा ' ऊंस अशी जात आहे. ही पट्ट्यापट्ट्याची असते. पहा–" सताळे ऊस पुंडे, कवठ कमरखें, सुंदरें तूत बोरें "–सामराज, रुक्मिणीहरण. **देशसाया**–माळवी, सोरठी ( माळव्यांतली व सौराष्ट्रांतली ( जोडीजोडीचीं ). **कोसी**–शुभ्र–श्याम मिश्रवर्णी. **कनकवर्णी**–सोनेरी.

**ओं. २८२–जाउपें**—वत्स. क्षीरसमुद्राच्या मुलाप्रमाणें पांढरी शुभ्र. दुधाच्या समुद्रांतून जणु जन्म झाला आहे अशीं. **धवळीं**—पांढरीं. **तांबीं**—तांबडी लाल. **नेपाळीं**—नेपाळांतली. वासरांचें वर्णन करतांना वर दूधवड, रोदे, असा त्या त्या देशांचा निर्देश केलेला आहे. त्या त्या देशांतली प्रसिद्ध जनावरें त्यावेळीं संग्रहित करण्यांत येत असावीं.

**ओं. २८३**—"गाईच्या पोटांत गर्भधारणा होत असतां, त्या मनानें श्रीकृष्णाचें चिंतन करीत होत्या. त्यामुळें, त्यांच्या मनांत ठसलेला श्रीकृष्णाचा काळा वर्ण, वासरांत उतरत होता." **तें वहत**—( तें बृहत् ) तें मोठें श्रीकृष्णाचें काळया वर्णाचें स्वरूप, गाईच्या पोटांतील वासरांनाही दिसत होतें. म्हणून तीं श्रीकृष्णासारखीं काळीं झालीं होतीं असा भाव. **गर्भधान**—गर्भधारणा, गर्भ राहणें.

**ओं. २८४**—"गोपींची गोष्ट काय सांगावी ? त्यांच्या ठिकाणींही तोच ( श्रीकृष्णाचा काळा ) रंग उमटला. कारण त्यांचीही श्रीकृष्णाशीं तशीच तन्मयता झाली होती." **जेणें**—ज्या तन्मयतेनें किड्याचा ( आळीचा ) भुंगा होऊं शकतो, ती तन्मयता काय त्या गोपीमध्यें असणार नाहीं ? 'कीटक-भृंग'न्यायानें किडा ज्याप्रमाणें भृंग होतो, त्याप्रमाणें त्या गोपीही श्रीकृष्णरूपी होणार नाहींत काय ? जी गोष्ट किड्यांच्या बाबतींत होऊं शकते, ती गोपींच्या बाबतींत कशी होणार नाहीं ? सारांश गोपीही तन्मयतेच्या गुणांमध्यें श्रीकृष्णरूपी झाल्या होत्या. **वाणें**—वाण, वर्ण.

**ओं. २८५**—आतां येथून ब्रह्मदेवानें हरलेल्या गोपाळांच्या वर्णांचें व रूपांचें वर्णन लागतें. **तारसें**-तिरकस डोळ्यांचे. **वेंभळें**-स्थूल दृष्टीचे. **मीलखें**-डोळ्यांची सारखी उघडझांप करणाऱ्या दृष्टीचे (?) **भुरळें**-उलट्या बाहुल्या नेत्राचे. **पींगळें**-पिंगळयाच्या सारख्या डोळ्यांचें ( पिंगळा हा पक्षी एक डोळ्याचा असा दिसतो ).

**ओं. २८६**—**दीघडें**-उंच, दीर्घ. **दातिरें**-दांत पुढें आलेलें. **राखोडे**-ओंठ-तुटके. **फेंगडें**-पाय फांकून चालणारें. **जामुन**-( यामुन ) काळया रंगाचें. **खुजें**-गिड्डें. वरील दोन ओंव्यांत गोपाळांचा केलेला नपुंसकलिंगी उल्लेख वात्सल्याचा निदर्शक आहे.

**ओं. २८७**—कांहीं गोपाळ जसे अगदीं कुरूप होते, तसे कांहीं अप्रतिम सुंदरही होते. " कांहीं आकारानें, रूपानें, व गुणांनीं सुंदर होते व ते जणु काय देवतांच्या अवताराप्रमाणें शोभत होते."

**ओं. २८८**—" पण ज्या ज्या गोपाळांनीं जसा जसा साजश्रृंगार केला होता, जसजसे कपडे किंवा दागिनें अंगावर घातले होते, तसेतसेच कपडे व अलंकार श्रीकृष्णानें त्यांच्या घेतलेल्या रूपावरही होते. मूळ गोपाळांत व श्रीकृष्णानें घेतलेल्या त्यांच्या स्वरूपांत तिळमात्र फरक नव्हता. सारांश गोपाळांचें रूप घेतांना, त्यांच्या वस्त्रांचें, दागिन्यांचें, व श्रृंगार-साजाचेंही रूप त्याला घ्यावें लागलें.

**ओं. २८९**—गोपाळांनीं घेतलेलीं वाद्यें, व त्यांचे राजस, तामस स्वभाव ही श्रीकृष्णाला अंगीकारावे लागले. त्यांचाही त्यानें स्वीकार केला. नाहीं तर त्या गोपींना श्रीकृष्णानें रूप घेतलेले गोपाळ पाहून संशय आला असता, व श्रीकृष्णानें केलेली लीला ( खेळ ) बाहेर फुटली असती. पण श्रीकृष्णानें सर्व बाबतींत गोपाळांचें बेमालूम अनुकरण केलें होतें. **पेंडारी**—राक्षसांचा शत्रू, तो श्रीकृष्ण. **भावाची**—गुणाचे प्रकार. सत्व, रज व तम असें तीन गुण प्रसिद्ध आहेत. वास्तविक श्रीकृष्ण मूळ सत्वगुणी आहे. पण गोपाळ होतांना त्याला राजस व तामस वृत्तीही स्वीकारावी लागली. **परी**—प्रकार. वाद्यांच्या प्रकाराबद्दल ओं. ७० वरील टीपा पहा.

**ओं. २९०**—यापमाणें गोपाळांचीं रूपें घेऊन तो ( श्रीकृष्ण ) गोकुळांत आला होता. त्यावेळीं तेथील स्त्रीपुरुषांत जो उत्साह दिसला तो वर्णन करतां येणार नाहीं." **अवगौनि**—सोंग घेऊन, वेष धारण करून. **संभ्रमु**—उत्साह, समारंभ, आदर, पूज्यबुद्धि. पहा-" सुदेवा आदरू करी सुंदरी : संभ्रमें उठिली राजकुमरी-नरेंद्र, रुक्मिणीस्वयंवर-६५५.

**ओं. २९१**—" अमृताच्या एका तुषाराला ( थेंबाला ) जो राजी असावा त्याला अमृताचा समुद्र मिळावा, किंवा ज्याला परमाणु दुर्लभ वाटावा, त्याला तेजस्वी मेरु पर्वत मिळावा," तशी गत गोकुळांतल्या स्त्रीपुरुषांची झाली. त्यांच्या मूळच्या मुलाऐवजीं श्रीकृष्णच त्यांच्या घरीं चालत आला होता. जी गोष्ट दुर्लभ ती त्यांच्या घरींच आपणहून आली होती. कारण श्रीकृष्णानें त्या गोपींच्या

आपत्यांचीं (गोपाळांचीं) रूपें आपणहून घेतलीं होतीं. **माणिजे**—मानिजे, मानावा.

**ओं. २९२**—“ जें परब्रह्म कोणाच्याही सांगण्यावरून प्राप्त झालें नसतें, तें श्रीकृष्णरूपानें गोकुळांतल्या लोकांच्या घरीं, त्यांचा ठावठिकाणा विचारत आलें; कारण तें त्याचें अपत्यच झालें होतें. ज्यांचीं ज्यांचीं मुलें (ब्रह्मदेवानें हरल्यामुळें) नाहींशीं झालीं होतीं, त्यांच्या घरीं श्रीकृष्णाला रहावेंच लागलें होतें.

**ओं. २९३**—आजपर्यंत श्रकृिष्ण हा नंद–यशोदांच्या घरींच त्यांचा मुलगा म्हणून राहि्ला, यासाठीं त्यांना धन्य मानण्यांत येत होतें. आतां तर तो प्रत्येक गवळयांच्या घरोंघर खेळण्यास आला होता! प्रत्येक गवळी नंद–यशोदे-इतकाच धन्य जाहला होता!

**ओं. २९४**—सर्वसंगपरित्याग करून योगी लोक ज्याचें (श्रीकृष्णाचें) चिंतन करतात, त्याला पुत्रभावानें (वात्सल्यानें) आलिंगन देण्यांत केवढें सुख होत असेल?” सारांश गोकुळांतल्या स्त्रीपुरुषांना (श्रीकृष्णानें त्यांच्या मुलांचीं रूपें घेतल्यामुळें) ब्रह्ममीलनाचें सुख मिळत होतें, असा अभिप्राय.

**ओं. २९५**—“ ज्यांच्या घरीं परब्रह्माची सालंकृत मुलें होतीं, (कारण श्रीकृष्णच तीं मुलें झाला होता) त्यांचें भाग्य वर्णन करण्यास जरी शेषाकडे त्याची हजार तोंडें मागितलीं असतीं, (व तीं जरी त्यानें दिलीं असतीं) तरी तें वर्णन करणें शक्य झालें नसतें.” शेषाच्या हजार तोंडानें जर श्रीकृष्णाचें वर्णन करणें अशक्य (एवढें तें अमर्याद, विस्तृत होतें) तर एका तोंडाच्या कवीकडून तें होणें कसें शक्य आहे?

**ओं. २९६**—“ त्यांच्या (त्या गोकुळांतील स्त्रीपुरुषांच्या) भाग्याची थोरवी किती उच्च कोटीला पोचली होती! कीं, निर्गुण, निराकार असें परब्रह्म (साकार सगुण होऊन) हट्ट करून गौळणीजवळ जेवण मागत होतें!” श्रीकृष्ण (परब्रह्म) च ज्यांचें मूल झाल्यामुळें, त्याचा हट्ट पुरवून त्याला जेवावयास घालण्याचें ज्यांना भाग्य लाभलें, त्या भाग्याची कोटी काय वर्णावी? **ठाऊवेर्‍हीं**—(कोणत्या) स्थानापर्यंत, (कोणत्या) कोटीपर्यंत. **सदैवपण**–भाग्य. **आळि**–हट्ट. ज्या गौळणीचा निर्गुण निराकार अशा परब्रह्मांशीं असा वात्सल्याचा संबंध घडला!

**ओं. २९७**—" जो श्रीकृष्ण स्तवन करतांना संतोष देणारा व अगाध आहे, व वेदांना ज्याचें वर्णन करणें अशक्य, तो गाईंच्या हंबारवानें, त्यांच्या पाठी-मागून जातो." म्हणजे जो योग्यांनाही अगम्य तो पशूंना सुलभ होतो. हा विरोध आहे, पण भक्तीनें हें सर्व घडतें हा त्याचा परिहार आहे. **चाटु**—मनाला संतोष देणारा, सुखद, हृदयंगम. जो श्रीकृष्ण मोठमोठ्या देवांना व योगिजनांना देखील दुर्लभ, तो आपल्या भक्तांना कसा सुलभ झाला होता, याचें वर्णन २९६ पासून ३०२ पर्यंत आलें आहे. यावरून 'देव भावाचा भुकेला' हाच या ओंव्यांचा अर्थ आहे.

**ओं २९८**—जो कोणत्याही प्रकारें योगी लोकांच्या आटोक्यांत येत नाहीं, यज्ञांत अग्नीला दिलेल्या हविर्भागानेंही जो आपला थांग लागूं देत नाहीं, तो गवळ्यांच्या घरांत ( मुलें होऊन ) घरोघरीं जेवतो आहे," हा केवढा विरोध ! **योगियां**—हटयोग्यांना. 'योगिनामप्यगम्यः' हें विशेषण प्रसिद्धच आहे. **यजितां**—यजन करतांना. **स्वाहाकारीं**—देवांना अग्निद्वारें हविर्भाग देण्याकरितां केलेल्या यज्ञानें. **ठाउनेदीं**—पत्ता लागूं देत नाहीं, हाताला लागत नाहीं. येथें कर्म मार्गानें जें घडत नाहीं तें भक्तिमार्गानें घडतें, असें सांगण्याचा उद्देश आहे.

**ओं. २९९**—" जो परमात्मा ( श्रीकृष्ण ) सदैव ब्रह्मरसानें ( ब्रह्मानंदानें ) तृप्त आहे, तो ( गवळयांच्या घरांत मुलें होऊन ) ( क्षुल्लक ) ताकदुधाचा ढेकर देत आहे "! प्रत्यक्ष परब्रह्मानें एखाद्या प्राकृत लहान मुलाप्रमाणें वागावें हें सकृद्दर्शनी विरोधी वाटलें, तरी भक्तीच्या दृष्टीनें तें सयुक्तिकच आहे. **ढेकर देतसे**-तृप्त झाल्याचें हें चिन्ह आहे.

**ओं. ३००**—" देहाचें व इंद्रियांचें दमन करून, ( हठयोगानें यम नियम प्राणायाम इ० करून ) ज्याचा लाभ व्हावा म्हणून तपस्वी ज्याच्या पाठीं लागतात, तो श्रीकृष्ण ( परब्रह्म ) निजणें, बसणें, व जेवणें. इ० क्रिया करतांना गवळ्यांना सहज हातीं सांपडला." ज्याचा साक्षात्कार होण्यासाठीं हठयोगी वाटेल ते शारीरिक कष्ट सोसतात, तरी जो त्यांच्या हातीं लागत नाहीं, तोच गवळयांच्या भक्तिभावनेनें मात्र त्यांच्या घरींच राहण्यास येतो ! **देहेंद्रिया** इ०—देहाला व इंद्रियांना. प्राणायाम, षट्चक्रभेदन, व सुषुम्नेचें नियमन इत्यादि प्रकारांनीं योगी लोक ब्रह्मैक्यासाठीं समाधीची खटपट करीत असतात. पण ब्रह्मचिंतनाचा

हा खडतर मार्ग शेंवटपर्यंत यशस्वी होतोच असें नाहीं. भक्तिमार्ग सर्वांत सोपा व निश्चित आहे, असा भाव. हठयोग व भक्तियोग यांतील फरक येथें दाखविला आहे. **सुलभु**—सुलभ, सोपा.

**ओं. २०१**—श्रीकृष्ण कर्ममार्गी लोकांना लाभत नाहीं, तो गवळ्यासारख्या हलक्या पण भक्त लोकांना लाभतो हाच फरक येथें आणखी व्यक्त केला आहे. "यज्ञाची दीक्षा घेणाऱ्या दीक्षितांनीं तुझ्यासाठीं पुष्कळ जरी यज्ञ केले, तरी तूं त्यांच्या घरीं जात नाहींस, पण गौळ्यांच्या दारांत मात्र तूं लोळतोस, यांचें कारण तुलाच काय तें ठाऊक आहे!" गवळ्यांची भक्ति हेंच त्याचें कारण असा भाव. **अध्वरीं**—यज्ञांत.

**ओं. २०२**—**जाणविलें**—श्रीकृष्णानें गोपाळांचीं रूपें घेऊन आपण भक्तांना सुलभ होतो, याची जाणीव करून दिली. **जो इ०**—ज्याची सेवा देवादिकांनीं करावी, तो गवळ्यांना मात्र आपल्यापैकींच एक गवळी असा वाटत होता. **ओळगीजे**—सेवा केला जातो.

**ओं. २०३**—**विज्ञान**—विज्ञानशक्ति, अद्भुत चमत्कार करून दाखविण्याचें सामर्थ्य. गवळ्यांच्या घरीं त्यांचीं मुलें होऊन राहण्यांत श्रीकृष्णानें अद्भुतशक्ति दाखविली म्हणावी, तर तसा प्रकार नसून उलट श्रीकृष्णानें गवळ्यांचीं आपत्यें होण्यांत तेथें प्रेमाचीच वृद्धि केली; प्रेमभावच वाढविला. प्रेमभाव वाढविणें हें मात्र तुझ्या (श्रीकृष्णाच्या) कृपेशिवाय दुसऱ्या कशानें घडून येणार नाहीं. येथें देखील विज्ञानापेक्षां भक्तीचें श्रेष्ठत्वच सांगितलें आहे.

**ओं. २०४**—"आपल्या घरचीं स्वतःचीं वासरें व गोपाळ सोडून, त्या गाई व गौळणी त्या श्रीकृष्णाच्या ठिकाणीं प्रेम करीत होत्या, वात्सल्य दाखवीत होत्या. हें वात्सल्य हजार तोंडाचा शेष देखील वर्णन करूं शकला नसता, इतकें तें अपूर्व होतें." शेषाचा हा दृष्टांत कवीचा नित्याचाच आहे. **पढिअेताति**—प्रेम करतात. गाईंचीं व गौळणींचीं खरीं स्वतःचीं वासरें व मुलें सत्यलोकांत होतीं, व त्या तर श्रीकृष्णरूपी वासरांवर व गोपाळांवर प्रेम करीत होत्या. हा प्रभाव श्रीकृष्णप्रेमाचाच होता!

**ओं. २०५**—"श्रीकृष्णरूपीं वासरांना व गोपाळार्भकांना पाहून, गाईंना व गोपींना आवरूं नये असा पान्हा फुटला. त्या दुधानें गोकुळांत दुधाच्या नद्या

वाहूं लागल्या." कवीनें पान्ह्याचें हें वर्णन अनेक उत्प्रेक्षांनीं सजविलें असून वासरांच्या रूपानें श्रीकृष्ण प्रत्येकाच्या घरीं वास करीत असल्यामुळें, घरोघरीं होत असलेल्या उत्सवाचें वर्णनही बहारीचें केलें आहे. हें वर्णन ३१५ ओंवीपर्यंत येतें. **डिंभें**—मुलें. **ऽ॑रसें**-पान्हा फुटे. **न धरे**-न आंवरे. **सरितां**-नद्या. येथें अतिशयोक्ति अलंकार होतो.

**ओं. ३०६**—गाई-गोपींच्या पान्ह्याच्या प्रकर्षावर आणखी कविकल्पना. "किंवा आदिपुरुष (श्रीकृष्ण) च दूध पिणारा झाला, असें पाहून त्याचा पाहुणचार करण्यासाठीं विष्णूनें हा (पान्हा म्हणजे) क्षीरसागरच जणु पाठविला असें मला वाटतें !" मागें उपमन्यूसाठीं विष्णूनें जसा क्षीरसागर उत्पन्न केला, तसाच या पान्ह्याच्या रूपानें नारायणानें हा श्रीकृष्णरूपी बालकांसाठीं क्षीरसागरच जणु उत्पन्न केला ! **नारायणें**—नारायण, विष्णु या देवता आदिपुरुषाच्या अपेक्षेनें कमीच होत. अशा खालच्या देवतांनीं मग आदिपुरुष श्रीकृष्णाला पाहुणचार करणें युक्तच होतें. **दूधपीरू**—दूध पिणारा. **पाहोंनरूं**—पाहुणेर, आतिथ्य. **मज पांता**—मला वाटतें, इंग्रजींतील Me-thinks या अर्थी. तो पान्हा एवढा मोठा कीं, तो शेषशायी नारायणाच्या क्षीरसमुद्राप्रमाणें कवीला वाटला !

**ओं. ३०७**—"तेथें (गोकुळांत) मोक्षदाता श्रीकृष्ण राहत आहे, असें पाहून प्रत्येक घरांत संपत्तीनें आपलें ठाणें दिलें होतें. सर्व समृद्धि व अष्टसिद्धी तर श्रीकृष्णाच्या सेवेची संधीच पाहत होत्या." सारांश गोकुळांत सर्वत्र संपन्नता नांदत असून, ऋद्धि व सिद्धी या दासी होऊन राहिल्या होत्या. घरोघरीं कशी चंगळ चालली होती ती पुढें वर्णन करतात. गोकुळांत घरोघरां असा संपन्न कार्यक्रम चालू होता.

**ओं. ३०८-परगुणें**-उटण्यानें (तृ). **मर्दना**-मर्दन करणें, तेल चोळणें. **मादनें**—उष्णोदकाचीं स्नानें. पहा-" मग मर्दना मादनें जालें : पुजावसरु जाला: आरोगणा जाली "-गोविंदप्रभुचरित्र-७५.

**ओं. ३०९-षड्रसीं**—कटु, अम्ल, मधुर, लवण, तिक्त, कषाय अशा सहा रसांनीं युक्त असें. **आरोगणु**—भोजन. **नींबलोणु**—दृष्ट काढण्यासाठीं ध्यावयाचे कडू निंबाचीं पानें, मीठ, मोहरी इ० पदार्थ. **श्रीचरणसहावाणु**-श्रीचरणसंवाहन=श्रीकृष्णाचे पाय चोळणें, घासणें. **वीडा**—तांबूल.

**ओं. ३१०–क्षीरोदक**–पांढरें–शुभ्र रेशमी वस्त्र. पहा–" पद्मरागाचेया रंगावरी : घातैली क्षीरोदकु चाउरीं ॥ ६४ ॥–शिशुपालवध–भास्कर. **पासवड्या वरी**–आच्छादनावर. त्या पांढऱ्या रेशमी आच्छादनावर, चादरीवर. **पहूडतुसे**–निद्रा घेत असे. **वीजणें जाणवीति**–पंख्यानें वारा घालतात. (वीजणें = पंखे). **विद्याधरी**–विद्याधराच्या स्त्रिया. विद्याधर ही एक देवसदृश योनि आहे. श्रीकृष्ण प्रत्येक गवळ्याच्या घरीं वत्सरूपानें अथवा शिशुरूपानें असल्यानें तेथें ही वर्णन केलेली त्याची बडदास्त चालली होती.

**ओं. ३११—पाहातेआं पाहारां**—पहांटेच्या प्रहरीं. **दधिमंथनी**–दही घुसळतांना. **गातीं**–गौळणी श्रीकृष्णावरून गाणीं म्हणत होत्या. **उपहौडले**–उठले. अशा गाण्यांच्या आवाजानें जागे होऊन श्रीकृष्ण उठत असत. पहा–" ऐसा उदयाचळिचा उपरवाळा । उपहुडु जाला चंद्र–मंडळा ॥"–नरेंद्र, रुक्मिणी-स्वयंवर–४९१.

**ओं. ३१२—परिअें**—झोकें. पाळण्यांत निजलेल्या श्रीकृष्णरूपी बालकांना कोणी बायका झोकें देत होत्या ! **निजकीर्तीतें**—आपलें चरित्र गाइलेलें ऐकून श्रीकृष्णाला आनंद होई. बायका श्रीकृष्णावरूनच गाणीं म्हणत असल्याकारणानें, बालकरूपानें पाळण्यांत निजलेल्या श्रीकृष्णाला तीं सहजच ऐकायला मिळून, त्याला आनंदच होत असे. **तोखतु**—तोषतु–संतोषत असे.

**ओं. ३१३**—" चार प्रकारच्या तंतुवाद्यावर गाणारे गायक, मंगळ राग आळवीत असून, कांहीं (गायक) श्रीकृष्णाचीं स्तुतिस्तोत्रें गात होते." **दंडीचे**–तंतुवाद्याचे, तंतुवाद्यावर गाणारे. **विद्यावंत**—गायक, स्तुतिपाठक. पहा–" देवीचा विदावंतु गगनरंगु : तो दुरौनी आळवी मेघरागु । तेणें रागें होय जळ–योगु : मेघ–अकर्शणीं ॥ ५६७ ॥"–नरेंद्र–रुक्मिणी स्वयंवर. **सुहावीं**–शोभिवंत. पहा–" ते श्रीमूर्ति सगुण सुहावी : प्रसादली असे माझां जीवीं । ते कवणें अनुवादावी : प्राणसखिये ! ॥ "–नरेंद्र–रुक्मिणी स्वयंवर–६३८. हें रूपकाचें विशेषण घ्यावें. **रूपकें**—चरित्रपर गीतें. पहा–" सदाफळां आंबेयाचे टके : तेथ अम्र पंचमांचेनि अंशुके । कोकिळा गातातिं रूपकें : राया गोविंदाची ॥ "–नरेंद्र– रुक्मिणी स्वयंवर–७८९.

**ओं. ३१४**—गोकुळांत प्रातःकालीं श्रीकृष्णाचें गुणगान कसें चाललें होतें, त्याचेंच हें वर्णन आहे. बंदीजन, मागध व नागारी हे नांवानें भिन्न असले, तरी

प्रातःकाली राजाचें गुणगान करून त्याला उठविण्याचें काम त्यांच्याकडे असें. **वंदीजन**—भाट, स्तुतिपाठक. **मागध**—हेही भाट व स्तुतिपाठक असून, राजाची वंशावलि सांगण्याचें काम हें करतात. **नागारि**–हेही असेच स्तुतिपाठक आहेत. **तेआं जाणाचा रा० इ०**—ज्ञानाचा राजा असा श्रीकृष्ण त्यांना प्रसाददान देत असें. **पसाअेदान**—प्रसाददान. आपली स्तुति गायल्याबद्दल श्रीकृष्ण त्यांच्यावर अनुग्रह करीत होता, त्यांना देणग्या देत होता. **पवाडें पढींति**—स्तुतिस्तोत्रें गातीं, म्हणतीं.

**ओं. ३१५**—अशा पंच पंच. उषःकालीं, ब्राह्मण देखील वेदघोष करून श्रीकृष्णाला ओवाळीत होते, तर योगी लोक देखील मोक्षदायक अशा त्या श्रीकृष्णाचें स्तवन करीत होते. **कैवल्यपती**—मोक्षदाता, (श्रीकृष्ण). योगी लोकांना देखील श्रीकृष्णाच्या सगुण भक्तीशिवाय समाधान वाटत नव्हतें, असा भाव.

**ओं. ३१६**—अशा थाटांत दिवस उजेडल्यावर, श्रीकृष्ण नित्याप्रमाणें बलरामाबरोबर वांसरें चारण्यास वृंदावनास जातात. खरें गोपाळ व वासरें ब्रह्मदेवानें सत्यलोकास हरण करून नेल्यानंतर, मध्यंतरीच्या काळांत श्रीकृष्णच ते गोपाळ व वांसरें होऊन राहिला होता, हें गोकुळांत कोणाच्या लक्षांत आलेंच नव्हतें. सर्वांचे नित्याचे व्यवसाय चालूच होते, व श्रीकृष्णानेंही आपल्या नेहमींच्या कार्यक्रमांत कांहीं बदल केलेला नव्हता. येथें तो आपल्या वडील भावाबरोबर वासरें चारण्यास वृंदावनास नित्याप्रमाणें गेलाच आहे. **बलिभद्रेंसी**—बलरामाबरोबर.

**ओं. ३१७**—"गोवर्धन पर्वताच्या उतरणीवर गोपाळ आपल्या गाई चारीत होते, तर श्रीकृष्ण त्या पर्वताच्या अगदीं पायथ्याला वासरें राखण्याचें काम करीत होता. इतर गोपाळ गाई राखीत होते तर श्रीकृष्ण वासरें राखीत होता. (कारण तोच तीं वासरं झाला होता!). **पाठारीं**–पृष्ठभागावर. **खीरारी**–खिल्लारी, गवळी. **तळवटीं**–गोवर्धन पर्वताच्या पायथ्याला.

**ओं. ३१८**—"श्रीकृष्णाच्या मुरलीचा ध्वनि ऐकून गाईंना इतका आनंद झाला कीं, आपली श्रीकृष्णरूपीं वासरें पाहून त्या चरण्याचें देखील विसरल्या." गाईंचीं मनें श्रीकृष्णाच्या ठिकाणीं आकर्षित झालीं असा भाव. **तेआचां**—श्रीकृष्णाचा.

**ओं. ३१९**—गाईंचें हें श्रीकृष्णाकडे होणारें आकर्षणच येथून कवीनें वर्णिलें आहे. "अगोदर आयांचीं मनं मूळचींच प्रेमळ, त्यांत पुनः तीं श्रीकृष्णानें आकर्षित केलेलीं ! ( यामुळें त्या इतक्या देहभान विसरल्या कीं ) श्रीकृष्णावरून आपलीं मनें दुसरीकडे काढून घेतल्यावर, त्यांना स्वतःचीं शरीरें सांभाळतां येईनाशीं झालीं." **माडांची**—मातांची-आयांची. **तेथौनि इ०**-श्रीकृष्णावरून काढून घेतल्यावर. **तिआ न इ०**—त्यांना आपणा स्वतःलाच सांभाळतां येत नव्हतें. इतका त्यांचा शरीरावरचा ताबा शिथिल झाला होता.

**ओं. ३२०**—गाई गोवर्धन पर्वताच्या पाठारावरून खालीं पर्वताच्या पायथ्याशीं असणाऱ्या श्रीकृष्णाकडे धांव घेत होत्या व गोपाळ त्यांना माघारी वळवीत होते. तथापि गोपाळांना त्या गाई कांहीं आवरत नव्हत्या. ईश्वराच्या शक्ति जशा अनावर असतात, तशा त्या गाईही अनावर झाल्या होत्या असा भाव. **वंबाळैलिआं**—मोठा आवाज केला तरी. न **संवरेति**—आवरत नव्हत्या. **ईश्वरीचिआं शक्ती**–" परमेश्वर हा सर्वशक्तियुक्त म्हटलेला आहे. तेव्हां त्याच्या या शक्ती कोणकोणत्या त्या पाहिल्या पाहिजेत. 'शक्ति शब्दें सकळही देवताः सकळही गुणः सकळही धर्म : ज्ञान : विज्ञान : हे सर्व शक्तिशब्दें बोलिजेती' ( महावाक्य ६ ) असें शक्तीचें स्पष्टीकरण श्रीचक्रधरस्वामींनीं केलेलें आहे. त्यावरून सर्व देवता, सर्व गुण, सर्व धर्म, ज्ञान व विज्ञान, या परमेश्वराच्या शक्ति होत असें स्पष्ट होतें. यापैकीं देवतांना परमेश्वराच्या चेतना शक्ति म्हणून म्हणतात, आणि इतर शक्तींना जडा शक्ति म्हणून संबोधतात. देवता या चेतनाशक्ति असून त्या भावरूप आहेत, तर गुणधर्म, ज्ञान व विज्ञान ह्या जडाशक्ति असून त्या अभावरूप आहेत."–कोलते–महानुभावतत्त्वज्ञान. पृ. १२४. येथें गाईंना ईश्वराच्या या अनिवार शक्तींची उपमा देतांना, पंडित दामोदरानें महानुभावी तत्त्वज्ञानाचा आपल्यावर झालेला संस्कारच व्यक्त केला आहे.

**ओं. ३२१**—गोवर्धनाच्या पाठारावरून खालीं उतरणाऱ्या गाईंना येथें कर्ममार्ग सोडून निर्गुणोपासनेचा मार्ग चोखाळणाऱ्या मुनींची उपमा दिली आहे. "ज्याप्रमाणें पहिल्यां प्रथम यज्ञयागादि कर्मांचा अवलंब करून कंटाळलेले मुनी, तो मार्ग सोडून शेवटीं परब्रह्माच्या उपासनेला लागतात, त्याप्रमाणें त्या गाई देखील गोवर्धन पर्वतावरचा आपला मार्ग टाकून, पर्वताच्या तळाशीं असणाऱ्या श्रीकृष्णाकडे धांव घेत होत्या." कर्मकांडानें स्वर्ग मिळाला, तरी मोक्ष मिळत

नाहीं हें पाहून मुनी जसा ब्रह्मचिंतनाचा मोक्षमार्ग पत्करतात, त्याप्रमाणें त्या गाईंनींही पर्वतावरील आपला मार्ग टाकून श्रीकृष्णरूपी परब्रह्माशीं तद्रूप होण्यासाठीं त्या पर्वताखालीं उतरूं लागल्या, असा भाव. **आधाडा**—तुटलेला कडा. पहा–" मग प्रत्याहाराचा आधाडा । जो बुद्धीचियाही पाया निसरडा । जेथ हटिये सांडिती, होडा । कडेलग ॥ "–ज्ञाने ६।५६. त्या गाई गोवर्धनपर्वताच्या तुटलेल्या कड्यावरून खालीं येत होत्या.

**ओं. ३२२**—" त्या गाईंचें व गोपींचें तें प्रेम म्हणजे एक दुधानें भरलेली, आनंदसागराला मिळणारी नदीच होती! किंवा ती वांसरांवर व अर्भकांवर वर्षाव करणारी मेघवृष्टीच जणु होती." त्या गाईंचें तें प्रेम म्हणजे दुधानें दुथडी भरून वाहणारी व ब्रह्मानंदरूपी सागराला मिळणारी जणु नदीच होती, अशी कवीनें येथें अध्यात्मिक उत्प्रेक्षा केली आहे. गाई, गोवर्धनाच्या तळाशी असणाऱ्या श्रीकृष्णाकडे व त्यानेंच रूपें घेतलेल्या वासरांकडे इतक्या उत्कट प्रेमानें आकर्षिल्या गेल्या होत्या कीं, त्यांच्या त्या प्रेमाला दुधाच्या नदीचीच उपमा साजणारी होती, व अशा रीतीनें त्या श्रीकृष्णाला भेटणार असल्यानें, तेथें त्यांना ब्रह्मानंदच प्राप्त होणार होता, श्रीकृष्ण अशा आनंदाचा केवळ सागरच होता.

**ओं. ३२३**—त्या खालीं उतरणाऱ्या गाईंवर आणखी कांहीं अध्यात्मिक उत्प्रेक्षा कवीनें योजल्या आहेत. " किंवा त्या गाई म्हणजे ( ईश्वराचें चिंतन करणाऱ्या ) महंताची ( निरुपाधिक ) मनेंच, किंवा दहा उपनिषदांर्गत श्रुतिवचनेंच, किंवा परमेश्वराची सेवा करणारा हा चैतन्यमायेपासून सेवटील यक्षणीपर्यंत अनंतशक्ति देवतांसमूहच मूर्तिमंत अवतरला आहे जणु!" गाईंची मनें कशीं शुद्ध व अव्यभिचारी होतीं, तें पटविण्यासाठीं या उत्प्रेक्षा अत्यंत सूचक आहेत. **महंताचीं मतीं**—परमार्गसेवकाचें मन जसें अव्यभिचारिपणानें परमेश्वराकडे लागलेलें असतें. **दशोपनिषदां इ०**—दशोपनिषदें हीं वास्तविक वेदाचाच भाग असून, ती जशीं परब्रह्माच्या विवरणालाच वाहिलेलीं आहेत, त्याप्रमाणें त्या गाई देखील श्रीकृष्णाकडेच आकृष्ट झाल्या होत्या. **सांभवादिकां**—महानुभावपंथाच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें देवता या परमेश्वराहून गौण आहेत. या प्रत्येक देवतेची एक विद्या आहे. अर्थात् मायेपासून तों यक्षिणीपर्यंत सर्व देवतांच्या मिळून १ कोटी १। लक्ष १० विद्या आहेत. त्यांचे प्रामुख्यानें चार थोवे केले आहेत. ( १ ) शांभव ( २ ) शाक्तेय ( ३ ) महाणव व ( ४ ) आणव.

शांभव थोव्यांत दोन देवतांच्या विद्यांचा अंतर्भाव होतो. यांपैकी एक समळ शांभव व दुसरी शुद्ध शांभव. ‘समळ शांभव’ ते विश्वेची विद्या आणि ‘शुद्ध शांभव’ ते चैतन्याची विद्या. या दोनी विद्यांना ‘शांभव’ म्हणण्याचें कारण असें कीं, त्या शंभूच्या म्हणजे परमेश्वराच्या जवळील देवतांच्या विद्या होत. येथे या गाई म्हणजे परमेश्वराला जवळून पाहणाऱ्या शांभवादि विद्याच जणु मूर्तिमती अशी कवीनें कल्पना केली आहे. शांभवादि विद्या येथें गाईच्या रूपानें परमेश्वराला (श्रीकृष्णाला) पाहण्यास अवतरल्या आहेत जणु, असा भाव. **पाळांती**—न्याहाळती, अवलोकिती.

**ओ. ३२४**—“गोवर्धन पर्वतावरून उतरतांना त्या धापा टाकणाऱ्या गाई कशा भासल्या म्हणाल, तर श्रीकृष्णाच्या आकर्षणानें आकाशांतून देवांगनाच जणु येत आहेत, (अशा भासल्या).” **धापसिया**—धापा टाकणाऱ्या, अर्थात् गडबडीनें जाणाऱ्या. पहा-‘जा तुम्ही एकी धापसियां । तुम्हां लागीनिलिआं गौ-मासिया। तरि वारां जा कां।’-शिशुपालवध २१९. **पढिआसल्या**—प्रतिभासल्या. पहा “ब्रह्मचि अवीद्यावशें: जिवरूपें पढियासें”-उद्धवगीता-५५९. **आंतराळौनि**—आकाशापासून, आकाशांतून.

**ओं. ३२५**—“त्या गाईची व (गोवर्धनाच्या तळाशी चरणाऱ्या) वासरांची भेट झाल्यानंतर व त्यांच्या (वासरांच्या) दर्शनानें गाईच्या शरीरांना प्रशांतता प्राप्त झाल्यानंतर, परस्परांच्या स्पर्शसुखाचें वर्णन प्रत्यक्ष हजार तोंडाच्या शेषालाही करणें शक्य नव्हतें.” हें वर्णन कसें करावें हें त्याला देखील (इतकीं तोंडें असून) जर समजेना, तर एका तोंडाच्या कवीला तें कुठलं करायला येणार! असा भाव. कवीनें अशी वर्णनाक्षमता प्रस्तुत ग्रंथांत अन्यत्रही व्यक्त केली आहे. गाईवांसरांच्या भेटींत परस्परांना जें स्पर्शसुख मिळालें तें अवर्णनीय होतें, इतकेंच कवीला ध्वनित करावयाचें आहे. **वाणौ**—वर्णू.

**ओं. ३२६**—“तीं वांसरें (श्रीकृष्ण स्वरूपींच असल्यामुळें) तर ज्ञानीच होतीं. त्यामुळें त्यांच्या मनांत ब्रह्मानंद भरला असल्यास नवल नाहीं. पण त्या वांसरांच्या आनंदाचा परिणाम तेथील गैरिक धातूंवरही होऊन त्या देखील अमृत पाझरूं लागल्या!” वासरांच्या आनंदाचा परिणाम जड वस्तूंवरही झाला असें प्रतिपादन! **तेणें**—त्या आनंदानें. **धातुआदिकरौनी**-गैरिक धातु, पिवडी, काव इ० **ऊळतांती**—पाझरतात.

**ओं. ३२७**—" त्या गाई, वासरांना पाजीत असतांना, त्यांना आपला पान्हा आवरेना. ( इतका तो जोरदार व विपुल होता. ) त्या पान्हयानें सर्व त्रिभुवनच दुधानें भरून गेलें. " अपत्यप्रेमानें आयांना आपला पान्हा आवरत नाहीं, हें आपण पाहतोंच. **स्थनपानु**—स्तनपान, पाजविणें. **न सावरे**—आवरत नव्हता.

**ओं. ३२८**—" ज्याप्रमाणें योगी लोक आपल्या सर्व इंद्रियांच्या द्वारां ईश्वराच्या मूर्तीचा आपल्या हृदयांत प्रवेश करवितात, ईश्वराच्या स्वरूपाचें ग्रहण कोणत्या इंद्रियानें करूं व कोणत्या इंद्रियानें नको, असें त्यांना होऊन जातें, तद्वतच त्या गाई देखील आपल्या वासरांना चाटतांना, त्यांना आपल्या मनांत किती म्हणून साठवूं, असें त्यांना होऊन गेलें होतें. ज्या हावरेपणानें योगी लोक परमेश्वराला आपल्या मनांत सांठवितात, त्याच हावरेपणानें त्या गाई वासरांना चाटतांना, त्यांना आपल्या हृदयांत सांठवीतच आहेत अशा दिसत होत्या.

**ओं. ३२९**—" गाई गोवर्धनखालीं उतरतांना त्यांच्या मागून गौळीही पर्वताखालीं आले, व त्यांनादेखील तेथें श्रीकृष्णरूपानें असणारे आपले पुत्र दिसून पुत्रमुखदर्शनाचा आनंद मिळाला. हा आनंद खरोखरच या जगांत तरी निरुपम होता.

**ओं. ३३०**—साध्या नित्याच्या [ लौकिक ] मुलांना आलिंगन देतांना सर्वच लोक ( आनंदानें ) गरगर फिरूं लागतात. मग येथें तर मोक्षानंदाचा केवळ ठेवा असा श्रीकृष्णच अपत्य झाल्यावर, मग ( त्यानेंच अपत्यांचें रूप घेतल्यावर ) त्यालाच आलिंगन देतांना त्यांनीं आनंदानें किती गिरक्या मारल्या असतील ! " **भोंवतीं**—फिरती, गिरक्या घेती. येथें " नीवती " असें रूप असावें असें वाटतें. पहा ओं. ३३२. **बालवेषें**—श्रीकृष्णानेंच त्या गवळयांच्या मुलांचीं रूपें घेतलीं असल्यामुळें, मुलांना आलिंगन देतांना त्या गवळयांना श्रीकृष्णाच्या आलिंगनसुखाचा लाभ मिळत होता. **आलिंगण**—आलिंगन.

**ओं. ३३१**—न कळतां अमृताचें पान घडावें व त्यानें माणसांना अमरपण प्राप्त व्हावें, त्याप्रमाणें त्या गवळयांनाही अभावितपणानेंच श्रीकृष्णाचें (परब्रह्माचें) आलिंगन मिळून, त्यांना परब्रह्माशीं एकरूप होणाऱ्या मोक्षाचें सुख प्राप्त झालें होतें. आपलीं खरीं अपत्यें व वासरें ब्रह्मदेवानें हरण केलीं असून, श्रीकृष्णानेंच त्यांचीं रूपें घेतलीं आहेत, ही गोष्ट ठाऊक नसल्यामुळें, ते गवळी तीं अपत्यें

आपलीं पूर्वींचींच समजून त्यांना जें आलिंगन देत होते, तें वास्तविक श्रीकृष्णाशींच (परब्रह्माशींच) घडणारें त्यांचें आलिंगन होतें. त्यामुळें अभावितपणें नकळतच त्यांना परब्रह्माशीं ऐक्य पावण्याचें सुख प्राप्त होत होतें. **निर्वाणसुख**— परब्रह्माशीं ऐक्य पावणाऱ्या मोक्षाचें सुख. पहा—" एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति । स्थित्वास्यामंतकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥ ७२ ॥ श्रीमद्भगवद्गीता–२.

**ओं. ३३२**—येथें सगुणोपासनेचें महत्त्व वर्णन केलें आहे. " ईश्वराच्या सगुण स्वरूपाचें दर्शन झालें असतां, प्राणिमात्रांच्या मनाला कशी प्रशांतता मिळते, त्याचें मर्म फक्त भक्त असे योगी लोकच निश्चितपणें जाणतात." **निरौता**—निश्चित. येथें पंडित दामोदरानें भक्त व योगी यांची भूमिका एक केली आहे. केवळ हटयोगाचा अवलंब करून निर्गुण परब्रह्माचें चिंतन करणाऱ्यांना, सगुणोपासना करणाऱ्या भक्तांना मिळणारें, परमेश्वराच्या मूर्तिमंत दर्शनाचें सुख मिळत नाहीं, असा त्याचा अभिप्राय आहे. म्हणून भक्तिमार्गाची सगुणोपासना व योगमार्गाचें अनुसंधान, यांचा त्यानें येथें मिलाफ सुचविला आहे.

**ओं. ३३३**—" गाईचें व गवळ्यांचें श्रीकृष्णावरील [ वत्सावरील ] प्रेम पाहून बलरामाला विस्मय वाटला. त्यांच्या प्रेमाच्या अपूर्वतेनें तो आश्चर्यचकित झाला व श्रीकृष्णाच्या मायेचाच हा खेळ असला पाहिजे अशी शंका येऊन, तो ज्ञानदृष्टीनें या प्रकाराकडे पाहूं लागला." **रामाचां**—रामाच्या, बलरामाच्या, बलराम हा श्रीकृष्णाचा वडील भाऊ. **ज्ञानदृष्टीं**—पूर्वी घडलेल्या गोष्टीं ज्या अंतर्ज्ञानानें पाहण्याची दृष्टि त्याला [ बळरामाला ] होती, त्या दृष्टीनें. **ठाकोनि**— राहून. त्या ज्ञानदृष्टीनें युक्त असा तो, उभा राहून मागील गोष्टीं पाहूं लागला.

**ओं. ३३४**—श्रीकृष्ण आपल्या अंगच्या दिव्यशक्तीनें स्वतःच वासरं व गोपाळ झाला आहे, हें बलरामाच्या लक्षांत येऊन तो म्हणतोः—" हा त्याच्या (श्रीकृष्णाच्या) दिव्यशक्तीचा प्रभाव म्हणावा, कीं देवाधिदेव अशा (श्रीकृष्णाचा) हा खेळ म्हणावा !" वास्तविक गोकुळांतील सर्व वासरं ब्रह्मदेवानं सत्यलोकाला नेल्यानंतर श्रीकृष्णानें आपण त्यांचीं रूपें घेऊन, जणु कांहीं कांहींच घडलें नाहीं, असें जें भासविलें, तें श्रीकृष्णाच्या अंगच्या दिव्यशक्तीमुळें कीं त्याच्या लीलेमुळें, याचा निर्णय बलरामाला झाला नाहीं. कारण श्रीकृष्णाचा महिमाच तसा अगम्य होता ! अशा महिम्याचेंच बलराम पुढें वर्णन करतो.

**ओं. ३२५**—श्रीकृष्णाच्या दोन अद्भुत चमत्कारांचा येथें निर्देश केला आहे. **एणें मुखामाजीं** इ०—श्रीकृष्णानें लहानपणीं एकदां माती खाल्ली म्हणून यशोदेनें त्याचे हात बांधून ( माती खाल्लेली पाहाण्यासाठीं ) तोंड उघडण्यास सांगितलें असतां, त्यानें तिला आपल्या मुखांत त्रिभुवन दाखवून थक्क केलें, ही कथा येथें उल्लेखली आहे. **राक्षसी पूतनेचें** इ०—श्रीकृष्णाला मारण्यासाठीं कंसानें आपली पूतना नांवाची बहीण गोकुळास पाठविली असतां, तिचें स्तनपान करून श्रीकृष्णानें तिला मारली. **शोखण**—शोषण.

**ओं. ३२६**—श्रीकृष्णानें केलेल्या आणखी एका अद्भुत कृत्याचा उल्लेख बलराम करतो. "या श्रीकृष्णानें जेव्हां अर्जुनवृक्ष मोडून आम्हांला दोन दिव्य पुरुष [ त्यांतून निघालेले ] दाखविले, तेव्हां [ देखील ] असाच आणखी चमत्कार झाला!" **अर्जुनाचे वृक्ष मोडिले**—श्रीकृष्ण खोड्या करीत असे म्हणून नित्याप्रमाणें त्याला उखळाला बांधून यशोदा कामास निघून गेल्यावर, श्रीकृष्ण तें उखळ ओढीत ओढीत जवळच परसांत असलेल्या दोन अर्जुनाच्या झाडांजवळ गेला. श्रीकृष्णाचा स्पर्श होतांच. ते वृक्ष मोडून खालीं पडले, व त्यांतून दोन दिव्य पुरुष बाहेर पडले. कारण ते अर्जुनवृक्ष म्हणजे नारदाच्या शापानें वृक्षत्व पावलेले कुबेर पुत्र असून, श्रीकृष्णाच्या स्पर्शानेंच त्यांचा उद्धार व्हावयाचा होता. **दिव्य-पुरुष**—दोन कुबेर पुत्र, जे त्या मोडून पडलेल्या वृक्षांतून बाहेर निघाले.

**ओं. ३२७**—"अनंत विश्वांची उभारणी ही ज्याची केवळ लीला, तो भक्तांचा कैवारी श्रीकृष्ण ( परमात्मा ), आपल्या मायाशक्तीनें मनुष्यरूप धारण करून या पृथ्वीवर अवतरला आहे." **मायावेषें**—महानुभावपंथांत देवतांचे जे ९ थोवे कल्पिले आहेत, त्यांत शेवटचा मायेचा थोवा आहे. मायेला, चैतन्य, विदेह, परा, शक्ति अशीं भिन्न भिन्न नांवें आहेत. ही ईश्वराची आदिशक्ति होय. ईश्वराच्या अनंत गुणधर्माप्रमाणेंच देवतांनाही 'शक्ति' असेंच म्हणतात. सूक्ष्म व स्थूळ प्रपंचालाही ती आदि असते. ईश्वर अवतार धारण करतो, त्यावेळींही तीच ईश्वराचें शरीर बनते. या सर्व अर्थांनीं माया ही ईश्वराची शक्तीच नव्हे, तर आद्यशक्ति होय. ( पहा—महानुभाव तत्त्वज्ञान पृ. ७१ ). या मायाशक्तीनेंच ईश्वरानें गोकुळांत श्रीकृष्णाचें मानवरूप धारण केलें, अशी बलराम आपल्या मनाची समजूत घालतो.

**ओं. ३३८**—ज्या परमेश्वरामुळें जीव (पुरुष) प्रकृतीपासून तुटतो व ज्याच्यामुळें जन्ममरणाचा फेरा चुकतो, तो हा श्रीकृष्ण (परमेश्वर), आर्त जनांचें रक्षण करण्यासाठीं हे पवाडे ( यशाचीं कृत्यें ) करीत आहे. **जीवु प्रकृती** इ०—सांख्यांच्या मताप्रमाणें प्रकृति (जग) व जीव (पुरुष) यांच्या संयोगानें अखिल विश्वाची उभारणी होत असून, प्रकृतीहून आपण भिन्न आहोंत या ज्ञानांतच पुरुषाचा ( जिवाचा ) मोक्ष आहे. **उजिडे**—तुटतो, निराळा होतो. पुरुष प्रकृतीपासून निराळा झाला असतां संसारबंधाचा, जन्ममरणाच्या फेऱ्याचा नाश होतो. सांख्यदर्शनांत ईश्वराला स्थान नाहीं, म्हणून पंडित दामोदरानें आपलें ईश्वरवादी तवत्त्ज्ञान मांडतांना, सांख्यांचे प्रकृति व पुरुष यांची तातातूट परमेश्वर करतो, असें आपल्या पंथमताप्रमाणें कल्पून, त्या दोन तत्त्वावर परमेश्वराचें आधिपत्य गृहीत धरलें आहे. महानुभावांच्या तत्वज्ञानांत जीव हा शुद्ध आहे, पण सृष्टिरचनेच्या इच्छेनें परमेश्वरानेंच त्याच्यामागें अनेक 'मळ' लाविले आहेत. जीव जन्माला येतांच त्याला 'आदिमळ' लागलेला असतो. आदिमळ, विश्वमळ, प्रकृतिमळ, (अष्टभैरवाचे मळ), विकृतिमळ (शेषशय्यादिकांचे) व विकृतिविकृतिमळ (इंद्रादि देवतांचे, असे अनेक मळ घेतल्यावरच जीव प्रपंचनिर्मिति करतो. शेवटीं त्याला 'मृत्तिका मळ' लागला, म्हणजे तो प्रपंचाच्या पूर्णपणें पाशांत सांपडतो. हे 'मळ' उजळण्यांतच त्याची मुक्ति आहे. "ज्ञानी किंवा सामान्य ज्ञानिया आपल्या सर्व मळांचें क्षाळण करतो, पण जो मळ त्यानें आपणहून लावून घेतला नाहीं तो 'आदिमळ,' तो क्षाळूं शकत नाहीं. म्हणून या आदिमळाचें क्षाळण परमेश्वराच्या प्रवृत्तीमुळेंच होतें. अविद्येबरोबर या आद्यमळाचा नाश परमेश्वरच करतात."–( पहा महानुभाव तत्त्वज्ञान. पृ. ४७६ ) प्रस्तुत ओंवींत 'जीव प्रकृतीपासून तुटतो' असें जें म्हटलें आहे, तें महानुभाव तत्त्वाप्रमाणें "जीव ज्या परमेश्वरामुळें प्रकृतिमळ क्षाळूं शकतो," अशा अर्थानेंच घेतलें पाहिजे. **आर्ती**—आर्ति–इच्छा.

**ओं. ३३९**—याप्रमाणें आपल्या ज्ञानदृष्टीनें बलरामानें आपल्या मनाची समजूत घातल्यानंतर, त्यानें आपल्या सभोंवतीच्या वांसराकडे व गोपाळांकडे न्याहाळून पाहिलें. तों तीं वासरें व ते गोपाळ परब्रह्माचींच ( परमेश्वराचीचें ) मूर्तिमंत रूपें आहेत, अशी त्याला भासलीं." श्रीकृष्णानेंच स्वतः त्या सर्व वांसरांची

व गोपाळांचीं रूपें घेतलीं आहेत, हें बलरामाला अंतर्ज्ञानानें कळून चुकलें. **वस्तु**—परब्रह्म. **पढियासलीं**—प्रतिभासलीं, पहा ओं. ३२४. **पाळाइलें**–न्याहाळून पाहिलें. पहा–ओं. ३२३.

**ओं. ३४०.**—आपलीं मूळचीं वांसरें व गोपाळ कोठे गेले हें अंतर्ज्ञानानें पाहूं लागतांच, तीं ब्रह्मदेवानें (आपल्या सत्यलोकाला) नेल्याचें बलरामाला आढळून आलें. मग बलराम आपल्याशींच म्हणाला, "हा माझा स्वामी श्रीकृष्णच हा सर्व खेळ खेळतो आहे." श्रीकृष्णानेंच वासरांचीं व गोपाळांचीं रूपें घेऊन इकडे गोकुळांत जणु कांहींच घडलें नाहीं असें जसें भासविलें आहे, तसाच ब्रह्मदेवाचाही नक्षा त्यानें उतरविला आहे, अशा रीतीनें श्रीकृष्णाचा हा सर्व खेळ आहे, असें बलरामाला कळून आलें. श्रीकृष्णाच्या अपेक्षेनें बलरामाची भूमिका दुय्यम प्रतीची आहे, असें महानुभावतत्त्वाप्रमाणें मानलें पाहिजे. म्हणूनच येथें बलराम श्रीकृष्णाला, "स्वामी माझा" असें संबोधतो.

**ओं. ३४१.**—त्यानंतर बलराम श्रीकृष्णास म्हणाला–"ज्यानें केवळ एका शक्तीनें ब्रह्मदेवाचा असा गर्व हरण केला, त्या तुझें सामर्थ्य अथवा महिमा कोण जाणणार ?" **एकें शक्तीचेनि गुणें**—परमेश्वर हा सर्वशक्तियुक्त असून त्याच्या शक्तिचक्रांत सर्व देवता, सर्व गुण, सर्व धर्म, ज्ञान व विज्ञान यांचा अंतर्भाव होतो. यांपैकीं देवतांना चेतना शक्ति व इतरांना जडा शक्ति असें म्हणतात. पण परमेश्वराच्या ठिकाणीं ज्ञानशक्तीप्रमाणेंच एक विज्ञानशक्तीही असते. विज्ञान म्हणजे विपरीत ज्ञान. या विज्ञानशक्तीमुळेंच भावीं अभाव व अभावीं भाव दाखविणें, असे अद्भुत चमत्कार परमेश्वर करतो. याच एका शक्तीच्या योगानें श्रीकृष्णानें वासरें व गोपाळ यांचीं रूपें घेऊन ब्रह्मदेवाचा अपेक्षाभंग केला. श्रीकृष्णाची परीक्षा पाहण्यासाठीं ब्रह्मदेवानें गोकुळांतील वांसरें व गोपाळ सत्यलोकीं हरण केलीं. त्याला वाटलें आतां गोकुळांत एकच हाहाकार उडून श्रीकृष्णाभोंवतीं काहूर माजेल. पण श्रीकृष्णानें आपल्या विज्ञानशक्तीनें वासरें व गोपाळ यांची रूपें घेऊन, जणु काहींच घडलें नाहीं असें भासविल्यामुळें, ब्रह्मदेवाची तोडफोड होऊन त्याचा नक्षा उतरला.

**ओं. ३४२**—परमेश्वराचा अवतार दुष्ट दैत्यांचा नाश व शरण आलेल्यांचा उद्धार करण्यासाठीं आहे, असा उल्लेख करून बलराम श्रीकृष्णाची स्तुति करतो. **उद्धरण**—अनादि अविद्येचें परातंत्र्य झुगारून देऊन तिच्यापासून पूर्णपणें

स्वतंत्र होणें, हाच खरा मोक्ष होय. जीवस्वरूपी असलेलें हें अविद्येचें चिन्ह जेव्हां गळून पडेल, तेव्हांच मोक्ष मिळूं शकेल. त्यासाठीं जीवाला प्रथम या. अविद्येचें, तिच्यामुळें त्यानें रचलेल्या मळकर्मांचें, संलग्नाचें व आपल्या दोषांचें यथार्थ ज्ञान झालें पाहिजे. या आत्मज्ञानानेंच मोक्ष मिळतो. पण नुसत्या मळकर्मादिकांच्या ज्ञानानें मोक्ष मिळत नसून, त्यासाठीं आत्मज्ञान म्हणजे परमेश्वरज्ञान झालें पाहिजे, व हेंच ज्ञान मोचक आहे. तथापि या ज्ञानापेक्षां परमेश्वराचें प्रेम विशेष मोचक आहे. तात्पर्य अविद्येपासून मोक्ष मिळवून, परब्रह्म परमेश्वर हा त्याच्या ज्ञानानें व भक्तीनेंच प्राप्त होऊं शकतो. परमेश्वराचें ज्ञान व प्रेम परमेश्वराव्यतिरिक्त कोणी देत नाहीं. अर्थात् हा परमेश्वर म्हणजे व्यक्त परमेश्वरावतार असून, तोच ज्ञानप्रेमाच्या साधनानीं आपली प्राप्ति करून देतो. शिवाय परमेश्वरानें जरी पशुतिर्यंचांचे अवतार घेतले, तरी ते मात्र उद्धरणकार्य करूं शकत नाहींत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. परमेश्वराचा मनुष्यावतार व त्यांतही युक्त मनुष्यावतारच हें कार्य करूं शकतो. पण या मनुष्यावतारांतही •परावरदृश्य म्हणजे उभय दृश्यावतारच जीवांना ज्ञानप्रेम देऊन त्यांचें उद्धरण करूं शकतो. (पहा–महानुभाव तत्त्वज्ञान पृ. ४०२–४०४). श्रीकृष्णाचा अवतार म्हणजे परब्रह्मानें घेतलेला असाच उभयदृश्य मनुष्यावतार असून, त्यानें आपल्या भक्तांना ज्ञान व प्रेम देऊन त्यांचा उद्धार केला, असा बळरामाच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.

**ओं. ३४३**—"श्रीकृष्णाच्या रूपानें परब्रह्माच्या मनुष्यावताराचें ज्ञान झाल्यामुळें, बलरामानें त्याची स्तुति केली. तर श्रीकृष्णानेंही स्मित करून (व त्या स्मितानें बलरामाच्या मनांतील आशय ओळखलासें दाखवून) बलरामाला मोहित केलें, (आनंदित केलें)." **वस्तु संबंधें**—महानुभावांच्या तत्त्वज्ञानांत 'वस्तु' या शब्दाचा अर्थ थोडा भिन्न आहे. ईश्वराच्या अवर अवतारांनाच 'वस्तु' ही संज्ञा लावली जाते. ईश्वरानें श्रीकृष्णाचा जो अवतार घेतला, तो वस्तूच असून, त्याचें खरें ज्ञान झाल्यामुळेंच बलराम त्याच्या स्तुतीस प्रवृत्त झाला आहे. बलरामाला श्रीकृष्णाच्या अवताराचें खरें रहस्य समजलें होतें, व तें त्यानें त्याच्या स्तुतीच्या रूपानें प्रकट केलें.

**ओं. ३४५**—"वृंदावनाला गाईवासरं चारायला जायचं, व ईश्वराचें चरित्र गात वासरं पुढं घालून (सायंकाळीं) गोकुळाला परत यायचं, असा क्रम रोज

चालला होता. तों इतक्यांत ब्रह्मदेवाला आपण केलेल्या कृत्याची आठवण झाली." वास्तविक गोकुळांतली गाई-वासरं ब्रह्मदेवानं हरण करून किती तरी दिवस झाले होते! पण श्रीकृष्णानें त्याचीं रूपें घेऊन त्यांची उणीव मुळींच भासूं न दिल्यानें, विशेष असें कांहीं घडल्याचा भासही कोणास झाला नाहीं. गोकुळांतील गवळयांचा रोजचा जीवनक्रम अबाधित चाललाच होता! आपलीं मुलें व वासरें ब्रह्मदेवानं नेलीं आहेत, याची जाणीवही त्यांना नव्हती! तर इकडे ब्रह्मदेवालाही आपण गोकुळांतील वासरें व गोपाळ हरण केले आहेत याचें स्मरण नव्हतें. जणु कांहीं कांहींच झालें नाहीं अशा तऱ्हेनें श्रीकृष्णाची लीला नित्य चालू होती. तों अचानक ब्रह्मदेवाला आपल्या केल्या कृत्याची आठवण झाली. **से**—आठवण. **प्रत्यदीनीं**—प्रतिदिनीं, प्रत्येक दिवशीं, दररोज. **चतुराननन**—ब्रह्मदेव.

**ओं. ३४६**—"ज्यावेळीं एक वर्ष पालटलें, तेव्हां ब्रह्मदेवाचा एक क्षण झाला. म्हणून तो आपण (क्षणापूर्वीं जें केलें त्याचा परिणाम तरी काय झाला,) हें पाहण्यासाठीं मर्त्यलोकांत आला." वास्तविक ब्रह्मदेवानं वासरें व गोपाळ सत्यलोकाला नेऊन एक वर्ष होऊन गेलें होतें, पण आमचें एक वर्ष म्हणजे ब्रह्मदेवाचा एक क्षण असल्यामुळें, आपण केलेलें वत्सहरण क्षणापूर्वीच केलें असें ब्रह्मदेवाला वाटलें. सारांश श्रीकृष्णानें गोपवासरांचीं रूपें घेऊन एक वर्षपर्यंत जो अद्भुत चमत्कार केला, त्याची जाणीव त्या मुदतींत कोणालाच नव्हती. मर्त्यलोकांत एक वर्ष होऊन गेल्यानंतर म्हणजे ब्रह्मदेवाच्या एका क्षणानंतर ब्रह्मदेवाला एकदम आठवण झाली, व तो आपल्या कृत्याचा काय परिणाम झाला तें पाहण्यास पृथ्वीवर आला. **आपुले केलें**—आपण केलेलें, (भूतकाळाचा पूर्ण भूतकाळासारखा उपयोग). गोकुळांत आपल्या वत्सहरणाच्या कृत्यानें भलतीच खळबळ उडाली असेल, अशी त्याची कल्पना होती.

**ओं. ३४७**—"आपल्या वासरांच्या व अपत्यांच्या विरहानें अगदीं वेड्या झालेल्या गाई व स्त्रिया आतां काय बरें करीत असतील?" असा विचार ब्रह्मदेव आपल्या मनांत करूं लागला. **विवरों लागेला** विचार करूं लागला. पहा—"हृदयीं विवरीं गाधिकुमार'—मुक्तेश्वर—अदिपर्व ४०।८० "द्वादश वरुषें आरण्यवासु। सरल्या नंतरें कुरुनरेशु। दीर्घदृष्टी गुणविशेषु। विचार विवरी तो ऐका॥ १०॥"—मुक्तेश्वर, विराटपर्व. गोकुळांतील वासरें व गोपाळ आपण सत्यलोकीं हरण केल्यामुळें, तेथील गाई व गोपी अगदीं वेड्या झाल्या असतील,

अशी ब्रह्मदेवाची समजूत झाली होती. आपण त्यांची चांगलीच गंमत उडविली आहे, आतां श्रीकृष्ण यावर काय युक्ति योजतो, ती तर पाहूंया, अशा तऱ्हेचे मांडे ब्रह्मदेव मनांत खात होता. **निऱ्हा**—अगदीं, निखालस.

**ओं. ३४८**—"पण त्यानें ईश्वराचा (श्रीकृष्णाचा) महिमा जाणलाच नव्हता! (कारण) ज्यानें त्रिभुवनाला सुखी केलें आहे, त्याच्याच भक्तांना दुःख प्राप्त होईल, हें घडेल तरी कसं?" ब्रह्मदेवाला ईश्वराचा महिमा पुरता कळलाच नव्हता. नाहींतर त्याची वरीलप्रमाणें समजूत कां झाली असती? त्याला वास्तविक हें समजायला पाहिजे होतें कीं, जो परमेश्वर (श्रीकृष्ण) तिन्ही जगांना (स्वर्ग, मृत्यु, पाताळ) सारखाच सुख देणारा आहे, त्याच्याच माणसांवर (त्यानं आपलीं म्हटलेल्यांवर) दुःख कसें ओढवेल? **तेआंची होती तेआं**—त्याची झाली होती त्यांना, अर्थात् श्रीकृष्णाच्या भक्तांना. गोकुळांतील गाई व स्त्रिया जर श्रीकृष्णाच्या भक्त होत्या, तर त्यांच्यावर त्यांच्या अपत्यविरहाचें दुःख कसें कोसळेल, श्रीकृष्ण कसेंही करून तें निवारण करीलच, हें ब्रह्मदेवाला समजायला पाहिजे होतें. **व्याकुलपण**—दुःख, चिंता. ब्रह्मदेव श्रीकृष्णाबद्दलच्या अज्ञानांतच कसा होता, तें पुढील ओंवींत दृष्टांतानें स्पष्ट केलें आहे.

**ओं. ३४९**— "सिंहाचें सामर्थ्य विसरून, एखाद्या हत्तीनें ज्याप्रमाणें गर्वानें फुगून जावें, त्याप्रमाणें (श्रीकृष्णाचा माहिमा विसरून) ब्रह्मदेव निरर्गल बोलूं लागला!" **असासितु**—अविशानें, अकस्मात्. पहा–"सिंहासना-वरौनि ऊठिला] तंवकें असासितु निगाला। तंव वारू मेळविला। वारुडेनि ॥ ९८९ ॥–भास्कर, शिशुपालवध. "ऐसे बोलौनि असासित: पाठीं धाविनली आक्रंदत"–उद्धवगीता–३२५. ब्रह्मदेवाचें हें भाषण पुढें ३५३ ओंवीपर्यंत आलें आहे.

**ओं. ३५०**—ब्रह्मदेवाचें हें स्वगत भाषण आहे. वासरांचें हरण झालेलें पाहून श्रीकृष्ण स्वस्थ कसे बसले याचें त्याला आश्चर्य वाटलें. ज्यानें पूर्वी मोठमोठे राक्षस मारून पराक्रम केला, त्याचा तो पराक्रम, अभिमान व सामर्थ्य आज गेलें तरी कोठें, अशी ब्रह्मदेवाला शंका आली आहे. श्रीकृष्णानें मनुष्यरूपानें पृथ्वीवर अवतार धारण केल्यानें, तो कदाचित् वासरांची मुक्तता करण्यास आपल्या सत्यलोकाला यावयास भ्याला, अशीही वेडी कल्पना ब्रह्मदेवाला

आल्यावांचून राहिली नाहीं. **चोरां शंखा**—शंखासुरानें देवांना जिंकून वेद चोरले व ते समुद्राच्या तळाला नेऊन ठेवले. तेथून ते परमेश्वरानें मत्स्यावतार घेऊन परत आणले. **हिरण्याक्ष**—हा हिरण्यकशिपूचा भाऊ असून, त्यानें समुद्रतळाला नेलेल्या पृथ्वीस परमेश्वरानें वराहावतार घेऊन वर आणली. **हिरण्यकाशिपु**—हा प्रल्हादाचा पिता असून ईश्वराचा शत्रु होता. परमेश्वरानें नृसिंहावतार घेऊन याचें पोट फाडलें. परमेश्वराच्या कूर्म, वराह व नृसिंह या अवतारांतील महत्कृत्यांचा येथें उल्लेख करून, ब्रह्मदेव असें म्हणतो कीं, "या अवतारांत दृष्टोत्पत्तीस आलेलं हें परमेश्वराचं सामर्थ्य श्रीकृष्णाच्या चालू अवतारांत कोठें गेलें ?" आपण वासरं व गोपाळ ब्रह्मलोकाला नेले, तरी त्यांना परत आणण्याचा कांहींच प्रयत्न श्रीकृष्णाकडून झाला नाहीं असें पाहून परमेश्वराच्या सामर्थ्याबद्दलच ब्रह्मदेवाला अनेक शंका आल्या आहेत, व त्याच त्यानें पुढें व्यक्त केल्या आहेत. **विदारिला**—फाडला. **अतुल बलिआं**—अनन्य सामर्थ्यशाली.

**ओ. ३५१**—"परमेश्वराचें तें [ कूर्म, वराह व नृसिंहावतारांतील ] शक्तिसामर्थ्य गेलें तरी कोठें ? कां त्यानें भक्तांचा अभिमानच टाकला ? कीं परब्रह्माची आतां फजीति झाली आहे, तें उपहासाला प्राप्त झालें आहे–हें मी खरें मानावें ?" **अभिमानु**—भक्ताबद्दलचा अभिमान, आपुलकी. परमेश्वरानें आपल्या भक्ताबद्दल दाखविलेली आपुलकी आतां सोडली काय ? **अवाक्रिये**–उपहासाला, फजितीला. "परब्रह्माच्या अवताराचें पूर्वीसारखें आतां चालत नाहीं असें पाहून, तें ( परब्रह्म ) आतां उपहासाला पात्र झालें आहे, असें मी मानावें काय ?" अशी ब्रह्मदेवाची शंका.

**ओ. ३५२**—ब्रह्मदेव आणखी शंका प्रगट करतो. "किंवा परमेश्वरानें मनुष्यपण स्वीकारलें म्हणून तो ( मृत्युलोकाहून ) सत्यलोकाला यायला भ्याला ? कीं परमेश्वरानें दुसराच प्रपंच निर्माण केला ?" आपण गोकुळांतील श्रीकृष्णाची वासरं सत्यलोकाला आणलीं, तरी तीं परत नेण्याची कांहींच व्यवस्था श्रीकृष्णानें केली नाहीं, यावर ब्रह्मदेवाला या शंका आल्या आहेत. श्रीकृष्णाचा अवतार म्हणजे मनुष्यावतारच होय. मग साधा माणूस सत्यलोकांत यायला भिणारच. आणि म्हणूनच कदाचित् श्रीकृष्ण आपलीं वासरं आणण्यास सत्यलोकांत यायला भ्याला असणार ! **नवलु प्रपंचु**—किंवा हीं सत्यलोकांत गेलेलीं वासरं आतां

परत येण्याची किंवा आणण्याची आशा नाहीं, तीं गेली तर गेली, असें समजून श्रीकृष्णानें नवीन प्रपंच, नवी सृष्टी तर उत्पन्न केली नाहीं ना ! अशीही आशंका ब्रह्मदेवाला आली आहे. **आवगलां**–आवगणें=सोंग घेणें, वेष घेणें. **विहाला**–भ्याला. **नवल**–नवनि.

**ओं. ३५३**—"याप्रमाणें विचार करीत (निरनिराळ्या शंका कुशंका काढीत) ब्रह्मदेव आपल्या सत्यलोकांतून (मृत्यलोकांत) गोकुळांत आला. तों परमेश्वराच्या विज्ञानशक्तीचा अद्भुत प्रभाव त्याच्या दृष्टीस पडला." **विज्ञान-शक्ति**—"सर्व देवता, सर्व गुण, सर्व धर्म, ज्ञान न विज्ञान या परमेश्वराच्या शक्ती होत. यांपैकीं देवतांना परमेश्वराच्या चेतनाशक्ति व इतर शक्तींना जडा शक्ति असें म्हणतात. परमेश्वराच्या स्वरूपीं ईश्वरस्वरूपाप्रमाणेंच अनंत गुण व अनंत धर्म आहेत. पण या स्वरूपांग धर्मांशिवाय त्याच्या ठिकाणीं शक्तिरूप गुणधर्म निराळेच आहेत. ज्ञानविज्ञानाच्याहि याबतींत तीच वस्तुस्थिति आहे. परमेश्वराचें स्वरूप ज्ञानमय असणें निराळें आणि त्याच्या ठिकाणीं ज्ञानशक्ति असणें निराळें. अर्थात् गुणधर्मांप्रमाणेंच स्वरूपांग ज्ञानविज्ञाना-शिवाय परमेश्वराच्या ठिकाणीं ज्ञानशक्ति व विज्ञानशक्ति वेगळी असते. परमेश्वराच्या ठिकाणीं ज्ञानशक्तीप्रमाणेंच एक विज्ञानशक्तीही आहे. विज्ञान म्हणजे विपरीत ज्ञान. या विज्ञानशक्तीच्या सामर्थ्यानें भावाचा अभाव करणें किंवा अभावीं भाव दाखविणें, असे अनेक चमत्कार परमेश्वर करूं शकतो. (पहा महानुभाव तत्त्वज्ञान पृ. १२६–१३९). प्रस्तुत वच्छहरण प्रकरणींही ब्रह्मदेवानें गोकुळांतील वांसरें हरण केल्यावर, तेथें तीं आहेतच असें दाखविण्याचा श्रीकृष्णानें जो चमत्कार केला, तो त्यानें आपल्याला विज्ञान-शक्तीनेंच केला असल्यानें, तिचाच उल्लेख येथें केला गेला आहे.

**ओं. ३५४**—"ब्रह्मदेव जों गोकुळांत काय प्रकार चालला आहे तें पहाण्यास आला, तों त्याला पावे व सिंगांच्या गजराचे प्रतिध्वनी आकाशांत उठत असलेले, व टाळघोळ, मोहरीं वाजत असलेली आढळून आली." या वाद्यांचा असाच उल्लेख मागें ओं. ७० व ओं. ८४ मध्यें आला आहे. आपण वासरं व गोपाळ हरण केल्यानें, गोकुळांतील लोक हवालदील झालें असतील अशी ब्रह्मदेवाची कल्पना होती ! पण तेथें तर त्याला असला कांहींच प्रकार दिसला नाहीं. उलट सर्व लोक श्रीकृष्णभजनाच्या आनंदांतच गर्क असलेले त्याला दिसले. **वातांती**—वाजतात.

**ओं. ३५५**—जीं वासरें व गोपाळ ब्रह्मदेवानें सत्यलोकांत हरण केलीं होतीं, तींच देहभाव विसरून अत्यानंदांत श्रीकृष्णचरित्र गात असलेलीं त्यानें गोकुळांत पाहिलीं. कारण श्रीकृष्णानें विज्ञानशक्तीनें तीं सत्यलोकाहून गोकुळांत केव्हांच आणलीं होतीं !

**ओं. ३५६**—पण "आपण मर्त्यलोकास आल्यावर श्रीकृष्णानें तीं वासरें आपणास न कळत इकडे आणलीं असतील, म्हणून ज्ञानदृष्टीनें मागें पाहूं जातां, ब्रह्मदेवाला तीं सत्यलोकांत दिसलीं." एवंच श्रीकृष्णानें आपल्या विज्ञानशक्तीनें तीं वासरें ब्रह्मदेवाला दोनी ठिकाणीं दाखविण्याचा चमत्कार केला ! पृथ्वीवर पहावं तर तेथें आहेत, पुनः मागें सत्यलोकांत पहावं तर तेथेंही तीं आहेतच.

**ओं. ३५७**—पुनः त्यानें पृथ्वीवर (गोकुळांत) दृष्टि फेंकतांच त्याला श्रीकृष्णच त्या वत्सगोपाळासह वावरत असलेला दिसला. **निरोपमु**—निरुपम, अतुल.

**ओं. ३५८**—याप्रमाणें तीं वासरें एकसमयावच्छेदानें दोनी ठिकाणीं पाहिल्यावर, ब्रह्मदेव बुचकळयांत पडला. तों त्याला आणखी एक चमत्कार तेथें दृष्टीस पडला. **परिऐसा**—ऐका.

**ओं. ३५९**—ब्रह्मदेवाला तेथें (गोकुळांत) आणखी विशेष असें दिसून आलें कीं, सर्वच गोपाळ श्रीकृष्णाप्रमाणें चतुर्भुज व शंखचक्रादि आयुधांनीं युक्त असे आहेत. सारांश सर्वच गोपाळ कृष्णस्वरूप पावलेले त्याला आढळून आले. मुक्तीच्या चार प्रकारापैकीं सलोकता, समीपता व ही सरूपता असे तीन प्रकार त्या गोपाळांना साध्य झाले होते. **कौस्तुभकंठी**—कौस्तुभ रत्न ज्यांच्या गळयांत आहे असे. पहा–'कंठीं कौस्तुभमणी वीराजीत'–तुकाराम.

**ओं. ३६०**—सर्व गोपाळ श्रीकृष्णरूप झालेले ब्रह्मदेवाला दिसल्यामुळें, श्रीकृष्णाच्या अंगावरील नित्याचे अलंकारही त्या प्रत्येकाच्या अंगावर त्याला दिसले. **पदकीं** इ०—श्रीकृष्णाच्या गळयांतील वैजयंती माळेच्या मध्यभागीं जें पदक होतें, त्यांत नीळरत्नाचें कोंदण केलें होतें. **खेवनी**—कोंदण. पहा मागें ओं. २४२. पुनः "अष्टादश पुराणें । तियेंचि मणिभूषणें । पदपद्धति खेवणें । प्रमेयरत्नाचीं ॥ ५ ॥-ज्ञानेश्वरी-१. **अंगदांची**—बाहुभूषणांची. **मिरवणी**—

शोभा. **मकरकुंडलें**—कानांत असणारी मगराच्या आकृतीचीं कुंडलें. पहा—
'मकर कुंडलें, तळपती श्रवणीं'–तुकाराम.

**ओं. ३६१—मुकुटपाटवर्धन**—सर्वच गोपाळ श्रेष्ठप्रतीच्या मुकुटांनीं विराजमान झाले होते. **श्रीवत्स-लंछन**—विष्णूच्या हृदयावरील पांढऱ्या केसांचा भोंवरा. यासच विष्णूच्या हृदयावरील भृगूच्या लत्ताप्रहाराचें चिन्ह म्हणतात. पहा—"सकळ भूषणांचें भूषण। ब्राह्मणाचा दक्षिण चरण। हृदयीं वाहे नारायण। श्रीवत्सलांछन गोविंद।"–एकनाथ, रुक्मिणीस्वयंवर १।६८. "हृदयीं श्रीवत्सलांछन। मिरवी भक्तांचें भूषण।"–तुकाराम, ७२६. गोकुळांतील गोपाळांच्या छातीवरही श्रीकृष्णाप्रमाणेंच ही वत्सलांछनाची विशिष्ट खूण ब्रह्मदेवाला दिसली. **आघवे**—आवघे, सर्व. भागवत दशमस्कंद अध्याय १३, श्लोक ४६।४८ चाच अनुवाद वरील ३५९–३६१ ओंव्यांत केला आहे.

**ओं. ३६२**—या वरील अद्भुत प्रकारानें ब्रह्मदेव विस्मित होऊन आपल्या मनाशींच ( हें काय असावें यासंबंधीं ) विचार करूं लागला. तों त्याला प्रत्येक गोपाळाजवळ एकेक ब्रह्मदेव दिसला." श्रीकृष्णानें ब्रह्मदेवाला हा आणखी एक विस्मयाचा धक्का दिला आहे. सर्व गोपाळ श्रीकृष्णरूप झाल्याचें पाहून ब्रह्मदेव जों आश्चर्यचकित होतो, तों प्रत्येक गोपाळाजवळ एकेक ब्रह्मदेव, असे एका ब्रह्मदेवाचे अनेक ब्रह्मदेव श्रीकृष्णानें तेथें करून दाखविले. ( पर्यायानें येथें ब्रह्मदेवाचें असणारें अनन्यत्वच अमान्य करून, श्रीकृष्णानें त्याच्या गर्वाला हें उत्तरच दिलें आहे. ) पुढील ओंवीत तर प्रत्येक गोपाळाजवळ सर्व तत्त्वें व सर्व शक्ती असलेल्या दाखवून, ब्रह्मदेवाला अधिकच विस्मित केलें आहे. येथें देखील प्रत्येक गोपाळाभोंवतीं चराचर सर्व सृष्टी गोळा झाल्याचें वर्णन करतांना, दामोदर पंडितानें, भागवत दशम स्कंद १३ अध्यायांतील, श्लोक ५०–५५ यांचा आधार घेतला आहे. पण या चराचर सृष्टींतील ज्या तत्त्वांचा व शक्तींचा त्यानें येथें अंतर्भाव केला आहे, तीं मात्र आपल्या महानुभाव तत्त्वज्ञानाला अनुसरून आहेत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

**ओं. ३६३**—गोकुळांतील सर्वच गोपाळ श्रीकृष्णरूप झाल्याचें ब्रह्मदेवाला दाखविल्यानंतर, अशा श्रीकृष्णरूप प्रत्येक गोपाळाजवळ सर्व तत्त्वें व परस्परांची उपासना करणारें अनेक शक्तींचे समूह, मूर्तिमंत स्वरूपांत ब्रह्मदेवाला दिसून आले. **सकलें तत्त्वें**—सांख्यांची चोवीस तत्त्वें, पंचमहाभूतें, पंचविषय,

दशेंद्रियें, मन, अहंकार, महत्तत्त्व, व माया अशी चोवीस तत्त्वें असून, पुरुष हा २५ वा त्यांहून वेगळा आहे. हीं सर्व २४ तत्त्वें मूळचीं निराकार असलीं, तरी तीं साकार स्वरूपांत ब्रह्मदेवानें तेथें श्रीकृष्णाच्या अद्भुत शक्तीनें पाहिलीं. **शक्तिचक्रें**–सर्व देवता, सर्व गुण, सर्व धर्म, ज्ञान व विज्ञान या परमेश्वराच्या शक्ति होत. यापैकीं देवतांना परमेश्वराच्या चेतनाशक्ती व इतर शक्तींना जडाशक्ती असें म्हणतात. देवतांचे एकंदर ९ थोवे पुढीलप्रमाणें आहेतः–(१) कर्मभूमीच्या देवता–१३ कोटी (२) अष्टौदेवयोनीच्या देवता–१३ कोटी (३) अंतराळीच्या देवता –१३ कोटी (४) स्वर्गीच्या देवता–३३ कोटी (५) सत्य–कैलास–वैकुंठीच्या देवता–९ कोटी (६) क्षीराब्धीच्या देवता–१। लक्ष (७) अष्टभैरव–८ (८) विश्व–१ (९) माया–१. या सर्व थोव्यांत उच्चनीचक्रम असून, माया ही सर्वांत उच्च देवता होय. विश्वदेवता मायेपेक्षां नीच, विश्वेपेक्षा अष्टभैरव नीच, याप्रमाणें वरील थोव्यांतील देवता खालील थोव्यांतील देवतांहून नीच होत. या देवतांचीं स्वरूपें चेतन असून, त्यांच्या ठिकाणीं ज्ञान, सुख, सामर्थ्य, ऐश्वर्य व प्रकाश या पंचप्रकारांची समृद्धि असते. एका देवतेपेक्षां दुसरी वरील देवता उंच किंवा श्रेष्ठ आहे याचा अर्थच असा कीं, त्या नीच देवतेपेक्षां उंच देवतेच्या ठिकाणीं हे पंचप्रकार अधिक प्रमाणांत असतात. नीच देवतेच्या स्वरूपापेक्षां ऊच देवतेचे स्वरूप आठ पटींनी 'सपूर' म्हणजे पातळ असतें. अर्थात्, ऊच देवतेच्या स्वरूपापेक्षां नीच देवतेचें स्वरूप आठ पटींनीं 'घोष्टर' किंवा जाडेभरडें असतें. आणि म्हणूनच वरील देवतेचें स्वरूप खालील देवतेच्या स्वरूपाला नेहमीं व्यापून असतें. हा नियम थोवेपरत्वें नसून देवतापरत्वें लागू आहे. उदा. कर्मभूमींतील शेवटची देवता 'यक्षिणी,' हिच्या स्वरूपापेक्षां तिच्यावरील 'यक्ष' देवतेचें स्वरूप आठ पटीनीं सपूर असल्यामुळें, यक्षाचें स्वरूप यक्षिणीच्या स्वरूपाला व्यापून असतें. यक्षावरील देवतेचें स्वरूप, त्याच्याहिपेक्षां आठ पटींनीं अधिक सपूर असल्यामुळें, त्यानें यक्षाचें स्वरूप तर व्यापलेंच आहे. पण त्याच्या खालील 'यक्षिणी'चेंहि स्वरूप व्यापलेलें आहे. यक्षिणीपासून वरील सर्व देवतांच्या बाबतींत पृथक्त्वानें हा नियम लागू आहे. (पहा–महानुभाव तत्त्वज्ञान पृ.३६–४३)

**उपासताती एकमेकांतें**—वर सांगितलेल्या प्रत्येक थोव्यांतील देवतांच्या समूहांतील नीच देवता, आपल्यावरील उच्च देवतेची सेवा करीत असलेली व उच्च देवताहि आपल्या खालील नीच देवतेला व्यापून असलेली, ब्रह्मदेवाला तेथें

प्रत्यक्ष दिसून आलीं. अशी देवतांची चक्रें, देवतांचे समूह त्यानें तेथें श्रीकृष्ण-स्वरूपीं प्रत्येक गोपाळाच्या भोंवतीं मूर्तिमंत पाहिले. श्रीकृष्णानें आपल्या माया-शक्तीनें ब्रह्मदेवाला हा चमत्कार दाखविला.

**ओं. ३६४**—याशिवाय ब्रह्मा, विष्णु व शंकर, श्रीकृष्णाचें सर्व सैन्य, अष्ट दिग्पाळ, सात समुद्र व आठ कुलपर्वत त्यानें ( ब्रह्मदेवानें ) प्रत्येक गोपाळाजवळ मूर्तिमंत पाहिले. **ब्रह्माविष्णु महाकाळु**—या ५ व्या थोव्यापैकीं, सत्य–कैलास–वैकुंठीच्या देवता होत. महानुभाव तत्त्वज्ञानाप्रमाणें देवतांच्या स्वरूपांत सामर्थ्य असलें, तरी सर्वसमर्थ ईश्वराच्या सामर्थ्याच्या तुलनेनें तें अगदींच तोकडें ठरतें. उदाहणार्थ परमेश्वराचें संहारसामर्थ्य हें कोणत्याच देवतेच्या ठिकाणीं नाहीं. आमच्या ब्रह्माविष्णुमहेशादि पौराणिक देवता, महानुभावमताप्रमाणें परमेश्वराहून गौण किंवा दुय्यम ठरत असल्यानें, त्या येथें श्रीकृष्णस्वरूपीं प्रत्येक गोपाळाची सेवा करतांना ब्रह्मदेवाला दिसल्या, असें येथें वर्णन केलें आहे. ब्रह्मदेवाला येथेंहि पुनः आपला गौणपणा प्रत्यक्ष दिग्दर्शित करण्यांत श्रीकृष्णाचें चातुर्यच दिसून येतें. **सकल साहान**—सर्व सैन्य. पहा–" कीं तें अनंगाचें पालाणलें साहाण। त्रिनेत्रावरि "–नरेंद्र, रु. स्वयंवर–७३६. **अष्ट दिग्पाळ**—आठ दिशांचे पति. पूर्वेचा इंद्र, आग्नियेचा अग्नि, दक्षिणेचा यम, नैऋत्येचा नैऋत, पश्चिमेचा वरुण, वायव्येचा वायव्य, उत्तरेचा उत्तर व ईशान्येचा ईशान. असे हे अष्ट दिग्पाळ ब्रह्मदेवानें तेथें मूर्तिमंत पाहिले. **सप्तसमुद्र**—क्षार, इक्षुरस सुरा, घृत, क्षीर, दधि, व शुद्धोदक समुद्र. पहा–" जैसें अगस्तीभेणें देवां आडः पडिले सातै समुद्र "–नरेंद्र, रु. स्वयंवर–८७३. **अष्टकुळाचळु**—आठ कुलपर्वत. पण " महेंद्रोमलयः सह्यः शुक्तिमान् ऋक्षपर्वतः। विंध्यश्च पारियात्रश्च सप्तैते कुलपर्वताः॥ "– यांत सातच कुलपर्वत दिले आहेत. हे सर्व ब्रह्मदेवानें तेथें प्रत्येक गोपाळाजवळ मूर्तिमंत पाहिले. याशिवाव आणखीही त्यानें काय काय पाहिलें, तें पुढील ओंवींत दिलें आहे.

**ओं. ३६५**—" याशिवाय पंचमहाभूतें, आकाशांत संचार करणारे गंधर्व, किन्नर, इंद्रचंद्रादि क्षुद्र देवता, मत्स्यकच्छादि जलचर प्राणी, आपापल्या परि-वारासह तेथील प्रत्येक गोपाळाची सेवा करीत असलेले ( ब्रह्मदेवानें ) पाहिले " **महाभूतें**–पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश. **खेचरें**–आकाशगामी किन्नर. **क्षुद्रदेवता**–इंद्र, वायु, यम, स्कंद, नैऋत, गणपति, भैरव इत्यादि देव व काली,

कूष्मांडा, तुळजाई, मेसाई, जाखाई, जोखाई, इत्यादि देवता, यांची क्षुद्रदेवतांमध्येंच गणना होते. यांना सामर्थ्य असलें, तरी परमेश्वराप्रमाणें मोक्ष देण्याचें सामर्थ्य यांच्यांत नाहीं. **ओँगळता**—आश्रय करीत असतां. प्रत्येक गोपाळाचा आश्रय करून असलेले ब्रह्मदेवानें पाहिले. एकंदरीनें सर्व चराचर सृष्टीच मूर्तिमंत प्रत्येक गोपाळाजवळ दाखवून, श्रीकृष्णानें ते सर्व गोपाळ श्रीकृष्णच कसे आहेत, हें ब्रह्मदेवाच्या निदर्शनास आणलें, व अशा गोपाळांचें आपण हरण केलें, म्हणजे पर्यायानें श्रीकृष्णाचेंच हरण केलें, हें सर्व अज्ञानानें आपल्या हातून घडलें, याची त्यांस जाणीव करून देऊन त्याच्या गर्वाचें घर खालीं केलें.

**ओं. ३६६**—श्रीकृष्णानें ब्रह्मदेवाला ही जी सर्व चराचर सृष्टि प्रत्येक गोपाळाजवळ दाखविली, ती खरें पाहिलें तर, ब्रह्मदेवाला विस्मित करून त्याचा गर्व हरण करण्यासाठींच होती. पण श्रीकृष्णाच्या हेतूवर येथें कवीनें उत्प्रेक्षा योजून आपली कल्पकता लढविली आहे. कवि म्हणतो—"मला तर असें वाटतें कीं देवाला आपला परिवार किती आहे याचा विसर पडला. म्हणून त्या सर्व परिवाराचा पडताळाच जणु तो घेत आहे." आपली सर्व चराचर सृष्टि ब्रह्मदेवाला दाखविण्यांत श्रीकृष्णाचा हेतु, जणु त्या सर्व सृष्टीचा त्याला एकदा पडताळा घ्यावयाचा होता ! म्हणून झाडून साऱ्या वस्तू त्यानें गोकुळांत बोलाविल्या ! **ते व्हेळीं**—ब्रह्मदेवाला सर्व तत्त्वांचें, शक्तिचक्रांचें, ब्रह्मा विष्णु महेशादि देवतांचें सान्निध्य प्रत्येक गोपाळाजवळ दाखवितांना. **विसुरासें**—विसुर + असे. विस्मरण असे. देवाला आपल्या परिवारांत कोण व किती आहेत याचें विस्मरण पडल्यामुळें, त्यानें हा नामनिशीवार पडताळा पाहिला ! **दाखाला**—पडताळा. पहा–"चालवेयां वैराग्यमंडळां: श्रृंगारें आपुला दाखाळा पाहिला ॥ कवतिकें दाखविला: मन्मथासीं"–भास्कर, शिशुपालवध ३३२. **सर्व दळांचा**—आपल्या सर्व परिवाराचा, आपल्या सर्व सैन्याचा. कारण वर ओं. ३६४ मध्यें 'सकल साहान' याचा उल्लेख आलाच आहे.

**ओं. ३६७**—अनेक देवताचक्रें तेथें प्रत्येक गोपाळापाशीं दिसलीं, यावर कवि दुसरी उत्प्रेक्षा करतो. "सर्व देवता परब्रह्माची सेवा करतात, पण त्याचें रूप मात्र त्या कधीं पाहूं शकत नाहींत. म्हणून (या निमित्तानें तरी) परब्रह्माची साकार मूर्ति (श्रीकृष्ण) त्या पहावयास जणु आल्या होत्या !" वास्तविक श्रीकृष्णानेंच ब्रह्मदेवाला हा चमत्कार दाखविला होता. पण कवीची कल्पना अशी कीं, या

देवता तेथें जमल्या, त्या श्रीकृष्णरूपी साकार परब्रह्माला पाहाण्यासाठींच जणु आल्या होत्या ! **तें**—परब्रह्म. देवता परब्रह्माची सेवा करतात. पण परब्रह्म हें निराकार असल्यामुळें, त्याचें रूप त्यांनीं कधींच पाहिलें नव्हतें. म्हणून श्रीकृष्णरूपानें वावरणारी परब्रह्माची साकार मूर्ति पाहण्याची ही संधीच त्यांनीं जणु साधली होती ! **कहीं**—कधीं.

**ओं. ३६८**—" श्रीकृष्णाचीं अद्भुत कृत्यें अशीं कीं, जो ब्रह्मदेव (शेषशायी) नारायणाच्या नाभिकमळाच्या ठिकाणीं (जन्मून) ओरडला, त्यानेंच या पृथ्वीवर अनेक ब्रह्मांडें पाहिलीं." ब्रह्मदेवाचा जन्म विष्णूच्या बेंबीपासून उत्पन्न झालेल्या कमलांत झाला, अशी पौराणिक कल्पना आहे. पण महानुभाव मताप्रमाणें विष्णु, शिव, ब्रह्मा या देवता परमेश्वरानें (श्रीकृष्णानें) च उत्पन्न केल्या असल्यानें, ब्रह्मदेवाच्या जन्माच्या चमत्काराचें श्रेय श्रीकृष्णाकडेच जातें. शिवाय त्यानें गोकुळांत ब्रह्मदेवाला अनेक ब्रह्मांडें पृथ्वीवर अवतरलेलीं दाखविलीं. ज्या ब्रह्मदेवाला श्रीकृष्णानें विष्णूच्या नाभिकमलांत उत्पन्न केला, त्यालाच त्यानें पृथ्वीवर (गोकुळांत) अनेक ब्रह्मांडें एकसमयावच्छेदानें दाखविलीं. **चुके**–ओरडे. (जन्मून ओरडे असा लाक्षणिक अर्थ.) पहा मागें ओंवी. ५९.

**ओं. ३६९**—" श्रीकृष्णानें ब्रह्मदेवाला पुरता विस्मित केला. त्यानें तेथें इतके ब्रह्मदेव उत्पन्न केले कीं, त्यांना परिमितीच राहिली नाहीं. आपण खरा एक ब्रह्मदेव असून, तेथें अपरिमित ब्रह्मदेव पाहून " हें आपण पाहतों तें खरें कीं भ्रम, हें समजत नाहीं " असें तो मनांत म्हणाला. प्रत्यक्ष ब्रह्मदेवाच्या मनांतही असा संभ्रम उत्पन्न करण्याचा चमत्कार श्रीकृष्णानें केला, असा भाव. **चतुरानन**—ब्रह्मदेव. **साचु**—सत्य, खरें.

**ओं. ३७०**—" श्रीरामानें साटका राक्षसीचे अग्निस्तंभन केल्यानें तिची जशी संभ्रमित अवस्था झाली, तशीच ब्रह्मदेवाचीही अवस्था झाली. आपण कोण व कोठें आहों हें तो विसरून गेला." **साटकेचे** इ०—साटका ही त्राटिकेप्रमाणेंच रावणाची एक बहीण होती. ही रामावर काममोहित होऊन त्यांच्याकडे आली असतां, रामानीं तिच्या कामाग्नीचें स्तंभन केलें, अशी रामायणांत कथा आहे. **अग्निस्तंभन**–कामाग्नि प्रशांत करणें. रामाकडून साटकेचें अग्निस्तंभन झाल्यानंतर तिला जसें आपल्या देहाचें विस्मरण पडलें, त्याप्रमाणेंच ब्रह्मदेवाचें झालें, असा भाव. विरहाग्नीच्या शांतीलाही ' अग्निस्तंभन ' अशी संज्ञा आहे. पहा–" हां वो !

हिमाचें दामोधर: इये विरहिणीं वोडवलें जौहर। इये अग्निस्तंभाचे अक्षेर: पुसां पां सिद्धाते "–नरेंद्र, रु. स्वयंवर–५९३. ब्रह्मदेव स्तंभित झाला असा भाव.

**ओं. ३७१**— तेथील प्रत्येक गोपाळाची समृद्धि (शक्ति) पाहून, त्यापाशीं असलेला प्रत्येक ब्रह्मदेव विस्मित झाला. (इतकी मोठी ऋद्धिशक्ति प्रत्येक गोपाळाच्या ठिकाणीं होती असा भाव). पण या प्रत्येक ब्रह्मदेवाला आपल्या ज्ञानाचा अभिमान होता." ब्रह्मदेवाचा अहंकार असा उघडा करण्यासाठींच श्रीकृष्णानें हीं अहंकारीं ब्रह्मदेवांचीं दृश्यें येथें मुद्दाम दाखविलीं आहेत. ब्रह्मदेवानें आपल्या सर्वज्ञतेचा असा अभिमान बाळगणें हेंच त्याचें अज्ञान होतें, व त्याचीच जाणीव ब्रह्मदेवाला करून देण्यासाठीं, श्रीकृष्णाला हा सर्व खटाटोप करावा लागला आहे. **जाणुपणाचा**—ज्ञानाचा, सर्वज्ञतेचा.

**ओं. ३७२**—"अशा (अभिमानी) ब्रह्मदेवाच्या कोटी, (संख्या) ज्या श्रीकृष्णाच्या शरीरावरील त्वचेच्या प्रत्येक रंध्रांत होत्या, त्या श्रीकृष्णाच्या रूपाची महति कोण जाणूं शकेल?" श्रीकृष्णाच्या शरीरावरील केसागणिक जर कोटी ब्रह्मदेव होते, तर त्या श्रीकृष्णशरीराची व्याप्ति केवढी मोठी असली पाहिजे! विष्णूच्या नाभिकमळांतून एकच ब्रह्मदेव निघाला, तर श्रीकृष्णाच्या अंगावरील प्रत्येक केसाच्या छिद्रांत कोटी ब्रह्मदेव असलेले दिसले, यावरूनच श्रीकृष्णाचें इतर देवतांहून श्रेष्ठत्व सिद्ध झालें! **रोमकूपीं**—शरीराच्या कातडीवरील फार बारीक भोंक. पहा–"ज्याचें रोमकूपीं ब्रह्मांडकोटी। तो हरि वैकुंठीं नांदत।"–एकनाथी भागवत २४।२६०. **एकीकडी**—एका बाजूला. असे कोटी ब्रह्मदेव श्रीकृष्णाच्या अंगावरील छिद्रांत एका बाजूला पडले होते! अशा ब्रह्मदेवांची तेथें क्षिति काय होती!

**ओं. ३७३**—"अशा त्या ईश्वराची (श्रीकृष्णाची) करणी समजून घेण्यासाठीं, ब्रह्मा या नात्यानें तो स्वतः मृत्युलोकास आला! (वास्तविक) त्यानें पोरपणानें आपल्या सत्यलोकांत राहायचें नव्हे?" मृत्युलोकाला येऊन श्रीकृष्णाचें सामर्थ्य अजमावण्याची दुर्बुद्धि त्याला कोठून सुचली? **ब्रह्मपणें**—ब्रह्मदेव या नात्यानें, आपण ब्रह्मदेव आहोंत या जाणिवेनें अथवा अहंकारानें. **लेंकुरुवेंपणें**–आपण परमेश्वराचें लेकरूं आहों, तर परमेश्वराच्या सामर्थ्याची परीक्षा पाहण्याच्या भानगडींत तो (ब्रह्मदेव) कां पडला? या त्याच्या उपद्व्यापानें शेवटीं त्याचीच फजिति झाली नाहीं काय? वास्तविक आपण एक बडे देव आहों, असा अहंकार

( अभिमान ) ब्रह्मदेवाला झाला, म्हणूनच तो परमेश्वराचें सामर्थ्य अजमावून पाहण्याच्या भानगडींत पडला ! पुढील ओंवींत पंडित दामोदर, यासाठींच अहंकार सोडून श्रीचक्रधराचें ( परमेश्वराचें अथवा सर्वज्ञ अशा चक्रधरप्रभूचें ) अनुसरण करण्यास वाचकांना ओरडून सांगतो.

**ओं. ३७४**—" अहंकार सोडा ! व श्रीचक्रधरांना अनुसरा. मगच तुम्हीं परब्रह्माच्याही पलीकडच्या परमेश्वराचा विचार समजण्यास समर्थ व्हाल. " पंडित दामोदर प्रस्तुत ओंवींत उघडपणानें आपल्या महानुभावपंथाचा प्रचार करीत आहे. **अहंकार**—ब्रह्मदेवाला अहंकाराचा मल जडला म्हणून त्याला परमेश्वराचें खरें स्वरूप समजलें नाहीं, व तो त्याचीच उलट परीक्षा पाहण्यास प्रवृत्त झाला ! प्राण्यानें हा अहंकारमल टाकल्याशिवाय; त्याला परमेश्वराचें ज्ञान होणार नाहीं. **श्रीचक्रधरा**—( परमेश्वरास ), महानुभावपंथसंस्थापक चक्रधरप्रभूस. " अहंकार सोडून चक्रधरांची शिकवण घ्या, म्हणजे तुम्हांला परमेश्वराचा विचार कळेल, त्याचें स्वरूप जाणण्यास तुम्हीं समर्थ व्हाल, " असें कवीचें सांगणें आहे. **परात्परा विचारातें**—मायेच्या पलीकडे असलेलें ब्रह्मस्वरूप व त्याच्याही पलीकडे असलेलें ईश्वरस्वरूप, हीं दोन्हीं स्वरूपें वेगवगळीं असून पहिल्यापेक्षां दुसरें अधिक श्रेष्ठ आणि म्हणून तेंच परमेश्वर होय. तथापि सर्वसाधारणपणें बोलतांना या दोन स्वरूपांत साक्षेपानें भेद केला जात नाहीं. दोन्ही मिळून एकच ईश्वररूप होय, असें मानूनच त्यांचा उल्लेख केला जातो. उदाहरणार्थ, " जय जय परात्परा परमेश्वरा "–या वच्छहरण–४६७ ओंवींत, चैतन्यमायेच्या पलीकडील ईश्वराचें किंवा परमेश्वराचें वर्णन आहे. पण तेथें ब्रह्म व ईश्वर या स्वरूपांचा भिन्नपणा लक्ष्यांत न घेतां दोहोंनाही एकत्र मानल्याचें स्पष्टपणें दिसतें. ( पहा–महानुभाव तत्त्वज्ञान पृ. ९६–९७ ). महानुभावांच्या "विचारमाळिका," ' महावाक्य ' या सूत्ररूप तत्त्वज्ञानग्रंथांत, मायेच्या अव्यक्त स्वरूपापलीकडे ' परम ' किंवा सर्वश्रेष्ठ अशा ईश्वराचें अव्यक्त स्वरूप असल्याचें जरी सांगितलें आहे, तरी मायेच्या पलीकडे प्रथम ब्रह्मस्वरूप व त्याहीपलीकडे ईश्वररूप आहे, अशी वस्तुस्थिति आहे. या तत्त्वाचाच अनुवाद पंडित दामोदरानें येथें स्पष्टपणें केला आहे.

**ओं. ३७५**—आपल्या प्रभु चक्रधरांचें ध्यान मनांत नेहमीं करण्याबद्दल व त्यांचेंच गुणवर्णन नित्य श्रवण करण्याबद्दल कवि श्रोत्यांना उपदेश करतो.—

**भणे केशवराजु मुनी**—येथेंही कवीनें आपल्या 'केशवराज' या मित्राचा अभिन्नत्वानें निर्देश केला आहे. यासंबंधींचें विवेचन मागें ओं. ६ वरील टीपेंत आलेंच आहे **धेआवां**—ध्यावा, ध्यान केला जावा.

**ओं. ३७६**—" अज्ञानाचा भ्रम नष्ट होण्यासाठीं, अजूनसुद्धां अहंकार सोडून श्रीकृष्णाची सेवा कर," असें नारद ब्रह्मदेवाला म्हणाला. अहंकारामुळें परमेश्वराचें खरें ज्ञान होत नाहीं. म्हणून अजूनसुद्धां ( इतकी फजिती झाली तरी ) श्रीकृष्णाची सेवा कर, म्हणजे सर्व अज्ञान जाईल असें नारदानें ब्रह्मदेवाला सांगितलें. नारद वास्तविक ब्रह्मदेवाचा मुलगा, त्यामुळें येथें मुलानें बापाला शिकविण्याची पाळी आली आहे. पण असा विपरीत प्रकार अभिमानानें घडून आल्याचें आपण व्यवहारांतही पाहतोंच. येथें प्रत्यक्ष ब्रह्मदेवावर मुलानें 'खुळा' असें म्हणण्याची जी पाळी आली, ती केवळ त्याच्या अहंकाररूप अज्ञानामुळें, हेंच तत्त्व येथें स्पष्ट करावयाचें आहे. **ॐळगे**–ओळगे–सेवा कर. **भ्रांती**–भ्रम, अज्ञान. **फिटावया**–नष्ट होण्यासाठीं.

**ओं. ३७७**—नारद देखील श्रीकृष्णाचें अद्भुत चरित्र पाहून विस्मित झाला. नारदाचा त्रिभुवनांत यथेच्छ संचार असतो हें प्रसिद्ध आहे. **ब्रह्मसुतु**–नारद. **एकला**—त्यानें श्रीकृष्णाला एकटा ( एकमेव ) असलेला पाहिला. कारण थोड्या वेळापूर्वींच श्रीकृष्णानें सर्व चराचर सृष्टि आपल्या भोंवतीं गोळा झालेली दाखवून ब्रह्मदेवाला विस्मित केला होता. पण या नारदभेटीच्या वेळीं श्रीकृष्णाभोंवतीचें तें मायिक वातावरण लुप्त झालेलें होतें. क्षणांत सर्व चराचर सृष्टिसहित, तर क्षणांत एकटा, असा श्रीकृष्णाचा अद्भुत चमत्कार पाहून नारद चकित झाला. नारदाचें भाषण ओं. ३७८–३८० यांत दिलें असून तो ब्रह्मदेवाबद्दल रदबदली करीत आहे.

**ओं. ३७८**—" आईवडिलांच्या देखत मुलाला जर भूल पडली, तर त्याचा दोष हे सर्वज्ञ श्रीकृष्णा ! कुणाला लावायचा याचा तूंच विचार कर. " नारदाचा युक्तिवाद असा कीं, ब्रह्मदेव हा तसें पाहायला गेलें तर श्रीकृष्णाचा पुत्रच असून, वडिलापुढें ( श्रीकृष्णापुढें ) भूल पडून त्याच्याकडून ( ब्रह्मदेवाकडून ) जर अपराध घडला असला, तर त्याबद्दल ब्रह्मदेवाकडे बोल लावूं नये. आईवडिलांच्या लडिवाळपणामुळें मूल एकादा अपराध करतें, तर त्याचा जसा दोष मुलाकडे लावला जात नाहीं, तसा येथेंही ब्रह्मदेवानें केवळ लडिवाळपणानें हा 'वच्छहरणा'चा अपराध केला आहे, म्हणून त्याला अपराधी धरूं नये !

**बळां**–बाळां, मुलाला. **भूलि ठाके**–भूल पडली, अपराध घडला. **बोल**–शब्द, दोष. **विचारी**–विचार कर. ब्रह्मदेवाला क्षमा करावी याबद्दलच हा नारदाचा युक्तिवाद असून, पुढील ओंवींतही त्याच अर्थानें दृष्टांत दिला आहे.

**ओं. ३७९**—"एकाद्या क्षुद्र घुंघुरट्याचें सत्व पाहण्यासाठीं सिंह कधीं हालचाल करतो काय? तुझी शक्ती विश्वाला मोहनी घालण्यास समर्थ आहे, तिच्यापुढें ब्रह्मदेव कुठल्या झाडाचा पाला!" एकाद्या क्षुद्र घुंघुरट्याच्या सामर्थ्याची परीक्षा सिंह कशाला पाहील? त्यासाठीं कां तो वनविहार करील? कधीच करणार नाहीं. सिंह अशा क्षुद्र प्राण्याकडे ढुंकूनही पाहणार नाहीं. नारदाचें म्हणणें असें कीं, सिंहाची जशी ही उच्च भूमिका असते, तशी श्रीकृष्णासारख्या सामर्थ्यसंपन्नाचीही असावी. त्यानें देखील ब्रह्मदेवाची फजीति करून त्याला खिजविण्याचें मनावर घ्यावयास नको होतें. सिंहापुढें जसें मशक क्षुद्र, तसाच श्रीकृष्णापुढें ब्रह्मदेवही क्षुद्र. अशा क्षुद्राची खोड मोडण्यांत श्रीकृष्णानें लक्षच घालावयास नको होतें. **मशक**–घुंगुरटें. **ताराण**–सामर्थ्य. पहा–"अवलंबिलें अंगिचें ताराण। भीमकी उठिली आपण। तेथ लागु दे अनंगाची आंगवण। भावकळनाते–नरेंद्र, रु. स्वयंवर–४४७. किंवा, "तें अहंकाराचें आंदण : किं ममतेचें मेहुण : किं अभिळाषाचें ताराण : मूर्त्त जालें"–भास्कर, उद्धवगीता ३०८. **विचरण**–वनविहार. **तुझी**–श्रीकृष्णाची शक्ति (माया-शक्ति) जगाला मोहविणारी किंवा भुरळ घालणारी आहे, एवढ्या शक्तीपुढें ब्रह्मदेवाचा पाड काय?

**ओं. ३८०**—"ब्रह्मदेव हा जुना, पूर्वीपासून चालत आलेला (सेवक) असल्यामुळें, त्यानें (तुझ्या) राजवाड्यांत केलेली (गोपवासरांची) मोठी चोरी, त्याला क्षमा करावी, माफ करावी." नारदाचें म्हणणें असें कीं, ब्रह्मदेवानें श्रीकृष्णाघरचीं वासरें व गोपाळ हरण करण्यांत चोरीचा मोठा अपराध केला आहे, हें खरें. पण ब्रह्मदेव हा जुना सेवक आहे, हें लक्षांत घेऊन श्रीकृष्णानें त्याला क्षमा करावी. नारदासारख्या ब्रह्मदेवाच्या प्रत्यक्ष मुलानें आपल्या वडिलाबद्दल अशी रदबदली किंवा मध्यस्थी श्रीकृष्णाजवळ करावी, हें थोडें मौजेचें आहे. पण ब्रह्मदेव अभिमानानें ग्रासला होता, तर त्याचाच मुलगा नारद हा मात्र श्रीकृष्णाचा एक विनम्र भक्त होता, हाच दोघांच्या वृत्तींतला विरोध कवीला येथें अधिक स्पष्टतेनें व थोड्या विनोदानें दाखवावयाचा असल्यानें, या नारदसंभाषणप्रसंगाची योजना येथें झाली आहे. **राउळींची**–राजवाड्यांतली.

(श्रीकृष्णाची). **चोरी**—वच्छहरणाची. **उपसाहावा**—क्षमा करावा. **कां सृष्टिकर्ता:** इ०—ब्रह्मदेव हा पुरातनचा केवळ आहे हें लक्षांत घेऊन. **पूर्वधरी**—पूर्वापार चालत आलेला, सनातन. नारदानें ब्रह्मदेवाबद्दल केलेली मध्यस्थी येथें संपली आहे.

**ओं. ३८१**—"नारदाच्या या भाषणानें श्रीकृष्ण हांसला! व '(ब्रह्मदेव) म्हातारपणामुळें भुलला (चुकला)' असें म्हणून त्या कृपावंत (श्रीकृष्णानें) त्याच्या अपराधाची क्षमा केली." **हासिनिला**—हासला. श्रीकृष्णाचें हें हसें नारदाच्या विनंतीला त्यानें मान्यता दिल्याचें निदर्शक होतें. **म्हातारपणें**—ब्रह्मदेवाच्या हातून जो हा चोरीचा अपराध घडला, तो त्याच्या म्हातारपणाचा परिणाम होय, असें श्रीकृष्ण म्हणाला. ब्रह्मदेव हा कित्येक दिवसांचा असल्यानें, म्हातारपणामुळें त्याला जरूर तो संयम राहिला नाहीं, असा हा श्रीकृष्णाचा म्हणण्याचा मथितार्थ आहे. म्हाताराचळ लागलेली माणसें, केव्हां केव्हां असेंच विचित्र वर्तन करतात. **भूलैला**—चुकला. **अपराधु**—ब्रह्मदेवाकडून झालेला 'वच्छहरणा'चा अपराध.

**ओं. ३८२**—"देवांचा राजा (श्रीकृष्ण) ब्रह्मदेवावर प्रसन्न झाला व त्यानें आपल्या दिव्य मायाशक्तीचें सामर्थ्य मागें घेतलें. तों तेथें जे जें पाहिलें होतें, तें तें खोटें असें उमगून येऊन एकटा श्रीकृष्ण तेवढा खरा (असें अनुभवास आलें.)" ब्रह्मदेवानें गोकुळांतलीं वासरें व गोपाळ हे सत्यलोकाला हरण केल्यानंतर इकडे गवळ्यांना तें समजूं नये म्हणून, श्रीकृष्णानें आपल्या दिव्यशक्तीनें गोपवासरांचीं रूपें घेऊन तो वर्षभर तसा वावरला. पुढें आपण वासरें व गोपाळ हे हरण केले तरी गोकुळांत कांहींच हालचाल नाहीं हें पाहून, श्रीकृष्णाच्या अवतराची परीक्षा पाहण्यासाठीं ब्रह्मदेव गोकुळांत आला असतां, प्रत्येक गोपाळाजवळ एकेक ब्रह्मदेव, व सर्व चराचर सृष्टि असल्याचा अद्भुत देखावा ब्रह्मदेवाला दाखवून श्रीकृष्णानें त्याला विस्मित केला. हा सर्व चमत्कार श्रीकृष्णानें आपल्या दिव्य मायाशक्तीच्या प्रभावानें घडवून आणला होता. आतां ब्रह्मदेवाला कृतापराधाबद्दल क्षमा केल्यावर श्रीकृष्णानें आपली लीला आटोपती घेतली, व साहजिकच त्यानें आपली मायाशक्ती जी प्रसृत केली होती, तीही आखडली, मागें घेतली. ही मायाशक्ती मागें घेतल्यावर सर्वांचेंच अज्ञानपटल नष्ट होऊन, आतांपर्यंत पाहिलेले सर्व अद्भुत चमत्कार केवळ मायिक (मिथ्या) असें समजून

येऊन, श्रीकृष्ण ( परब्रह्म ) तेवढा खरा असें ज्ञान झालें. 'ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या' असाच प्रत्यय सर्वांना आला असा भाव. **आकर्षिला**—मागें घेतला, आखडला. **दिव्यशक्ती**—परमेश्वराची मायाशक्ति. **वाऽ**—मिथ्या, खोटें.

**ओं. ३८३**—"ब्रह्मदेवाचा देखील भ्रम दूर झाला, व त्यानें चिद्घन आनंदमूर्ति, मोक्षाचा केवळ पुतळा असा देव ( श्रीकृष्ण ) पाहिला." मायेचा निरास झाल्यावर अर्थातच ब्रह्मदेवाच्या अज्ञानाचा निरास झाला व त्याला मगच सच्चिदानंद अशा परमेश्वाराचें दर्शन घडलें. अज्ञान जाऊन ज्ञानोदय झाला, तरच परमेश्वरदर्शन घडतें, असें येथें ध्वनित केलें आहे. परमेश्वराचें स्वरूप सत्, चित्, आनंद अशा तीन अंशांचें आहे. 'सच्चिदानंद' म्हणजे ब्रह्म, माया व ईश्वर. सत् शब्दें ब्रह्म बोलिजे : चित् शब्दें माया बोलिजे : आनंद शब्दें ईश्वरु बोलिजे : ब्रह्म : माया : ईश्वरु ऐसा त्र्यंश परमेश्वरु एकु आति : ( महावाक्य ५. ) **आनंदमूर्ती**—ईश्वराचें स्वरूप कैवल्यरूप असून आनंदमय आहे. निरतिशय सुख किंवा सुखाची परिसिमा म्हणजे आनंद. ईश्वरस्वरूप असें निरतिशय सुखमय किंवा आनंदमय आहे. ईश्वरस्वरूपाचा हा आनंद यौगिक नसून स्वरूपगत असतो. यामुळें तें कितीही विभागलें तरी स्वरूपीचा आनंद जसाचा तसा राहतो. **चिद्घणु**—मायेनें परिपूर्ण असा. ब्रह्म, माया व ईश्वर मिळून त्र्यंश बनलेला असून त्यालाच 'त्र्यंश परमेश्वर' किंवा 'सच्चिदानंद परमेश्वर' असें म्हणतात. तथापि त्र्यंशाला एक म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, हीं तिन्हीं स्वरूपें तेथें व्यापक भावानें मिसळलेलीं असतात. हा व्याप्यव्यापकभावही निश्चित आहे. तो असा कीं, मायास्वरूपाला ब्रह्मस्वरूपानें व्यापलें आहे, पण ब्रह्मस्वरूपाला मात्र मायास्वरूपानें व्यापलें नाहीं. तसेंच या दोनी स्वरूपांना ईश्वरस्वरूपानें व्यापलें आहे, पण त्यांनीं मात्र ईश्वरस्वरूपाला व्यापलें नाहीं. तथापि देवतांची स्वामिनी जी माया, तिचा संबंध झाल्यावांचून 'ईश्वरा'ला 'परमेश्वरत्व प्राप्तच होत नाहीं. मायाव्यतिरिक्त म्हणजे मायास्वरूपापलीकडील केवळ ईश्वरस्वरूप हें कोणतेंच कार्य करूं शकत नाही. मायेचें याप्रमाणें महत्त्व असल्यामुळें, परमेश्वराला येथें 'चिद्घणु' असें संबोधलें आहे. **कैवल्याचा**—परमेश्वराच्या त्र्यंशांत ब्रह्म, माया व ईश्वर या तीहींचीं स्वरूपें एकत्र मिसळलेलीं असतात, तथापि ती तशीं एकत्र मिसळलेलीं असूनही स्वस्वरूपानें वेगवेगळींच असतात, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. उदा. ब्रह्मस्वरूप मायास्वरूपांत व्यापलें असूनहि

तें त्यापासून वेगळें आहे, आणि ईश्वरस्वरूप या दोन्ही स्वरूपांत व्यापलेलें असून दोहोंपासूनहि वेगळें आहे. ईश्वरस्वरूप 'सर्वात्मक' भावानें सर्व जीवदेवता-प्रपंचाच्या ठायीं कडतरून व्यापलेले असूनहि ते 'सर्वातीत' त्वानें निराळे असतें. अर्थात् तें मायास्वरूपांत मिसळलेलें असूनहि त्यापासून अलिप्त असतें, हें सांगावयास नको. कमळपत्रामध्यें जीवन ज्याप्रमाणें अंतर्बाह्य व्यापूनसुद्धां त्यापासून वेगळें राहतें, त्याप्रमाणें स्वस्वरूपांत ईश्वरस्वरूप व्यापूनहि त्यापासून तें वेगळें राहतें. त्र्यंशात्मक अथवा सच्चिदानंदस्वरूपाला 'एक' म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, तीं स्वरूपें वेगळीं म्हणतां येत नाहींत, तथापि वस्तुतः तीं वेगवेगळीं आहेतच. कारण तीं एकमेकांच्या गुणधर्मांनीं लिंपित होत नाहींत. ईश्वरस्वरूप 'केवळ' आहेच. त्र्यंशांतील या 'केवळ' ईश्वरस्वरूपाजवळच माया सेवकभावानें मनोधर्मपूर्वक वेचून निरंतर असते. तथापि तिच्यापासूनहि ईश्वरस्वरूप अलिप्तच राहतें. तिला तें स्पर्शदेखील करीत नाहीं. ईश्वरस्वरूपांत माया मिसळलेली असूनहि त्याच्या स्वरूपानंदाची प्राप्ति मात्र त्या अभागिणीला होऊं शकत नाहीं. याचमुळें, मायासंबंध असूनहि त्र्यंशांतील ईश्वररूप 'केवळ' होय. (पहा-महानुभाव तत्त्वज्ञान पृष्ठें-११८-१२१.) श्रीकृष्णाला येथें कैवल्याचा पुतळा असें विशेषत्वानें कां संबोधलें आहे, याचा वरील टीपेनें उलगडा होईल. ब्रह्मदेवाला श्रीकृष्ण कोणत्या वेषांत दिसला, तें वर्णन पुढील दोन ओंव्यांत दिलें आहे.

**ओं.३८४**—श्रीकृष्ण मागें वनभोजन करतांना ज्या वेषांत होता, तसाच या ब्रह्मदेवभेटीच्या वेळींही होता. "(श्रीकृष्ण) भोजन करीत, खात खात (असतांना) हिंडत होता, अशा वेषांत तो शोभत होता, व गोपवासरांची त्या रानांत तपासणी करीत होता." **आरोगितु**—जेवीत. **तेणेंचि**—त्या भोजनाच्या वेळच्या वेषानें. तो वेष पुढील ओं. ३८५ मध्यें दिलाच आहे.

**ओं. ३८५**—"डाव्या हातांत दहिभाताचा उंडा (मोठा घास) व बोटांत आवळ्यांच्या डिऱ्या व आल्याच्या फोडी, परमानंद अशा श्रीकृष्णानें धरल्या होत्या." मागें २१३ ओंवींत वृंदावनांतील वनभोजनाच्या वेळीं श्रीकृष्णाचा जो वेष वर्णिला आहे, तोच यावेळीं आहे. याचें कारण असें कीं, मागें वच्छहरण करतांना ब्रह्मदेवाला श्रीकृष्ण ज्या वेषांत दिसला होता, त्याच वेषांत तो त्याला आतांही दिसला. म्हणजे मध्यंतरी श्रीकृष्णाच्या योगमायेनें जो अद्भुत चमत्कार घडला, त्याचा आतां समारोप होऊन सर्व गोष्टी आतां पूर्वस्थळाला आल्या,

असें या प्रसंगानें सूचित करण्यांत आलें आहे. श्रीकृष्णाच्या अद्भुत लीलेनें ब्रह्मदेवाचा अंहकारही लुप्त होऊन तो आतां श्रीकृष्णाची स्तुति मोठ्या; विनयानें करीत असल्याचें मौजेचें दृश्यही आपणास यापुढें दिसत आहे. ब्रह्मदेवानें आपण केलेल्या अपराधाबद्दलचा पश्चात्ताप मुक्तकंठानें व्यक्त केला आहे. **फडतरी**—फोडी, कापण्या.

**ओं. ३८६.**—मग ( ब्रह्मदेव ) त्या उदार श्रीकृष्णाजवळ आला, खालच्या मानेनें त्यानें त्याला नमस्कार केला, व हात जोडून ( खालीलप्रमाणें ) विनंति करता झाला. " **दातार**—दाता. ( मोक्षदाता ) **विनत्कंधरें**—नम्र केलेल्या मानेनें. पुढील ओंवीपासून पुढें ४६६ पर्यंत, ही ब्रह्मदेवाची विनवणी वर्णन केलेली आहे. तुलनार्थ मूळ भागवतांतील श्लोक पहा–" शनैरथोत्थाय विमृज्य लोचने मुकुन्दमुद्वीक्ष्य विनम्रकंधरः । कृतांजलिः प्रश्रयवान्समाहितः सवेपथुर्गद्गदयैलतेलया ॥ ६४॥–भागवत १०।१३.

**ओं. ३८७.**—ब्रह्मदेव श्रीकृष्णास म्हणतो :–" सूर्याच्या प्रकाशापुढें काजव्याचा प्रकाश जसा दिसून येत नाहीं, त्याप्रमाणें तुझ्यापुढें माझ्या बुद्धीचा प्रभाव चालूं शकत नाहीं. " श्रीकृष्णापुढें आपण किती क्षुद्र आहों हेंच येथें रवि–खद्योत उपमेनें ब्रह्मदेवाच्या तोंडून वदविलें आहे. **खद्योत**—काजवा. काजव्याचा उजेड रात्रीं जसा दिसतो, तसा दिवसा मुळींच जाणवत नाहीं. **अभासु**—उजेड. ब्रह्मदेव येथून आपल्याकडे कमीपणाच घेत आहे.

**ओं. ३८८**—" परमाणूची थोरवी ती केवढी असणार ? पण तोही मेरु पर्वताशी आपली बरोबरी करतो. तसाच प्रकार देवा ! मी तुझ्याशीं केला. " वास्तविक परमाणु आकारानें किती क्षुद्र, पण तो जसा मेरूसी आपली बरोबरी करण्याचा मूर्खपणा करतो, तसाच मूर्खपणा आपणही श्रीकृष्णाची बरोबरी करतांना केला, अशी ब्रह्मदेवाची कबूली ! **केसनी**—केवढी. **सरी**—बरोबरी. पहा– " जिष्णुपुढें असुरजनीं कोणी वैरा टिके सरी करितां "–मोरोपंत आर्याभारत–विराटपर्व. **परी**—प्रकार.

**ओं. ३८९**—" एकद्या धुंगुरट्यानें गरुडाबरोबर प्रौढी मिरवावी किंवा एकाद्या पाणसापानें शेषाशीं बरोबरी करावी, तसेंच हें आदिनाथा ! मी तुझ्याशीं केलें ? धुंगुरट्यानें आपला क्षुद्र अधिकार न ओळखतां गरुडाशीं ऐट मारण्याचा

किंवा एकाद्या पाणसापानें पृथ्वीचा भार घेणाऱ्या शेषाची बरोबरी करण्याचा अव्यवहारीपणा करावा तसाच प्रकार: श्रीकृष्णाची (परीक्षा पाहतांना) बरोबरी करतांना आपण केला, असें ब्रह्मदेव श्रीकृष्णाला पश्चात्तापपूर्वक सांगतो. **खगपती**—गरुड. **विरुळा**—पाणसर्प, एक निर्विष सापाची जात. **शेखेसीं**—शेषाबरोबर. **सरीसी**—बरोबरी. ब्रह्मदेवाला आपल्या कृतापराधाची जाणीव झाली आहे. **आदिनाथा**—मूळ सृष्टीच्या आरंभीं सर्व जीवांना परमेश्वरानें मायेच्या द्वारां मनुष्यदेह आणि तेहि पुरुषदेह देऊन कर्मभूमींत जन्माला घातलें. या सृष्टि-प्रारंभाच्या दृष्टीनेंच श्रीकृष्णाला येथें 'आदिनाथ' असें म्हटलें आहे. पुढें ओं. ४०३ मध्येंही त्याला आदिकारण असें संबोधलें आहे.

**ओं. ३९०**—"किंवा एकाद्या मदोन्मत्त कोल्ह्याची जाणीव लुप्त होऊन त्यानें सिंहापुढें आपला पराक्रम वर्णन करावा, तसेंच मी तुला न जाणतां, तुझ्यापुढें भलताच मोठेपणा मिरवला!" सिंहापुढें कोल्ह्याची प्रौढी क्षणभर तरी चालेल काय? पण गर्वानें फुगून गेलेल्या कोल्ह्याला आपल्या अंगच्या दुर्बलपणाची जाणीव न राहावी व त्यानें सिंहासीं पराक्रमाच्या बाबतींत आपलें नातें लावावें हें जसें हास्यास्पद, तसेंच श्रीकृष्णाचें सामर्थ्य न जाणतां आपण त्याच्यापुढें मोठेपणा मिरवला असें ब्रह्मदेवाचें निवेदन. **सांभाळी**—सांभाळणें=जाणीव असणें. **विरुदावलि**—आपल्या पराक्रमाची मालिका. **थोरी**—मोठेपणा, श्रेष्ठता. सिंहापुढें कोल्हा, त्याप्रमाणेंच श्रीकृष्णापुढें आपण, असें असतां गर्वानें आपण भलत्याशींच भलतें नातें लावलें, याबद्दल ब्रह्मदेवाला खेद वाटतो. **आगळी**—भलती, आगाऊ. **तूंतें नेणौनिआं**—तुला न जाणतां, तुझें खरें सामर्थ्य लक्षांत न घेतां.

**ओं. ३९१**—येथून तीन ओंव्यांत श्रीकृष्णाशिवाय प्राण्यांना दुसरा कोण त्राता आहे? यासंबंधीं निरानिराळ्या व्यावहारिक दृष्टांतांनीं कवि युक्तिवाद करीत आहे. "लहान मूल आईच्या पोटांतून जन्मतांना गर्भाची जी हालचाल होते, ती आईला अपरिमित दुःख देते. पण आईच्या अंगच्या निर्भेळ वात्सल्यानेंच केवळ मुलें जगतात." स्त्रीला प्रसूतिवेदना असह्य होतात, पण ती त्या केवळ आपल्या अपत्यावरील प्रेमामुळेंच सहन करते. ब्रह्मदेवाचें म्हणणें असें कीं, श्रीकृष्ण हा सर्वांनाच मातेप्रमाणें वत्सल असल्यामुळें, आपल्यासारख्या प्राण्यांनीं दिलेला त्रास, त्यानें उदारपणानें व वत्सलतेनें सहन करावा. आपण केलेला

अपराध श्रीकृष्णानें पोटांत घालावा, या दृष्टीनेंच येथें ब्रह्मदेवाच्या तोंडीं मातेचा हा दृष्टांत घातला आहे. **चलनवलन**—प्रसूतीच्या वेळची गर्भाची मातेच्या पोटांतील हालचाल. **तेआं दुःखां**—प्रसूतिवेदनेच्या दुःखांना. **मातेसीं** इ०—आईच्या वात्सल्यानेंच केवळ मुलें जगतात. तिनें जर प्रसूतिवेदना सहन केल्या नसत्या, तर मुलें सुखरूप कशीं जन्मलीं असतीं? **लोभाळुपणा**—वात्सल्य, लोभ. **जीती**—जन्मती.

**ओं. ३९२**—येथें आणखी दुसरा दृष्टांत दिला आहे. "वैद्य अगोदर रोग्याला टाकून बोलला व त्यातूंनही पुनः त्यानें ( त्याची परीक्षा करण्यास अथवा औषध देण्यास ) यायला विलंब लावला, तर त्या रोग्याचे प्राण कसे वांचतील? हे देवा! तूं सांग." रोग्याला विरुद्ध बोलल्यास किंवा टाकून बोलल्यास व पुनः त्याला औषध द्यायला येतांनाच वैद्यानें विलंब केल्यास रोगी वांचावा तरी कसा? तद्वतच श्रीकृष्णानें आपल्यासारख्यानीं केलेल्या अपराधाबद्दल जर राग धरला, तर मग त्यांनीं जगावें तरी कसें, असें ब्रह्मदेवाचें म्हणणें. वैद्यानें रोग्याची जशी सर्वतोपरी काळजी घ्यावयास पाहिजे, तशी श्रीकृष्णानें किंवा परमेश्वरानेंही भक्ताची ( त्याचे सर्व अपराध सहन करून ) काळजी वाहिली पाहिजे, असा भाव. **विरुद्ध बोलणें**—टाकून बोलणें. **अवेळ**—विलंब. **तेआं**—त्या रोग्याला जीवित कसचें? त्याचे प्राण कसे वांचतील? **सांघे**—सांगै, सांग.

**ओं. ३९३**—"पृथ्वीला प्राणिमात्रांनीं दिलेला नित्याचा त्रास स्मरून तिनें जर आपली धारणाशक्तीच सोडली, तर या चार प्रकारच्या प्राणिमात्रांना सांवरून धरणार तरी कोण?" पृथ्वीवर चालून व इतर रीतीनें सर्वच प्राणी तिची पायमल्ली प्रत्यहीं करीत आहेत, पण तिनें हा आपला अपमान लक्षांत घेऊन, सर्व प्राण्यांना आपल्या पृष्ठभागावर धारण करण्याचा आपला गुण कांहीं सोडला नाहीं.! श्रीकृष्णानें देखील पृथ्वीप्रमाणेंच आपले अपराध सहन करून आपणास सांभाळावें, अशी ब्रह्मदेवाची विनवणी. **अपकार**—त्रास, अपमान. पृथ्वीवर चालून प्राणिमात्र तिची नित्य पायमल्ली करीत नाहींत काय? **धैर्यातें**—धारण करण्याच्या गुणास. भूतमात्रांना आपल्या पाठीवर धारण करणें हा पृथ्वीचा धर्मच आहे. **चतुर्विधा भूतग्रामातें**—जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज अशा चार प्रकारच्या प्राण्यांच्या समूहास. **संवरितें**—सांवरून

धरणारें. पृथ्वीचा सहनशीलतेचा व सर्वांना सांवरून धरून संभाळण्याचा गुण, श्रीकृष्णानेंही आपल्या बाबतीत अवलंबावा, अशीच ब्रह्मदेवाची विनंति आहे.

**ओं. ३९४**—परमेश्वराच्या ( श्रीकृष्णाच्या ) मूळच्या कृपाळुपणाचा, त्याच्या शरणागत वत्सलत्वाचा, त्याच्या मायळुपणाचा ब्रह्मदेव येथें उल्लेख करतो. श्रीकृष्णांत हे गुण सहजच असल्यामुळें, तो आपल्यावर कृपाळु होईल याबद्दल त्याला शंका वाटत नाहीं. **आर्त्तासी**—पीडितांना. पंडित दामोदरानें येथें परमेश्वराच्या कांहीं गुणांचा उल्लेख केला आहे. परमेश्वराच्या स्वरूपीं अनंत गुण व अनंत धर्म आहेत. पैकीं गुण हे ईश्वराकडून इतरांना देतां येतात, तसे धर्म देतां येत नाहींत. परमेश्वराच्या सौंदर्य, लावण्य, औदार्य, सौभाग्य, दया, मया, कृपा, करुणा, इत्यादि गुणांपैकीं कृपेचा व मायेचा तर येथें प्रामुख्यानें निर्देश दिसतो.

**ओं. ३९५**—येथें तर ब्रह्मदेव श्रीकृष्णाला आपण शरण आल्याचेंच सांगत असून, आपले सर्व अपराध क्षमा करण्याचीच तो पुनरपि विनवणी करीत आहे. **श्रीचक्रधरा**—श्रीकृष्ण हा सुदर्शन चक्र धारण करणारा असल्यानें, ब्रह्मदेवानें त्याला या नांवानें संबोधणें युक्त असलें, तरी कवीला येथें महानुभावपंथ-संस्थापक श्रीचक्रधरस्वामींचाही पर्यायानें उल्लेख करून आपला त्यांच्या ठिकाणचा पूज्यभाव व्यक्त करावयाचा आहे, हें स्पष्ट दिसतें. **अनिमित्यबंधो**-कोणतेंही कारण नसतांना बंधुत्व ( मित्रत्व ) ठेवणारा असा. अकारण मित्रा ! परमेश्वर भक्तावर जें प्रेम करतो तें कांहीं कोणत्या स्वार्थानें करीत नाहीं. अशा निःस्वार्थी प्रेमाला 'अनिमित्यबंधुत्व' म्हणतात. **करुणाकरा**—करुणेची खाण, करुणेचा सांठा. **सकळहीं**—आपण केलेले अपराध. ब्रह्मदेवाच्या मनांत येथें आपण 'वच्छहरणा'चा केलेला अपराध प्रामुख्यानें होताच, व तोच क्षमा केला जावा, अशी त्याची अपेक्षा आहे.

**ओं. ३९६**—ब्रह्मदेव श्रीकृष्णास म्हणतोः-" तूं भक्तवत्सल झाला नसतास व आनंदाचा सुकाळ करणारा नसतास, तर प्राण्यांचा संसाररूप दुष्काळ कसा नष्ट झाला असता ? " म्हणजे तूं तसा भक्तवत्सल व आनंद देणारा आहेस, म्हणूनच प्राणिमात्र संसारबंधनांतून सुटून मोक्ष पावतात असा भाव. प्रस्तुत ओंवींत भक्ति व ज्ञान या साधनांनीं मोक्ष मिळतो या मताचा पुरस्कार केला आहे. "ज्ञानाशिवाय मोक्ष मिळत नाहीं" व "ज्ञानापेक्षां भक्ति श्रेष्ठ", अशी परस्पर विसंगत

वचनें जरी 'विचारमालिकें'त दिसलीं, तरी ज्ञान व भक्ति यांचा समन्वयच चक्रधरांना संमत आहे, हें उघड दिसतें. उलट ज्ञान व भक्ति या दोन्ही मार्गांचा लागोपाठ अवलंब करावा असेंही त्यांनीं सूचित केलें आहे. प्रस्तुत ओंवींत परमेश्वराचें भक्तवत्सलत्व व आनंदप्रदायित्व यांचा जो उल्लेख केला आहे, तो अनुक्रमें भक्ति व ज्ञान या दृष्टीनेंच होय. परमेश्वर जीवाला प्रेम व ज्ञान देतो, व असें ज्ञान झाल्यावर जीव, देवता प्रपंच व परमेश्वर ही चार तत्त्वें त्याला प्रत्यक्ष दिसूं लागतात. 'सामन्य' ज्ञानानें पिंडस्थ देवता साधकाच्या शरीरापासून पृथक् होऊं लागतात, व जीवाचे मल सुटूं लागतात, आणि 'विशेष' ज्ञानानें साधकाचें शरीर मेदमांसादि सप्तधातूपासून मुक्त होऊं लागतें. पुढें विशेष ज्ञानाची पायरी चढल्यावर, एका चैतन्य मायेच्या आद्यमलाखेरीज जीवाचे सर्व मल नाहींसे होतात. 'मग ईश्वर आपलिया कृपासक्तीकरूनि तयाची अनादि अविद्याछेद करीति:' अविद्यानाशानें जीवाचा उरला सुरला आद्यमलहि नष्ट होतो, व जीव सर्व मलरहित होऊन मुक्त होतो. यानंतर जीवाला केवलत्व येण्यासाठीं त्याचें चार प्रकारचें ज्ञानही परमेश्वर हरण करतो व त्याला मोक्ष देतो. अशी ही जीवाला संसारबंधनांतून सोडविण्याची अथवा मोक्ष देण्याची (परमेश्वराची) प्रक्रिया आहे. येथें प्रस्तुत ओंवींत आनंदाची लयलूट (सुकाळ) करून जीवाचा संसाररूप दुष्काळ (आपत्ति) घालविण्याचा जो निर्देश केला आहे, तो याच अर्थानें आहे. जीवाला परमेश्वरस्वरूपाचें ज्ञान झाल्यावर त्याला जें कैवल्यसुख (आनंद) प्राप्त होतें, त्यानेंच तो जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटतो, असा एकंदरीनें मथितार्थ आहे. **संसाररूप दुःष्काळ**—जन्ममरणाच्या फेऱ्याची आपत्ति.

**ओं. ३९७**—" तूं उदारपणा न दाखवितां जर (जीवाला) आपलें ज्ञान दिलें नसतेस, तर त्याचें खडतर संसारभ्रमण कसें गेलें असतें ?" सारांश परमेश्वर उदारपणानें जीवाला आपलें ज्ञान देतो म्हणूनच तो जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटतो असा अभिप्राय येथें व्यक्त केला आहे. **ज्ञान**—ज्ञान ही परमेश्वराची एक शक्ति आहे. अर्थात् परमेश्वराच्या ज्ञानमय स्वरूपाव्यतिरिक्त किंवा स्वरूपांग ज्ञानाव्यतिरिक्त ती निराळी आहे. त्याचें अव्यक्त स्वरूप पूर्णपणें ज्ञानमय असून, शिवाय त्याच्याजवळ ज्ञान नांवाची एक शक्तीही आहे. परमेश्वर जीवांना जें ज्ञान देतो, तें ज्ञान म्हणजे ही ज्ञानशक्तीच होय–स्वरूपांग ज्ञान नव्हे. परमेश्वराचें हें

शक्तिरूप ज्ञान एक असून तें जड आणि प्रकाशमय आहे. उलट, जीव हा अज्ञान असतो व देवतांचीं स्वरूपें ज्ञानमय असलीं तरी त्यांच्या ठिकाणचें ज्ञान त्रुटित असून ते अयथार्थ असतें. त्यानें जीव-प्रपंचाची ओळख होत नाहीं. म्हणून देवतेच्या ज्ञानाला विज्ञान म्हणजे विपरीत ज्ञान असें म्हटलें आहे. हें विपरीत ज्ञान अन्यथार्थ प्रकाशक असतें. त्यामुळें तें झाल्यावर जीव देवतेलाच ईश्वर म्हणतो. परमेश्वराचें ज्ञान विपरीत नसतें, तर तें यथार्थ प्रकाशित करणारें असतें. त्यामुळें वस्तूचें वास्तवस्वरूप जीवांना कळतें. "जे जैसे असे तें तैसें जाणिजे : तें ज्ञान" अशी ज्ञानाची व्याख्या श्रीचक्रधरस्वामींनीं केली आहे. परमेश्वरस्वरूपीच्या ज्ञानाप्रमाणेंच त्याचें हें शक्तिरूप ज्ञानहि अखंड असतें. ( पहा-महानुभाव तत्त्वज्ञान पृष्ठें. १३५-१३६. ) परमेश्वर असें ज्ञान जीवाला देतो व त्यामुळेंच तो जन्ममरणरूप संसारापासून सुटतो, हेंच ज्ञानाचें कार्य येथें स्पष्ट केलें आहे.

**ओं. ३९८**—"आनंदाचें धन असें आपलें सन्निधान तूं जर [ जीवांना ] दिलें नसतेंस, तर त्यांना मोक्षाचें साधन तरी कुणी करून दिलें असतें ?" तात्पर्य ईश्वराचें ( श्रीकृष्णाचें ) सन्निधान हेंच मोक्षाचें साधन असून, तें परमेश्वराकडूनच जीवांना मिळतें. परमेश्वर आपलें सन्निधान जीवांना देऊन त्यांना मोक्ष देतो असा अर्थ. **सन्निधानु**-साकार परमेश्वराच्या संन्निधानानें देहधारी जीव आत्मकल्याण करून घेतात. हें सान्निधान चार प्रकारचें आहे. दर्शन, आनुस्मरण, सेवा व संबंध. दर्शन=परमेश्वराला पाहणें किंवा त्याच्या सन्निध असणें, आनुस्मरण=तो अवतार अविद्यमान असतां त्याचें स्मरण करणें, सेवा = त्या अवताराची अगर त्याच्या संबंधित वस्तूंची सेवाचाकरी करणें, व संबंध = सदर अवताराचा स्पर्श झालेल्या माणसांचा किंवा वस्तूंचा सहवास घडवून आणणें. या साधनांनीं इष्ट हेतू साध्य करतां येतो. ( पहा-महानुभावांचा वेद-त्र्या. ना. देशपांडे ). **आनंदघनु**—आनंदाचा परमसुखाचा केवळ सांठा ( असें तें संन्निधान ). परमेश्वराच्या उपरिनिर्दिष्ट संनिधानानें जीवाला अपरिमित सुख प्राप्त होतें.

**ओं. ३९९**—"हे कैवल्यपती ! तूं आपली नित्यभक्ति जर जीवांना करूं दिली नसतीस, तर त्यांना परमानंदाची प्राप्ती कशी झाली असती ?" परमेश्वराच्या नित्यभक्तीनेंच जीवांना परमानंद प्राप्त होतो असा भाव. ज्ञान व भक्ति ही मोक्षाचीं साधनें आहेत, पण चक्रधरांनीं या दोहोंचा पुरस्कार करतांना ज्ञानापेक्षां भक्तीला

थोडें अधिक श्रेष्ठत्व दिलें आहे, हें आपण वर पाहिलेंच. **कैवल्यपती**—मोक्षदाता. (परमेश्वर). **परमानंदाची**—ईश्वराचें स्वरूप कैवल्यरूप व आनंदमय आहे. निरतिशय सुख किंवा सुखाची परिसीमा म्हणजे आनंद. ईश्वरस्वरूप असें निरतिशय सुखमय किंवा आनंदमय आहे. ईश्वरस्वरूपाचा हा आनंद यौगिक असून स्वरूपगत असतो. तसेंच ईश्वरस्वरूप आनंदमय असल्यामुळें, तें कितीही विभागलें तरी स्वरूपीचा आनंद जशाचा तसाच राहतो. जीव तर निरानंदच आहे. (पहा महानुभाव तत्त्वज्ञान पृ. ११०).

**ओं. ४००**—" मूळचा निराकार व निर्गुण असणारा तूं, जर सगुण झाला नसतास तर पतितांचें रक्षण कुणी केलें असतें ? सांग बरं ! " महानुभावांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें निराकार व अव्यक्त परमेश्वराला जीवाचें कल्याण किंवा अकल्याण असें कांहींच करतां येत नसून, जीवाला ज्ञान देण्यासाठीं त्याला मनुष्यदेहच धारण करावा लागतो. परमेश्वराचा हा मानवदेहधारी अवतार जीवाच्या अथवा भक्ताच्या भक्तिप्रेमाचा स्वीकार करून त्याला त्याच्या अधिकारानुरूप फल देतो. **पतितांचा**—पतित जीवांचा, मलयुक्त भक्तांचा. **कुढावा**—रक्षण, थारा, पाठपुरावा. पहा–" तुका म्हणे देवा माझा करावा कुढावा–तुकाराम गाथा–१११८.

**ओं. ४०१**—" परब्रह्माचा राजा असा तूं ! जर साकार झाला नसतास, तर गरीब बिचाऱ्या जीवांना कुणी उद्धरलें असतें ? " अर्थात् परब्रह्म अशा निराकार परमेश्वरानें श्रीकृष्णाचा साकार मनुष्यावतार घेऊन अनेक जीवांचा उद्धार केला आहे, हेंच ब्रह्मदेव येथें ध्वनित करतो.

**ओं. ४०२**—श्रीकृष्णानें अनेक राक्षसांचा संहार करून पृथ्वीचा भार हलका केला व देवांना त्यांच्या पूर्वपदीं स्थापलें असा गौरवपर उल्लेख ब्रह्मदेव येथें करीत आहे. राक्षसांनीं यज्ञयागादिसंस्थांचा उच्छेद करून इंद्रादि देवतांनाही सळो कीं पळो केलें होतें. राक्षसाच्या अनन्वित पापकृत्यांनीं भूमीला भारही झाला होता. यासाठीं परमेश्वरानें श्रीकृष्णाचा अवतार घेऊन अनेक राक्षसांचा संहार केला व देवांना त्यांच्या भीतीपासून मुक्त केलें. राक्षसांचा संहार झाल्यावर पापेंही थांबून पृथ्वीचा भार आपोआप हलका झाला. श्रीकृष्णानें जर अवतारच घेतला नसता, तर हें सर्व कसें घडून आलें असतें ? **फेडितां**—दूर करतां, नष्ट करतां. **दैत्यांचा**—श्रीकृष्णानें, अघासुरादि राक्षसांना मारल्याचें प्रसिद्धच

आहे. **स्थापिते**—वाताहत झालेल्या देवांची स्थितिस्थापकता कोणी केली असती ? पहा–" धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे "—भगवद्गीता.

**ओं. ४०३.**—ब्रह्मदेव श्रीकृष्णास म्हणतो कीं, " तूं या सृष्टीचें आदिकारण नसतास तर आम्हांला तरी ब्रह्मपण कसें प्राप्त झालें असतें ? व जीवांना त्यांच्या कर्मांचें फळ देण्याचें सामर्थ्य देवांना तरी कसें प्राप्त झालें असतें ? " **आदिकारण**—मूळ सृष्टीच्या आरंभीं सर्व जीवांना मायेच्या द्वारा परमेश्वरानें मनुष्यदेह व त्यांतूनही पुरुषदेह देऊन कर्मभूमींत जन्माला घातलें. यांस अनुलक्षून श्रीकृष्णाला येथें ' आदिकारण ' असें म्हटलें आहे. **ब्रह्मपण**—देवतांच्या ९ थोव्यापैकीं ५ वा थोवा कैलास वैकुंठ-ब्रह्मलोकींचे हर, हरि व ब्रह्मा यांचा असून, या देवता मूळ अव्यक्त आहेत व त्यांना परमेश्वराच्या आज्ञेनें साकार म्हणजे परिमित व्हावें लागतें. या साकार देवतांना ' ब्रह्मांडस्थ ' देवता असें नांव असून, जीवाला त्याच्या कर्मानुसार स्वर्गनरक देणाऱ्या देवता त्या याच होत. प्रस्तुत ओंवींत आपल्या ब्रह्मपणाचें व आपल्या-सहित इतर देवांना ( जीवांना ) कर्मफल देण्याच्या बाबतींत समर्थपण दिल्याचें जें श्रेय श्रीकृष्णाला ब्रह्मदेव देत आहे, तें महानुभावपंथांतील देवतांच्या प्रक्रियेला अनुसरूनच आहे. परमेश्वर जर या सर्व सृष्टीचें आदिकारण नसता, त्यानें जर ही सृष्टि निर्माण केली नसती, तर जीव, प्रपंच व देवता यांना तरी जन्म कसा मिळाला असता ? म्हणून सर्व वस्तूंचेंच आदिकारण जो परमेश्वर त्यालाच सर्वाधार मानलें आहे.

**ओं. ४०४**—" तुझे सहजगुण याप्रमाणें असून शरणागतांना मोक्ष देण्यासाठीं तूं मायावेषानें ( पृथ्वीवर ) अवतरला आहेस. " **सहजगुण**—सौंदर्य, औदार्य, लावण्य, दया, मया, सौभाग्य, कृपा, कारुण्य इत्यादि अनंत गुण परमेश्वरांत आहेत. **देआवेआं दोषें**—देण्याच्या उद्देशानें. **दोषें**—कारणें, साठीं. या अव्ययाचा उपयोग यादवकालीन वाङ्मयांत विशेष आढळतो. पहा–" परिमळें बासटौनि रुद्रा–दोषें: अनंगें पेरियेलीं हातियेराचीं रोपें बहुवसें "—नरेंद्र, रु. स्वयंवर ७८०. **मायावेषें**—परमेश्वर जो नरदेह धारण करतो, तो ' मायानिर्मित पुर मायापुर ' असा मायेनें केलेला मायेचा दिव्य देह असतो. या देहांत प्रवेश करून परमेश्वर साकार होतो. श्रीकृष्ण हा परब्रह्मानें स्वीकारलेला मायावेषच होय.

**ओं. ४०५** " असे अनेक अवतार घेऊन, प्रत्येक अवतारांत ( तूं ) अपार पराक्रम केलेस. एकापक्षीं ( सृष्टींतील ) सूक्ष्म परमाणु किंवा ( आकाशांतील ) असंख्य तारका देखील मोजतां येतील, पण तुझे पवाडे ( पराक्रम ) मात्र वर्णन करतां येणार नाहींत. ( इतके ते असंख्य आहेत ! ) " ब्रह्मदेव येथें परमेश्वराच्या प्रत्येक अवतारांतील असंख्य पराक्रमांचा गौरवपर उल्लेख करतो. **ऐसें**—श्रीकृष्णावतारासारखेच. **गुणवती**—मोजता येती. **तारू**—तारका, तारे. **ते**—पवाडे.

**ओं. ४०६**—आपली बुद्धि व श्रीकृष्णाची स्तुति यांतील विरोध दाखवून आपण स्तुति करायला कसे अपात्र आहों, हें ब्रह्मदेव येथें स्पष्ट करतो. **भूलवीला एकीशक्ती**—जो विज्ञान शक्तीनें एवढा चकित केला गेला ! ब्रह्मदेवानें गोकुळांतील गोपवासरांचें हरण करून श्रीकृष्णाच्या सामर्थ्याची परीक्षा पाहण्याचें ठरविलें, पण आपल्या विज्ञान शक्तीनें इकडे आपणच तीं गोपवासरें होऊन श्रीकृष्णानें जणु कांहींच घडलें नाहीं असें भासवून ब्रह्मदेवाचीच उलट तोंडफोड केली, याचा उल्लेख मागें आलाच आहे.

**ओं. ४०७**—आपण स्तुति करायला अपात्र असलों, तरी आपण केलेली स्तुति श्रीकृष्णानें वात्सल्यानें स्वीकारावी असें ब्रह्मदेव एका दृष्टांतानें ध्वनित करतो. **कोडिसवाणें**—सुंदर, चांगलें, कौतुक करण्याजोगें. पहा. " म्हणे " हे यूक्ति कोडिसवाणी : कांहीं घडतें न दीसे "—नरेंद्र, रु. स्वयंवर–४०६. या ओंवीच्या समानार्थक पहा–" जैसा स्वभावो मायबापांचा । अपत्य बोले जऱ्हीं बोबडिया वाचा । तऱ्हीं अधिकाधिक तेयांचा । संतोखुचि आथि ॥ ६४ ॥"–ज्ञानेश्वरी–१.

**ओं. ४०८**—आपल्या बुद्धीचा डौल श्रीकृष्णासारख्या सर्वज्ञापुढें दाखविणें म्हणजे कसें हास्यास्पद आहे, तेंच दोन दृष्टांतांनीं येथें व्यक्त केलें आहे. " सूर्याला दिव्यानें ओवाळावें किंवा क्षीरसमुद्राला दुधाचा पाहुणचार द्यावा, ( हें जितकें हास्यास्पद ) तितकेंच हे सर्वज्ञनाथा ! तुझ्यापुढें मी तुझी स्तुति करून माझ्या बुद्धीचा प्रकाश दाखवावा हें हास्यास्पद आहे. **दिणकरूं**–सूर्य. **क्षीराब्धां**—क्षीरसमुद्राला. **पाहोंनरूं**—पाहुणचार, पाहुण्याला योग्य असा आदरसत्कार. पहा–" मग भीमे पाहुनरू घाडिला वंदिराजा : लेणी–लुगडी देउनि करविली पुजा "–नरेंद्र, रु. स्वयंवर–१४८. **मतीचा विस्तारुं**–बुद्धीचा विकास, विलास.

ओं. ४०९—“ सूर्याचा प्रकाश असेल तरच सर्वांना पाहावयास डोळे समर्थ होतील. तद्वत् तुझ्या प्रसादानेंच तुझें चरित्र वर्णन करतां येणें शक्य आहे.” सारांश वस्तूचें दर्शन होण्यास फक्त डोळे असून चालणार नाहीं, तर तेथें सूर्यप्रकाशाची जशी मुख्य जरूरी आहे, त्याप्रमाणें श्रीकृष्णाचें चरित्रवर्णन करावयाचें असल्यास नुसती बुद्धि असून केवळ भागणार नाहीं, तर श्रीकृष्णाच्या कृपाप्रसादाचीच मुख्य अपेक्षा आहे, असें ब्रह्मदेव सांगतो. श्रीकृष्णाच्या कृपेशिवाय आपणास त्याचें वर्णन करतांच येणार नाहीं असें म्हणतांना, तो पर्यायानें श्रीकृष्णाच्या कृपेचीच याचना करतो.

ओं. ४१०—“ तुझ्या पुण्यदायक कथा जर आइकल्या नाहींत, तर जीवांना पावित्र्य प्राप्त होणार नाहीं. मग मोक्षमार्गाला ते योग्य तरी कसे होणार ?” श्रीकृष्णाच्या चरित्रश्रवणानें भक्ताला पुण्य लागतें, व तो पवित्र होतो. पण ज्याच्या कानावरून श्रीकृष्णचरित्र मुळींच गेलें नाहीं, तो मोक्षाला अधिकारी होणार नाहीं. कारण श्रीकृष्ण हेच जीवाला मोक्ष देणारे आहेत. **परमार्ग**—मोक्षमार्ग. पण महानुभावपंथालाही हें नांव कोठें कोठें दिलेलें आढळतें. कदाचित् श्रीकृष्ण हें महानुभवांचें आदिदैवत असल्यानें, त्याचें चरित्र श्रवण न करणाऱ्यांस त्या पंथांत येण्याचा अधिकार नाहीं, असेंही कवीला येथें पर्यायानें सुचवावयाचें असेल !

ओं. ४११—“ तुझ्या चरित्राशिवाय कोणाचें असें चरित्र आहे कीं, ज्यानें ब्रह्मज्ञान होतें ?” श्रीकृष्णाच्या चरित्रश्रवणानें जीवाचे सर्व मल नाहींसे होतात व अशा प्रकारें त्याला परमेश्वरस्वरूपाचें शुद्ध ज्ञान होतें, म्हणजेच त्याला शुद्ध ब्रह्मज्ञान होतें, व कैवल्य प्राप्त होऊन त्याला मोक्ष मिळतो. **चोखाळे**—शुद्ध होई, मलरहित होई. **आत्मतत्त्व**—ब्रह्मज्ञान, परमेश्वराचें स्वरूप.

ओं. ४१२— परमेश्वराच्या कृपेशिवाय इतर कोणत्याहि मार्गानें ब्रह्मज्ञानांत शिरकाव होत नाहीं, हें येथून स्पष्ट करतात. “ परमेश्वर जरी इंद्रियगोचर झाला (डोळ्यांना जरी दिसला) किंवा मनानें (चिंतनानें) व प्राणायामानें जाणतां आला, तरी तुझ्या कृपेशिवाय जीव मोक्षाला पावणार नाहीं.” हटयोगादिसाधनांनीं जरी परमेश्वराचें प्रत्यक्ष दर्शन डोळ्यांना घडलें अथवा त्याचें ज्ञान झालें, तरी परमेश्वराच्या कृपेशिवाय, (त्याच्या भक्तीशिवाय अथवा प्रेमाशिवाय) जीवाला मोक्ष मिळणार नाहीं. येथें इतर कोणत्याही साधनापेक्षां प्रेमाचें अथवा भक्तीचें

महत्त्व अधिक सांगितलें आहे. सूत्रपाठांत ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग व कर्ममार्ग या मोक्षप्राप्तीच्या साधनांत, कर्ममार्ग हा अगदीं कुचकामाचा ठरविला आहे. कर्मानें सर्व कांहीं प्राप्त होईल पण मोक्ष मिळणार नाहीं असें, "कर्मवसें जीव सकळै पावे : एकुवाचौनि :" या सूत्रांत स्पष्ट केलें आहे. ब्रह्मज्ञानाच्या किंवा मोक्षाच्या बाबतींत कर्ममार्गाचा हा कमीपणा पंडित दामोदरानें ओं. ४१३–४१५ यांत विशेषत्वानें मांडला आहे.

**ओं. ४१३**—"यमनियम, आसनें इत्यादि योगसाधनें असलीं तरी: तुझ्या शब्दाशिवाय (जीवाला) ब्रह्मज्ञानांत शिरकाव नाहीं." परमेश्वराच्या बोधानें जसें ब्रह्मज्ञान होतें, तसें तें हटयोगाच्या साधनांनीं होत नाहीं. असें ब्रह्मदेवाच्या तोंडून वदवितांना, कवीनें परमेश्वराचा वेध व बोध हे ब्रह्मज्ञान होण्याच्या बाबतींत हटयोगापेक्षां श्रेष्ठ आहेत, असेंच आपल्या पंथाप्रमाणें स्पष्ट केलें आहे. "परमेश्वर वेधूनि बोधीतिः कां बोधूनि वेधीतिः" असा ज्ञान देण्याचा प्रकार असल्यानें, तें प्रत्यक्ष परमेश्वराच्या तोंडून आलेलें ज्ञान हटयागोच्या कोरड्या साधनापेक्षां केव्हांही प्रभावी असणार! **योगुसाधनीं**—"यमनियमासन प्राणायाम प्रत्याहार धारणा ध्यान समाधयोऽष्टावंगानि।" अशीं हटयोगाची आठ साधनें आहेत. या साधनांनीं आत्मा ब्रह्मांडीं नेतां येऊन, चित्कलास्वादानें साधकाला शरीर अजरामर करतां येईल. पण त्यानें ब्रह्मज्ञान होईल असें नाहीं. **रीगांवा**—शिरकाव.

**ओं. ४१४**—कर्ममार्ग (योगमार्ग) व भक्तिमार्ग यांची तुलना करून दुसऱ्याचें श्रेष्ठत्व कवि वाचकांच्या मनावर बिंबवीत आहे. "हटयोगी लोक आपल्याला मुक्ति (मोक्ष) मिळालाच आहे असें अहंकारानें मानतात, पण ब्रह्मज्ञानाची त्यांना ओळख नसते. हे लोक प्रकृतीपासून (शरीरापासून) कधींच वेगळे (स्वतंत्र) होत नाहींत." हटयोगी लोक षट्चक्रभेदन करून अगर प्राणनिरोध करून आपलीं शरीरें अजरामर करून घेतात व आपणास मोक्ष मिळालाच आहे, असा गर्व मानतात, अशा डौलांतच ते असतात. पण खरें ब्रह्मज्ञान त्यांना कोठें झालेलें असतें? मागें वृंदावनवर्णनांत मुनिमंडित सरोवरांचें वर्णन करतांना अनेक उपासकांचें किंवा साधकाचें असेंच उल्लेख येऊन गेले आहेत. पहा मागें ओंव्या १४६—१५२. **आत्मतत्वां**—ब्रह्मज्ञानास. **प्रकृती वेगळे** इ०—जीव सूक्ष्म प्रपंचाची रचना करतो याचें मुख्य कारण असें कीं,

तो मतित्रयानें युक्त आहे. अधमती, अधगती व अधरती अशा त्याच्या तीन मती आहेत. आदिमळ लागून जीवाचा जन्म झाल्यानंतर तो क्षणभर पडून असतो. तदनंतर त्याला अधमतीमुळें "आपण उघडे आहोंत, आपणास वस्त्र मिळालें पाहिजे" असें वाटतें. या अधमतीमुळें तो खालील देवतेच्या मळरूपी वस्त्राची मानसिक इच्छा करतो. त्याबरोबर मायासामर्थ्यानें त्याच्या जीवस्वरूपावर तो मळ आकारलेला दिसतो. मग अधगतीमुळें त्या मळांत तो शिरतो व पुढें अधरतीमुळें तेथेंच तो रममाण होतो. म्हणजे त्या मळाशीं तो तादात्म्य पावतो. तो मळ म्हणजे मीच असें त्याला वाटतें व त्याला आनंद होतो. पण पुनः अधमतीमुळें त्याला आणखी खालील देवतेच्या मळरूपी वस्त्राची वासना उत्पन्न होते. अशा रीतीनें विश्वेपासून तों यक्षिणीपर्यंत एकेका देवतेचा मळ तो तयार करतो, तो या मतित्रयामुळेंच.

परमेश्वर प्रवृत्तीमुळें मायेनें जीवाला लावलेला आदिमळ हा प्रांपचिक नसतो, तर जीवस्वरूपीचा अज्ञानरूप दोषच त्या मळाच्या रूपानें आकारलेला असतो. विश्वेचा मळ हा प्रापंचिक म्हणजे अष्टभूतांचा असतो, तथापि तो केवळ कारण–भूतांचा असतो. पण अष्टभैरव व त्या खालील सर्व देवता यांचें मळ मात्र कारण–मिश्रसमळ प्रपंचाचे असतात. या अष्टभैरवांच्या मळांना 'प्रकृतिमळ' असें म्हणतात. कारण आपल्या ठिकाणीं एक प्रधान व सात आनुषंगिक भूतें धारण करण्याचा त्यांचा जो स्वभाव, त्याला 'प्रकृति' असें नांव आहे. त्यावरून त्यांच्या मळांनाहि 'प्रकृतिमळ' असें नांव मिळालें आहे. आठही भैरवांचे मळ जीवाकडून एकाच वेळीं तयार केले जातात, व त्या सर्वांत जीव पृथक्त्वानें पण एकाच वेळीं व्यापतो. म्हणजे जीव हे आठही मळ एकाच वेळीं लावून घेतो. या प्रकृतिमळांत रममाण होताक्षणींच जीवाला आपणच 'प्रकृति' आहोंत असें वाटतें. (पहा–महानुभाव तत्त्वज्ञान पृष्ठें, १६१–१६३; १६७–१६८.) प्रस्तुत ओंवींत ते साधक (जीव) 'प्रकृति वेगळे न होती' असें जें म्हटलें आहे, तें वर सांगितल्याप्रमाणें जीव प्रकृतिमळांत रममाण होताक्षणींच त्याला आपणच 'प्रकृति' आहे असें वाटतें त्या त्याच्या प्रवृत्तीसच अनुलक्षून आहे. प्रकृति-मळापासून जीवाची सुटकाच होत नाहीं. ते या अष्टधा प्रकृतीलाच सर्वस्व मानतात, व तिच्या धारणेंतच गढून गेलेले असतात.

**ओं. ४१५**—प्राणायामादि आचरण करूनहि जेंथें जीवाला शुद्धता येत नाहीं तेथें मुक्तिमार्गांत (मोक्षमार्गांत) कर्मांची मातब्बरी ती काय असणार?" सारांश

प्राणायामादि शारीरिक यमनियमांनीं शरीराची शुद्धि होईल, पण मोक्षाला जरूर त्या जीवाची (आत्म्याची) शुद्धि त्यांनीं होणार नाहीं. मोक्षाला (जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटायला) जें ब्रह्मज्ञान लागतें, तें यमनियमप्राणायामादि बाह्य शारीरिक आचरणानें मिळणार नाहीं, अशा भाव. **पवनादिकीं**—प्राणायामादि यमनियमाचें आचरण (धारणा). **केउती गणना**—मोक्षमार्गांत कर्मांची किंमत ती केवढी असणार! अर्थात् नाहींच.

**ओं. ४१६**—जीवाला हे प्रकृतिमळ आवडूं लागून तो शेषशय्या, ब्रह्मादि देवापासून तों यक्षिणीपर्यंतचे सर्व देवतांचे मळ क्रमाक्रमानें तयार करतो, व अशारीतीनें सर्व देवतांचे मळ लागून सूक्ष्म प्रपंच जीवाकडून तयार करून घेतल्यावर, माया आपण स्थूळ प्रपंच तयार करते. सूक्ष्म प्रपंच तयार झाल्यानंतर स्थूळाची रचना होऊन जीव थोड्या कालावधीनें कर्मफळांत घातला जातो. जीवाला भोगावीं लागणारीं हीं कर्मफळें स्वर्ग, नरक, कर्मभूमि व मोक्ष अशीं चतुर्विध आहेत. यांपैकीं स्वर्ग व मोक्ष हीं देवताफळें होत. इंद्रादि देवतांच्या फळांना 'स्वर्गफळें,' तर ब्रह्मादि देवतांच्या फळांना 'मोक्षफळें' असें म्हणतात. कर्मभूमि व नरक हीं बाकीचीं कर्मफळें होत. 'कर्मभूमि म्हणजे मनुष्यदेह आणि 'नरक' म्हणजे मनुष्यदेहाखालील पशुतिर्यंचादि सगळ्या पापयोनि, रौरवादि नरक वगैरे दुःखफळें. जीवाला याप्रमाणें स्वाभाविकच प्रत्येक देवताचा मळ लागून तिचा अभिमान जडला म्हणजे स्वर्ग, नरकादि फळें त्याला भोगावीं लागतात, व अशा रीतीनें मनुष्यदेहांत मात्र कर्मभोग व कर्मनिष्पात्तिहि असते. जीव या कर्मांमुळें अनेक जन्मांच्या फेऱ्यांत सांपडतो, व हें जन्ममरणाचें चक्र त्याच्या मागून सुटत नाहीं. **फळांची**—स्वर्ग मोक्षादि कर्मफलांची फलश्रुति. **श्रवणीलिं**—ऐकली. **दुणाविली जीती**—जन्ममरणाचें चक्र दुप्पट वेगानें फिरूं लागतें. **संडें**— सोडलें जात नाहीं. अष्टधा प्रकृतिरूप शरीराची आसक्ति व त्यांतूनहि अनेक फलांचें आमिष, त्यामुळें जीवाला अनेक जन्म प्राप्त होतात, व हें रहाटगाडगें याला सोडतां येत नाहीं.

**ओं. ४१७**—येथून केवळ कर्ममार्गी लोकांची निंदा सुरू होते. "जे कर्ममार्गाचेंच केवळ अवलंबन करतात, ते जणु काय, नवसानेंच (नवस करूनच) आपणास बंधनांत अडकवून घेतात. 'शरीराची आसक्ति सोडून या ब्रह्मज्ञान्यांनीं सर्व घालविलें' असेंच ते (कर्ममार्गी) म्हणतात." वीतराग

( सर्वसंग परित्यागी असे ब्रह्मज्ञानी ) लोकांनीं जो प्रकृतीचा त्याग केला, शरीराची जी आसक्ति सोडली, ती त्यांच्या मतें मोठीच चूक होय. वास्तविक कर्ममार्ग हा शारीरिक उन्नतीचा मार्ग असल्यानें, कर्ममार्गी लोकां कांहीं मोक्षाला अंतच नाहींत. त्यामुळें यज्ञयागादि कर्मे करून जणु काय नवस करूनच ते जन्ममरणाचें बंधन आपणावर ओढवून घेतात. आणि उलट हे लोक " वीतराग्यांनीं यज्ञयागादि साधना करून स्वर्गसुखाचें साधन केले नाहीं, त्यामुळें त्यांनीं मोठाच नाश करून घेतला " अशी हाकाटी करतात. कर्मवादी व ब्रह्मवादी लोकांचा हा झगडा येथें पंडित दामोदरानें मोठ्या जिव्हाळयानें वर्णिला आहे. **सूति**—घालती. **वीतरागीं**—विरक्त अशा ब्रह्मवादी लोकांनीं. **नाशिलें**—घालविलें, दवडलें. ( यज्ञयागांनीं मिळणारीं फलें दवडलीं म्हणून दोष देतात ).

**ओं. ४१८.**—येथें कर्मकांडी लोकांची प्रवृत्ति वर्णिली आहे. " हे लोक, आपल्यासारखे जे कोणी कर्मकांडी नाहींत त्यांना ( ब्रह्मज्ञान्यांना ) 'कर्मनष्ट' अशा नांवानें निंदतात. जशा वेश्या कुलस्त्रियांना हंसतात, तसेच ( हे कर्ममार्गी ब्रह्मज्ञान्यांचा उपहास करतात. ) " कर्ममार्गी लोकांना वेश्यांची उपमा देऊन कवीनें त्यांच्याबद्दल आपला निषेध व्यक्त केला आहे. वास्तविक यज्ञयाग किंवा व्रतेंवैकल्यें केलीं नाहींत, म्हणून कांहीं एकादा माणूस कर्मनष्ट ( अधर्माचरणी ) होत नाहीं. काम्यकर्में करणें वेगळें व नित्यनैमित्तिक कर्में करणें वेगळें. पण हे कर्ममार्गी लोक आपण काम्यकर्में करतों तशीं इतर लोक करीत नाहींत, म्हणून त्यांना 'नित्यनैमित्तिककर्महीन' म्हणून नांवें ठेवतात. 'कर्म' या शब्दाची याप्रमाणें ते गफलत करतात. आपण जी काम्यकर्में करतों तेवढींच काय तीं उचित कर्में अशी त्यांची अहंकारी समजूत असते.

**ओं. ४१९.**— " ज्याप्रमाणें विरहिणीला चंद्र ताप देणारा होतो, व चंदनाहि तिला शांत करीत नाहीं, त्याप्रमाणें कर्मजड लोकांना हे निवृत्तिमार्गी ( ब्रह्मज्ञानी ) लोक ( तापद ) भासतात. " येथें कर्ममार्गी लोकांना विरहिणीची व ब्रह्मज्ञानी लोकांना चंद्राची व चंदनाची उपमा हृद्य व मार्मिक असून, तिनें कवीनें आपला ब्रह्मज्ञानाबद्दलचा जिव्हाळाही सूचित केला आहे. सारांश कर्में करूनही आहेत तेथेंच असणाऱ्या ( जड ) कर्ममार्ग्यांना, ब्रह्मज्ञानी लोक दृष्टीपुढेंही नको असतात. इतका त्यांच्यांत विरोध असतो असा भाव. **निवृतां**—सर्वसंगपरित्याग केलेल्या ( ब्रह्मज्ञानी ) लोकांना.

**ओं. ४२०**—" कांहीं लोक कर्ममार्गाचाच उपदेश करतात, तर कांहीं त्यानेंच ( कर्ममार्गानेंच ) तरलों, ( वांचलों ) असें प्रतिपादन करतात. ( अशारीतीनें ) परस्परांची स्तुति करून हे ब्रह्मज्ञानी, लोकांची निंदा करतात." कोणीकडून आपला प्रवृत्तिमार्ग ( कर्ममार्ग ) श्रेष्ठ असें अट्टाहासानें म्हणून, निवृत्तिमार्गाला ( ब्रह्मज्ञानी लोकांना ) नांवें ठेवण्याचाच हा प्रकार येथें वर्णन केला आहे. कर्ममार्गाबद्दलचा हा अभिनिवेश भगवद्गीतेंतहि दिग्दर्शित केला आहे. पहा—" कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् । क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥ ४३ ॥ भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् । व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ ४४ ॥—अध्याय. २.

**ओं. ४२१**—" म्हणून ब्रह्मदेव श्रीकृष्णास म्हणतो:—" जे ( लोक ) कर्माच्या वाटणीला जातात, व अर्थ व काम यांना भुलतात, ते तुझ्या शब्दाशिवाय दुसऱ्या कोणाच्या शब्दानें कर्ममार्ग सोडतील ?" जे कर्ममार्गी लोक यज्ञयागादिकांच्या आचरणानें स्वर्गसुखाच्या मागें लागले आहेत, ते अर्थातच श्रीकृष्णासारख्या परमेश्वराच्या बोधाशिवाय दुसऱ्या कोणाच्याही उपदेशानें आपला कर्ममार्ग सोडणार नाहींत. कारण यज्ञयागादिकांनीं मिळणारें स्वर्गफल, हें ब्रह्मज्ञानानें मिळणाऱ्या मोक्षसुखासारखें शाश्वत नाहीं, हें ज्ञान त्यांना श्रीकृष्णाच्या तोंडून कळलें तरच त्यांची तशी खात्री होईल. **वरगणे पडिले**—वाटणीला गेलेले, अवलंब केलेले. वरगणवांटणी. पहा—" जयाचिया आक्षौहिणी । तेणें तिया आरणी । वरगण कवणाकवणी । महारथीया ॥"—ज्ञाने, १।२२. **अर्थकामीं**—धर्म, अर्थ, काम व मोक्ष अशी कर्माची चतुर्विध फलें आहेत. त्यापैकीं काम्यकर्माची अर्थ व काम ही फलें असून, धर्म व मोक्ष हीं कर्मसंन्यासाचीं फलें होत. श्रीकृष्णाच्या बोधामृतानें कर्ममार्गी देखील कर्मसंन्यासी होतील असा भाव.

**ओं. ४२२**—" ज्या कर्माच्या योगानें प्रपंच हा पदार्थ मलिन होतो, त्यानें ( वास्तविक ) कांहींच स्वच्छ होणार नाहीं. अपवित्र वस्तूच्या संसर्गानें दुसरी वस्तु कधींच पवित्र होत नाहीं." सारांश काम्यकर्म हें अपवित्र असल्यामुळें स्थूळ प्रपंच त्यामुळें मलिन झाला आहे. जीव ब्रह्मांडांत आल्यानंतर त्याच्या निरनिराळ्या कर्माप्रमाणें त्याला फळें देण्यासाठीं जीवस्वरूप देवतांना व्यक्त होणें अवश्य आहे. यासाठीं जीवाला आपल्या स्वरूपावर प्रत्येक देवतेचा मळ घ्यावा लागतो. या

देवतामळाला ' सूक्ष्म प्रपंच ' असें म्हणतात. मायादत्त सामर्थ्यानें जीव मळांची ऊर्फ सूक्ष्म प्रपंचाची रचना करतो, त्याचवेळीं मायेकडून स्थूळ प्रपंच रचला जाऊन चतुर्विध कर्मफळें तयार होतात. अशा रीतीनें प्रपंच हा पदार्थ कर्मांनीं बाधित होतो.

**ओं. ४२३**—" ज्याप्रमाणें वस्तूचा संबंध चालू असतांना तिच्याबद्दलचा मोह तुटत नाहीं, त्याचप्रमाणें कर्में चालू आहेत तोंपर्यंत कर्मांचें बंधन नष्ट होत नाहीं. पण जर ( श्रीकृष्णा ! ) तूं कृपा करशील तर ( कर्मांचें बंधन नष्ट होण्याची ) ही अशक्य घटनाही घडून येईल. " श्रीकृष्णाच्या बोधानें, त्याच्या स्वरूपज्ञानानें आपलें कर्मबंधन तुटेल, असें सांगून ब्रह्मदेव त्याच्या कृपेची अपेक्षा करतो.

**ओं. ४२४**—येथून दोन ओंव्यांत संत्संगाची महति गाइलेली आहे. " जर संतांचा संग घडेल तर मोक्षाचें दार उघडेल. हे श्रीकृष्णा ! तुझें पराक्रमवर्णन मी पुष्कळ ऐकलें आहे ! " संतसंगतीनें बुद्धि शुद्ध होऊन परमेश्वराचें ज्ञान प्राप्त होतें, व त्या द्वारां मोक्षाचा मार्ग सुलभ होतो. श्रीकृष्णासारख्या संताचा संग आपणास मिळाल्यास आपणास मोक्षाचा मार्ग खुला होईल, अशी ब्रह्मदेवाची अपेक्षा.

**ओं. ४२५**—" जर भक्तांना तुझी संगत घडेल, तरच संसाराचीं बंधनें तुटतील. ज्यांनीं बोलावल्याबरोबर तूं आलास, त्यांनीं तुझें नाम व लीला वर्णिल्या आहेत. " ज्यांना ज्यांना म्हणून परमेश्वराचा संग घडला आहे, त्यांना त्यांना मोक्ष हा मिळालाच आहे. शिवाय संकटप्रसंगीं द्रौपदी, गजेंद्र, यांनीं हाक मारल्याबरोबर तो त्यांच्या सुटकेसाठीं धावला आहे, व त्यांना त्यानें मोक्षही दिला आहे. **हाकारणें**—बोलावणें.

**ओं. ४२६**—परमेश्वराचें निर्गुण निराकार स्वरूप दोन ओंव्यांत वर्णन करून तेंच सगुण साकार होऊन श्रीकृष्णासारख्या मनुष्यावतारांत व्यक्त झाल्याचें, ब्रह्मदेव निवेदन करतो. **पररूप**—ज्या निर्गुण परमेश्वराचें स्वरूप मनाच्या व बुद्धीच्या आटोक्याबाहेरचें आहे. " यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसा सह " अशी परब्रह्माची स्थिति आहे. **जेथ**—ज्या परब्रह्माच्या ठिकाणीं नांव, रूप व रंग यांची कोणतीही खूण सांपडत नाहीं. जेथें नाव, रूप व रंग यांचा मागमूसही लागत नाहीं, असें.

**ओं. ४२७—सर्वगत**—सर्वत्र व्यापलेलें. पहा. " यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् । तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ॥ ६ ॥ भगवद्गीता-९. वायुप्रमाणें जे परब्रह्म सर्वगामी व सर्वव्यापी आहे. **कूटस्थ**—मायेच्या संगतीनें असणारें चैतन्य, आत्मा. पहा. " आणि कूटस्थु जो अक्षरु । दाविला पुरुषाकारू । तेणें उपहिता आकारु । चैतन्या केला ॥ ४३ ॥ ज्ञाने-१६. **अक्षरूं**—नाशरहित, अविनाशी. **कैवल्यरूप**—बोधामुळें ' हा ईश्वर ' व ' मी जीव ' अशी प्रतीति आल्यावर, ज्ञानियाला प्रत्यक्ष परमेश्वरावताराकडून बोध झालेला असेल तर, त्याच्याकडून शास्त्रश्रवणहि घडतें. त्यामुळें सर्व गोष्टींचें यथार्थ ज्ञान त्याला विशेष विस्तारानें होऊं लागतें. यांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, ज्ञान व प्रेम हीं परमेश्वरप्राप्तीचीं दोन साधनें असून ज्ञानानें ब्रह्मस्वरूपाचा ' मोक्ष ' प्राप्त होतो, तर प्रेमानें ईश्वरस्वरूपाचें ' कैवल्य ' प्राप्त होतें, ही गोष्ट पूर्णपणें लक्षांत येतें. मोक्ष म्हणजे ब्रह्मस्वरूपप्राप्ति, ही कैवल्यापेक्षां म्हणजे ईश्वरस्वरूप प्राप्तीपेक्षां कमी दर्जाची आहे. कारण ईश्वरस्वरूप हें ब्रह्मस्वरूपाच्या पलीकडचें आहे. ( पहा. महानुभाव तत्त्वज्ञान पृ. ४२६ )

**ओं. ४२८**—येथें श्रीकृष्णाच्या सगुण मनुष्यावताराचें महत्त्व वर्णन केलें आहे. जीवांना ज्ञान देण्यासाठीं, त्यांचा उद्धार करून त्यांना आनंद देण्यासाठीं, परमेश्वराला जो अवतार धारण करावा लागतो तो मनुष्यावतारच ! कारण हीं कार्यें फक्त मनुष्यावतारांतच होऊं शकतात. परब्रह्मानें जो श्रीकृष्णावतार घेतला, तो जीवोद्धारासाठींच होय.

**ओं. ४२९**—श्रीकृष्णाच्या स्वरूपाचें वर्णनही चार वेदांना व हजार तोंडाच्या शेषाला करतां येणें शक्य नाहीं, इतकें तें अपार आहे, असें ध्वनित करतात. असाच उल्लेख मागें. ओं. ९ व ओं. ३०४, यांत आला आहे.

**ओं. ४३०**—" तूं सर्वांचा स्वामी आहेस, हें देवांना ठाऊक नाहीं. ( याची जाणीव त्यांना नाहीं ). नाहींतर देहादिकावरची अहंता त्यांच्या ठिकाणीं कां उत्पन्न झाली असती ? " महानुभाव तत्त्वज्ञानाप्रमाणें प्रत्येक देवतेला आपल्यावरील सर्व पदार्थांचें अज्ञान असतें. परमेश्वराचेंही त्यांना अज्ञान असतें. हें त्यांचें अज्ञान कधींच नाहींसें होऊं शकणार नाहीं. असें जर आहे, तर परमेश्वर हा सर्वांचा स्वामी हें तरी त्यांना कसें ठाऊक असणार ? देवता या परमेश्वराहून भिन्न व नित्य आहेत. परमेश्वर सर्वांचा स्वामी आहे हें ठाऊक नसल्यामुळें देवतांना स्वतःच्या

देहाबद्दल अहंकार उत्पन्न होतो. ब्रह्मदेवालाही 'वच्छहरण' करतांना तसा अहंकार झाला होता, म्हणून त्याचे हे बोल स्वानुभावाचेच आहेत.

**ओं. ४३१**—" तूं कैवल्याचा राजा आहेस अशी जर जीवाला जाणीव झाली, तर संसारांत त्याला जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडण्याचें कारण नाहीं. " मागें ओं. ४२७ च्या टीपांत सांगितल्याप्रमाणें, ज्ञान व प्रेम या परमेश्वर प्राप्तीच्या दोन साधनांपैकीं प्रेमानें ईश्वरस्वरूपाचें कैवल्य प्राप्त होतें. परमेश्वर जीवाला दानें देऊन जें औदार्य दाखवितो, तें त्यानें अवतार घेतल्यावर, लीलादान, संबंधज्ञान, ग्रहणादान व कैवल्यदान या चार प्रकारांनीं प्रगट होतें. परमेश्वराकडून त्याच्या स्वरूपाचें असें हें कैवल्यदान जीवाला मिळाल्यावर तो जन्ममरणाच्या चक्रांतून सुटतो.

**ओं. ४३२**—ईश्वराचें ज्ञान होण्याच्या मार्गांत, अज्ञान, मोह, अहंकार, ममता, कर्मबंधन, काम, क्रोध, मद, मत्सर, तृष्णा, व्याधि, वियोग, लोभ व नाना मळ इत्यादिकांचे कसे अडथळे असतात, ते येथून ओं. ४३६ पर्यंत वर्णिलें आहे. " हे कैवल्यपती श्रीकृष्णा ! असें पहा कीं, अगोदर जीवांना तुझें ज्ञान नाहीं, व त्यांतून पुनः ते महामोहाच्या तावडींत सांपडलेले. (मग त्यांना परमेश्वराचें ज्ञान होणार कसें ? ).

**ओं. ४३३**—" जीवांना अहंकाराचे गळफास व ममतेचे हातखोडे घातले असून, वर पुन्हाः त्यांच्या पायांत कर्माच्या बेड्या घातल्या आहेत." एखाद्या गुन्हेगाराला बंदीवान केल्यावर त्याला गळफास, हातखोडे व बेड्या घालतात व सर्व बाजूनीं त्याला हालूं देत नाहींत. तद्वत् येथें जीव, अहंकार, ममता व कर्में यांनीं जखडला असल्यानें, तो परमेश्वराचें ज्ञान करून घेण्यास स्वतंत्र नाहीं. **हुंबर**—गळफास. पहा-" तैसा प्रपंचाचा हुंबरु : केवि ल्ये जिउ निराकारु । येवढा संसारतरु : केवि भोगी ? "-उद्धवगीता ५९६. **हातखोडा**—हात अडकविण्याचें लाकडी यंत्र. पहा-" चंद्रसूर्यांचा हातखोडा : काळा कैसेनि घालिजे ? " उद्धवगीता ५९४. **शांखळां**—बेड्या. ( लोखंडाच्या ).

**ओं. ४३४**—" कामक्रोधांनीं ( जीव ) फोडले असून, अहंकारानें त्यांची विटंबना केली आहे, व मदमत्सरांनीं त्यांना भिकेला लावून अलग केलेले आहेत. " षड्रिपुपैकी चारांनीं जीवाची अशी वाट लावून त्यांना परमेश्वरज्ञानाला अपात्र केलें आहें. **विभांडणें**—फोडणें. पहा-" जेणें कासेश्वरें आपुलेनि कोपें :

मळयाचळ विभांडुन सक्षेपें '–नरेंद्र, रु. स्वयंवर २४९. **विचंविणें**—विटंबना होणें. पहा– ' तया बाधका : नेईजे कुंभिपाका । मग अनेगी जाचणुका : विचंबिजे हा–" उद्धवगीता ५०९. **सवते केले**—स्वतंत्र केले, अलग केले.

**ओं. ४३५.**—" जीव तृष्णारूपीं पाण्यांत बुडले जातात, व रोगविरहादिकांनीं जखमी होतात. मग त्यावेळीं ते काकुळतीला येऊन ' आम्हीं वाटेल तें करूं ' असें म्हणतात." प्राणिमात्र वासनांनीं त्रस्त होतात व आधिव्याधींनीं ग्रस्त झाल्यामुळें असहाय होत्साते, वाटेल तें करायला तयार होतात. अशा स्थितींत परमेश्वराच्या ज्ञानाकडे त्यांचें लक्ष कसें लागणार ? **घाअे पडणें**—जखमी होणें. **काकुलतैलें**—काकुळतीस आलेले, गयावया करणारे.

**ओं. ४३६.**—एकाद्या बंदीवानाला ज्याप्रमाणें अंधारकोठडींत घालून उपाशी ठेवतात, व त्याची जशी अगदीं मलीनावस्था झालेली असते, तशीच संसारांत जीवाची झालेली असते, असें वरीलप्रमाणें रूपकानें वर्णन करतात. " जीवांना लोभाच्या अंधकार कोठडींत घातलें असून त्यांना ज्ञानाचा उपवास घडविला जातो." याचाच अर्थ असा कीं, जीव लोभाविष्ट होऊन परमेश्वरविषयक ज्ञानाला पारखे होतात. त्यांना आपल्या स्वरूपावर प्रत्येक देवतेचा मळ घ्यावा लागतो, व अशा रीतीनें ' सूक्ष्म प्रपंच ' तयार होतो. जीवांची अशी असहाय स्थिति होऊन त्यांना परमेश्वराचें ज्ञान न झाल्यानें, ते मोक्षाचे अधिकारी होत नाहींत. **नाना मळीं**—अनेक देवतांच्या विश्वेपासून याक्षिणीपर्यंतच्या देवतांच्या मळांनीं.

**ओं. ४३७**—" दीन व अनाथ अशा जीवांचा पक्षपाती व सर्वांना संसारबंधनापासून सोडविणारा ( हे श्रीकृष्णा ! ) तुझ्याशिवाय या चराचर विश्वांत दुसरा कोणी नाहीं." सर्व अनर्थाचें मूळ जी अनादि अविद्या, तिचें पारतंत्र्य झुगारून देऊन तिच्यापासून पूर्णपणें स्वतंत्र होणें हाच खराखुरा आत्यंतिक मोक्ष होय. जीवस्वरूपी असलेलें अविद्येचे चिन्ह गळून पडेल, तेव्हांच हा मोक्ष प्राप्त होऊं शकेल. त्यासाठीं आत्मज्ञान म्हणजे परमेश्वराचें ज्ञान झालें पाहिजे. हें परमेश्वराचें ज्ञान मोचक होय. पण त्याहीपेक्षां त्याचें प्रेम मोचक होय. हें परमेश्वराचें ज्ञान व प्रेम परमेश्वराव्यतिरिक्त दुसरा कोण देऊं शकणार ?

**ओं. ४३८**—परमेश्वराच्या भिन्न भिन्न अवतारांतील त्याचे पराक्रम येथें वर्णिले आहेत. श्रीरामावतारांत रावणाच्या बंदींतून इंद्रादि देव व सूर्यादि नवग्रह

परमेश्वरानें सोडविलें, तर कृष्णावतरांत कंस, चाणूर, पूतना अघासुर जरासंधादि राक्षस मारून, शेवटच्या जरासंधाच्या बंदीशाळेंत कोंडून घातलेले अनेक राजे त्यानें सोडविले. **बांदौडी**—बंदिवास.

**ओं. ४३९**—म्हणून ब्रह्मदेव श्रीकृष्णाचें नाममहात्म्य वर्णन करतो. "तूं आपल्या अनेक नांवापैकीं एक नांव ( जेथें भक्त संसाराच्या बंदिशाळेंत पडले आहेत तेथें ) पाठीव, कीं ते त्यांना तारक होऊन त्यांना मोक्ष देईल. त्याचप्रमाणें तें ( तुझ्या भक्तांच्या ) अज्ञानाची शृंखलाही आपल्या प्रभावानें तोडून टाकील." सारांश तुझें नांव तुझ्या भक्तांना संसारापासून सोडवून त्यांचें अज्ञान घालविण्याइतकें प्रभावी आहे. तर असें नांव तूं आपल्या भक्ताकडे धाड, असें म्हणण्याचा ब्रह्मदेवाचा आशय आहे **मोहाचिआ**—अज्ञानाच्या अविद्येच्या.

**ओं. ४४०**—मागील ओंवीचाच थोडाफार अनुवाद येथें केला आहे. श्रीकृष्णाचा नाममहिमा असा आहे कीं, त्याचें जेथें म्हणून गुणसंकीर्तन चालेल, तेथील अज्ञान संपूर्ण नष्ट होऊन तेथील भक्त, संसाराच्या बंदिवासांतून सुटतील. श्रीकृष्णाचें गुणगान भक्ताला संसारबंधनांतून सोडवून परमेश्वराजवळ आणतें, त्याचें संनिधान घडवितें.

**ओं. ४४१**—"याच्या उलट जे परमेश्वराचा मोक्षमार्ग जाणत नाहींत, ते संसाराच्या घोर अरण्यांत पडतात, व मग त्यांचा प्रांत कोणता ( ते कोठें जातात ) हें आम्हांला कळत नाहीं." असें ब्रह्मदेव म्हणतो. जे मोक्षमार्ग सोडतात, ते संसारांत पडून जन्ममरणाच्या चक्रांत सांपडतात, असा भाव.

**ओं. ४४२**—"हे अवतारधारी जगजेठी श्रीकृष्णा! तुझ्या स्वरूपज्ञानाची दृष्टी जीवावर ( भक्तावर ) पडली, तर "या जगांत अज्ञान नाहींच" असें होऊन जाईल." तुझ्या स्वरूपाच्या ज्ञानानें अज्ञान होतें कीं नव्हतें असें होऊन जाईल !

**ओं. ४४३**—येथून संसाराटवीचें वर्णन लागतें. यांत कवीनें मोठेंच अध्यात्मिक रूपक केलें आहे. "या ब्रह्मांडाच्या कढईवर सुखदुःखरूपीं रसांनीं गळणाऱ्या अनेक फळांनीं फळलेले कर्माचे वृक्ष डोलत आहेत." सारांश या संसारांत प्राणिमात्रांच्या हातून अनेक कर्में घडून त्यांची सुखदुःखमिश्रित फलें त्यांना भोगावीं लागतात. **ब्रह्मकटाह**—ब्रह्मांडरूप कढई. पहा–" साधु सत्यलोका-

पासुनि दिसेः सुभेद गातें आंग कैसें। रसरंगें ब्रह्मकटाहो होतुसे : सपोत कुंकुमाचा "–नरेंद्र, रु. स्वयंवर ३४८. **श्रवते**—गाळणारे, सोडणारे,

**ओं. ४४४.**—" विविध वेदांच्या वेलींच्या रांगा येथें तयार केल्या असून चोहोंकडे, आस्तिकवाद व नास्तिकवाद यांचा झाडोरा मातला आहे." अरण्य म्हटलें कीं वेली व झाडोरा आलाच. पण येथें या संसारारण्यांत चार वेदांचा सुळसुळाट व ईश्वरवाद व निरीश्वरवाद यांच्या मतमतांतराचा झगडा चाललेला आढळतो. अर्थातच हे वेद किंवा हीं भिन्न मतें, मोक्षाला थोडींच कारण असणार! **वेदवेली**—ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या चार वेदरूपी वेली. **भावाभाव**—ईश्वरनिरिश्वरवाद. अशा वादापासून निष्पन्न मात्र कांहीं होत नाहीं, असा कवीचा ध्वनि. **झाडौली**—( झाडळी ) झाडांचा समूह. पहा—" " जिये वनिचिया झाडळी : श्रीकृष्णकांति पडप लाधली सांवळी "–नरेंद्र, रु. स्वयंवर ७२३.

**ओं. ४४५**—" ( अशा या संसारसागरांत ) विषयरूपी गवतं जाणाऱ्याचा मार्ग झांकून टाकतात. शिवाय येथें इंद्रियरूपी हरिणें सेरावैरा धांवत असून प्राणांच्या प्रमाणेंच त्यांना आवरतां येत नाहीं" जगांत इंद्रियांना भुलविणारे विविध विषय असून, त्याच्यामागें लागलेल्या प्राण्याला दुसरें कांहीं दिसतच नाहीं. हे विषय माणसाला आंधळे करतात व ईश्वरविषयक ज्ञानाकडे जाऊंच देत नाहींत. या विषयामागें लागलेली, त्यांना लुब्ध झालेलीं इंद्रियें देखील हरिणाप्रमाणें सैरावैरा धांवतात, व मग शरीरांतून जाऊं पहाणारें प्राणरूपी हरिण जसें कोणी रोखूं शकत नाहीं, त्याप्रमाणें या इंद्रियांनाही कोणी आवरूं शकत नाहीं. असा हा, अनेक विषय व त्यांच्या मागें लागलेलीं हीं इंद्रियें यांचा सर्वत्र सुळसुळाट असतो. **चौताळणें**–पिसाळणें, क्षोभणें, भरधांव पळत सुटणें. **संव्हरणें**–आवरणें, आटोक्यांत आणणें. **प्राणाचे रोही** प्राणरूपी हरिण. रोही = एक जातीचा हरिण.

**ओं. ४४६**—" तेथें अहंकार व मदरूपी हत्ति, लोभ व मत्सर हे झुंजणार महिष, मोहादि वाघ व अविद्येच्या ( अज्ञानाच्या ) लाहासि धांवत असतात." सारांश संसारांत कामक्रोधमदमत्सरलोभदंभादि षड्रिपूंचें कसें फावतें तेंच येथें वन्य व हिंस्र पशूंच्या रूपकानें सूचित केलें आहे. **भद्रजाति**—ही एक हत्तीची जात आहे. मुक्तेश्वरांत हा शब्द अनेक वेळां येतो. **लाहासि**–राक्षसी. अविद्येला राक्षसी म्हटलें तें योग्यच आहे.

**ओं. ४४७**—वनांत एकादा धटिंगण राक्षस सर्व जगाला त्रस्त करून राहावा, त्याप्रमाणें मदनाचीही या संसारारण्यांत वसति असते. मदन ( कामविकार ) काय अनर्थ करून सतावतो हें जगाला सांगायला नको. त्याच्या सपाट्यांत सांपडला नाहीं असा कोण आहे ? **डोडपणें**—पुंडाव्यानें. पहा-" मग न करी नागोवा : रसना डोंडु हा "–उद्धवगीता, १९६. शिवाय जेथें धर्मरूपी अष्ट दिग्गजांना, क्रोध रूपी सिंह भीति दाखवितो. संसारांत क्रोधापासून धार्मिक व्यवहारांना बाध येतो, हें आपण पाहतोंच. सिंह अरण्यांत जसा हत्तींना भिववितो, तसाच क्रोध, धर्माला संसारांत सरळपणें वागूं देत नाहीं. धर्माचरण संसारांत अशक्य होतें, असा आशय !

**ओं. ४४८**—अरण्य हिंस्रपशूंनीं व राक्षसांनीं युक्त असूनही तें उंचच उंच पर्वतांनीं व खोल दऱ्यांनीं व्यापलं असल्यानें, तेथें सर्वत्र अंधार व काळोख पसरला असल्यास नवल नाहीं. या संसारवनांतही गर्व व अभिमानाचे उंच पर्वत व तृष्णा-ममतेच्या खोल दऱ्या असून, त्यामुळें तेथें अज्ञानाचा अंधार व भ्रमाचा काळोख पडलेला असतो. जगांत विकारांचें कसें प्राबल्य असतें, व तें खऱ्या ज्ञानाला कसें झाकून टाकतें, त्याचाच निर्देश येथें या रूपकांनीं केला आहे.

**ओं. ४४९**—अरण्य म्हटलं कीं तेथें पुनः कृष्ण सर्प व सर्पिणी असायच्याच ! या संसाराटवींत सुंदर स्त्रिया आपल्या कटाक्षांनीं कृष्णसर्पाच्या विळख्याप्रमाणें दंश करतात. या ( स्त्रियारूपी ) विषारी सर्पिणी, आपल्या कामरूपी विषानें फूत्कार टाकतात. " मनुष्याला कामुक स्त्रिया आपल्या विषारी दृष्टीनीं कशा मारतात, व पुरुष अशा रीतीनें कामाच्या स्वाधीन झाल्यावर तो परमेश्वराचें ज्ञान करून घेण्यास कसा कुचकामाचा होतो, हेंच येथें प्रतिपाद्य आहे. **घेरणी**–विळखा. **डंकिती**–दंश करिती. **विखारा**–विषारी. **धुधुवातणें**–फूत्कार करणें.

**ओं. ४५०.**—अशा वनाला वणवा लागल्याची आपत्ति वर्णन करून त्याची भीषणताहि वाढविली आहे. " प्रियकर प्रेयसी परस्परांना वश झाली असतांना त्यांच्या दर्शन व प्रेमाच्या वणव्यांत व तापत्रयाच्या ज्वालांत प्राणिमात्र कसे करपून जातात ! " प्रेमसंबंध वरून आकर्षक दिसला, तरी त्यांतून जाणाऱ्यांना तो किती तापद होतो, हें " तो योग खरा हटयोग " या कै. गडकऱ्यांच्या उक्तीवरून समजण्यासारखें आहे. प्रेमी माणसांना परस्परांचें दर्शन अथवा प्रेम

दाहक झाल्याचींही उदाहरणें आपण पाहतों. एकंदरीनें संसारांत प्रेमाचा मामला प्राणिमात्रांना कांहीं सुखाचा जात नाहीं, हेंच कवीला सुचवावयाचें आहे. **दावानळीं**—वणव्यांत. **तापत्रय**—आधिभौतिक, अध्यात्मिक व आधिदैविक ताप.

**ओं. ४५१.**—या संसारारण्याच्या आंतील कर्मरूपी वृक्षांच्या व षड्रिपूंच्या झाडीचा, गर्व–अभिमानरूपी पर्वतांच्या व तृष्णाममतारूपी दरींच्या निबिड अंधकारानें, ज्ञानसूर्याच्या प्रकाशाचा आंत शिरकावच होत नाहीं. म्हणून या वनांतून जाणाऱ्या मार्गानें मोक्षाला जाणाऱ्या प्राणिमात्रांची दिशाभूल होते." विविध कर्मांनीं व विकारविचारांनीं साधकाचें मन या संसारांत व्याप्त झाल्यानें, ईश्वरविषयक ज्ञानाचा शिरकाव त्याच्या मनांत होणें कठीण होतें, असा अर्थ. ब्रह्मज्ञानाच्या बाबतींत असे अडथळे असल्यानें, साधकाची दिशाभूल होते! **भीतरील**—आंतील. कर्मवृक्षांच्या व भावाभावाच्या झाडौलीच्या इ. अंधारानें. **ज्ञानरवी** परमेश्वरविषयक ज्ञानाचा सूर्य. दाट अरण्यांत सूर्याचें किरण प्रवेश करूं शकत नाहींत, ही वस्तुस्थिति आहे.

**वनचरें**—वनांत संचार करणारीं. प्रस्तुत स्थलीं मोक्षमार्गी साधक. संसार सर्वतोपरीनें कसा तापदायक आहे, मोक्षमार्गाला तेथें किती अडचणी आहेत, हें दामोदर पंडितानें या वर्णनांत कौशल्यानें दाखविलें आहे.

**ओं. ४५२**—"अशा ( संसार ) वनांत तूं आनंदाचा मेघ अवतरलास! तर आतां पीडित लोकांवर आपल्या जीवनतुषारांनीं वृष्टि कर." सर्वत्र विकारांचा वणवा लागलेल्या या संसारवनांतील त्रस्त प्राणिमात्रावर आपल्या कृपेच्या पाण्याची वृष्टि करून तूं त्यांना शांत कर, असा भाव ब्रह्मदेवानें येथें प्रकट केला आहे. वनाला लागलेला वणवा मेघाच्या प्रचंड वृष्टिशिवाय कसा शांत होणार? तद्वत् संसारांतील विविध तापानें होरपळून गेलेल्या प्राणिमात्रांना परमेश्वराच्या अगाध कृपेशिवाय कोण तारक होणार? **प्रकटलासीं**—जीवाच्या उद्धारार्थ अवतार घेतला आहेस, श्रीकृष्णाच्या मनुष्यवेषानें आला आहेस. ( कारण परमेश्वर मनुष्यवेषांतच जीवाचा उद्धार करतो, असा महानुभावांचा सिद्धांत आहे. ) **अमृततुषारीं**—अमृतासारख्या जीवन देणाऱ्या धारांनीं, अर्थात् कृपाधारांनीं. हा कृपेचा वर्षाव परमेश्वर कसा करतो तें पुढील ओंवींत सांगितलें आहे.

**ओं. ४५३**—" ( त्रस्त प्राणिमात्रांना ) तूं आपल्या शब्दांनीं शांत कर, त्यांच्याकडे सहानुभूतीच्या दृष्टीनें पहा, व जीवांना कैवल्यसुखाची प्राप्ती करून दे. " अधिकारी जीवाला आपलें ज्ञान देऊन त्याचा उद्धार करावा ही परमेश्वराला तळमळ लागलेली असते. आपल्या कृपेला पात्र असा अधिकारी मनुष्य कुठें आढळतो काय हें पाहण्यासाठीं आपली आशाळभूत व करुणेनें ओथंबलेली नजर तो टाकतो. परमेश्वर जसें एकदम ज्ञान देत नाहीं तसें तें आपल्या मुखानें ज्ञान देतात असेंहि नाहीं. परमेश्वरावतार कित्येकांना स्वतः तर कित्येकांना एखाद्या अधिकरणाच्या मुखानें ज्ञान देतात. हा बोध परमेश्वर आपल्या ' परा ' वाणीच्या द्वारां देतो. परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी हे वाणीचे चार प्रकार आहेत. परमेश्वरावताराच्या मुखांतून वैखरीच्या द्वारां अक्षरें बाहेर पडलीं, तरी ती परा शक्तीनें युक्त असतात. बोधामुळें ' हा ईश्वर ' व ' मी जीव ' अशी प्रतीति आल्यावर ज्ञानियाला प्रत्यक्ष.परमेश्वराकडून बोध झाला असल्यास त्याच्याकडून शास्त्रश्रवणाहि घडतें. ज्ञान व प्रेम हीं परमेश्वरप्राप्तींचीं दोन साधनें असून, ज्ञानानें ब्रह्मस्वरूप मोक्ष व प्रेमानें ईश्वरस्वरुपाचें " कैवल्य " प्राप्त होतें. ( पहा महानुभाव तत्त्वज्ञान पृ. ४१२–४२६. ) आपल्यासारख्यां जीवाकडे कृपाकटाक्षानें पाहून आपणास श्रीकृष्णानें स्वमुखानें बोध द्यावा व परमेश्वरस्वरूपाचें ' कैवल्य ' द्यावें, अशी ही ब्रह्मदेवाची विनंति, एकंदरीनें महानुभाव तत्त्वाप्रमाणेंच आहे. **नीववी**—शांत करी.—**नवाळी**–प्राप्ति. पहा–" तुझी जाहलिया नव्हाळी । करिसी अज्ञान कंडोळी "–कथाकल्पतरु. १।१. " जेयां नव्हालियेचें फल । स्वर्गसुख " ॥ ज्ञाने. ४।१५६.

**ओं. ४५४**—" अंधकार घालविण्यासाठीं सूर्याला काय विनंति करावी लागते ? त्याप्रमाणें जीवांचा उद्धार करण्यासाठीं तुला विनवावें लागत नाहीं. " महानुभाव–मताप्रमाणें जीवाच्या उद्धारार्थ परमेश्वरालाच तळमळ लागलेली असते. परमेश्वरच अधिकारी जीवाच्या शोधार्थ असतो, याला अनुलक्षूनच हे ब्रह्मदेवाचे शब्द आहेत. **वार्णावे**—वर्णावें.

**ओं. ४५५**—परमेश्वरानें श्रीकृष्णाच्या स्वरूपांत जीवोद्धारार्थ मनुष्यावतार घेतल्यानें, त्याच्या ज्ञान व प्रेमदृष्टीनीं आतां जीवांना ज्ञान व कैवल्य प्राप्त झाल्यावर मग संसाराचें अथवा जन्ममरणाचें नांवच उरणार नाहीं हें या अवताराचें फल ब्रह्मदेवाच्या तोंडून कवीनें स्पष्टपणें वदाविलें आहे.

**ओं. ४५६**—येथून ५१६ ओंव्यांत, श्रीकृष्णानें बालक्रीडेपासून पुढें द्वारकेचा राजा होईपर्यंत केलेल्या अद्भुत पराक्रमांचा उल्लेख केला आहे. येथें श्रीकृष्णाच्या स्पर्शसुखाचा प्रभाव वर्णन करणारा प्रसंग सांगितला आहे. शापभ्रष्ट यमलार्जुन हे वृक्षाच्या स्वरूपांत गोकुळांत वाढले होते. कृष्णाला यशोदेनें उखळाला बांधल्यानंतर श्रीकृष्ण त्या उखळासहित त्या दोन वृक्षांमधून जातांना त्याचा त्यांना स्पर्श होऊन ते वृक्ष उन्मळून पडले, व शापमुक्त झाले. श्रीकृष्णाच्या संगाचें, स्पर्शाचें हें फल यांना मिळालें. श्रीकृष्णाच्या अल्पकाल संगानें ते वृक्ष जगद्वंद्य झाले. या कथेचाच उल्लेख येथें कवीनें केला आहे. **देविका महिमा**—दैवी महिमा. तुलनार्थ पहा–" जयाचेनि प्रपंचाचें डांग उन्मळे : तेथ काइसे यमळार्जून !–नरेंद्र, रु. स्वयंवर २०६.

**ओं. ४५७.**—श्रीकृष्णाच्या महिम्याचा अंत लागत नाहीं असें ब्रह्मदेव म्हणतो. **ज्ञानविज्ञाना इ०**—परमेश्वराच्या शक्तीमध्यें ज्ञान व विज्ञान यांचाही समावेश होतो. त्याचें अव्यक्त स्वरूप पूर्णपणें ज्ञानमय असून, शिवाय त्याच्याजवळ ज्ञान नांवाची एक शक्तीही आहे. परमेश्वराचें हें शक्तिरूप ज्ञान एक असून तें जड आणि प्रकाशमय आहे. उलट जीव हा अज्ञान असतो. आणि देवतांचीं स्वरूपें ज्ञानमय असलीं, तरी त्यांच्या ठिकाणचें ज्ञान त्रुटित असून तें अयथार्थ जसतें. त्यानें जीवप्रपंचाची वास्तव ओळख होऊं शकत नाहीं. असाच उल्लेख ओं. ३९७ मध्यें आला आहे. **विज्ञान**—या विज्ञानशक्तीच्या प्रभावानें ईश्वर अभावाचा भाव व भावाचा अभाव असे चमत्कार करून दाखवितो. यासंबंधीं उल्लेख मागें ओं. ३५३ च्या स्पष्टीकरणांत आलाच आहे. ब्रह्मदेवाला या श्रीकृष्णाच्या विज्ञानशक्तीचा पुरा अनुभव 'वच्छहरण' प्रकरणीं नुक्ताच येऊन गेल्यानें तो या विज्ञानशक्तीचा पुनरपि उच्चार करीत असावा. तथापि परमेश्वराच्या या विज्ञानशक्तीचे दोन प्रकार आहेत. ( १ ) विद्यारूप विज्ञान व ( २ ) ज्ञानरूप विज्ञान. अन्यत्राचेनि प्रमाणें परमेश्वरस्वरूपी देवतांच्या विद्यांची जीं सामर्थ्यें असतात, ते विद्यारूप विज्ञान होय. ज्ञानरूप विज्ञान हें खास परमेश्वरस्वरूपीचें आहे. तें इतरत्र कोणाच्याही ठिकाणीं नाहीं. विद्यारूप विज्ञान हा साधनसामर्थ्यांचा प्रकार आहे, म्हणून अवतार धारण केल्यानंतर अधिकारकाळीं म्हणजे १२ वर्षांनंतरच परमेश्वर त्याचा स्वीकार करतो. याचमुळें श्रीकृष्णांनीं ज्ञानरूप विज्ञानशक्तीनें लहानपणीं अपूर्व चमत्कार दाखविले, पण ज्ञानशक्तीचा व विद्यारूप विज्ञानाचा स्वीकार मात्र त्यांनीं कंसवधानंतर अर्थात्

बाल्यदशेनंतर केला. ( पहा—महानुभाव तत्त्वज्ञान पृ. १३४–१३७. ) **वेधवती दीक्षागुरु**—प्रेमशक्तीचा श्रेष्ठ गुरु, आकर्षण शक्तीचा दीक्षा गुरु. मागील ओं. १८ वरील टीपा पहा. तेथेंही ' सकलवेधु दीक्षागुरु ' असेंच श्रीकृष्णाला संबोधलें आहे.

**ओं. ४५९**—या ओंवींत प्रत्यक्ष वैऱ्यालाही मोक्ष देण्याचा श्रीकृष्णाचा उदार गुण वर्णिला आहे. " विषाचें स्तनपान देणारी पूतना राक्षसी, ती देखील तूं वैकुंठाला पाठविलीस. हे श्रीकृष्णा ! वैरामुळें जर अशी मुक्ति ( तिला ) दिलीस, तर मग भक्तांना काय देशील ? " मोक्षापेक्षां कांहींतरी अधिक देशीलच असा भाव. वैऱ्यांना जर मोक्षाचें फल, तर भक्तांना खात्रीनें त्याहून मोठें असें फल तूं देणारच ! मागें ओं. १२१ पहा.

**ओं. ४६०**—श्रीकृष्णाचे आणखी पराक्रम सांगितले आहेत. "तुझ्या विज्ञान-शक्तीचा पराक्रम पाहिला, तर काक, बक व तृणावर्त हे राक्षस तुझ्यापुढें कःपदार्थ होत ! तूं दोन यमलार्जुन वृक्ष मोडलेस, उन्मळून पाडलेस, हें वर्णन करतांना तुझा पराक्रम दिसून येत नाहीं. " दोन वृक्ष खालीं पाडले एवढ्यावरून सामान्य लोकांना तुझ्या पराक्रमाची जाणीव होत नाहीं. पण तेच वृक्ष कोण होते हा मागील इतिहास पाहतांच तुझ्या कृत्याचें महत्त्व डोळ्यांत भरतें.

**ओं. ४६१**—श्रीकृष्णाच्या स्पर्शानें उन्मळून पडलेले ते दोन वृक्ष दुसरे कोणी नसून, नारदशापामुळें वृक्षत्व पावलेले कुबेराचे दोन पुत्र होते, हें समजल्यावर मात्र श्रीकृष्णाच्या या कृत्याचें स्वरूप एकदम पालटतें. कुबेरपुत्रांना देखील उद्धरण्याचें सामर्थ्य ज्याच्या केवळ स्पर्शांत होतें, त्याच्या इतर संनिधान-प्रकारानें जीवाचा केवढा उद्धार होईल ! **धनद**—कुबेर. पहा मागें ओं. ३३६.

**ओं. ४६२**—या ओंवींत श्रीकृष्णाच्या कालियामर्दनाचा व गोवर्धनोद्धरणाचा उल्लेख केला आहे. हे दोनी पराक्रम कवि म्हणतो त्याप्रमाणें खरोखर ( स्तिमित करणारे ) असेच होते. **कालिया**—हा एक महाविषारी असा प्रचंड सर्प असून याच्या विषाच्या भयानें गोकुळाच्या आसमंतांतील भाग प्राणिमात्रांस वर्ज झाला होता. या सर्पाचें मर्दन करून याच्या निवासानें लोकांना पारखा झालेला यमुनेचा डोह, श्रीकृष्णानें बोलगोपालांना यथेच्छ क्रीडा करण्यास निष्कंटक करून दिला. **गोवर्धन**—श्रीकृष्णानें इंद्रयाग बंद करून गोवर्धन याग करविला. यामुळें

रागावलेल्या इंद्रानें गोकुळावर जोराची पर्जन्यवृष्टि केली. पण श्रीकृष्णानें आपल्या करांगुलीनें गोवर्धन पर्वत उचलून धरला व त्याच्या आश्रयानें गोकुळ पर्जन्य वृष्टीपासून सुरक्षित ठेवलें. ब्रह्मदेवानें या दोन पराक्रमांचा औचित्यानें निर्देश केला आहे.

**ओं. ४६३**—कृष्णानें केशि, चाणूर, मुष्टीक व कंस यांचे वध करून अनेक बंदीवान सोडविल्याचें येथें सांगण्यांत आलें आहे. **केशि**—राक्षसविशेष. **चाणौर मौष्टिकु**—कंसाच्या पदरचे श्रीकृष्णहननासाठीं ठेवलेले राक्षस पाहिलवान. **कंस**—हा तर श्रीकृष्णाचा मामा असून, श्रीकृष्णाच्या हातून मरणार असें कळल्यापासून त्याचा शत्रूच झाला होता. शेवटीं श्रीकृष्णाच्या हातून तो मरण पावला. **बांदिअे**—बंदीवान. **उ्डविसीं**—प्राप्त करिसी. कंसाला मारून तूं अनेक बंदीवान सोडविलेस, असा अर्थ.

**ओं. ४६४.**—मगध देशाचा राजा जरासंध, यानें देखील असेच अनेक राजेलोक बंदीवासांत टाकले होते. श्रीकृष्णानें त्याला भीमाकडून मारवून त्यांची सुटका केली. **पांडवांचा इ०**—श्रीकृष्ण पांडवांचा कसा पक्षपाति होता, तें प्रसिद्धच आहे. अर्जुनाचें सारथ्य करण्यापर्यंत ज्याची मजल गेली, त्याचें कैवारीपण काय विचारावें ? याशिवाय दुर्वासछळ, द्रौपदीवस्त्रहरण, कृष्णाशिष्टाई अशा विविध प्रसंगीं पांडवांचा तो पाठीराखा झाला आहे. **द्वारकापुरीं**—जरासंधांच्या त्रासानें श्रीकृष्णानें समुद्रांत द्वारकापुरीची स्थापना करून तिच त्यानें आपली राजधानी केली. **जीणसी**—जिंकिशी. पहा–ओं. ४३८

**ओं. ४६५**—परमेश्वरानें मनुष्यावतार घेतला व तो भक्तांना सुलभ झाला म्हणून त्यानें केलेले अद्भुत चमत्कार व पराक्रम सामान्य लोकांना मोठे व गहन वाटले नाहींत, तरी ते प्रताप नुसते वर्णन करणें देखील दुःखपीडित जीवांना मोचक होणार आहे. 'अतिपरिचयादवज्ञा' या न्यायानें श्रीकृष्णाचे पवाडे लोकांना महत्त्वाचे वाटले नाहींत, तरी यांचें संकीर्तन जीवांना मोक्षदायक होतें, असा कवीचा अभिप्राय आहे.

**ओं. ४६६**—येथें शेवटीं ब्रह्मदेव श्रीकृष्णाला आपली विनवणी ऐकण्याची विनंति करीत असून, आपणास श्रीचक्रधराची ( श्रीकृष्णाची ) सेवा करूं द्या याशिवाय आपलें दुसरें कांहीं काम नाहीं, असें निवेदन करीत आहे.

**श्रीचक्रधरा**—येथें श्रीकृष्णालाच ‘ चक्रधरा ’ असें संबोधण्यांत कवीचा, महानुभावपंथाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी यांचाही पर्यायानें निर्देश करण्याचा हेतु आहे. **उ॑ळगों देआं**—सेवा करूं द्या.

**ओं. ४६७**—येथून पुनः ब्रह्मदेवानें केलेली श्रीकृष्णाची जयजयकारयुक्त स्तुति पुढील ११ ओंव्यांत येत असून तिच्यांत परमेश्वराचें अनुक्रमें निर्गुण व सगुण स्वरूप वर्णन, आलटून पालटून केलेलें आढळतें. महानुभाव तत्त्वज्ञानाप्रमाणें ईश्वर स्वरूपीच्या महत्त्वाचा विशेष म्हणजे ईश्वराच्या विरुद्ध; धर्मियत्वाचा होय, आणि तो फक्त ईश्वराच्याच ठिकाणीं आढळतो, इतरत्र नाहीं. दामोदर पंडितानें या विरुद्ध धर्मित्वाचा उल्लेख ‘ वच्छहरणांत ’ मागें ओं. ५६, ६० व ६१ यांत केला आहे. प्रस्तुत ओंवींत परमेश्वराच्या निर्गुण, निराकार स्वरूपाचें वर्णन प्रथम आलें आहे. **परात्परा**—परा=माया तिअें हौनि परा. मायेच्याही पलीकडचा. परमेश्वर मायेच्याही अतीत आहे. पहा–“ जय जय परात्परा : जय जय आमिति चरित्रा ”–ऋद्धिपुर वर्णन–६३८. **प्रमाणां अगोचरा**-निरनिराळ्या प्रमाणांनींही जो दिसण्यासारखा नाहीं. प्रत्यक्ष, शाब्द व अनुमान अशीं जीं वस्तूचें स्वरूप जाणण्याचीं प्रमाणें प्रसिद्ध आहेत, त्यांनीं देखील ईश्वराच्या स्वरूपाचें खरें ज्ञान होणें शक्य नाहीं. या तिन्हीं प्रमाणांच्या जो ( परमेश्वर ) आटोक्याबाहेरचा आहे. **परमपुरुषा**—श्रेष्ठ पुरुषा, पुरुषार्थ प्रवरा.

**ओं. ४६८**—येथेंही निर्गुण स्वरूपाचेंच वर्णन आहे. **अनंतरूपा**—ज्यानें असंख्य अवतार घेतले आहेत असा. परमेश्वरानें मत्स्यकूर्मादि पशूंचे तसेच रामकृष्णादि मानुष अवतार घेऊन जीवोद्धाराचें कार्य केल्याचें प्रसिद्धच आहे. तथापि परमेश्वर मनुष्यावतारांतच जीवोद्धाराचें कार्य करूं शकतो, असा महानुभावांचा सिद्धांत आहे. **चराचरूभर्त्ता**-सर्व जड व सजीव किंवा स्थावरजंगम वस्तूंचा निर्माता. परमेश्वरानें स्थावरजंगमात्मक सर्वच वस्तू निर्माण केल्या आहेत. **विश्वरूपा**—विश्व हेंच ज्याचें रूप आहे असा. किंवा सर्व विश्वाचें दर्शन जेथें होतें असा. श्रीकृष्णानें अर्जुनाला विश्वरूपदर्शन घडविल्याचें, श्रीमद्भगवद्गीतेचा आकरावा अध्याय सांगतच आहे.

**ओं. ४६९**—या ओंवींत मात्र परमेश्वरावतार श्रीकृष्णाच्या सगुण व निर्गुण स्वरूपाचें एकसमयावच्छेदानें वर्णन करून हीं दोनीं स्वरूपें एकच परमेश्वर कसा धारण करतो, हेंच सूचित केलें आहे. अमूर्त असें परब्रह्मच श्रीकृष्णासारखा

मनुष्यावतार धारण करून जीवोद्धार करतें, अशी महानुभावी तत्त्वज्ञानाप्रमाणें कल्पना आहे. तीच येथें पर्यायानें स्पष्ट केली आहे.

**ओं. ४७०–सकलानंदघना**–"ईश्वराचें स्वरूप कैवल्यरूप असून आनंदमय आहे. निरतिशय सुख किंवा सुखाची परिसीमा म्हणजे आनंद. ईश्वरस्वरूप असें निरतिशय सुखमय किंवा आनंदमय आहे. ईश्वरस्वरूपाचा हा आनंद यौगिक नसून स्वरूपगत असतो. उदा० साखरेची गोडी. स्वरूपगत असते. तसेंच ईश्वररूप आनंदमय असल्यामुळें तें कितीही विभागलें तरी स्वरूपीचा आनंद जशाचा तसा राहतो." ( महानुभाव तत्त्वज्ञान पृ. ११० ). अशा आनंदाचा वर्षाव करणारा मेघ, असा निर्देश श्रीकृष्णाचा येथें केला आहे. **सकलफलनिधाना**—सर्व फलाचा सांठा. "जीवस्वरूपांत ज्याप्रमाणें अर्जन करण्याचा गुण आहे, त्याप्रमाणें फळ देण्याचा अनादिसिद्ध गुण देवतास्वरूपीं आहे. त्यामुळें जीवांनीं जोडलेल्या संतासंत कर्मांची व अंतर्याग बहिर्याग साधनांचीं फळें नेहमीं देवताच देत असतात. प्रावाहिक सृष्टींत जीवाला आपल्या मळाच्या आधारें पाहून व त्या मळावर प्रतिबिंबित झालेले जीवाचे कर्मलेप पाहून त्यांना तदनुसार बरेंवाईट फळ देणें हा धर्म देवतांच्या स्वरूपीं अनादिसिद्ध असतो. तोच सृष्टिरचनेच्या वेळीं ईश्वरप्रवृत्तीनें त्यांच्या स्वरूपावर उमटतो, म्हणजे कार्याला येतो. अर्थात् जीवांना संतासंतफळसंपादनाचें हें कार्य देवता ईश्वराच्या आज्ञेनेंच करीत असतात. ( महानुभाव तत्त्वज्ञान पृ. ५३ ). ईश्वराच्या ठिकाणीं हें सामर्थ्य आहे म्हणून त्याला येथें 'सकलफलनिधाना' असें संबोधलें आहे. स्वर्ग, नरक, कर्मभूमि ( मनुष्यदेह ) व मोक्ष, अशीं ही चतुर्विध कर्मफळें असून, हींच ईश्वराच्या आज्ञेनें देवतांकडून दिलीं जातात. **आदिपुरुषा**—आदि=जीव, देवता, सकळ सृष्टि आदि ! पुरुषा=पुरुषार्थप्रवरा. पहा–' जय परम मंगळगोत्रा : जी आदि पुरुषा ' ॥ ६३८ ॥ ऋद्धिपूरवर्णन.

**ओं. ४७१—अगाधबोधदायका**-अगाध असा बोध देणारा. ज्ञान अथवा बोध देणें म्हणजे जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर याची यथार्थ कल्पना अधिकारी मनुष्याला आणून देणें. प्रपंच जड आहे, देवता नित्यबद्ध आहेत, जीव बद्धमुक्त आहे, आणि या सर्वांहून वेगळा असलेला परमेश्वर तोच काय तो नित्यमुक्त आहे. अनादि अविद्येनें बद्ध झालेल्या पण सर्वाधिकारित्वामुळें उद्धरणाला पात्र असलेल्या जीवानें जड प्रपंचाच्या व च्युतिमंत फळें देणाऱ्या जीव देवतांच्या नादीं न

लागतां, चैतन्यपर परमेश्वराच्या ज्ञानाचे व प्रेमाचे उपाय जोडून ब्रह्मानुभूति मिळवावी. यासाठीं परमेश्वराचें दास्य घडलें पाहिजे. तें घडावें म्हणून जीवेश्वरामधील भेदाची प्रतीति अधिकारियाला प्रथम आली पाहिजे. हा ईश्वर आणि त्याहून वेगळा असा मी जीव, हा ईश्वर माझा स्वामी आहे आणि मी जीव त्याचा सेवक आहे, हें ज्ञानाधिकारी जीवाला पटवून देणें, नव्हे त्याची प्रतीति आणून देणें, हें बोधाचें कार्य होय. परमेश्वरावतार ज्यावेळीं परा वाणीनें घोळलेल्या शब्दांनीं अधिकारियाला आपला बोध देतो, त्यावेळीं आपलें 'अस्तित्व साधीति' म्हणजे आपल्याहून निराळा साकार परमेश्वर तो हा परमेश्वरावतार अशी जीवाला प्रतीति आणून देण्याचा प्रयत्न करतो. परमेश्वरानें केलेल्या शाब्दिक बोधानें त्या अधिकारी जीवाला हें सगळें कळतें, पटतें; पण त्याला त्याचा अनुभव येत नाहीं. हा अनुभव त्याला आणून देण्यासाठीं, ही ओळख त्याला पटविण्यासाठीं, परमेश्वर त्या अधिकारी जीवाच्या ठिकाणीं 'बोध शक्तीचा' संचार करतो. तो संचार होतांक्षणींच आपला बोधदाता परमेश्वरावतार हाच ईश्वर आहे, आणि आपण जीव आहोंत असा अनुभव त्याला तात्काळ येतो. हा अनुभव त्याला आला म्हणजे तो बोधवंत ज्ञानी बनलाच. (पहा महानुभाव तत्त्वज्ञान पृ. ४१७–४१८.) याच अर्थानें परमेश्वराला येथें 'अगाधबोधदायका' असें म्हटलें आहे. **शक्तिप्रदा**–परमेश्वर हा सर्वशक्तियुक्त म्हटलेला आहे. शक्ति या शब्दानें सर्व देवता, सर्व गुण, सर्व धर्म, ज्ञान व विज्ञान यांचा निर्देश होतो. यापैकीं देवतांना परमेश्वराच्या 'चेतना शक्ती' व इतर शक्तींना 'जडाशक्ती' म्हणतात. ईश्वरस्वरूपांत मायेचें स्वरूप हरपलेलें असून, मायेच्या स्वरूपांत इतर सर्व देवतांचीं स्वरूपें हरपलेलीं आहेत. तेव्हां पर्यायानें सर्व देवतांचीं स्वरूपें ईश्वरस्वरूपांत व्याप्त असल्याचें दिसून येईल. परमेश्वर आपलीं सर्व कार्यें त्यांच्याकडून करवून घेतो. परमेश्वर हा देवताशक्तींनीं नेहमीं युक्त असतो, व जीवानें देवतांच्या प्रीत्यर्थ केलेल्या क्रियेचें फळ तर त्या देऊं शकतात, त्याअर्थीं देवताकडून जीवांना मिळणाऱ्या फलांना परमेश्वरच कारण आहे. शिवाय परमेश्वराच्या स्वरूपीं असणारे अनंत गुण, ईश्वराकडूनच इतरांना दिले जात असून, ज्ञान व विज्ञान या परमेश्वराच्या शक्तीही परमेश्वर जीवांना देतो. विज्ञान म्हणजेच विपरीत ज्ञान. या विज्ञानशक्तीच्या सामर्थ्यानें भावाचा अभाव करणें किंवा अभावीं भाव दाखविणें, असें नानाविध चमत्कार परमेश्वर करूं शकतो. (पहा-महानुभाव तत्त्वज्ञान, पृ. १२४, १२६, १३४, १३६).

या सर्व शक्तींचा दाता म्हणूनच येथें श्रीकृष्णाला 'शक्तिप्रदा' असें म्हटलें आहे. **वेधका**—अवतारधारी परमेश्वर आपल्या शक्तींचें जें दान जीवाला करतात, तें 'वेधेंचि देति का बोधेंचि देति' आणि हे वेध 'दृक्–स्पर्श–आलाप व अंतःकरण' या क्रमानें संचरतात. त्या क्रमानें होणाऱ्या वेधसंचाराला अनुलक्षूनच येथें 'वेधका' हें उपलक्षण योजलें आहे. **सकलभूतानंदका**–सर्व प्राणिमात्रांना आनंद देणारा असा. **आनंदमूर्ते**–ईश्वराचें स्वरूप कैवल्यरूप असून आनंदमय आहे. निरतिशय सुख किंवा सुखाची परिसीमा म्हणजे आनंद. ईश्वरस्वरूप असें निरतिशय सुखमय किंवा आनंदमय आहे. म्हणून येथें त्याला आनंदाची केवळ मूर्ति असें संबोधलें आहे.

**ओं. ४७२**—परमेश्वराचे (श्रीकृष्णाचे) आणखी कांहीं भक्तोद्धारक गुण वर्णिले आहेत. **सुरवरवंद्या**—सर्व देवश्रेष्ठांना वंद्य असा. **नित्यानंदकंदा**–वर वर्णन केल्याप्रमाणें परमेश्वराचें मूळ स्वरूपच आनंदमय असल्यानें, त्याला येथें आनंदाचा कंद (गड्डा) असें म्हणणें उचितच आहे. **आर्त्तां इ०**—पीडितांना अभय देणारा. प्रस्तुत 'वच्छहरणांत' देखील अघासुरापासून गोपाळांची सुटका करून श्रीकृष्णानें त्यांना निर्भय केल्याचें आपण वाचलेंच. कंसानें गोकुळावर पाठविलेल्या अशाच राक्षसांना श्रीकृष्णानें मारल्याचें प्रसिद्धच आहे. **कृपावंता**—महानुभाव तत्त्वज्ञानाप्रमाणें परमेश्वराच्या व्यक्तावतारांत कार्यरूपानें असणाऱ्या त्याच्या गुणांत, सौंदर्य, लावण्य, औदार्य, सौभाग्य, दया, मया, कृपा, करुणा इत्यादींचा समावेश होतो. श्रीकृष्णाला म्हणूनच येथें 'कृपावंत' असें म्हटलें आहे.

**ओं. ४७३**—या ओंवींत श्रीकृष्णरूपी परमेश्वराच्या कांहीं धर्मांचा उल्लेख केला आहे. परमेश्वराच्या स्वरूपीं अनंत गुण व अनंत धर्म आहेत. पैकीं गुण हे ईश्वराकडून इतरांना देतां येतात, तसे धर्म देतां येत नाहींत. पुनः गुण हे परमेश्वराच्या अव्यक्त स्वरूपांत कारणरूपानें असतात आणि व्यक्त स्वरूपांत म्हणजे अवतारांत कार्यरूपानें असतात. उलट धर्म हे अव्यक्त स्वरूपांत कार्यरूपानें तर व्यक्त स्वरूपांत कारण रूपानें असतात. नित्यत्व, व्यापकत्व, सर्वात्मकत्व इत्यादि धर्म हे परमेश्वराच्या अव्यक्त स्वरूपी कार्यरूपानें असतात. श्रीकृष्णासारख्या व्यक्तावतारांत त्यांचें कार्य नसतें. येथें 'सकलाधारू', 'अपारा' व 'सर्वंगत' या अव्यक्त परमेश्वराच्या धर्मांचाच निर्देश केला आहे. **साकारा**—जीवाच्या

उद्धारासाठीं परमेश्वर मनुष्यावतार धारण करतो, असा महानुभावांचा सिद्धांत आहे. श्रीकृष्णाचा अवतार देखील उद्धवादि भक्तांच्या उद्धारासाठींच होता. **पेंढारा**—दैत्यांचा शत्रु असा. पहा मागें ओं. ८३. **जगजेठी**—जगांतील बलवान पुरुष, मल्ल. पहा—"म्हणौनि विषया जगजेठी : माल्हाडी नाचताती—" नरेंद्र, रुक्मिणी स्व. ७७३.

**ओं. ४७४—अनंतानंतमहिमा**-अनंत ब्रह्मांडांतील अनंत देवतांवर म्हणजे अनंत शक्तींवर मायेची व त्या मायेवर परमेश्वराची सत्ता आहे, म्हणूनच त्याला 'अनंतशक्ति परमेश्वरु' असें यथार्थपणें म्हणतात. **अनामेआं** इ.—निर्गुण निराकार परमेश्वराला नांव असें नसतेंच. पण तोच साकार होऊन मनुष्यावतारी होतांच त्याला सहस्रनामें प्राप्त होतात. 'विष्णुसहस्रनाम' प्रसिद्धच आहे. येथें 'अनामेआं' व 'सहस्रनामा' अशीं परस्पर विरुद्ध विशेषणें श्रीकृष्णाला लावलीं आहेत, व हाच तर ईश्वरस्वरूपाचा एक महत्त्वाचा विशेष होय. ईश्वर-स्वरूपांत विरुद्ध धर्मांचा समावेश होतो. असाच विरुद्धधर्मित्वाचा उल्लेख 'वच्छहरणा' च्या ओं. ५६, ६०, ६१ यांत येऊन गेलाच आहे. **परदैव**—श्रेष्ठ दैवता ! **परमधामा**—परम, अगदीं पलीकडचें ( शेवटचें ) आहे धाम ज्याचें. पहा–'यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम'—भगवद्गीता.

**ओं. ४७५—अव्यया**—परमेश्वराचें अक्षरत्व किंवा अविनाशित्व हा देखील त्याचा एक धर्मच आहे. **अच्युता**—"चैतन्यापरु परमेश्वरु पाविजे : ते अच्युतपद बोलिजे"–या 'विचारमालिकें' तील सूत्रानें चैतन्यमायेपलीकडे एकच 'अच्युत' पद सांगितलें आहे. ईश्वरपद व ब्रह्मपद ही दोनी स्थानें अच्युतच आहेत. कारण तेथें पोंचलेल्या भक्तांना व ज्ञानियांना च्युति नाहीं–पुनः जन्ममरण नाहीं. महानुभावतत्त्वज्ञानांत ईश्वर व परब्रह्म हें भक्त व ज्ञानी यांच्या दृष्टीनें भिन्न मानलें गेलें आहेत. शिवाय 'ज्ञानापासि प्रेम उत्तम' या त्यांच्या सिद्धांताप्रमाणें, ईश्वरपदालाच ते अधिक मान्यता देतात असें दिसतें. **प्रसन्नवदना**—ज्याचें मुख सदैव प्रसन्न आहे अशा.

**ओं. ४७६—कैवल्यापती**—सामान्येंकरून परमेश्वरापासून चार दानें दिलीं जातात. लीळादान, संबंधदान, ग्रहणादान व कैवल्यदान. उपकारनिरपेक्ष देणें तें दान होय. परमेश्वर आपलीं सर्व दानें उपकारानिरपेक्षतेनें देतो. त्याच्या सर्व दानांत कैवल्यदान श्रेष्ठ आहे. भक्ताला अथवा ज्ञानियाला साध्यसाधन देणें हें

कैवल्यदान होय. परमेश्वराकडून कैवल्यदान दिलें जातें तें उपकारनिरपेक्षतेनेंच ! इतकेंच नव्हे, तर हें कैवल्यदान देण्यासाठींच तर परमेश्वर सृष्टिरचना करतो, व स्वतः सृष्टींत अवतरतो. ज्ञान किंवा प्रेम यांचीं साधनें देऊन साध्याला–मोक्षाला किंवा प्राप्तीला पोंचवीपर्यंत होणाऱ्या परमेश्वराच्या सर्व क्रियांचा अंतर्भाव कैवल्य· दानांतच होतो. श्रीगोविंदप्रभु नेहमीं कैवल्यदानेंच देत असत. ( महानुभाव तत्त्वज्ञान पृष्ठें. २२९–२३० ) श्रीकृष्ण असें कैवल्यदान देणारा आहे, म्हणून त्याला येथें ' कैवल्यपती " असें संबोधलें आहे. **परमगती**—अंतिम आश्रयस्थान. परमेश्वर आपल्या भक्तांची अंतिम गति आहे. **परममंगलमूर्ती**—सर्व मंगल स्वतूंचें केवळ अधिष्ठान असा. पहा–" जय जय मंगळ गोत्रा : जी आदि पुरुषा ॥ " –ऋद्धिपुरवर्णन, ६३८. येथें ही ब्रह्मदेवानें केलेली श्रीकृष्णाची स्तुति संपते.

**ओं. ४७७**—" ( ब्रह्मदेवानें अशी ) स्तुति केल्यावर श्रीकृष्ण संतुष्ट झाला व त्यानें ब्रह्मदेवाला अभय दिलें. ब्रह्मदेवानेंही मग ( आपण सत्यलोकाला नेलेलीं ) वासरें एका क्षणांत आणलीं." **मानवला**—संतुष्ट झाला. पहा–" तुझेया भावाचिये विनती–वरी : मी तोंड–निरूपें मानवीन मुरारी "–नरेंद्र, रु. स्वयंवर, ६७३. **नाभीकारू**—अभय. पहा–' प्रतिष्ठान त्या नाभिकारीत निष्ठा'–मुक्तेश्वर, संक्षेप–रामायण, ४७०. आपण गोप व वासरें हरल्याबद्दल श्रीकृष्ण कदाचित आपणास शिक्षा करील, असें ब्रह्मदेवाला प्रथम वाटलें असावें. पण श्रीकृष्णानें त्याला अभय देतांच, मग त्यानें तातडतोब तीं गोपवासरें परत गोकुळांत आणलीं. **क्षेणा**—क्षणा.

**ओं. ४७८**—" सत्यलोकीं ( नेऊन ) अदृश्य अशीं बांधून ठेवलेलीं ( तीं वासरें ), जशीं होतीं तशीं जिवंत ( श्रीकृष्णाच्या ) दृष्टीस पडलीं. मग श्रीकृष्णानें तीं सर्व गोपवासरें मोजून पाहिलीं. " ब्रह्मदेवानें तीं गोपवासरें आपल्या सत्य-लोकांत अदृश्य-कोणाला दिसूं नयेत अशीं–बांधून ठेवलीं होतीं. तीं जशींच्या तशीं पुनः गोकुळाला आणलेलीं श्रीकृष्णानें पाहिलीं. मग हीं एकदा हरण केलेलीं व नंतर परत आणलेलीं गोपवासरें, पूर्वींइतकीं आहेत कीं नाहीं हें तपासून पाहण्यासाठीं श्रीकृष्णानें त्यांची मोजणी केली. चोरीचा माल पुनः ताब्यांत घेतांना मालकानें तो पुनः मोजून–तपासून घ्यावा त्याप्रमाणेंच श्रीकृष्णानें येथें केलें. **आलखतीं**—अलक्ष्य, अदृश्य. **उगानिलीं**—उगाणणें–हिशेब करून एकाद्याचा नीट निकाल लावणें. पहा–" आचाराचा उगाणा : जि ! कवणा

दीधला?"–उद्धवगीता १०९. "नाणी कांहीं मना। करुनि पापाचा उगाणा॥"–तुकाराम. **अमृतें**—जिवंत. (गोपवांसुरुवें याचें विशेषण). **दृष्टीं पातलीं**–दृष्टीला पडलीं.

**ओं. ४७९**—"मग देवांचा राजा अशा त्या श्रीकृष्णानें, ब्रह्मदेवाला (सत्यलोकास जाण्यासाठीं) निरोप दिला. ब्रह्मदेवानेंहि मग श्रीकृष्णाच्या पायाला लागून (पादवंदन करून पुढीलप्रमाणें) विनंति केली." **श्रीचक्रपाणी**—सुदर्शन चक्रधारी श्रीकृष्ण. पण येथें महानुभावांच्या पंचकृष्णांपैकीं द्वारावतीचे चांगदेव राउळ उर्फ चक्रपाणि यांचीही पर्यायानें सूचना केली आहे. **पाठवणी देणें**—निरोप देणें, जाण्यास परवानगी देणें. **विणविता जाला**—विनविता झाला.

**ओं. ४८०**—येथून ओं. ४८६ पर्यंत, ब्रह्मदेवानें सत्यलोकास परत जाण्यासाठीं श्रीकृष्णाचा निरोप घेतांना त्याची केलेली विनवणी वर्णन केली आहे. "हे कैवल्यदान करणाऱ्या श्रीकृष्णा! तूं माझ्या मनांत सदैव असावास व माझ्या डोळ्यांस सर्वदा दिसावास एवढें (माझें म्हणणें) ऐक." **अवधारणें**—ऐकणें. पहा–"जाण अवधारितु स्थानिचे : जे भावरीय शब्द-ब्रह्मीचे"–नरेंद्र, रु. स्वयंवर ३८. **कैवल्यदानी**—याच्या स्पष्टीकरणार्थ ओं. ४७६ मधील 'कैवल्यपती' या शब्दावरील टीपा पहाव्या. परमेश्वर, जीं लीळादानें, संबंधज्ञान, ग्रहणादान व कैवल्यदान अशीं चार दानें देतो, त्यापैकीं 'कैवल्यदान' हें श्रेष्ठ प्रकारचें दान आहे. श्रीकृष्णाचें मनन व दर्शन आपल्याला घडावें, अशी प्रवृत्ति आपणास परमेश्वरानें द्यावी, असें ब्रह्मदेवाचें मागणें आहे.

**ओं. ४८१**—"ज्या भक्तांना तुझा योग घडला आहे, व जेथें तुझ्या कथेच्या श्रवणमननाचा प्रसंग नित्य घडतो, त्यांचा मला समागम दे!" ब्रह्मदेव येथें परमेश्वराच्या (श्रीकृष्णाच्या) नवविधा भक्तीपैकीं, श्रवणं कीर्तनं दास्यं, अशा कांहीं प्रकाराबरोबरच संतसमागमांचीही मागणी करीत आहे. **तुझा योगु**—तुझा लाभ. ज्या भक्तांना तुझा (परमेश्वराचा) साक्षात्कार झाला आहे, अशांचा संग देण्याबद्दलच ब्रह्मदेवाची ही प्रार्थना आहे. **कथेचा प्रसंगु**—श्रीकृष्णाच्या गुणांचें कीर्तन व श्रवण ज्या संताच्या ठिकाणीं चालतें, त्यांचें जीवाला दर्शन देऊन, त्याच्याकडून सेवा, दास्य, निरूपण, श्रवण वगैरे करवून, परमेश्वर नेहमीं जीवाची पूर्व सृष्टींतील अयोग्यता नष्ट करीत असतात. त्यामुळें, जोडलेली

मागील सृष्टींतील अयोग्यता नष्ट होते. ब्रह्मदेव अशीच आपली अयोग्यता नष्ट करण्याची श्रीकृष्णास विनंति करीत आहे.

**ओं. ४८२**—" आपल्यांचा ( भक्तांचा ) समागम देऊन तूं ( अज्ञ ) जीवांचें अज्ञानांचें बंधन तोडून टाकतोस, व अशा रीतीनें अगाधाचाही अगाध असा तूं ( जीवांना ) सहज सुलभ होतोस. " महानुभाव तत्त्वज्ञाना-प्रमाणें, परमेश्वराला त्या जीवाविषयीं कणव उत्पन्न होते, व मग ते त्याला ज्ञान देतात. जीवानें पूर्वी जोडलेल्या कमीअधिक अयोग्यते-नुसार त्याला ज्ञान देण्याला कमीअधिक कालावधि लागतो, आणि म्हणूनच परमेश्वर, एकाच वेळीं सर्व जीवांना ज्ञान देत नाहींत. पण परमेश्वर जसें एकदम ज्ञान देत नाहींत, तसें सर्वांना ते आपल्या मुखानें ज्ञान देतात असेंही नाहीं. पर-मेश्वरावतार कित्येकांना स्वतः तर कित्येकांना एकाद्या अधिकरणाच्या मुखानें ज्ञान देतात. प्रस्तुत ओंवींत " आपल्या भक्तांचा संबंध देऊन तूं जीवांचें अज्ञान फेडतोस " असें जें ब्रह्मदेव म्हणतो, ते अधिकरणाच्या म्हणजे आपल्या भक्ताच्या द्वारा जीवाला ज्ञान देण्याच्या परमेश्वराच्या ( श्रीकृष्णाच्या ) स्वभावास अनुलक्षून आहे. **आपुलेआंचा**—भक्तांचा. **महामोहाचा**—अनादिकाळापासून अविद्या, अज्ञान, अधमतित्रय, जीवत्व इत्यादि अनेक दोषांनीं जिवस्वरूप ' बद्ध ' असल्याचें दिसून येईल. यांतील अविद्याबंध हाच सर्वांत मुख्य व दृढ असा बंध होय. त्याच्याचमुळें जीवाला खरेखुरें ' बद्धत्व ' आलेलें आहे. ' केवळ ' जीवस्वरूप अविद्येनें बद्ध असलें, तरी त्यापासून ' मुक्त ' होऊन ' कैवल्य ' बनून ईश्वर-स्वरूपाचा आनंद भोगण्याची पात्रता मात्र त्याच्या ठिकाणीं आहे. म्हणूनच जीवस्वरूप ' बद्धमुक्त ' ! म्हटलें जातें. ( महानुभाव तत्वज्ञान–पृ. ३०–३१ ) **बंधु**–बंधन. **फेडिसी**–दूर करिशी. **सुखलभू**–सुखानें लभ्य असा, सहजसाध्य.

**ओं. ४८३.**—" ज्याचें गुणसंकीर्तन ऐकून ( जीवाचें ) शरीर, मन व पंचप्राण शांत होतात ( संतुष्ट होतात ), त्या तुला हे कैवल्यपति ! प्रत्यक्ष पाहिल्यावर, कोण सोडून जाऊं शकेल ? " श्रीकृष्णाचें नयनमनोहर स्वरूप प्रत्यक्ष पाहिल्यावर ब्रह्मदेव मोहित होऊन, त्याला तेथून हलावेसें सुद्धां वाटेना ! हीच आपल्या मनाची विशिष्ट स्थिति त्यानें व्यक्त केली आहे. निराकार परब्रह्म, परमेश्वराच्या सगुण स्वरूपांत मनुष्यावतार धारण करून जर जीवाला दर्शन देईल, तर त्या परमेश्वरस्वरूपाला सोडून जाणें जीवाला फार कठिण आहे, हें येथें ब्रह्मदेवाच्या मुखानें स्पष्ट केलें आहे.

**ओं. ४८४.**—" पण तूं बोलशील तें करणारा असा असल्यानें, हे श्रीकृष्णा! (जीवांना) मोठाच लाभ (तुझ्यापासून) होणार आहे." असें म्हणून ब्रह्मदेवानें श्रीकृष्णापुढें साष्टांग नमस्कार घातला. परमेश्वरानें जीवावर अनुग्रह करण्याचें मनांत आणल्यास तो तसें खात्रीनें करणारा आहे, व याप्रमाणें जीवाला उद्धाराचा पारमार्थिक लाभ मिळतो, असा उल्लेख करून ब्रह्मदेव पर्यायानें आपला उद्धार करण्याचीच विनंति करतो. **लाभुसे**—लाभु+असे. यांतील 'अ' चा लोप झाला आहे.

**ओं. ४८५**—" श्रीकृष्णाच्या चरणांवर मस्तक ठेवून ब्रह्मदेव म्हणूं लागला, " हे श्रीकृष्णा! (या पुढें) मी तुझा झालेला असा राहीन, मग वाटेल तें कर." **मी असैनु श्रीकृष्णा! तुझा होता**—या पुढें मी सर्वस्वी तुझा अधीन झालेला असा वागेन. **होता**—झालेला. (भूतकाळाचा पूर्ण भूतकाळासारखा अर्थ) **ठाके**—लाहे, प्राप्त होये. पहा–' तया मज तो वाङ्महा पथुः केवि टाके'—ऋद्धिपुरवर्णन ७. मग तुला वाटेल तें, चाहील तें तूं कर. ब्रह्मदेव सर्वस्वी असहाय होऊन श्रीकृष्णाला शरण गेला आहे. ब्रह्मदेवाच्या या शरणागतीनें, हरिहरब्रह्मादि देवता परमेश्वराच्या कशा आधीन आहेत, हेंच दर्शविलें आहे.

**ओं. ४८६**—" (श्रीकृष्णाचा निरोप घेऊन) ब्रह्मदेव आपल्या सत्यलोकाला गेला व तेथें त्याच्या तोंडून श्रीकृष्णाच्या अद्भुत कृत्याचें वर्णन ऐकून देवांनीं श्रीकृष्णावर जयजयकारानें पुष्पवृष्टि केली." सर्व देव श्रीकृष्णाच्या चरित्रानें विस्मित होऊन, त्यांनीं पुष्पवृष्टीनें त्याचा गौरव केला.

**ओं. ४८७**—" इकडे श्रीकृष्णानें सर्व गोपाळांसह वनभोजन आटोपलें, व जीं वासरें चरत होतीं तीं त्यानें (एकत्र) आणलीं." **आरोगणा**—भोजन. पहा–' माझेनि हातेंविण : देवो न करीति आरोगण'—उद्धवगीता १२७. **चरुतें**—चरत. 'उ'कार पादपूरक आहे. **सारणें**—संपविणें.

**ओं. ४८८**—" मग पाव्याच्या सुसंबद्ध गाण्यांत हें चरित्र गात (असतां), श्रीकृष्णानें गोकुळांत गमन केलें." **पावेयाचेनि**—पाव्याच्या. श्रीकृष्णाच्या मरगज पाण्याचा उल्लेख, मागें ओं. ८१ मध्यें आलाच आहे. **सुसंदछंदें**—सुसंबद्ध छंदें, लयबद्ध गाण्यांत. आपण केलेल्या प्रस्तुत (ब्रह्मदेवाला शरण आणल्याच्या) अद्भुत कृत्याचें गीत, तो आपल्या पाव्यावर वाजवीत होता. **वींजे केले**—गमन केलें. श्रीकृष्णानें गोकुळांत प्रवेश केला. 'वीज्' (व्रज)

गतौ धात्पासून 'बीजें' हें रूप झालें आहे. पहा—" लेंकुरुवें जेवीतें असति : तंव गोसावी बीजें करीति "—श्रीगोविंदप्रभुचरित्र-५. **छंद**—गायनाचा प्रकार. पहा—" मग छंद गाउनि ताळ ठेविला : धृव-पदावरी-नरेंद्र, रुक्मिणी स्वयंवर, १८६.

**ओं. ४८९**—गोपाळांनीं घरोघरीं आपल्या आईबापांनां, आपण अघासुर-रूपी सापाच्या तोंडांत कसें पडलों, व श्रीकृष्णानें आपलें कसें रक्षण केलें तें सर्व वृत्त निवेदन केलें. **सांघेति**—सांगती. **आजि राखिलों** इ०—आज या श्रीकृष्णाकडून रक्षिले गेलों (असा कर्मकर्तरी प्रयोग येथें मानला पाहिजे). **मुरारी**—(तृ.)-मुरारीकडून. **नंदा कुमरें**—नंदाच्या मुलानें.

**ओं. ४९०**—गोपाक्ष घरोघर अघासुराचें कसें वर्णन देत होते, तें या ओंवींत सांगितलें आहे. " पर्वताप्रमाणें प्रचंड असा तो साप (श्रीकृष्णानें) सहज मारला. त्याचं नांव अघासुर असं देव (श्रीकृष्ण) म्हणत होता." वास्तविक त्या गोपाळांना त्या सापाचें प्रचंड शरीर पाहून विस्मय वाटला, पण त्याचें नांव (किंवा कोणा अघासुर नांवाच्या राक्षसानें हें सापाचें रूप धारण केलें आहे ही गोष्ट) त्यांना ठाऊक नव्हती. श्रीकृष्णानेंच त्याचें नांव 'अघासुर' असें सांगितलें. कंसानें कारस्थानासाठीं पाठविलेल्या या मायावी राक्षसाचें खरें स्वरूप श्रीकृष्णा-शिवाय कोण जाणणार ? गोपाळांना बिचाऱ्यांना त्यांतलें काय माहित असणार ? **विषारू**—सर्प.

**ओं. ४९१**—" हें (अघासुरवधाचें अद्भुत) श्रीकृष्णचरित्र ब्रह्मदेवा-कडून आपल्या सत्यलोकांत, नारदाकडून (श्री विष्णूच्या) वैकुंठांत, व देव-समूहांकडून (इंद्राच्या) अमरावतींत, अत्यंत प्रेमानें गाइलें जात आहे." **महिमानी**—मोठेपणा, थोरवी गाणारा. भगवंताचा महिमा गाणारा म्हणून नारदाची प्रसिद्धी आहे. श्रीकृष्णाचें गुणगान, सत्यलोकीं, वैकुंठांत व अमरावतींत गाइलें जात होतें, अशा वर्णनानें त्या त्या लोकांच्या अनुक्रमें ब्रह्मदेव, विष्णु व इंद्र या अधिष्ठात्री देवता, श्रीकृष्णाच्या (परमेश्वराच्या) अपेक्षेनें कशा दुय्यम दर्जाच्या आहेत, हेंच महानुभावी मत येथें सूचित केलें आहे. **वेधें**-गोडीनें. **गाईजतुसे**—गांइलें जात आहे. येथून पंडित दामोदर प्रस्तुत हरिकथेचा महिमा ओं. ५०१ पर्यंत वर्णीत आहे.

**ओं. ४९२**—" आतापर्यंत परमेश्वरानें एकैका अवतारांत अनेक अद्भुत कृत्यें केलीं ! पण प्रस्तुत 'वत्सहरण' प्रसंगींच केवळ त्यानें एकाच वेळीं अनेक

गोपवासरांचीं रूपें घेतलीं." ! परमेश्वरानें आतांपर्यंत म्हणजे कृष्णावतारापर्यंत झालेल्या मत्स्यकूर्मादि सात अवतारांत जीवोद्धाराचीं अनेक कृत्यें केलीं. पण या श्रीकृष्णावतारांत ब्रह्मदेवानें गोपवासरें हरण करून देवाची परीक्षा पाहण्याचा घाट घातला असतां, श्रीकृष्णानें एकसमयावच्छेदानें त्या गोपवासरांची रूपें घेऊन, सत्यलोकांत व गोकुळांत अशा दोन्ही ठिकाणीं गोपवासरांचें अस्तित्व दाखवितांना ब्रह्मदेवाची जी तोंडफोड केली, ती मात्र परमेश्वराच्या या एकट्या श्रीकृष्णावताराचेंच वैशिष्टय होय. 'एकं सद्विप्रा बहुधा वदंति' या श्रुतीचा प्रत्यय परमेश्वरानें फक्त या श्रीकृष्णावतारांतच आणून दिला, असा कवीचा अभिप्राय आहे. **एकैकें अवतारें**—श्रीकृष्णावतारापूर्वींच्या मत्स्यकूर्मादि सात अवतारांत. **ययां एका**—या एकाच श्रीकृष्णावतारांतील प्रस्तुत वत्सहरणप्रसंगीं केलेल्या अद्भुत कृत्यांत. **रूपें बहुतें**—( ब्रह्मदेवानें ) हरण केलेल्या गोपवासरांचीं रूपें एकट्या श्रीकृष्णानें धरलीं, व ब्रह्मदेवाचा नक्षा उतरला.

**ओं. ४९३.**—" ज्या ( श्रीकृष्ण ) चरित्रानें सर्व देवांचा पिता असा ब्रह्मदेव देखील विस्मित झाला, त्याचा महिमा आमच्यासारख्या सामान्यबुद्धीच्या माणसांना वर्णन करतां येणार नाहीं." जेथें प्रत्यक्ष ब्रह्मदेव हतबुद्ध झाला, तेथें आपल्यासारख्यांची काय कथा ? अशी कवि विनयानें आपली वर्णनाक्षमता कबूल करतो. श्रीकृष्णकथेच्या महतीच्या दृष्टीनेंच कवीनें हा विनय व्यक्त केला आहे. **महिमा**—येथें हा शब्द स्त्रीलिंगी उपयोजला आहे, हें ध्यानांत धरण्यासारखें आहे.

**ओं. ४९४.**—येथून तीन ओंव्यांत प्रस्तुत कथा कोणत्या श्रोत्यांना अधिक आवडेल, त्या श्रोत्यांचा अधिकार वर्णन केला आहे. " हा भयंकर संसार तरून जाण्यासाठीं ज्यांनीं परमेश्वराची आराधना ( भक्ति ) केली असेल, त्यांच्याच मनांत ही श्रीकृष्णाची अद्भुत कथा घर करून राहील." सारांश जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटून मोक्ष मिळण्यासाठीं ज्यांनीं आर्ततेनें परमेश्वराची भक्ति केली असेल, तेच ही कथा श्रवण करण्यास खरे अधिकारी असून, त्यांच्याच मनावर ती जशी ठसेल, तशी इतरांच्या मनावर ठसणार नाहीं, असा कवीच्या म्हणण्याचा आशय आहे. **मनीं वसैलु**—मनांत राहील, मनांत बिंबेल.

**ओं. ४९५**—" ज्यांनीं जगांतील सर्व गोष्टींबद्दलची आसक्ती सोडून, श्रीकृष्णाच्या ठिकाणीं अत्यंत भक्ति धरली आहे, तेच ( भक्त ) लोक या ( प्रस्तुत ) श्रीकृष्णचरित्रानें संतुष्ट होतील, शांत होतील." सारांश जगांतील इतर सर्व

गोष्टींबद्दलची आसक्ती सोडून ज्यांनीं श्रीकृष्णाची अनन्य भक्ति धरली आहे, असेच भक्तजन प्रस्तुत कथाश्रवणास अधिकारी होत, असें पंडित दामोदराचें म्हणणें आहे. **निवृत्ती**—आसक्ति सोडणें, विरक्ति. ज्यांनीं सर्वसंगपरित्याग करून श्रीकृष्ण भक्तीच केवळ धरली आहे, तेच श्रोते या कथेच्या श्रवणाला खरे योग्य होत.

**ओं. ४९६**—" ज्यांचें मन, कामक्रोधमदमत्सरादि विषयांकडे जात नाहीं, व जे परमेश्वराचें केवळ सेवक आहेत, त्यांच्याच तोंडीं श्रीकृष्णाचें हें अद्भुत चरित्र राहील ( इतरांच्या नाहीं ). " ज्यांचें मन सहा विकारापासून मुरडून केवळ परमेश्वराच्या भक्तींतच स्थिरावलें आहे, अशाच भक्तांच्या तोंडीं प्रस्तुत कथा राहील, ते जेसे या कथेंचें विशिष्ट प्रीतीनें वाचन करतील, तसें इतर कोणी करणार नाहींत असा भावार्थ. **विषयीं**—काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर व दंभ अशा सहा विकारांच्या विषयांत. **न वचे**—जात नाहीं, गुंतत नाहीं. ज्याचें मन विषयव्यावृत्त झालें आहे, व परमेश्वर भक्तींतच रुजलें आहे, तोच अधिकारी श्रोतां होय. **परदैवाचे**—परमेश्वराचे.

**ओं. ४९७**—" श्रीकृष्णाच्या चरित्रश्रवणापुढें पृथ्वीवरील इतर तीर्थें, व्रतें, दानें इत्यादि पुण्य जोडण्याचीं साधनें, तुलनेलाही टिकत नाहींत, हें स्पष्ट करतात. माणसें तीर्थांत स्नान करून, अनेक तऱ्हेचीं व्रतें करून व सत्पात्रीं दानें देऊन पुण्य संपादन करतात. पण कवीचें म्हणणें असें कीं, पुण्य संपादनाच्या बाबतींत हीं तीर्थादि साधनें, श्रीकृष्णचरित्रश्रवणाशीं मुळींच बरोबरी करणार नाहींत. **सरीं न पावती**-बरोबरी पावणार नाहींत, योग्यता पावणार नाहींत. पहा मागें–" विरुळेआं शेखेसीं सरीसीं–"ओं. ३८९. किंवा–"विष्णुपुढें असुरजनीं कोणी वैरा टिके सरी करितां–" मोरोपंत–विराटपर्व. **तेतुली**–तितकी. **पवर्ती**–पवती.

**ओं. ४९८**—" एकट्या श्रीकृष्णाच्या चरित्राच्या श्रवणानें जीवाला जेवढी पवित्रता प्राप्त होते, तेवढी दुसऱ्या कोणत्याही क्षेत्रानें, यज्ञानें अथवा, यजनानें मिळत नाहीं." क्षेत्रवास, यज्ञयाग हे मनःपावित्र्याचे मार्ग, श्रीकृष्णचरित्रश्रवणापुढें कसें फिके पडतात, तेंच येथें अधिक स्पष्ट केलें आहे. कर्ममार्ग हा भक्तिमार्गापेक्षां खडतर असूनहि कसा कनिष्ट आहे, तेंच येथें तुलनेनें पटविण्याचा कवीचा प्रयत्न आहे. कर्ममार्ग व भक्तिमार्ग यांतील हा तौलनिक झगडा फार पुरातन कालचा असून, कवीनें भक्तीमार्गाकडील आपलें मत, व त्यांस असणारी आपली

मान्यता, कर्ममार्गाबद्दलची आपली अरुचि दाखवून मागें. ओं. १९२–१९६ यांमध्यें मांडलीच आहे. **पवित्रता**—परमेश्वराच्या चरित्रश्रवणानें प्रथम भक्ताच्या मनांत त्याच्याबद्दल आवड वाढून तिचें प्रीतींत रूपांतर होतें, व याच प्रमाचें पर्यवसान पुढें भक्तींत होतें. परमेश्वरानें जीवाच्या ठिकाणीं प्रेमसंचार केल्याबरोबर अगदीं तावडतोब त्याचे विकार, विकल्प व स्वभाव नाहींसे होतात. याप्रमाणें परमेश्वराच्या चरित्रश्रवणानें जीवाला मानसिक पवित्रता जशी प्राप्त होते, तशी तीर्थादिकांनीं होत नाहीं.

**ओं. ४९९**—येथें कवि हटयोग व भक्तियोग यांमधील विरोध स्पष्ट करून दुसऱ्याचें उत्तमत्व सिद्ध करीत आहे. " इडा, सुषुम्ना पिंगला इत्यादि नाड्यांचा निरोध करून त्यायोगें साधकानें निरनिराळ्या सिद्धी (अष्टसिद्धी) प्राप्त करून घेतल्याचें आपण ऐकतों. पण श्रीकृष्णाच्या चरित्रश्रवणानें त्या परमपुरुषाची भक्ति भक्ताला (सहज) प्राप्त होते. **धमनीचिआं कोंडी**–आपल्या शरीरांत इडा व पिंगला या दोन क्रिया आहेत. शरीराला होणाऱ्या स्पर्शाचें ज्ञान मेंदूस कळविणें, हें काम इडा करते, तर मेंदूचे व्यापार सर्वत्र पोंचविण्याचें काम पिंगला करते. ज्या वायूच्या योगानें इडेची क्रिया चालते त्यांस अपानवायु, व ज्यानें पिंगलेची क्रिया चालते त्यांस ऊर्ध्ववायु म्हणतात. इडा व पिंगला यांमधील मार्गास सुषुम्ना म्हणतात. नेहमींच्या स्थितींत अपान व ऊर्ध्ववायूंचें दळवळण सारखें चाललेलें असतें. यामुळें इंद्रियव्यापारास षट्‌चक्रांच्या प्रोत्साहनानें गति मिळते. अपानवायु व ऊर्ध्ववायु यांचा निरोध करून गुदद्वारापासून तों टाळूंतील ब्रह्मरंध्रापर्यंतच्या सुषुम्नेच्या मार्गांत, प्राणाची–कुंडलिनीची–गति होणें, यालाच षट्‌चक्रभेदन होऊन साक्षात्कार होणें म्हणतात. हें योगसाधन करीत असतांनाच योग्याला अणिमालघिमादि सिद्धी प्राप्त होतात, व त्या त्याच्या मनास मोह पाडून त्याच्या ब्रह्मैक्याच्या ध्येयापासून त्याला परावृत्त करीत असतात. हठयोग्याला भक्तापेक्षां योगसिद्धी किंवा योगचमत्कार यांची प्राप्ति होते, हें खरें आहे. पण हें त्याचें खरें उद्दिष्ट नव्हे; त्यांतच तो गुरफटून बसेल तर तो ध्येयच्युत होऊन त्याचें सर्व साधन फुकट जाईल. म्हणून अशा योगसामर्थ्यानें मिळणाऱ्या इंद्रपदांना देखील वाटमारें अशी सज्ञा ज्ञानेश्वरींत दिली आहे. पहा–" तया महेंद्रादिपदें । करिताति वाटवधें । आणि ऋद्धिसिद्धीची द्वंद्वें । पाडौनि ठाती ॥ ६१॥–ज्ञानेश्वरी अ. १२. **केलिया फळेंचि देतां**–हठयोग

आचरीत असतां मध्यंतरी योग्याला आणिमालघिमादि अष्ट महासिद्धि प्राप्त होतात, त्यांचाच उल्लेख येथें केला आहे. अशा सिद्धी योग्याच्या ब्रह्मैक्याच्या मार्गांत अडथळा आणतात, म्हणून हा हठयोग जितका कष्टतर तितकाच फसवा आहे. उलट भक्तिमार्गांत परमेश्वराच्या चरित्राचें श्रवण होऊन त्याच्या योगें त्या परम-पुरुषाची भक्ती जडते, असा या दोन मार्गांतील अनुक्रमें शारीरिक व अध्यात्मिक भूमिकेचा फरक या ओंवींत सूचित केला आहे.

**ओं. ५००**—श्रीकृष्णाच्या अवतारद्वारां परमेश्वरी दानाचें प्रकार येथें सांगितले आहेत. अवतारधारी हें दान 'वेधेंचि देति कां बोधेंचि देति.' आणि हे वेध 'दृक्-स्पर्श-आलाप व अंतःकरण' या क्रमानें संचरतात. **सुरगणां**—देवसमूहाला. श्रीकृष्णांनीं कसा वेध लावला तें ब्रह्मदेवाच्या उदाहरणावरूनही समजण्यासारखें आहे. **निजबोधु**—ज्ञान अथवा बोध देणें म्हणजे जीव, देवता, प्रपंच, व परमेश्वर यांची यथार्थ कल्पना अधिकारी मनुष्याला आणून देणें. श्रीकृष्णानें आपल्या भक्तांना–उद्धवार्जुनासारख्या भक्तांना आपल्या परावाणीनें स्वस्वरूपाचा बोध दिल्याची साक्ष, उद्धवगीता व श्रीमद्भगवद्गीता, या दोन गीता देतच आहेत. श्रीकृष्णानें वेध, बोध व परमानंद यांचा आपल्या अवतारांत सुकाळ केला, असा सामान्यतः भावार्थ.

**ओं. ५०१**—पंडित दामोदर विनयानें येथें नेणतेपण स्वीकारून आपल्या महंत श्रोत्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत आहे. "ज्या (श्रीकृष्णाच्या) महिम्यानें हरिकथेचें अमृत कानांना प्राप्त झालें आहे, तो (महिमा) मी न कळतां (कसा तरी) वर्णिला असून तो महंत श्रोत्यांनीं संतोषानें मानून (गोड करून) घेतला आहे." **श्रवणामृता**—'श्रवणा अमृता' असे निरनिराळे शब्द पाहिजेत. कानांना हरिकथारूपीं अमृत प्राप्त होतें. अमृतासारखी मधुर व अमर करणारी हरिकथा ऐकावयास मिळते. **नेणता**—न समजतां. आपणास परमेश्वराच्या महिम्याचें यथार्थ ज्ञान नसतांनाही आपली कथा श्रोत्यांनीं गोड मानून घेतली हा त्यांचा मोठेपणा आहे, असा आपल्या श्रोत्यांचा गौरव ज्ञानेश्वरांप्रमाणेंच आमच्या कवीनेंही येथें केला आहे. **महंत**—महनीय अशा श्रोत्यांनीं. नाग-देवाचार्यांसारख्या महंतत्व पावलेल्या श्रोत्यांनीं. मागें ओं. ५ मध्यें नागार्जुनादि महंतांना कवीनें नमन केलें आहेच.

**ओं. ५०२**—कवीनें शेवटीं ज्ञानेश्वरांच्या प्रमाणेंच सर्व भक्तभाविकाबद्दल एक सात्विक आकांक्षा व्यक्त करून ठेवली आहे. पण " दुरिताचें तिमिर जावो। विश्वस्वधर्मसूर्यो पाहो। जें जें वांछील तें तें लाहो। प्राणिजात ॥ " ही ज्ञानेश्वरांची सदिच्छा, पंडित दामोदराहून अधिक व्यापक व बहुजनसमाजसापेक्ष वाटते; तर पंडित दामोदर केवळ श्रीकृष्णभक्त व आपल्या कथेचे श्रोते, यांच्याच कल्याणाची अधिक काळजी वाहत आहे, असें ही ओंवी वाचून समजूत होते. **आनंदतु**—सर्व श्रीकृष्णभक्तांना परमेश्वराचा आनंद प्राप्त होवो. **निर्मळ**—आपली 'वच्छहरण' ही हरिकथा श्रवण करण्याऱ्या श्रोत्याचें मन निरनिराळ्या (कारणमळ, कार्यमळ, अंतःकरणमळ, इंद्रियमळ, तत्त्वमळ, धातुमळ, प्रकृतिमळ, विषयमळ, देवतामळ इत्यादि) मळापासून रहित होवो. अशा मळांचा संसर्गही त्यांच्या मनाला न होवो. **भणे मुनी** इ०—याबद्दल मागें ओं. ६ मध्यें स्पष्टीकरण केलेंच आहे.

**ओं. ५०३**—ही कवीची शेवटची प्रार्थना कवीनें सर्वसाधारण श्रोत्यांना केली आहे. **हा सारासार** इ०—आपलें कथानिरूपण म्हणजे नित्यानित्यवस्तुविवेकच आहे, असें कवीचें सांगणें आहे. प्रस्तुत कथा जरी पौराणिक असली, तरी तिच्यांत प्रामुख्यानें नित्य वस्तु कोणती अनित्य कोणती इत्यादि पारमार्थिक विचार झाला आहे, हें कवीनें स्पष्ट करतांना प्रस्तुत कथा रचण्याचा आपला अंतिम अध्यात्मिक उद्देशच पर्यायानें मांडला आहे. **सारासार वस्तु**—महानुभाव तत्वज्ञानाप्रमाणें जीव, देवता, प्रपंच (जगत्) व परमेश्वर या चार वस्तु गृहीत धरल्या असून, जीव-बद्धमुक्त, देवता–नित्यबद्ध, प्रपंच–अनित्य व परमेश्वर–नित्यमुक्त असें त्यांचें स्वरूप सांगितलें आहे. प्रस्तुत 'कथें'त, पंडित दामोदरानें याच तत्त्वांच्या अनुषंगानें आपल्या विवेचनाचा विस्तार केला आहे. तथापि कवीनें आपल्या नांवाचा येथें स्पष्ट उल्लेख केला आहे, हें या शेवटच्या ओंवीचें वैशिष्ट्य असून, तिच्या लेखनामागील इतिहास ओं. ६ वरील टीपांत देण्यांत आलाच आहे. **श्री परधर्में**—भक्तीनेंच परमेश्वराचें स्वरूप ओळखतां येतें, व भक्तिमार्ग हाच श्रेष्ठ मार्ग किंवा परधर्म आहे, असें कवीचें ग्रंथसमाप्तिकालीं निवेदन आहे. महानुभावपंथालाही परमार्ग असें नांव असून, त्यांत भक्तीला दिलेल्या प्राधान्यावरून, 'भक्ति' हाच परमेश्वरज्ञानाचा श्रेष्ठ धर्म ठरतो. **महामोक्षैकसाधने**—भक्ति किंवा वर उल्लेखलेला

परधर्म हाच मोक्षाचें एकमेव साधन आहे, असें कवीचें मत आहे. **श्रीनागार्जुनाचेनि** इ०—पंडित दामोदर हा नागदेवाचार्यांचा शिष्यच असल्यामुळें, त्यांच्या उपदेशानुरूप (त्यांच्या आज्ञेनें) प्रस्तुत कथा आपण रचल्याचें तो येथें स्पष्ट करीत आहे. यावरून नागदेवाचार्यांचा उपदेश घेतल्या-नंतर प्रस्तुत काव्य त्यानें रचलें असल्यानें, कवीनें महानुभाव तत्त्वज्ञानाच्या जागजागीं केलेल्या परिस्फुटतेचा ग्रंथही आपणास सहज लागतो.

# कठिण शब्दांचा कोश.

( शब्दार्थापुढें दिलेले आंकडे ओंव्यांचे आहेत. )

अ

**अग्निस्तंभन**—कामाग्नि किंवा विरहाग्नि प्रशांत करणें ३७०.

**अघवे**—सर्व, पुष्कळ १०३.

**अंगद**—बाहुभूषण ३६०.

**अंगाथिणें**—अंगावर घालणें १७८.

**अणंगु**—मदन १६२.

**अतिप्रसंगु**-ग्रंथविस्तार, अतिरेक ६२.

**अध्वर**—यज्ञ २०१.

**अनुवाद**—पुनरुच्चार ७.

**अंतराल**—आकाश ९०.

**अरुते**—एकीकडे, अलिकडे १९४.

**अर्धांग**—पत्नी १७८.

**अवक्रिया**—उपहास, फजिती ३५१.

**अवगणे**—सोंग घेणें, वेष धारण करणें २९०.

**अवदीप्ती**—तेज, प्रकाश, ज्ञान १२२

**अवधारणें**—ऐकणें ४८०.

**अवेळ**—विलंब ३९२.

**असासित**-आवेशानें, अकस्मात् ३४९

आ

**आखर**—गांवाजवळची जमीन ६७.

**आगळी**—अगाऊ, भलती ३९०

**आंगवण**—सामर्थ्य ९४.

**आड पडणें**—मुरकुंडी वळणें. २१७.

**आणुआणी**-भिन्न भिन्न १५९.

**आत्मतत्त्व**-ब्रह्मज्ञान ४११.

**आथी**—आहे ४२.

**आधाडा**-तुटलेला कडा, आडमार्ग ३२१

**आन्तौरे**—स्त्रिया ५८.

**आंदोळणें**—झोके घेणें १३५.

**आपणपें**—आपणहून ९३.

**आरिख**—आर्ष १७.

**आरु**—आवार, अंगविस्तार १३९.

**आरोगन**—भोजन २४६.

**आलखती**—अलक्ष्य, अदृश्य ४७८.

**आसु**—इच्छा २५३.

**आळि**—हट्ट २९६.

उ

**उगानिणें**—हिशेब करून नीट निकाल लावणें ४७८.

**उचलणि**—उत्थान १७९.

**उजिडणें**—तुटणें, निराळा होणें ३३८

**उजुवाट**—सरळ रस्ता ९७.

**उठाविणें**—उठाव होणें ५२.

**उत्पवन**—उड्या ८६.

**उधाणे**—उत्कर्ष पावणें १५८.

**उन्मीखें**—पापणीला पापणी न लावतां ७३.

**उपसाहणे**—क्षमा करणें ३८०

**उपहोडणें**—उठणें ३११.

**उरंगणें**—विटणें, हीन रंग होणें २९.

ओ

**ओडजा**—कौतुकभाव दर्शविणारा ६८.
**ओडवणें**—प्राप्त करणें ४६३.
**ओतवरा**—उत्कर्ष १५४.
**ओरसणें**—पान्हा फुटणें ३०५
**ओहरतें**—निमुळतें ३२३.
**ओळणें**—पाझरणें ३२६.
**ओळगणें**—आश्रय करणें, सेवा करणें २०७.

क

**कपाट**—दार, दरवाजा ९७.
**कलप**—कळप ७५.
**कहीं**—कधीं ३६७.
**कामारि**—काम करणारे चाकर २७८
**कांबरी**—कबऱ्या रंगाची २८०.
**किडरू**—साप १०४.
**किळ**—तेज, प्रभा १७७.
**केवाळु**—बारिक वाळु १७७.
**केसनी**—केवढी ३८८.
**कोडिसवाणें**—सुंदर, चांगलें ४०७

ख

**खगपति**—गरुड ३८९.
**खद्योत**—काजवा ३८७.
**खीरारी**—खिल्लारी, गवळी ३१७.
**खेडकुळिया**—उद्यानांतील पाण्याचे लहान हौद १५९
**खेवनी**—जडण २४२.

ग

**गजबजणें**—घाबरून जाणें, गोंधळ उडणें, १११.
**गुण**—कापसाची वात २३.
**गुणवणें**—मोजणें ४०५.

घ

**घाअे पडणें**—जखमी होणें ४३५.
**घेरणी**—विळखा ४४९.

च

**चतुरानन**—ब्रह्मदेव ३४५
**चुके**—ओरडे ३६८
**चोखाळणें**—शुद्ध होणें ४११
**चोखाळपण**—निर्दोषत्व १२

छ

**छंद**—गायनाचा एक प्रकार ४८८

ज

**जंघा**—पोटऱ्या, पिंढऱ्या २२३
**जाउपे**—वत्स २८२
**जामुन**—काळें २८६
**जिंतिणें**—जिंकणें ५२
**जोहर**—अग्निप्रलय १०९

झ

**झांका**—समूह १४३
**झाडौली**—झाडांचा समूह ४४४

ट

**टाळघोळ**—झांजा वगैरे वाद्यांचा गजर ८४
**टेकळिया**—टेकड्या ९७

ठ

**ठाकणें**—पटणें, प्रत्यक्ष होणें ९५
**ठीकलग**—रत्नजडित १७८
**ठेली**—राहिली ४८

ड

**डंकणें**—दंश करणें ४४९

**डांगा**—काठ्या ७०.

**डिंभ**—मूल ३०५.

**डोडपण**—पुंडावा ४४७.

**डोळस**—सुंदर ६४.

ढ

**ढोंक**—पक्षिविशेष १८१.

त

**तगर**—मेंढा ८६.

**तडवा**—पाल उभारण्यासाठीं वापरलेली दांडी १०६

**तढे पडणे**—तटस्थता, साभिनिवेश दृष्टि होणें. २३६.

**तारपी**—वाद्यविशेष ७०.

**तारसें**—तिरकस डोळ्याचें २८५.

**ताराण**—सामर्थ्य ३७९.

**तितुरवाउल**—तित्तिरपाऊल ८७.

**तिर्यंचें**—पशुपक्ष्यादि १२३.

**तृणचरें**—जनावरें, वासरें १२१.

**तेसनी**—तेवढी १०४.

**तोकडे**—थोडके २४.

**तोखणें**—संतुष्ट होणें.

**तोडर**—पादभूषण–८१.

थ

**थोरी**—मोठेपणा, श्रेष्ठता. ३९०.

द

**दंडीचे**—तंतुवाद्याचे ३१३.

**दाखाळा**—पडताळा ३६६.

१४

**दाटणें**—गर्दी करणें १७०.

**दातारु**—धनी १८.

**दावानळ**—वणवा ४५०.

**दी**—दिवस १३३

**दीघडे**—उंच, दीर्घ २८६

**दूधपीरू**—दूध पिणारा ३०६

**दूधवडीची**—दूधवड देशाची २८०

**देखोवेखीं**—पाहतां पाहतां १०२

**दोषें**—उद्देशानें, करितां, सांठीं १३३

ध

**धमनी**—नाडी ४९९

**धरणें**—आवरणें ३०५

**धाडी घालणें**—स्वारी करणें, हल्ला करणें ११०

**धातु**—पिवडी, काव, गेरु ७७

**धापासिया**—धापा टाकणाऱ्या ३२४

**धुधुवातणें**—फूत्कार टाकणें ४४९

न

**नटणा**—नाटक, बहाणा २६०

**नवाई**—नाविन्य २५७

**नवाळी**—प्राप्ती ४५३

**नागारि**—स्तुतिपाठक ३१४

**नाभीकारू**—अभय ४७७

**निधान**—भूमिगत द्रव्य ११

**निभ्रांती**—खात्रीनें, निश्चयपूर्वक २५२

**निरवधि**—अमर्याद १९

**निरालंब**—निराश्रय १४८

**निरौते**—पूर्णपणें ९

**निर्मळ होणें**—स्पष्ट होणें ११४

**निर्वाण**—ब्रह्माशीं ऐक्य पावण्याचा मोक्ष १२

**निऱ्हा**—अगदीं २५
**निवाडु**—भिन्नता, भेद १८२
**निशानी**—सोपान, शिडी ४४
**निहटीं**—जवळ २४४
**नीड**—नीट २०३
**नीवाविणें**—शांत करणें ४५
**नींवलोण**—दृष्ट काढण्यासाठीं द्याव-याचे कडुनिंबाचीं पानें, मीठ मोहरी इत्यादि पदार्थ ३०९
**नेटकें**—सुंदर, रेखीव ४८

### प

**पढळ**—पटल, पडदा २३८
**पढिअे**—आवडता ४७
**पढियासणें**—भासणें १७१
**पद्मिणी**—सूर्यविकासी कमल २६
**परगुणें**—उटणें ३०८
**परिअे**—झोके ६४
**परिवट**—कडोसरी २२६
**पवाडे**—यशोवर्णन १४
**परिहार**—निरसन ८
**पसाअेदान**—प्रसाददान ८८
**पहुडणें**—निद्रा घेणें ३१०
**पाईकपण**—चाकरी २२५
**पाजातिक**—पारिजातक १३८
**पानिअेडा**—पाणोठ्यावर १८७
**पांतिकर**—पंक्तीस बसणारे २११
**पावळी**—अशक्त, कमकुंवत ७५
**पारडी**—मलीन वर्णाची २८१
**पारुखणें**—कुंठित होणें. २५१
**पालखत**—मांडी १८७
**पालुक**—पाळणा ५९
**पासवडा**—आच्छादन ३१०
**पाहोनरू**—पाहुणेर, आतिथ्य ३०६
**पाळांतणें**—न्याहाळणें, अवलोकणें १८८
**पाळायिणें**—न्याहाळून पाहणें ३९९
**पुडुरा**—पुरवठा, पुरवणी १३०
**पुंडी**—शुभ्रमुखी असून पीतवर्णी २८१
**पुलिन**—वाळवंट १९९.
**पूर्वधरी**—पूर्वापार चालत आलेला; सनातन ३८०.
**पेंडारी**—दैत्यांचा शत्रू ८३.
**पेंधा**—स्थूळ.
**पोमिनी**—पद्मिनी २१२.

### फ

**फडतरीं**—फोडी, कापण्या ३८५.
**फणिकु**—नाग, सर्प १८६.
**फिटणें**—नष्ट होणें ३७६.
**फूटा**—शेला २३३.
**फेडणें**—कमी होणें ११२

### ब

**बंबाळणें**—मोठा आवाज करणें ३२०
**बरवेपणा**—सौंदर्य ४८
**बाउलीं**—टिकल्या, चित्रें ७७
**बागडा**—मस्कऱ्या ६८
**बांदौडि**—बंदिवास ४३८.
**बाहाकणें**—सुगंध पसरणें ७७.
**बिरणें**—गुंफणें २४४.
**बिरुदावलि**—पराक्रममालिका ३९०.
**बीजे करणें**—गमन करणें ४८८

**वेले**—दुफाटी, डिरी २१३.
**वैकार**—पवाडे २८.
**वोल**—दोष, शब्द ३७८.
**ब्रह्मकटाह**—ब्रह्मांडरूप कढई ४४३.
**ब्रीदें**—बाणा, बिरुदें. ८१.

### भ

**भणऔनि**—म्हणून १९.
**भद्रजाति**—हत्तीची एक जात. ४४६.
**भुरळें**—उलट्या बाहुल्याच्या डोळ्याचें २८५.
**भूलि**—अपराध ३७८.
**भेडाविणें**—भिवविणें ५२.
**भोगावती**—पाताळगंगा ३४.

### म

**मकरकुंडलें**—मगराच्या आकाराचीं कानांतील कुंडलें ३६०.
**मज पांता**—मला वाटतें ३०६.
**मांजिरी**—तुरा, मोहर २११.
**मरगज**—पाचू रत्न ८१.
**मशक**—घुंघुरटें ३७९.
**मसी**—शाई ७७.
**महिमानी**—मोठेपणा गाणारा ४९१.
**मातु**—गोष्ट २४०.
**मादन**—उष्णोदकाचें स्नान ३०८.
**मानवणें**—संतुष्ट होणें १५.
**मालगंठी**—पतिंवर २२४.
**मिठी देणें**—गिळणें १०३.
**मिरवणी**—शोभा ३६०.
**मीनणें**—मिळणें ६९.
**मीलखें**—डोळ्यांची उघडझाप करणारें २८५.
**मुकुटपाटवर्धन**—श्रेष्ठ प्रतीच्या मुकुटानीं विराजमान ३६१.
**मुखरी**—पुढारी, प्रमुख ६९.
**मेळणें**—मळणें १०२.
**मोकारा**—मोकळीक १३१.
**मोप**—पेटी, भांडार १३७,
**मोहरी**—पुंगी, मुरली ७०.

### र

**रसना**—जीभ ९७.
**राळेया**—विनोद, थट्टा २१६.
**राउळ**—राजमंदिर २६४.
**राखोंडें**—औंठ तुटकें २८६.
**राजवल्लभ**—राजायोग्य वस्त्र ८०.
**रापदाळिया**—अंगविक्षेप, शरीरचेष्टा २१६.
**रिगणें**—शिरणें १०२.
**रीगावा**—शिरकाव ४१३.
**रुद्र**—रौद्ररस ५२.
**रुळणें**—हालणें ८०.
**रूंझी**—हर्ष ८८.
**रूपकें**—चरित्रपर गाणीं ३१३.
**रोदेची**—रोद देशाची २८०.
**रोमकूप**—शरीराच्या कातडीवरील बारीक भोंकें ३७२.
**रोवंतणें**—रंवथ करणें १४२.

### ल

**लाहासि**—राक्षसी ४४६.
**लोभाळुपणा**—वात्सल्य.

व

**वचणें**—जाणें ११.
**वडप**—वृष्टि १३७.
**वरगण**—वाटणी ४२१.
**वरिपडे होणें**—प्राप्त होणें.
**वर्णुक**—उपमान १४.
**वस्तु**—परब्रह्म २१.
**वाइणें**—वाजविणें ८४.
**वाणणें**—वर्णन करणें ८.
**वातणें**—वाजणें ३५४.
**वामा**—ठेंगणा ६८.
**विखारू**—सर्प ५२.
**विग्रह**—शरीर १.
**विचारणें**—विचार करणें १०२.
**विचंविणें**—विटंवना होणें ४३४.
**विदारणें**—फाडणें ३५०
**विद्यावंत**—गायक, स्तुतिपाठक ३१३
**विनतंकंकधरें**—खालच्या मानेनें ३८६
**विभांडणें**—फोडणें ४३४.
**विरुळा**—पाणसर्प ३८९.
**विवरणें**—विचार करणें ३४७.
**विषारु**—सर्प ४९०.
**विज्ञान**—परमेश्वराची अद्भुत चमत्कार करून दाखविण्याची शक्ति ३०३.
**वीजणें**—पंखे ३१०.
**वीरगुंठी**—केसांचा झुंबाडा ८०.
**वेठी**—तुरा ७८.
**वेध**—आवड, लोभ ३४.
**वेंभळें**—स्थूल दृष्टीचें २८५.
**वेंली**—लांब गाणें ८५.
**वेल्हाळ**—सुंदर ६४.
**वोडवणें**—पुढें करणें १५.
**व्याकुलपण**—दुःख, चिंता ३४८.

श

**शाका**—पालेभाज्या २०९.
**शेख**—शेष, नाग, ३८९
**श्रीवत्सलंछन**—विष्णूच्या हृदयावरील पांढऱ्या केसांचा भोवरा ३६१.
**श्लेष**—उपमेय १४.

स

**सांनिधान**—प्रत्यक्ष सहवास ११४.
**संभ्रमु**—उत्साह, समारंभ २९०.
**सरते**—ग्राह्य, मान्य ४६.
**सरी**—बरोबरी ३८८.
**सरीसि**—बरोबरी ३८९.
**सवैल**—सांगाती, सोबती ८३.
**सहवाणु**—संवाहन, पाय चोळणें, घासणें ३०९.
**साउमे**—समोर ७५.
**साच**—खरें २०४.
**साटका**—ताटकेसारखी असलेली रावणाची एक बहीण ३७०
**साडे पहर**—चोख सोनें २९.
**साद्रव**—सुगंधित १३०
**सांभाळणें**—जाणीव असणें ३९०
**सारणें**—संपाविणें ४८७.
**सावरणें**—आवरणें ३२७.

**साहान**—सैन्य ३६४
**साहानुक**—सांप्रत २६८
**सुरवाडु करणें**—सुखांत ठेवणें २६४.
**सुहावें**—आवडीनें ८४
**सुहावी**—शोभिवंत ३१३
**सूणें**—घालणें, ठेवणें ५९
**सूदणें**—घालणें १०३
**से**—आठवण, स्मरण ३४५
**सेखी**—शेवटीं २६८.
**सोज्वल**—निर्मल, स्वच्छ ७६.
**सोनेखैरी**—सोनेरी, पिवळी २८०
**सोनेसळा**—जरीच्या धारा असलेलें वस्त्र. ७९
**सोवाण**—सोपान १४५

### ह

**हमामा**—वांकून पोटांत कोपर दडपणें व हांसणें ८५.
**हाकारणें**—बोलावणें ४२५.
**हाटक**—सोनें. ८१.
**हातखोडा**—हात अडकवण्याचें लाकडी यंत्र ४३३
**हातिरु**—हत्ती १८६
**हुंबर**—गळफांस ४३३
**हुंवळी**—नाचत गाल फुगवणें व मुठीनीं गाल-फुग्यावर मारणें. ८५.

### क्ष

**क्षीरोदक**—पांढरें शुभ्र वस्त्र. ३१०.
**क्षुद्रघंटिका**—घागऱ्या २२५.

ग्रंथालय ... क्र. ८०८२ ...

# परिशिष्ट

## ' वच्छहरणा 'च्या भाषेस लागू पडणारे भाषाशास्त्राचे सामान्य नियम

—:◆◆◆:—

(१) यकारांत व हकारांत विरहित, अकारांत नामें अथवा विशेषणें उकारांत होतात. उदा०–परिहारु (८), दूषणु (९), अखंडितु (२५), सुखाडु (२६४).

(२) ष किंवा क्ष च्या ऐवजीं ख येतें. उदा०–संतोखती (२४), मनुष्यवेखें (६३), पाखवां (१८६), हर्खु (११३).

(३) ज्या शब्दांत रेफयुक्त ष आहे, त्यांतील षबद्दल ख होऊन रेफाबद्दल त्याच्यामागें रि किंवा री येते. उदा०–आर्ष–आरिख (१७).

(४) ऋ चा अ, इ, उ, होतो. उदा०–ऋजुकारे–उजुकारे (१५१), बृहत्–बहत (२८३), दृष्टी–दिर्शी (११), वृंदावनमार्गी–वंदावनमार्गी (९२).

(५) प ज्यावेळीं शब्दाच्या आरंभीं नसेल, तेव्हां त्याचें व होतें. उदा०– आपणपें–आपणवें (९३), सोपानीं–सोवाणी (१४५).

(६) संस्कृतांतील 'प्रति' करितां 'पढि' किंवा 'पडि' येतें. उदा०—पाढिआसलें (१७१) पडिसाद (३५४).

(७) शब्दांच्या आरंभीं ट नसतां त्याचें ड होतें. उदा०—पाटल–पाडळ (१५६) कोटी–कोडी (३७२) नीटें–नीडे (२०३)

(८) शब्दारंभीं न नसल्यास त्याचें ण होतें. उदा०—मानिजे–माणिजे (२९१) गोपांगना–गोपांगणा (३३)

(९) श, ष, बद्दल स येतें. उदा०—दाषें–दोसें (१३३). यशोदा–जसोदा (५२) शिंग–सिंग (७०) अशासित–असासित (३४९).

(१०) त्य चा च होतो, व च्च बद्दल च्य येतें. उदा०=सत्य–सच–साचु (२४७), मंगलोच्चारु–मंगलोच्यारु (३१५).

(११) ज्या दोन व्यंजनांचें एक जोडाक्षर होतें, त्यांपैकीं एकांत किंवा दोन्हींत मध्येंच स्वर येऊन मिळतो. उदा०–ब्रीद–बिरुद (१७५), उष्टें= उसिष्टें (२५३, त्राण–ताराण (३७९), जीवन्मुक्त–जीवनमुक्त (२७२).

(१२) जोडाक्षराकरितां साधें अक्षर येतें, व असें होतांना जोडाक्षरामागें असणारा वर्ण दीर्घ होतो. उदा०–प्राजाक्तिक–पाजातिक (१३८) प्रसाददान पसाअेदान (३१४), कर्मकारी–कामारी (२७८) पंक्तिकरी–पांतिकरी (२११).

# शुद्धिपत्र

## मूळ संहिता

| पान | ओंवी | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ५ | २५ | होअ | होअे. |
| १२ | १०७ | सर्पमुखामाजी | सापमुखामाजी |
| १७ | १६२ | श्रीमंत–सुंदर | श्रीमंत–सुंदरू |
| १८ | १७० | अंतकरणी | अंतःकरणी |
| २० | १८६ | मुग | मृग. |
| २१ | २०२ | ब्रह्य–रसे | ब्रह्म–रसे. |
| २६ | २५८ | जेवं | जंवं. |
| २७ | २७२ | तआते | तेआतें. |
| ३२ | ३१९ | आपणेआते | आपणपेआतें. |
| ३३ | ३३६ | जै | जैं. |
| ३६ | ३६४ | सकलहाहान | सकलसाहान. |
| ४२ | ४३७ | बंध मोक्षु | बंधमोक्षु. |
| ४४ | ४५० | वशजाली | वश जाली. |
| ४६ | ४७५ | जयाव्यथा | जयाव्यया. |

REFBK-0008082
8082